COMMENTARY

ON THE

GOSPEL ACCORDING TO LUKE

Library of the Theol. Seminary
Princeton N.J.
By the Author

COMMENTARY

ON THE

GOSPEL ACCORDING TO LUKE.

BY THE REV. R. G. WILDER.

लूकानें केलेलें शुभवर्त्तमान

या वरील

टीका.

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
1875.

मुंबईमध्यें
एजुकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

१८७५.

First Edition.—800 Copies.

Price 8 Annas.

लूकानें केलेलें शुभवर्त्तमान.

प्रस्तावना.

ज्या लूकानें हें शुभवर्त्तमान लिहिलें त्यानें प्रेषितांचीं कृत्येंहि लिहिलीं. प्रेषि. १:१ पाहा. पौलस देशोदेशीं उपदेश करीत फिरत जाई तेव्हां हा लूका त्याबरोबर जात असे. प्रेषि. १६:१०–१७.२१:१–६.२०:५–६. पौलसानें जें शुभवर्त्तमान गाजविलें तें हेंच असें प्राचीन काळीं मानिलें होतें. ऐरीनियस जो पहिल्या धर्मोपाध्यांमध्यें प्रख्यात होता तो ह्मणतो कीं "पौलस उपदेश करून गाजवीत असे तें लूका जो त्याचा सोबती त्यानें पुस्तकांत लिहून ठेविलें." आणखी, "लूका हा प्रेषितांचा सोबती होता असा केवळ नव्हता, तर त्याचा व विशेषेंकरून पौलसाचा संगतीचा कामकरीहि होता." आरजिन जो दुसरा एक प्रख्यात ख्रिस्ती उपाध्या होता तो शुभवर्त्तमानांविषयीं लिहीत असतां ह्मणतो कीं "तिसरें शुभवर्त्तमान हें लूकानें केलेलें तेंच आहे. त्याला पौलसानें अनुमोदन दिल्हें आणि ख्रिस्ती झालेल्या परदेशस्थासाठीं तें लिहून प्रसिद्ध केलें होतें."

हें शुभवर्त्तमान कोठें व केव्हां लिहिलें होतें हें दाखविलें नाहीं. जरोम ह्मणतो कीं तें अरबियांत रचलें होतें परंतु याविषयीं प्राचीन वडिलांचें एकमत नाहीं. प्रेषितांचीं कृत्यें लिहिल्यापूर्वीं हें लिहिलें होतें असें सिद्ध होतें, आणि पौलस रोमांत कैदी होता तोंवरच त्याची बखर प्रेषितांच्या कृत्यांत लिहिली आहे. यावरून उघड होतें कीं पौलसाचें मरण, ह्मणजे सन ६५ इसवी, याच्या अगोदर हें शुभवर्त्तमान लिहिलें होतें. चाफाचें मत असें आहे कीं हें शुभवर्त्तमान पौलस कैसरियांत कैदी होता, ह्मणजे सन ५८–६० या वेळेस लिहिलें होतें; आणि प्रेषितांचीं कृत्यें सन ६१–६३ पौलस रोमांत कैदी होता त्या वेळेस लिहिलीं होतीं.

लूका यहुदी नव्हता असें दिसतें. तो परदेशस्थ होता; पण त्यानें यहुदी धर्माला अनुसरलें असेल. कसेंहि असो तो मागून खरा शिष्य होऊन ख्रिस्ती उपदेशक झाला.

हें शुभवर्त्तमान व प्रेषितांचीं कृत्यें ईश्वराच्या प्रेरणेनें लिहिलीं होतीं आणि तीं बाकीच्या ईश्वरप्रणीत पवित्र शास्त्रांत धरायाचीं आहेत, यास प्रमाण पाहिजे तर जरासे विचार केल्यानें मनाची खातरी होईल. येणें-प्रमाणें.

१. हीं पुस्तकें खरीं व ईश्वरप्रणीत आहेत असें प्राचीन काळच्या सर्व ख्रिस्ती मंडळ्या मानीत असत, कोणीहि वेगळें मत दाखवीत नसे.

२. हीं पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं होतीं त्या वेळेस पेत्रस पौलस व योहान्न हे तिघे प्रेषित अद्यापि होते; यास्तव हीं खरीं नाहींत, अथवा ईश्वरप्रणीत नाहींत, असें जर त्यांस वाटलें असतें तर त्यांची असली साक्ष देऊन तीं रद्द केलीं असतीं. त्यांनीं असें केलें नाहीं यावरून सिद्ध होतें कीं तेहि तीं खरीं व ईश्वरप्रणीत असें मानीत असत.

३. हें शुभवर्त्तमान पौलसाच्या उपदेशाचा सारांश आहे आणि त्याच्या अनुमोदनानें प्रसिद्ध केलें होतें असी प्राचीन काळच्या सर्व ख्रिस्ती वडिलांची साक्ष आहे. तर पौलसाच्या पत्रासारिखें हें मोजलें पाहिजे.

४. याची व पवित्र शास्त्रांतल्या बाकीच्या पुस्तकांचीं ईश्वरप्रेरित असल्याचीं एकसारखीं च लक्षणें आहेत.

५. लूका बारा प्रेषितांतला नव्हता यावरून जर कोणी दिकत घेतो तर पौलसहि बारा प्रेषितांतला नव्हता असी अठवण केली पाहिजे. तरी यावरून त्याचीं पत्रें ईश्वरप्रणीत नाहींत असें कोणी ह्मणत नाहीं.

या सर्व विचारावरून हें शुभवर्त्तमान ईश्वरप्रणीत आहे असें सिद्ध होतें.

लूकानें केलेलें शुभवर्त्तमान.

१ अध्याय.—ज्या गोष्टींची पक्की खातरी आह्मास आहे त्यांविषयीं पहिल्यापासून [१]प्रत्यक्ष पाहाणारे व वचनाचे सेवक [२]यांनीं आह्मास सांगून दिल्याप्रमाणें त्यांचा इतिहास रचायास बहुतांनीं उद्योग केला आहे.

---

(१) योह. १५:२७. इब्री २:३. १ पेत्र. ५:१. २ पेत्र. १:१६. १ योह. १:१.
(२) रोम. १५:१६. एफ. ३:७. ४:११, १२.

अध्याय १.

१,२ "ज्या गोष्टींची" इ० त्या गोष्टी कोणत्या? तर येशू ख्रीस्त ईश्वराचा खरा अवतार व जगाचा एकच तारणारा आहे, तो जगांत आला, त्यानें आपलें देवपण व ईश्वरी अधिकार यांविषयीं चमत्कार करून प्रमाण पटविलें आणि वधस्तंभीं जीव देऊन पापाबद्दल पूर्ण प्रायश्चित्त केलें, तो तिसऱ्या दिवशीं मेलेल्यां मधून उठला व परत आकाश लोकांत चढून सर्वांवर देव सर्वदा स्तुतिमान्य आहे, आणि जगाचा न्याय ठरविण्यास तो जगाच्या समाप्तीस फिरून येईल. या सर्व गोष्टींविषयीं लूकाची व त्या वेळच्या सर्व ख्रिस्त्यांची पक्की खातरी झाली होती. आणि आह्मास आठवलें पाहिजे कीं या गोष्टी जाणायाला व यांची खातरी करून घेण्याला त्या वेळच्या लोकांस विशेष चांगली सोई होती. त्यांतील बहुतेक प्रत्यक्ष पाहणारे होते आणि वरकडांनीं त्यांजकडून ऐकून घेतलें होतें. तर सांप्रतकालचे पाखंडी मत धरणारे यांनीं लक्षांत आणावें कीं आपणापेक्षां त्या वेळच्या ख्रिस्ती लोकांस त्या गोष्टींचा निर्णय करण्यास चांगला प्रसंग होता आणि जी साक्ष त्यांनीं दिल्ही ती अद्यापि अढळ असी राहिली आहे. "वचनाचे सेवक" ह्मणजे सुवार्तिक अथवा शुभवर्त्तमान गाजविणारे. "बहुतांनीं" या शब्दावरून दिसतें कीं लूकाच्या अगोदर बहुतेक ख्रिस्ताचा वृत्तांत व त्यानें केलेल्या मुख्य गोष्टी मांडून ठेवीत असत. मात्थी व मार्कस यांनीं आपापलें शुभवर्त्तमान अगोदर लिहिलें होतें खरें, परंतु या दोघांलाच लक्षून लिहिलें असतें तर बहुत, असें लूकानें ह्मटलें नसतें. तर वास्तविक बहुत, अनुक्रमानें नव्हे तर मनास येई त्याप्रमाणें कमजास्त टिपून मांडीत असत, मग लूकानेंच असें केवळ नव्हे, परंतु इतर प्रेषितांनींहि असे बहुत निबंध जमवून व तपासून आपापलें शुभवर्त्तमान ईश्वराच्या प्रेरणेनें व साहायानें रचून लिहिलें, हें संभव्य आहे. मग सर्व ख्रिस्ती मंडळ्या हीं नवीं शुभवर्त्तमानें खरीं, पूर्ण, व ईश्वरप्रणीत आहेत असें मानूं लागल्यावर ते पहिले निबंध रद्द होऊन गेले.

३ यास्तव हे महाराज थ्यपिलसा, [1]म्या पहिल्यापासून सर्व गोष्टींचा शोध नीट केला आहे ह्मणून मलाहि वाटलें कीं, तुला अनुक्रमानें [2]त्या लिहाव्या.

४ यासाठीं कीं ज्या गोष्टी तूं शिकलास त्यांचा निश्चय त्वां जाणावा.[3]

५ यहूदाचा राजा हेरोद [4] याच्या दिवसांमध्यें अबीयाच्या [5] वर्गांतील जखर्या नामें कोणी याजक होता, व त्याची बायको अहरोनाच्या कन्यांतील होती, तिचें नांव अलीसाबेत.

---

(१) प्रेषि. १:१. (२) प्रेषि. ११:४. (३) योह. २०:३१. (४) मात्थ. २:१. (५) १ काळ. २४:१०. नहे. १२:४, १७.

---

३ "हे महाराज थ्यपिलसा." या नांवाचा मूळ अर्थ देवाचा मित्र, अथवा देवावर प्रीति करणारा, असा आहे. हा कोण होता अथवा कोठें राहात असे हें कळविलें नाहीं. लूकाचा कोणी सन्मान्य ख्रिस्ती मित्र होता असें दिसतें, आणि लूकानें हें शुभवर्त्तमान प्रथम त्याकडे लिहून पाठविलें. "शोध नीट केला आहे." मी लिहिणार त्या गोष्टी म्या प्रत्यक्ष पाहिल्या असें लूका ह्मणत नाहीं. परंतु म्या त्यांविषयीं पक्का शोध काढून चौकसी केली आहे, असें कीं त्या खऱ्या आहेत असी माझी खातरी झाली आहे, असें तो दाखवितो. यावरून सूचना.१ जसा संसारांतल्या गोष्टींविषयीं तसा धर्मांतल्या गोष्टींविषयीं शोध बरोबर केल्याशिवाय भरवसा धरायाचा नाहीं. मनुष्यांनीं योजलेले धर्ममार्ग बहुत आहेत. ईश्वर एकच आहे आणि त्यानें एकच खरा मार्ग लावून दिल्हा आहे. तो कोणता हें समजायाला शोध नीट केला पाहिजे, आणि ख्रिस्ती मार्ग खरा आहे असी खातरी त्याच्या सत्यतेचीं प्रमाणें पाहिल्याशिवाय होत नाहीं. २ ज्या ईश्वरी प्रेरणेनें लूकानें हें शुभवर्त्तमान रचिलें ती कसी होती हें दिसून येतें. ती त्याच्या बुद्धीला व स्वाभाविक गुणाला बाधक नव्हती. ईश्वरानें त्याच्या मनाला वळण लावून, त्यानें पक्का शोध काढून खऱ्या खोट्याचा निर्णय करून शुभवर्त्तमान अगदीं बिनचूक व परिपूर्ण रचावें असें केलें.

"अनुक्रमानें." काळाच्या क्रमानें नव्हे तर निरनिराळ्या सर्व गोष्टींचा चांगला संबंध राखून त्यानें संगतवार इतिहास केला.

४. जो शिकला होता त्याला अधिक पूर्णपणें जाणण्याचें अगत्य होतें; तर जे अद्यापि शिकले नाहींत त्यांस या भारी गोष्टी मन लावून समजून घेण्याचें किती विशेषें करून अगत्य असावें?

"हेरोद याच्या दिवसांमध्यें." मात्थ. १:२ पहा. "अबीयाच्या वर्गांतील याजक फार वाढले तेव्हां दाविदानें त्याचे चोवीस वर्ग केले." १ काळ. २४. मग एक एक वर्ग एक एक आठवड्यापर्यंत पाळी पाळीनें चाकरी करीत असे; अबीयाचा वर्ग हा आठवा होता. अबीया हा ग्रीक भाषेंतला शब्द आहे. इब्री भाषेंत अबीजा म्हणत असत. "अहरोनाच्या कन्यांतील." अहरोन हा यहुद्यांचा पहिला याजक होता. तर योहान्नाच्या बापाचे व आईचेहि वडील हे याजक होते.

६ तीं दोघेहि देवाच्या दिसण्यांत न्यायी [१] व प्रभूच्या सर्व आज्ञा व नेम [२] यांप्रमाणें निर्दोष चालत होतीं.

७ त्यांस लेंकरूं नव्हतें कारण कीं अलीसाबेत वांझ होती, व तीं दोघेंहि म्हातारीं झालीं होतीं.

८ आणि असें झालें कीं तो आपल्या वर्गाच्या अनुक्रमानें देवाच्या समोर याजकपण करीत असतां,

९ त्याला याजकपणाच्या चालीप्रमाणें प्रभूच्या देवळांत जाऊन धूप दाखविणें [३] पडलें.

१० धूप दाखविण्याच्या वेळेस लोकांचा सर्व समुदाय बाहेर [४] प्रार्थना करीत होता.

११ त्या वेळेस त्यानें प्रभूचा दूत धूपवेदीच्या [५] उजव्या बाजूस उभा आहे असा पाहिला.

---

(१) उत्प. ७:१. १ राज. ९:४. २ राज. २०:३. (२) १ करिंथ. ११:२. फिलि. ३:६. (३) निर्ग. ३०:७, ८. (४) ले. १६:१७. (५) निर्ग. ३०:१. प्रग. ८:३,४.

---

६ "निर्दोष चालत होती." तसा पौलस पुनः जन्म पावल्या पूर्वीं नेमशास्त्राकडून न्यायीपणाविषयीं निर्दोष होता; पण जखार्या व अलीसाबेत हीं त्याप्रमाणें निर्दोष होतीं असें केवळ नव्हे तर देवावर खरोखर प्रीति करून त्याच्या आज्ञा पाळीत असत.

७ "म्हातारीं झालीं होतीं." असें कीं त्यांस लेंकरें होतील असी कांहीं आशा नव्हती.

८ "देवाच्या समोर." म्हणजे देवळांत. देव सर्वत्र सर्व ठिकाणीं आहे खरा, तथापि तो विशेष अर्थीं आपल्या भजनस्थानीं असतो.

९ "धूप." ह्या सुगंध द्रव्याचा वास विशेष आवडता होता म्हणून देवळांत भजन करितांना जाळीत असत. तो याजक सकाळीं व संध्याकाळींहि जाळीत असत.

१० "बाहेर" म्हणजे देवळाच्या अंगणांत. संध्याकाळीं भजनाच्या वेळेस बहुत लोक जमले होते.

११ "प्रभूचा दूत." प्राचीन काळीं ईश्वर आपल्या भक्तांस दूत कधीं कधीं पाठवून आपली इच्छा कळवीत असे. परंतु मलाखीच्या दिवसांपासून त्यानें दूत पाठविला नव्हता.

हे सर्व दिवस म्हणजे सुमारें चारशें वर्षें भविष्यवाद्यांच्या लेखांवरून पारमार्थिक यहुदी मशीहाची वाट पाहत आले होते, आणि आतां तर तो लवकर येतो आहे असें त्यानें त्यांस कळवून व आश्वासन देऊन ख्रिस्ताला अंगीकारण्यास सिद्ध करावें म्हणून देवानें आपला दूत पाठविला. "धूपवेदीच्या." ही वेदी सुमारें दोन हात उंच व एक हात चौरस असी होती. ती चहुंकडून आणि वरून शिंगासुद्धां असल सोन्यानें मढविलेली होती, आणि तिच्यावरच्या भागास सोन्याची माला वेष्टिली होती. इच्या खालीं दर कोनाजवळ एक एक, मिळून चार सोन्याच्या कड्या लाविल्या होत्या. त्यांत

१२ तेव्हां जखर्या पाहून घाबरला, व तो भयभीत झाला.

१३ दुतानें त्याला ह्मटलें, जखर्या, भिऊं नको, कां कीं तुझी प्रार्थना ऐकण्यांत आली व तुझी बायको अलीसाबेत तुजसाठीं पुत्र प्रसवेल, व त्वां त्याचें नाम [१] योहान्न ठेवावें.

१४ तेव्हां तुला आनंद व उल्लास होईल, आणि त्याच्या जन्मावरून बहुत आनंदतील.[२]

१५ कारण कीं तो प्रभूच्या दिसण्यांत मोठा [३] होईल, आणि द्राक्षारस व दारू [४] पिणार नाहीं, व आपल्या आईच्या पोटापासून [५] पवित्र आत्म्यानें पूर्ण होईल.

---

(१) उ. ५०:६३. (२) ओ. ५८. (३) अ. ७:२८. (४) गण. ६:३. (५) इर्म. १:५.

सोन्यानें मढविलेल्या काठ्या घालून वेदि उचलून नेत असत. या वेदीवर दर रोज सांजसकाळीं धूप जाळीत असत. निर्ग. ३०:८. या वेदीवर साधारण अर्पणें, बळीदान, पशुयज्ञ अथवा होम करीत नसत, आणि दर वर्षी एका वेळेस मुख्य याजक प्रायश्चित्त करीत असे त्याशिवाय तिजवर रक्त कधीं शिंपडीत नसत. ले. १६:१८,१९.

१२ हा देवदूत आहे असें एकाएकीं जखर्यास कळलें असेल कीं काय याचा निर्णय करवत नाहीं, परंतु हें उघड आहे कीं तेथें याजकाशिवाय धूप घालते वेळेस कोणी माणूस नसावा असें होतें. आणि हा उजव्या हातास अकस्मात् दृष्टीस पडला आणि कांहीं तेजस्वी दिसला असेल, यावरून त्याला अनुमान करायाचें होतें, मग दुतानें आपलें नांव सांगून व त्याचें भय घालवून आणलेला निरोप सांगितला तेव्हां सगळा अंदेशा दूर झाला असावा.

१३ "तुझी प्रार्थना." म्हणजे लेंकरांसाठीं प्रार्थना. ह्यांची यहुदी लोकांस मोठी उत्कंठा होत असे. लेंकरें नसलीं तर नांव रद्द होईल असें माहीत होतें, याकरितां भावानें आपल्या भावाच्या विधवेशीं लग्न करावें असें नेमिलें होतें. अनु. २५:५,६.

१४ "बहुत आनंदतील." त्याकडून ते आशिर्वाद पावतील म्हणून.

१५ "प्रभूच्या दिसण्यांत." ईश्वराच्या मोजण्यांत; म्हणजे तो खरोखर थोर होईल. "द्राक्षारस व दारू." द्राक्षांच्या रसामध्यें मद्यार्क थोडाच आहे. यहुदांत राहणारे सर्व हा रस पीत असत. नेजेर याला मात्र तो मना केला होता. गण. ६:३. नेजेर याच्या वर्गांत योहान्न मोजला होता म्हणून तो द्राक्षारस पीत नसे. दारू ही काय होती याविषयीं कांहीं अंदेशा आहे. मद्य काढण्याची युक्ति त्या वेळेस माहीत नव्हती. ही युक्ति नवव्या किंवा दाहाव्या शतकामध्यें एका आरबी रसायनवेत्त्यानें शोधून काढिली. यावरून कळतें कीं ती दारू सांप्रत काळीं जी दारू रूढींत आहे तिजसारिखी नव्हती. तरी तींत द्राक्षारसापेक्षां जास्ती मद्यार्क होता असें असेल. हल्लीं कित्तीएक देशांत बहुत लोक दारू पिऊन आपणावर व आपल्या कुटुंबावर भारी अनर्थ आणितात. दारू पिण्याची

१६ आणि तो इस्राएल लोकांतील बहुतांस त्यांच्या प्रभू देवाकडे फिरवील;
१७ आणि बापांचीं अंतःकरणें लेंकरांकडे व हट्टी लोकांस न्यायींच्या
ज्ञानाकडे फिरवून प्रभूसाठीं योग्य [1] प्रजा तयार करावी ह्मणून तो एली-
याच्या [2] आत्म्यानें व सामर्थ्यानें येऊन त्यांच्या पुढें चालेल.
१८ तेव्हां जखर्या दुताला ह्मणाला, हें कशावरून समजूं? कारण कीं
मी ह्मातारा [3] आहें व माझी बायकोहि ह्मातारी झाली आहे.
१९ मग दुतानें त्याला उत्तर दिल्हें कीं, मी देवाच्या समोर उभा राह-
णारा [4] गाब्रियेल आहें, आणि तुजसी बोलायास व हें चांगलें वर्त्तमान
तुला सांगायास मला पाठविलें [5] आहे.

(१) १. पेत्र. २:९. (२) मात्थ. ११:१४. मार्क. ९:११. (३) उत्प. १७:१७.
(४) दान. ८:१६. अ. २६. (५) इब्री. १:१४.

चाल केवळ नाशकारक आहे. "पवित्र आत्म्यानें पूर्ण," म्हणजे देवाकडून प्रेरलेला व प्रबोधित असून विशेष महत्वाचें काम करण्यास सिद्ध होईल.

१६ त्यांनीं पश्चात्ताप करावा व पाप सोडून देवाच्या सेवेस लागावें म्हणून तो त्यांस बोध करून फिरवील.

१७ "बापांचीं अंतःकरणें लेंकरांकडे." यहुद्यांमध्यें अनेक पंथ होते आणि हे एकमेकांची स्पर्धा व द्वेष करीत असत. येणेंकडून आईबाप व लेंकरें, बहिणभावंडें यांमध्यें फुटी व वैरभाव चालत असत. मात्थी ३:७. यावरील टीका पाहा. यांची समेट करावी हा योहान्नाच्या येण्याचा एक हेतु होता. कुटुंबांतील माणसांनीं एकमेकांसीं समेट करून प्रीतीनें व मैत्रीनें वागावें हें खऱ्या धर्माचें एक फळ आहे. "हट्टी लोकांस." म्हणजे जे स्वच्छंदी असून विश्वास धरीत नाहींत यांस तो खऱ्या ज्ञानाकडे फिरवील. "प्रजा तयार करावी." म्हणजे मशीहा येतो आहे असें गाजवून त्यांस पश्चात्ताप करायाला बोलाविल्यानें त्यांस तयार करावें. ईश्वर पवित्र आहे असें समजून, तो येतो अथवा त्याच्या समक्ष जायाचें आहे असें असल्यास तर विशेष प्रयत्न करून सिद्ध असलें पाहिजे. निर्ग. १९:१४,१५ आणि देव अवतार घेऊन जगांत येणार होता तेव्हां त्याच्या येण्याला सिद्ध व्हावें म्हणून योहान्न लोकांस उपदेश करून तयार करण्यास पाठविला होता. तो फिरून येईल आणि आपल्या समोर सर्वांचा न्याय करील; तर त्यासाठीं पश्चात्ताप करून व विश्वास धरून आणि किती विशेषें करून शुद्ध होऊन सिद्ध असलें पाहिजे? १ पेत्र. ४:७.२ पेत्र ३:११,१२. "एलीयाच्या आत्म्यानें व सामर्थ्यानें." "मात्थी. ११:१४ यावरील टीका पाहा.

१८ "हें कशावरून समजूं?" दुतानें सांगितलें तें संभाव्य वाटलें नाहीं म्हणून त्यानें प्रमाण मागितलें. दुताचें बोलणें आहे, म्हणून खरें असें मानायाचें होतें, आणि त्याच्या अविश्वासामुळें तो मुका झाला.

१९ "मी देवाच्या समोर उभा राहणार गाब्रियेल आहें." समक्ष असणें या शब्दावरून सेवा व मानहि दर्शविलीं आहे. १ राज. १७:८; १२:६;१७: १. नीति २२:२९. मला

२० पाहा, हें घडेल त्या दिवसापर्यंत तूं मुका [1] होसील व तुझ्यानें बोलवणार नाहीं, कां कीं तुझ्या ज्या गोष्टी यथाकालीं पूर्ण होतील त्यांवर त्वां विश्वास ठेविला नाहीं.

२१ तेव्हां लोक जखर्‍याची वाट पाहत होते, व त्याला देवळांत उशीर लागल्यावरून ते आश्चर्य पावले.

२२ मग बाहेर आल्यावर त्याच्यानें त्यांसीं बोलवेना, तेव्हां त्याला देवळांत दर्शन झालें आहे असें ते समजले, आणि तो त्यांस खुणावूं लागला व मुका राहिला.

२३ मग असें झालें कीं त्याच्या सेवेचे दिवस भरल्यावर तो आपल्या घरास गेला.

२४ आणि त्या दिवसांनंतर त्याची बायको अलीसाबेत गरोदर झाली व पांच महिने लपून राहिली व ह्मणाली,

---

(१) यहेज्क. ३:२६.

ईश्वरासमोर उभें राहण्याचा मान आहे, आणि त्यापासून मी हा निरोप घेऊन आलों, तर हा खरा असें मानिलें पाहिजे. गाब्रियेल याच्या दोन इब्रि मूळ शब्दांचा अर्थ देवाचा माणूस असा आहे. दानीएलाची प्रार्थना ऐकण्यांत आली होती असें कळविण्यास हा दूत त्याकडे पाठविला होता. दान. ८:१६;९:२१. दिव्य दूत हे सेवा करणारे आत्मे आहेत आणि देवभक्तांची सेवा करण्यांत त्यांस सुख होतें. इब्री. १:७,१४.

२० "तूं मुका होसील." हें खूणरूप व शिक्षारूपहि होतें. तो दूत देवापासून आला होता याचें चिन्ह, आणि जखर्‍या विश्वास धरीना यामुळें शिक्षा, हीं दोन्ही तो मुका झाल्यावरून प्राप्त झालीं.

२१ "वाट पाहत होते...... आश्चर्य पावले." याजक फार करून घटका दीडघटका यापेक्षां अधिक वेळ देवळांत राहत नसे. यावेळेस फार उशीर लागला म्हणून त्याला कसें काय झालें असेल असें भय त्यांस वाटूं लागलें.

२२ "दर्शन झालें आहे." दृष्टांत पडला अथवा कोणी अमानवी प्राणी त्याला दिसला असें त्यांस वाटलें; आणि तो बाहेर आल्यावर जरी बोलतां येईना तरी खूण करून, त्यांस वाटलें तें खरें असें त्यानें त्यांस समजाविलें.

२३ "सेवेचे दिवस भरल्यावर." तो तें आश्चर्यकारक दर्शन पाहून मुका झाला, यामुळें तो लवकर घरीं जाईल असें त्यांस वाटलें असेल. परंतु तो गेला नाहीं. माझें काम एथें देवळांत आहे असें समजून त्यानें आपले सेवेचे दिवस पूर्ण केले. धर्मोपाध्यांनी आपली शक्ति पुरेल तोंवर आपलें काम चालवीत जावें. जो क्षुल्लक कारणावरून आपलें धर्मसंबंधी काम एकीकडे ठेवून दुसर्‍या उद्योगांत गुंततो तो विश्वासू नाहीं.

२४ "लपून राहिली." लोकांत गेली नाहीं. आपली अवस्था व आशा याविषयीं

२५ लोकांमध्यें जो माझा अपमान [१] तो दूर करण्यास ज्या दिवसीं प्रभूनें मजकडे पाहिलें त्यांमध्यें मजसाठीं असें केलें आहे.

२६ नंतर साहाव्या महिन्यांत गालीलांतील नाजारेथ नामें नगर एथें गाब्रियेल दूत एका कुमारीकडे देवानें पाठविला.

२७ ती कुमारी [२] दावीदाच्या वंशांतील योसेफ नामें पुरुषाला दिल्हेली होती, त्या कुमारीचें नांव तर मारया होतें.

२८ तेव्हां दूत तिजकडे आंत येऊन ह्मणाला, हे कृपा पावलेली, [३] सलाम; प्रभु तुजबरोबर असो, बायकांमध्यें तूं धन्य आहेस.

२९ तेव्हां ती त्याला पाहून त्याच्या बोलण्यावरून फार घाबरली, व हा आशीर्वाद कसला आहे असा विचार करूं लागली.

३० तेव्हां दुतानें तिला ह्मटलें, मारये, भिऊं नको, कारण कीं देवाची कृपा तुजवर झाली आहे.

---

(१) उत्प. ३०:२३. १ शमु. १:६. यश. ५४:१४. (२) मात्थ. १.१८. (३) दान. ९:२३.

बोलून अभिमान दाखवावा यापेक्षां एकांतीं राहून मनांत विचार करून व परिणामाची वाट पाहून देवाची स्तुति करावी हें योग्य होतें.

२५ "माझा अपमान." संतान हें ईश्वरी कृपेचें चिन्ह आणि विशेष आशीर्वाद आहे, असें यहुदी मानीत असत. गीत. ११३:९;१२८:३; यश. ४:१;४४:३,४; ले. २६:९. म्हणून वांझ व्हावें यांत मोठा अपमान आहे असें ते मोजीत असत. १ शमु. १:६.

२६ "नाजारेथ." मात्थ. २:२३ यावरील टीका पाहा.

२७ "कुमारी." मात्थ. १:१८,१९ यांवर टीका पाहा.

२८ "हे कृपा पावलेली, सलाम." यहुदी लोक मशिहाची वाट फार वेळ पाहात आले होते. त्याच्या वंशांतलें व्हावें हा मोठा मान असें सर्वांस वाटत असे. आब्राहाम दावीद वगैरे त्याचे पूर्वज असल्यावरून जो मान तो मोठा असें मोजीत असत. परंतु या कुमारी मारयेला त्यांहून मोठा मान मिळाला. ही कुमारी देवाचा अवतार व जगाचा तारणारा याची आई होणार आहे असें पाहून व सांगून ही सर्व बायकांमध्यें विशेष सुखी आहे व इला मोठा मान मिळाला आहे म्हणून त्या दुताला वाटलें यांत काय आश्चर्य?

२९ "विचार करूं लागली." दूत अकस्मात दिसला त्याचा निरोप विलक्षण होता, म्हणून तिला मोठें भय प्राप्त झालें, तरी सावध राहून ती विचार करूं लागली, यावरून तिचे विवेक सावधगिरी वगैरे चांगले गुण दिसून येतात.

३०–३२ "तो मोठा होईल." यशाय भविष्यवाद्यानें सांगितल्याप्रमाणें. यश. ९:६,७. म्हणजे ज्ञानानें व अधिकारानें मोठा होईल, परंतु विशेषेंकरून पाप्यांस तारणाचा उपाय योजून सिद्ध करण्यावरून आणि त्यांतून बहुतेकांचा समेट देवाशीं करून त्यांस पापाच्या व दुःखाच्या भ्रष्ट

३१ पाहा, तूं गरोदर होसील [१] व पुत्र प्रसवसील व त्वां त्याचें नांव येशू ठेवावें.

३२ तो मोठा होईल व त्याला परात्पराचा पुत्र [२] ह्मणतील, आणि प्रभु देव त्याचा बाप दावीद याचें आसन [३] त्याला देईल.

३३ आणि तो याकोबाच्या घराण्यावर सर्वकाळ राज्य करील व त्याच्या राज्याचा शेवट [४] होणार नाहीं.

३४ तेव्हां मारयेनें दुताला ह्मटलें, हें कसें घडेल? कारण कीं, मी पुरुषाला जाणत नाहीं.

---

(१) यश. ७:१४. मात्थ. १:२१. (२) इब्री. १: २-८. (३) २ शमु. ७: ११, १२. यश. ९:६,७. (४) दान. ७:१४,२७. मीख. ४:७.

अवस्थेंतून काढून आकाशलोकांत आणण्यावरून तो पृथ्वीवर व आकाशांतहि सर्वकाळ प्रख्यात होईल, असा अर्थ आहे.

"परात्पराचा." म्हणजे सर्वांहून उंच, थोर, पराक्रमी जो आहे त्याचा. मार्क. ५:७ पाहा.

"म्हणतील." तो त्याचा पुत्र वास्तविक होईल असा अर्थ आहे. ख्रीस्त दावीदाच्या वंशांत जन्मला म्हणून दावीद त्याचा बाप असें म्हटलें आहे. मात्थ. १:१ पाहा. तुझें आसन म्हणजे राज्य सर्वकाळ राहील असें वचन दावीदाला दिल्हें होतें; आणि हें वचन, येशूला आपल्या लोकांचा तारणारा व सर्वकाळचा राजा असें केल्यावरून पूर्ण झालें.

३३ "याकोबाच्या घराण्यावर." म्हणजे इस्राएलावर. प्राचीन काळीं यहुदी हे देवाचे निवडलेले लोक होते. सांप्रतकाळीं जे जे ख्रीस्ताला अंगीकारून त्याचे खरे भक्त होतात ते सर्व त्याचे लोक होतात; म्हणजे याकोबाच्या घराण्यावर तो सर्वकाळ राज्य करील याचा अर्थ हाच कीं तो आपल्या भक्तांच्या मंडळीवर सर्वकाळ राज्य करील. तो आपल्या मंडळीला नेम व आज्ञा देऊन आणि तिचें संरक्षण करून तिला सुमार्गीं नेऊन सांप्रतकाळीं राज्य करितो आणि सर्वकाळपर्यंत सौख्य लोकीं तो करीत जाईल. ज्याचा शेवट होणार नाहीं तें त्याचेंच मात्र राज्य आहे. जो आपला पोशाख व मुगूट एकीकडे कधीं ठेवणार नाहीं आणि मरण कधीं पावणार नाहीं तो हाच आहे. जो सर्व शत्रूपासून आमचें संरक्षण करायास समर्थ आहे, जो मरते वेळेस समाधान आणि आकाशलोकांत अविनाशी वतन आम्हास द्यावयास समर्थ आहे, तो हाच राजा आहे. तर त्याची मर्जी आपल्याकडे करून घ्यावी व त्याची कृपा मिळवावी याचें केवढें अगत्य आहे?

३४,३५ "पवित्र आत्मा तुजवर येईल." इ. मात्थ. १:१८,२० पाहा. ख्रीस्ताचा जन्म लोकजननाप्रमाणें नव्हे तर देवाच्याच शक्तीनें झाला असें या वाक्यावरून स्पष्ट दाखविलें आहे. मशीहा प्रायश्चित्त करून पाप्यांस तारायास जगांत आला म्हणून असा चमत्कारिक रीतीनें मनुष्य देह धरणें प्राप्त झालें. जनरूढी प्रमाणें जन्म पावला असता तर त्याचा स्वभाव इतर लोकांच्या

३५ मग दुतानें तिला उत्तर दिल्हें कीं, पवित्र आत्मा तुजवर येईल, आणि परात्पराची शक्ति तुजवर सावली करील, याकरितां जें पवित्र लेंकरूं होईल त्याला देवाचा पुत्र [१] ह्मणतील.

३६ आणि पाहा, तुझी नातलग अलीसाबेत तिलाहि ह्मातारपणीं पुत्र-गर्भ राहिला आहे, आणि जिला वांझ ह्मणतात तिला हा साहावा महिना आहे.

३७ कारण कीं [२] देवाच्यानें करवत नाहीं असी कोणतीहि गोष्ट नाहीं.

३८ तेव्हां मारया ह्मणाली, पाहा, मी प्रभूची दासी, [३] तुझ्या बोल-ण्याप्रमाणें मला होवो. [४] मग दूत तिजपासून निघाला.

३९ त्या दिवसांमध्यें मारया उठून डोंगरवटीस घाईनें जाऊन यहूदां-तील एका नगरांत [५] गेली.

४० आणि जखर्याच्या घरांत जाऊन तिनें अलिसाबेतीला सलाम केला.

---

(१) मार्क. १:१. (२) मल. ४:५,६. (३) गीत. ११६:१६. (४) गीत. ११९:३८.
(५) यहो. २१: ९-११.

सारिखा भ्रष्ट व पापिष्ट झाला असता. याकरितां देवानें आपल्याच सामर्थ्यानें त्याला देह उत्पन्न करून दिल्हा. इब्री. प. १०:५ पाहा.

"देवाचा पुत्र म्हणतील." त्याचा देह देवाच्या सामर्थ्यानेंच उत्पन्न झाला म्हणून ख्रीस्ताला देवाचा पुत्र म्हटल्यावरून जे दिकत घेतात व दोष ठेवितात त्यानीं ही गोष्ट ध्यानांत आणून विचार करावा. तो साधारण रीतीनें नव्हे, पण देवाच्याच पराक्रमानें जन्मपावला यावरून, आणि ईश्वरी सामर्थ्यानें तो मेलेल्यांतून उठला यावरूनहि त्याला देवाचा पुत्र म्हणणें योग्य आहे. रोम. प. १:४ व प्रेषित. १३:३३ यांची व गीत २:७ याचीहि तुलना करून पाहा.

३६,३७ मारयेनें भय सोडावें आणि धैर्य व भरवसा धरून दुताचें बोलणें खरें मानावें म्हणून त्यानें अलिसाबेतीची गोष्ट तिला कळविली.

३८ मारयेनें तेव्हांच ही मान्यता दाखवून ईश्वराची मर्जी पूर्ण व्हावी असी इच्छा दाखविली यावरून तिची सुबुद्धि व धार्मिकपण दिसून येतात.

३९, ४० "नगरांत." हें कोणतें नगर होतें याविषयीं कळविलें नाहीं. जखर्या देवळांत चाकरी करीत नव्हता तेव्हां या नगरांत राहिला असेल. तेथें पोहंचून व दूत बोलल्याची आठवण करून तिनें अलिसाबेतीला पाहून मोठा हर्ष केला यांत काय आश्चर्य ?

४१ तेव्हां असें झालें कीं अलीसाबेत मारयेचा सलाम ऐकतांच बाळकानें तिच्या पोटांत उडी मारिली व अलीसाबेत पवित्र आत्म्यानें पूर्ण झाली.

४२ आणि ती मोठ्यानें बोलली कीं, तूं बायकांमध्यें धन्य [1] व तुझ्या पोटचें फळ धन्य आहे.

४३ आणि माझ्या प्रभूच्या आईनें [2] मजकडे यावें हें मला कोठून?

४४ कां तर पाहा, तुझ्या सलामाची वाणी माझ्या कानीं पडतांच बाळकानें माझ्या पोटांत उल्लासानें उडी मारिली.

४५ तर विश्वास धरणारी ती धन्य, कारण कीं प्रभूनें तिला सांगितलेल्या गोष्टी पूर्ण होतील.

---

(१) न्या. ५:२४. (२) यो. १३:१३.

४१, ४२ "पवित्र आत्म्यानें पूर्ण झाली." खरा मशीहा आतां जन्मास येतो, आणि इस्राएलाला व जगाला देवापासून मोठा आशीर्वाद प्राप्त होण्याचा दिवस आला आहे, असें पाहून तिला अतिशय आनंद झाला, आणि पवित्र प्रेरणा तिच्या मनांत भरून, दूत बोलला त्याच शब्दांनीं, म्हणजे "तूं बायकांमध्यें धन्य," असें म्हणून तिनें मारयेला जो मान प्राप्त झाला होता त्याचें वर्णन केलें.

४३ "हें मला कोठून?" हें नम्रतेचें बोलणें आहे. मारयेला देवापासून जो मोठा मान मिळाला होता तो पाहून ती माझ्या भेटीस आल्यावरून मलाहि मान प्राप्त आहे आणि एवढा मान मिळावा म्हणून मी कोण आहें, असें अलिसाबेतीच्या मनांत आलें.

४४, ४५ "तर विश्वास धरणारी ती धन्य." विश्वास धरल्यानें ती धन्यवादित होती असें केवळ नव्हे परंतु जीं वचनें तिनें खरीं मानिलीं तीं अगदीं पूर्ण व्हावयाचीं होतीं म्हणून ती सुखी होती. अलिसाबेतीच्या बोलण्यावरून दिसून येतें कीं (१) यहुदी लोकांमध्यें त्या वेळेस भविष्य सांगण्याची शक्ति रद्द झाली नव्हती. (२) ज्ञानाचा प्रकाश, सुख व समाधान हीं पवित्र आत्म्याकडून होतात. (३) येशूचा जन्म सर्व प्रकारें चमत्कारिक होता, आणि तो अमानुष असावा. (४) प्राचीन काळचे देवभक्त, मशीहा येतो असें पाहून मोठा आनंद पावले. (५) ख्रीस्ताची आई व्हावी हा वास्तविक मोठा मान होता. तथापि यावरून मारयेचें भजन करावें अथवा तिची प्रार्थना करावी हें योग्य आहे असें अगदीं नाहीं. कारण

(१) मारयेचें भजन करावें असी आज्ञा कोठेंहि शास्त्रांत अढळत नाहीं.

(२) ईश्वराशिवाय दुसऱ्या कोणाचेंहि भजन करूंच नये असें आज्ञापिलें आहे. निर्ग. ३४: १४; २०: ४,५. अनु. ६: १३:१४; यश. ४५: २०.

(३) उत्पन्न झालेल्याचें भजन किंवा प्रार्थना करावी ही मूर्त्तिपूजा आहे.

(४) कुमारी मारया मनुष्यच असून सर्वांची प्रार्थना ऐकायाला व त्यांचें साह्य करायाला सर्वत्र सर्व ठिकाणीं होण्यास समर्थ

४६ तेव्हां मारया बोलूं लागली, माझा जीव प्रभूला थोर मानितो.[१]
४७ आणि माझ्या तारणाऱ्या देवाविषयीं माझा आत्मा उल्लासला.[२]
४८ कारण कीं त्यानें आपल्या दासीच्या नीचपणाकडे [३] पाहिलें
आहे, कां तर पाहा, आतांपासून सगळ्या पिढ्या मला धन्य ह्मणतील.[४]
४९ कारण कीं जो शक्तिमान [५] त्यानें माझ्या करितां मोठीं कामें
केलीं, त्याचें नांव [६] पवित्र.
५० आणि त्याला भिणाऱ्यांवर [७] त्याची दया पिढ्यानपिढी आहे.

---

(१) १ शमु. २:१. गीत. ३४:२,३. (२) गीत. ३५:९. हब. ३:१८. (३) गीत. १३६:२३. (४) मल. ३:१२. लूका. ११:२७. (५) उत्प. १७:१. (६) गीत. १११:९. (७) उत्प. १७:१७. निर्ग. २०:६. गीत. १०३:१७.

आहे अशी कल्पना अगदीं पोकळ, व्यर्थ व अनुचित आहे. उत्पन्न झालेल्याचें भजन करावें हें मोठें पाप आहे. रोम. १: २५.

४६ "माझा जीव प्रभूला थोर मानितो." म्हणजे त्याची भक्ति, स्तुति, स्तवन करितो. देवाचें थोरपण, प्रीति, दया वगैरे ईश्वरी गुण पूर्वीपेक्षां चांगले समजून तिच्या मनांत आलें कीं त्याचें स्तवन संपूर्ण अंतःकरणानें व जीवानें करावें. गीतें. ३४: ३. २ शमु. ७: २६.

४७ "माझ्या तारणाऱ्या देवाविषयीं." मशीहा कांहीं अर्थानें तारणारा होईल असें सर्व यहुदी लोकांस समजलें. तो पापापासून व नरकापासून तारील हें केवळ खऱ्या भक्तांस समजलें. पण मारया खरी भक्तीण होती म्हणून हा तारणारा आतां येतो आणि मी त्याची आई होणार आहें असें समजून तिला मोठा उल्लास झाला.

४८ "नीचपणाकडे पाहिलें." जरी मी गरीब व नीच अवस्थेंतली आहें तरी देवानें हा मोठा उपकार मजवर केला आहे, हा तिच्या बोलण्याचा अभिप्राय आहे. जसें इतर वाक्यांवरून तसें यावरूनही दर्शविलें आहे कीं ईश्वर पक्षपाती नाहीं. तो उंच पदवी व कुल व मोठी दौलत पाहून उपकार करितो असें नाहीं. रोम. २: ११; १०: ११, १२. जे नम्र व लीन अंतःकरणाचे ते धन्य आहेत. त्यांस तो विशेष आशीर्वाद देईल. गीतें. १३८: ६. यशा. ५७:१५. "सगळ्या पिढ्या" म्हणजे सर्व माणसें जगाच्या समाप्तीपर्यंत मला धन्य म्हणतील. आजपर्यंत हें खरें पटलें आहे, आणि शेवटपर्यंत पटत जाईल. ख्रीस्ताची आई असल्यावरून ती सुखी आहे, असें सर्वांनीं मानावें, तरी तिचें भजन करूं नये. विश्वासणाऱ्यांचा बाप म्हटला जावा हा मान आब्राहामाला मिळाला, तरी यावरून त्याचें भजन करावें असें कोणाच्या मनांत येतें?

४९ "मोठीं कामें." म्हणजे विशेष उपकार. "त्याचें नाम पवित्र." देवाचें नांव म्हणजे देव असा अर्थ वरचेवर होतो. देव पवित्र व त्याचें नांव पवित्र आहे. असें कीं कोणी तें व्यर्थ घेऊं नये. निर्ग. २०:७.

५० "त्याला भिणाऱ्यांवर." जे त्याची भीड राखितात व त्याच्या आज्ञा पाळतात त्यांवर. गीतें. १११:१०. इयोब. २८:२८. "पिढ्यानपिढी." सर्वदा. विशेष अभिप्राय

५१ त्यानें आपल्या बाहूनें पराक्रम केला, [1] जे आपल्या अंतःकरणा-
च्या कल्पनेनें गर्विष्ठ त्यांस उडविलें. [2]

५२ त्यानें बलवानांस आसनांवरून [3] लोटून दिल्हें व नीचांस उंच-
विलें.

५३ भुकेल्यांस चांगल्या पदार्थांनीं तृप्त केलें व धनवानांस रिकामें
लाविलें. [4]

---

(१) गीत. ९८:१. यश. ५१:९; ५२:१०; ६३:५. (२) १ शमु. २:९. दान. ४:३७.
(३) ईयो. ५:११. लूका. १८:१४. (४) १ शमु. २:५.

हाच कीं आईबापें पारमार्थिक व धार्मिक असल्यावरून त्यांच्या लेंकरांवर देवाची दया व आशीर्वाद होईल. निर्ग. २०:६. याकरितां धार्मिक आईबापांचीं लेंकरें व्हावीं हें मोठें कृपादान आहे, आणि असलीं लेंकरें आईबापांचा कित्ता अनुसरत नाहींत तर त्यांचा दोष मोठा व दंड भारी होईल. ईश्वर लोकांवर दया करायास सिद्ध असतां जे स्वइच्छेनें चालून त्याची दया अव्हेरितात त्यांचा केवढा दोष होईल!

५१,५२ "बाहूनें." बाहू ही बळाची खूण आहे. मारया आपल्यावर जी देवाची दया झाली होती ती आधीं मनांत आणूं लागली मग इतरांवर चहूंकडून सर्व सृष्टीमध्यें त्याची दया व चांगुलपणा प्रगट झाली आहेत असे विचार करून देवाचें स्तवन करिती. "कल्पनेनें गर्विष्ट." आपण कोणी थोर व इतरांपेक्षां श्रेष्ठ असें ज्यांस वाटतें." "त्यांस उडविलें." असें कितीदां झालें आहे. प्राचीन काळीं ईश्वरानें लोकांचा गर्व व दुष्टाई पाहून जलप्रलय करून त्यांचा समूळनाश केला. सदोम व गमोरा आद्मा व जबोईम यांचा नाश गंधक व अग्नि आकाशांतून वर्षून एकाएकीं केला. प्राचीन रोम, बाबेल, निनवे वगैरे मोठीं मोठीं शहरें व राज्यें आतां कोठें आहेत? एथें म्हटल्या प्रमाणें उडविलेल्यांच्या उदाहरणानीं जगाचा इतिहास भरला आहे. हें पाहून लोक आपला गर्व सोडीत नाहींत व नम्र बुद्धि धरीत नाहींत, हें केवढें आश्चर्य? यश. १४:१२–१४. मारयेच्या बोलण्याचें एक प्रख्यात उदाहरण तिच्याच कुळांत घडलें होतें, म्हणजे गर्विष्ट शाऊल राजाला नाकारून देवानें दावीदाला मेंढपाळाच्या नीच अवस्थेंतून उंचावून राजगादीवर बसविलें होतें. या गोष्टीची आठवण मारयेला झाली असेल. मनुष्य स्वभाव पापाकडून एवढा भ्रष्ट झाला आहे कीं उंच पदवी व मोठा मान हीं कोणी एकास मिळालीं म्हणजे ते गर्विष्ट होऊन लवकर बिघडतात म्हणून त्यांस उडवून ईश्वर त्यांच्या ठिकाणीं नीच व नम्र यांस उंचावितो. याप्रमाणें जीं घराणीं फार प्रख्यात होतात त्यांचें मूळ पाहिलें तर अगदीं अप्रसिद्ध असतें. तसलीं घराणीं मेहनती व सद्गुणी असून आपण होऊन श्रेष्ठ होतात, आणि त्यांचे सद्गुण पाहून ईश्वर आशीर्वाद देऊन त्यांस उंच करितो.

५३ जे गरजवंत नम्र बुद्धि बाळगून देवापाशीं मागतात त्यांस तो रोजची भाकर देत असतो, इतक्यांत जे गर्विष्ट व धनवान त्याची भीड राखीत नाहींत त्यांची धन दौलत वारंवार अग्नि, पाणी वगैरे योगानीं

५४ त्यानें आमच्या पूर्वजांस सांगितल्याप्रमाणें [1] अब्राहाम व त्याचें
संतान यांवरची दया सर्वकाल आठवून [2]
५५ आपला सेवक इस्राएल याचें सहाय केलें आहे.
५६ नंतर मारया तिच्या जवळ सुमारें तीन महिने राहिली, मग आ-
पल्या घरास माघारी गेली.
५७ नंतर अलीसाबेतीच्या प्रसूतीचे दिवस भरल्यावर ती पुत्र प्रसवली.
५८ आणि प्रभूनें तिजवर मोठी दया केली हें ऐकून तिचे शेजारी व
नातलग तिच्या बरोबर [3] आनंद करूं लागले.
५९ मग असें झालें कीं आठव्या दिवसीं बाळकाची सुंता करायास ते
आले, आणि त्याच्या बापाच्या नांवावरून त्याचें नांव जखर्या ठेवीत होते.
६० परंतु त्याच्या आईनें उत्तर दिल्हें कीं, नका, त्याला तर योहान्न
ह्मणावयाचें आहे.
६१ तेव्हां ते तिला ह्मणाले, या नांवाचा ह्मणतात, असा तुझ्या नात-
लगांत कोणी नाहीं.
६२ नंतर तुझ्या मनांत त्याला कोणतें नाम द्यायाचें, असें त्याच्या
बापाला त्यानीं खुणेनें पुसलें.

---

(१) उत्प. १७:१९. गीत. १३२:११. (२) गीत. ९८;३. (३) ओ. १४.

बुडून जातात. नीति. २२:५. देवाची कृपा मिळवावी हें सगळ्या धनापेक्षां चांगलें आहे.

५४—५८ "पूर्वजांस सांगितल्याप्रमाणें." सर्व प्रकारचे उपकार व आशीर्वाद देण्याविषयीं देवानें पूर्वजांस वचन दिल्हें होतें, उत्प. २२:१७,१८, आणि मारयेनें ही रोजची कृपा आठवून हें म्हटलें असेल; परंतु विशेषेंकरून मशीहाच्या येण्याविषयीं जें वचन देवानें दिल्हें होतें तेंच लक्षून हें ह्मटलें असावें. तें वचन आतां पूर्ण व्हावयाचें होतें असें पाहून तिचें मन विशेष स्तुतीनें व आनंदानें भरलें होतें. "सेवक इस्राएल." सर्व यहुदी लोकांस इस्राएल असें नाम पडलें होतें. परंतु इस्राएल म्हणजे देवाचे खरे भक्त हाच अर्थ एथें व शास्त्रांत कोठें कोठें समजला पाहिजे. यशा.४१:८—९.हो. ११:१.

मारयेनें केलेलें हें स्तुतीचें गीत हान्नाच्या गिताच्या बरोबरीस लावून पाहा. १ शमु. २:२—१० या गीतापेक्षां सुंदर कविता क्वचित् आहे.

५९, ६० "आठव्या दिवसीं." सुंता करण्याचा हा दिवस नेमला होता. उत्प. २१:४. आणि सुंता करते वेळेस मुलाचें नाम ठेवीत असत, उत्प. २१:३, ४, व फारकरून वडील मुलाला बापाचें नाम ठेवीत असत. "योहान्न म्हणायाचें आहे." हें नाम ठेवावें म्हणून दुतानें म्हटलें होतें, आणि जखर्यानें याविषयीं अलिसाबेतीला कळविलें असेल.

६१—६३ आपलीं घराणीं वेगळीं करून राखावीं व वडिलांचा सन्मानहि राखावा

६३ मग त्यानें पाटी मागितली व त्याचें नांव (१) योहान्न आहे असें लिहिलें. तेव्हां सर्वांस आश्चर्य वाटलें.

६४ तेव्हांच त्याचें तोंड व त्याची जीभ मोकळी झाली (२) व तो देवाची स्तुति करीत बोलूं लागला.

६५ नंतर त्यांच्या चहूंकडील सर्व राहणाऱ्यांस भय वाटलें, आणि यहूदाच्या अवघ्या डोंगरवटींत या सर्व गोष्टींविषयीं लोक बोलूं लागले.

६६ आणि सर्व ऐकणाऱ्यानीं आपल्या अंतःकरणांत (३) ठेवून ह्मटलें, हा बाळक कसला होईल? आणि प्रभूचा हात (४) त्याला अनुकूळ होता.

६७ तेव्हां त्याचा बाप जखर्या पवित्र आत्म्यानें पूर्ण झाला, व त्यानें असें भविष्य सांगितलें कीं,

६८ इस्राएलाचा देव प्रभु तो सुवंदित (५) असो; कारण कीं, त्यानें आपल्या लोकांची भेट घेऊन त्यांची खंडणी केली आहे.

(१) ओ. १३. (२) ओ. २०. (३) लूका २:१९,५१. (४) गीत. ८०:१७. (५) गीत. ७२:१८.

म्हणून मुलांस नातलगांचींच नांवें ठेवावीं असी चाल पडली होती. "पाटी मागितली." म्हणजे खूणेनें मागितली.

६४, ६५ "जीभ मोकळी झाली." तो नऊ महिने मुका झाला होता. तो जन्मभर मुका राहील असें फारकरून सर्वांस वाटलें असेल. म्हणून तो बोलूं लागल्यावरून ते थक्क झाले. एकदांच अविश्वास दाखविल्या वरून ती विपत्ति त्याला प्राप्त झाली होती; आणि व्यर्थ झाली असें नाहीं. चांगलें फळ आलें. मग देवानें ती विपत्ति निवारण केली, आणि जखर्यानें देवाचे मोठे उपकार मानून त्याचें स्तवन केलें. "भय वाटलें." जखर्या मुका झाला होता मग बाळक जन्मल्यावर एकाएकीं बोलूं लागला, या विलक्षण गोष्टी मनांत आणून व दुतानें बाळकाविषयीं सांगितलें होतें त्याचीहि आठवण करून ते समजले कीं खचीत हें सर्व ईश्वराकडून झालें आहे, आणि असी खातरी धरून ते भयानें व भिडेनें व्यापले होते.

६६ "बाळक कसला होईल." ज्या विलक्षण गोष्टी झाल्या होत्या त्यावरून त्यांस वाटलें कीं बाळक हा कोणी थोर भविष्यवादी अथवा प्रख्यात पुरुष होईल. "प्रभूचा हात त्याला अनुकूल होता." हात हा मदत, संरक्षण आणि उपकार करण्याची खूण असा आहे. ईश्वराची कृपा व आशीर्वाद या बाळकावर आहे, असें सर्वांस समजलें.

६७ "भविष्य सांगितलें." भविष्य सांगणें म्हणजे. (१) ज्या गोष्टी होणार त्या कळविणें; (२) ईश्वराची स्तुति करणें. १ शमु. १०:५,६,१. राजे. १८:२९. मग शुभवर्त्तमान गाजविणें. जखर्याच्या या भविष्य सांगण्यांत हे तीन प्रकार येतात. याचा मोठा भाग ईश्वराची स्तुति असा आहे परंतु योहान्नाचे गुण व उपदेश कसा होईल हेंहि सांगितलें आहे.

६८ "सुवंदित असो." तो थोर, न्यायी, सत्यप्रतिज्ञ व अति दयाळू असून सर्वांच्या स्तुतीस योग्य आहे म्हणून. "भेट घेऊन."

६९ आणि जसें त्यानें पहिल्यापासून आपल्या पवित्र भविष्यवाद्यांच्या
तोंडानें [1] सांगितलें,
७० तसें त्यानें आपला सेवक दावीद याच्या घराण्यांत तारणाचें
शिंग, [2]
७१ ह्मणजे आमच्या शत्रूंपासून व आमचा द्वेष करणारे या सर्वांच्या
हातांतून सोडविणारा [3] आह्मासाठीं तयार केला आहे;

(१) इर्म. २३:५,६; दान. ९:२४. (२) गीत. १३२:१७. (३) यश. ५४:७-१७; इर्म. ३०:१०,११.

समाचार घेऊन, त्यांचें साह्य करावें व दुःख निवारण करावें म्हणून. मात्थ. २५: ४३ पाहा. जगाची दुःखावस्था पाहून ती दूर करायास व लोकांस तारायास तो आला. "खंडणी केली." असें बोलून जखर्यानें आपली खातरी दाखविली कीं खरा मशीहा आतां जन्मास येतो आहे आणि इस्राएलाची खंडणी झाली आहे म्हणजे त्यांस खंडून घेण्याचा उपाय सिद्ध झाला आहे. खंडणी म्हणजे लढाईंत पाडाव करून नेलेला त्याला सोडविण्याचें जें देणें तें आहे. माणसें पापी आहेत,देवाच्या आज्ञा मोडल्यानें तीं सर्वकाळचा दंड भोगण्यास योग्य झालीं आहेत, आणि नेमलेला दंड भरून घेतल्याशिवाय, अथवा त्याबदल ईश्वराचा न्याय तृप्त होईल आणि सृष्टीचें तेवढेंच कल्याण होईल, असा उपाय केल्याशिवाय, जर देवानें पाप्यांस मुक्त केलें असतें तर हें त्याच्या न्यायाला बाधक व सृष्टीला नाशकारक असें झालें असतें. असें असतां पाप्यांस जो दंड योग्य त्याबदल येशू ख्रीस्तानें जगांत येऊन आपला जीव दिल्हा आणि असें करून पापाबदल पुरतें प्रायश्चित केलें. याला पाप्यांची खंडणी म्हणावी. ती असी आहे कीं पाप्यांनीं नेमलेला दंड भोगल्यानें झालें असतें त्याप्रमाणेंच या खंडणीकडून देवाचा न्याय तृप्त झाला व सृष्टीचें कल्याण झालें आहे. प्राचीन काळीं सिल्यूकस राजानें एक कायदा केला कीं जो कोणी व्यभिचार करील त्याचे दोन डोळे काढण्यांत येतील. या अपराधांत प्रथम सांपडला तो त्या राजाचा एकुलता पुत्र होता. त्या बापानें एवढ्या संकटांत कसली खंडणी योजली? त्यानें पुत्राचा एक डोळा काढिला व आपलाहि एक डोळा काढिला. ही खंडणी पुरती होती. त्यानें असें करून आपल्या पुत्रावर व प्रजेवर फार प्रीति दाखविली, आपला न्याय व कायदा कायम राखिला आणि आपल्या प्रजेची सुधारणूक व कल्याण साधिलें. तसें ईश्वरानें आपला एकुलता प्रिय पुत्र जगांत पाठवून पाप्यांची खंडणी केली आहे. मात्थ. २०:२८; मार्क. १०:४५; ति. २:१४; इब्री. ९:१२.

६९–७१ "पहिल्यापासून."उत्पत्तीपासून सर्व भविष्यवाद्यांनीं मशीहाच्या येण्याविषयीं सांगितलें होतें. यांपैकीं उत्प. ४९:१०; अनु. १८:१५; यश. ९:६,७;५३. पाहा. "तारणाचें शिंग." शिंगांचीं जनावरें आपलें बळ व अधिकार शिंगांनीं दाखवितात, म्हणून शिंग ही सामर्थ्याची खूण आहे. गीतें. १४८:१४; अनु. ३३:१७; दान ७: ७,८;८:२१. तारणाचें शिंग म्हणजे हा थोर सोडविणारा तारण करायास समर्थ आहे. यहुदी लोकांच्या वेदीला, एक एक कोनाला एक एक अशीं चार शिंगें असत, आणि कोणी संकटांत असतां वेदीला शरणागत

७२ येणेंकरून त्यानें आमच्या पूर्वजांवरील दया पूर्ण केली;

७३ आणि जी शपथ [1] त्यानें आमचा बाप अब्राहाम यासीं वाहिली कीं,

७४ तुह्मी आपल्या शत्रूंच्या हातांतून सुटून निर्भय माझ्या समोर धार्मिकपणानें व न्यायीपणानें माझी सेवा [2] आपलें सर्व आयुष्य कराल असें मी करीन.

७५ याप्रमाणें जो आपला पवित्र करार तो त्यानें आठविला.[3]

७६ आणि हे बाळका, तुला परात्पराचा भविष्यवादी ह्मणतील, कारण कीं प्रभूचे मार्ग तयार [4] करण्याकरितां तूं त्याच्या तोंडापुढें चालसील.

७७ यासाठीं कीं त्याच्या लोकांस त्यांच्या पापांची क्षमा होण्यानें [5] जें तारण त्याचें ज्ञान द्यावें;

---

(१) उत्प. २२:१६,१७. (२) रोम. ६:२२; तित. २:११,१२; १पेत्र. १:१४,१५; प्रग. २:१०. (३) ले. २६:४२; गीत. १०५:८-१०; यहेज्क. १६:६०. (४) मल. ३:१. (५) प्रेषि. ५:१३.

जाऊन हीं शिंगें धरलीं तर सुरक्षित राहत असत. १राज. १:५०; २:२८. तसेंच आतां जे ख्रीस्ताला शरण जातात ते तारण पावतात. "शत्रूंपासून." माणसांचे शत्रु हे सैतान व त्याचे दूत, दुर्व्यसनें, वांच्छा, वाईट वासना वगैरे सर्व प्रकारचे दुर्गुण, असे आहेत. हीं त्यांचा नाश करायास पाहतात. यापासून आह्मास तारायास मशीहा आला. उत्प. ३:१५; मात्थ. १:२१.

७२ "पूर्वजांवरील दया." जी दया करावी ह्मणून त्यानें पूर्वजांस वचन दिलें ती. संततीवरील उपकार त्याच्या पूर्वजांवर उपकार आहे असें मोजण्यांत येतें.

७३ "जी शपथ." उत्प. २२:१६,१७ एथें ही शपथ लिहिली आहे. जें वचन देवानें आब्राहामाला दिल्हें तें किती पवित्र व कायम आहे हें दाखविण्यास त्यानें शपथ वाहिली, आणि ज्याची शपथ वाहावी असी आपणापेक्षां कोणी थोर नव्हता याकरितां त्यानें आपलीच शपथ वाहिली. इब्री. ६:१३,१४. तें वचन ख्रीस्ताच्या येण्याकडून अगदीं पूर्ण झालें.

७४,७५ "माझी सेवा...कराल." असी सेवा करणें त्या वचनांत होतें, आणि हें वचन देवानें पूर्ण केलें होतें म्हणून जखर्यानें त्याचें स्तवन केलें. "पवित्र करार." करार याचा अर्थ फारकरून बोली असा आहे. एथें करार म्हणजे जें वचन देवानें आब्राहामास दिल्हें होतें तें असें समजलें पाहिजे.

७६,७७ "हे बाळका." एथें जखर्या योहान्नाचें थोरपण, उद्योग, व यश भविष्य सांगून दाखवितो. "परात्पराचा भविष्यवादी." देवाचा अथवा देवानें नेमलेला भविष्यवादी. योहान्न देवाची इच्छा प्रगट करायास व मशीहाची वाट सिद्ध करायास नेमला होता. "तोंडा पुढें." त्याच्या समोर, त्याची वाट सिद्ध करावी म्हणून. यश. ४०:३; मात्थ. ३:३. "पापांची क्षमा झाल्याशिवाय तारण

७८ हें आमच्या देवाच्या परमदयेकरून झालें; तिजकडून उदयाच्या
प्रभेनें वरून आमची भेट घेतली आहे;
७९ यासाठीं कीं अंधारांत व मरणाच्या सावलींत बसलेल्यांस प्रकाश
[1] द्यावा व आमचे पाय शांतीच्या मार्गांस लावावे.
८० नंतर तो बाळक वाढला व आत्म्यानें बळकट होत गेला, आणि
इस्राएलामध्यें त्याच्या प्रगट होण्याच्या दिवसांपर्यंत तो रानामध्यें असे.

---

(१) यश. ९:२; ४९:९.

होतच नाहीं. जर पापी पश्चात्ताप करीत नाहींत तर देवाच्यानें त्यांस न्यायी असें मोजवत नाहीं. "त्याचें ज्ञान." म्हणजे जो मोठा तारणोपाय ख्रीस्ताकडून सिद्ध झाला आहे त्याचें ज्ञान द्यावें.

७८,७९ "उदयाच्या प्रभेनें." दिवसाचें उजाडणें म्हणजे पाहाट याची उपमा तारण्याच्या ज्ञानाला बरोबर लागती. हें ज्ञान वरून येतें, आकाशांतून प्रकाशतें. हें ज्ञान ईश्वराच्या परमदयेवरून आम्हास मिळालें आहे. यश. ४०:१२ पाहा व प्रग. २२:१६.

"प्रकाश द्यावा." मात्थ. ४:१६ यावर टीका पाहा. "पाय शांतीच्या मार्गांस लावावे." वाटसरें वाट चुकून भ्रमिष्ट होतात, रात पडली व कोणीकडे जावें हें माहित नसतां ते मोठ्या काळजीनें पाहाटेची वाट पाहतात, त्यांच्या संकटावरून हा दाखला घेतला आहे. तसल्या वाटसरांसारिखीं सर्व माणसें आकाशलोकची वाट चुकून पापरात्र लागली असतां कोणीकडे जावें हें न समजून मरणाच्या सावलींत निराश होऊन पडलीं होतीं. तेव्हां परमदयेवरून नीतीमत्वाचा सूर्य उगवला, तारणाचें ज्ञान पापी मनुष्यांवर प्रकाशलें, आणि आकाशलोकाकडली वाट सिद्ध होऊन त्यांस दिसून आली आहे.

जखर्यानें केलेलें सदहू गीत फार सुंदर आहे. यांत योहान्नाची भविष्य गोष्ट, पाप्यांस उद्धारण्याचा उपाय, आणि हा उपाय योजण्यांत ईश्वराची मोठी दया, हीं सुशब्देंकरून दाखविलीं आहेत. ही दया अतिशय मोठी आहे. आम्ही भटकणारे पापी, बिचारे, लाचार, नाशाच्या अवस्थेंत निराश होऊन पडलों होतों, तेव्हां ख्रीस्त तारणारा आला, तारणाची प्रभा जगावर फांकली, आणि आतां पापी माणसांनीं सर्वकाळचें जीवन पावण्याच्या आशेनें आनंद करावा.

८० "आत्म्यानें बळकट." त्याचें धैर्य बुद्धि, ज्ञान व सर्व सद्गुण वाढून तो आपलें भविष्यकाम करण्यास अधिक लायक होत चालला. "प्रगट होण्याच्या दिवसांपर्यंत." मात्थी. ३ ज्यांत वर्णलें आहे त्याप्रमाणें तो लोकांस उपदेश व बाप्तिस्मा करूं लागला तोंवर तो, आपला बाप राहत असे त्या डोंगरवटींत एकांतीं राहिला. त्या वेळेस त्याचें वय सुमारें तीस वर्षांचें झालें असेल. लूका ३:२३.

अध्याय २.—आणि असें झालें कीं त्या दिवसांमध्यें सर्व जगाची नांवनिशी लिहावी असी कैसर औगुस्तस याची आज्ञा झाली.

२ कुरेनयस सुरिया प्रांताचा अधिकारी असतां ही पहिली नांवनिशी झाली.

३ तेव्हां सर्व लोक आपापल्या नगरांत नांवनिशी लिहून द्यायास गेले.

अध्याय २.

१ "त्या दिवसांमध्यें." म्हणजे योहान्न जन्मल्यावर थोडक्या दिवसांनीं. "कैसर औगुस्तस." हा रोमी बादशाह होता. त्याचें नांव आक्तेविएसहि होतें. हा जुलियस कैसराचा पुतण्या होता आणि तो मरण पावल्यावर हा राजगादीवर बसला. औगुस्तस अथवा आगस्तस याचा अर्थ मूळभाषेंत प्रतिष्ठित असा आहे आणि या कैसरानें आपली प्रतिष्ठा दाखविण्यास हें नाम करून घेतलें; मग रोमी लोकांचा एक महिना ज्याला सेक्षिलिस म्हणत आले होते त्याला या गोष्टीवरून ते आगस्त म्हणूं लागले आणि तेंच नाम त्या महिन्याचें आजपर्यंत चाललें आहे. "सर्व जगाची नांवनिशी," म्हणजे केवळ यहुदा देशाची असें नव्हे तर गालील प्रांत व सगळ्या पालस्तीन यांची नांवनिशी लिहायाची होती. असें मानण्याचें कारण हेंच कीं मारया व योसेफ हीं गालीलांत राहत होतीं म्हणून केवळ यहुदा देशाची नांवनिशी लिहायाची असली तर मारया व योसेफ यांस आपल्या जन्म गावीं जाण्याचें अगत्य पडलें नसतें. तर रोमी बादशाईच्या अमलांत तुर्कस्थानांतले जे जे प्रांत आले होते त्या सर्वांची नांवनिशी करून घ्यावयाची होती, असें समजलें पाहिजे. "जग." सर्व जग, या शब्दावरून सगळी पृथ्वी असें नव्हे, परंतु अनेक प्रांत, असें वारंवार समजलें पाहिजे.

मात्थ. ४:८; यहोश. २:३; लूक. ४:२५; २१:२६. तुर्कस्थानांतले जे लोक रोमी अमलांत आले होते त्यांची गणना व्हावी ह्मणून कैसरानें ही आज्ञा केली.

२, ३ "कुरेनयस." योसेफसानें केलेल्या इतिहासावरून असें दिसतें कीं रोमी बादशाहानें हा कुरेनयस, ही नांवनिशी लिहून घ्यावयास पाठविला, मग मागून त्याला सुरिया प्रांताचा अधिकारी असें केलें. व्यारस जो त्यावेळेस सुरियाचा अध्यक्ष होता त्यापेक्षां अधिक अधिकार कुरेनयसाला मिळाला असेल यासाठीं कीं ही गणना त्यानें बरोबर करून घ्यावी, आणि मग व्यारसाच्या ठिकाणीं तो अधिकारी झाला. तर या साऱ्या वेळेस कुरेनयस मोठा अधिकार चालवीत होता आणि मागून सुरिया प्रांताचा अधिकारी असल्यावरून तो प्रख्यात झाला आणि या संज्ञेवरून प्रतिष्ठित झाला ह्मणून नांवनिशीचें वर्णन करितांना लूका त्याची ही संज्ञा धरितो. ही कुरेनयसानें केलेली पहिली नांवनिशी झटली कारण तिच्यामागून त्यानें दुसरी नांवनिशी करून घेतली. प्रेषित. ५:३७. "सुरिया प्रांत." ह्मणजे भूमिमध्यें समुद्र व फराथ नदी यांमध्यें पालस्तीनाचा जो प्रदेश

४ आणि योसेफ आपली लग्नाची बायको मारया गरोदर होती तिज-
बरोबर नांवनिशी लिहून द्यायास,
५ गालीलांतील नाजारेथ नगरापासून यहूद्यांतील बेथलहेम नामें
दावीदाचें नगर तेथें गेला; तो दावीदाच्या घराण्यांतला व कुळांतला
होता ह्मणून.
६ आणि असें झालें कीं तीं तेथें होतीं तेव्हां प्रसूतीचे तिचे दिवस
भरले.
७ तेव्हां ती आपला प्रथम [1] पुत्र प्रसवली व त्याला बाळंत्यानें गुंडा-
ळून गव्हाणींत तिनें निजविलें, कारण कीं त्यांस उतारशाळेंत जागा
नव्हती.

(१) मात्थ. १:२५.

तो. शेमाचा मुलगा आराम याच्या नांवावरून सुरिया प्रांताला आराम ह्मणत असत. उत्प. १०:२२. तथापि आराम हें नांव अधिक विस्तीर्ण देशाला फारकरून देत असत. सुरिया प्रांताचीं मुख्य लक्षणें येणेंप्रमाणें आहेत: लबानोन अथवा लैबेनस व आंति लैबेनस असे दोन मोठे घाटमाथे उत्तरेकडून दक्षिणेकडे पसरले आहेत आणि पूर्वेस व दक्षिणपूर्वेस एक मोठें ओसाड रान आहे. दरे व खोरे हे फार सुपीक आहेत. पुष्कळ धान्य, फळें वगैरे पिकतात. वसलेल्या भागांत हवा फार रमणीय आहे. तेथें बहुत प्रकारचे लोक राहतात. त्यांपैकीं तुर्क व ग्रीक लोक मुख्य आहेत. लबानोन डोंगरावर कोणी विलक्षण लोक राहतात त्यांस द्रुजीज व मारोनिट म्हणतात. अरबी भाषा फार रूढींत आहे तरी कोणी कोणी तुर्की भाषा बोलतात.

४–६ "दावीदाचें नगर." हें दावीदाचें जन्मस्थान होतें म्हणून त्याचें नगर ह्मटलें आहे. या नगरांत मशीहा जन्मावयाचा असें भविष्यवाद्यांनीं लिहून ठेविलें होतें. यहुदी लोकांची गणना करीत असत तेव्हां वेगवेगळे घराणे निराळे करीत असत. योसेफ बन्यामिनाच्या कुलांतला व दाविदाच्या घराण्यांतला होता म्हणून दाविदाच्या नगराला जावें लागलें.

७ "प्रथम पुत्र." तिचा एकुलता एकच पुत्र असें म्हटलें नाहीं. हा तिचा पहिला पुत्र होता असें म्हटल्यावरूनच मागून अनेक पुत्र झाले म्हणून सुचविण्यांत येतें. "गव्हाणींत." नांवनिशी लिहून देण्यास एवढे लोक जमले होते कीं उतारशाळा भरून गेली आणि सर्व जिवांचा राजा जगांत आला तेव्हां या नीच अवस्थेंत तो जन्म पावला. सृष्टीचा प्रभु व धनी असतां त्यानें राजवाड्यांत उंच जातीच्या कुलीन आईबापांपासून जन्म घेतला असें नाहीं, तर गरीब लोकांशीं संबंध ठेवून आम्हा पाप्यांचें सुख दुःख भोगण्यास लायक झाला. त्याचे आईबाप गरीब असतांहि सद्गुणी व धार्मिक होते, आणि यावरून, असें दाखविलें आहे कीं उंच कुलांतल्या व मातबर आईबापांपासून, यापेक्षां गरीब व धार्मिक आईबापांपासून जन्म पावावा हें बरें आहे.

८ आणि त्याच प्रांतांत मेंढपाळ रात्रीं रानांत राहून आपले कळप
राखीत होते.

९ तेव्हां पाहा, प्रभूचा दूत त्यांच्या जवळ उभा राहिला, व प्रभूचें
तेज त्यांच्या भोंवतें प्रकाशलें आणि ते फार भ्याले.

१० मग दूत त्यांस ह्मणाला, भिऊं नका, कारण कीं पाहा, जो मोठा
आनंद सर्व लोकांस होईल त्याचें शुभवर्त्तमान मी तुह्मास सांगतों,

११ कीं दावीदाच्या नगरांत तुह्मासाठीं (१) आज तारणारा जन्मला
आहे, तो ख्रीस्त प्रभु आहे.

१२ आणि तुह्मास हीच खूण कीं, बाळक बाळंत्यानें गुंडाळून गव्हा-
णींत निजविलेलें असें तुह्मास सांपडेल.

१३ मग एकाएकीं आकाशांतल्या सैन्याचा समुदाय (२) त्या दुताबरो-
बर प्रगट झाला, त्यांनीं देवाची स्तुति करीत ह्मटलें,

१४ परमउंचामध्यें देवाला गौरव आणि पृथ्वीवर शांति, (३) माणसांवर
कृपा.

---

(१) यश. ९:६. (२) गीत. १०३:२०,२१; १ पेत्र. १:१२. (३) यश.५७:१९.

---

८ "मेंढपाळ.—रानांत." आक्तोबर महिन्याच्या अखेरीस त्या प्रांतांत एवढी थंडी होती कीं मेंढपाळ रान सोडून आपले कळप गोठ्यांत आणीत असत. यावरून कळतें कीं डिसेंबर महिन्याच्या २५ व्या तारिखेस नव्हे तर त्याच्या अगोदर ख्रीस्ताचा जन्म झाला असावा. तो कोणत्या महिन्यांत अथवा कोणत्या तारिखेस जन्मला हें कोणालाहि माहित नाहीं, म्हणून जाणण्याचें अगत्य नाहीं हें उघड आहे. ज्यांचें अगत्य आहे त्या गोष्टी ईश्वर कळवीत असतो; ही त्यानें लिहून कळविली नाहीं, तर अमका दिवस येशूचा जन्मदिवस आहे असें कल्पून तो दिवस पाळावा यांत काय हासील?

९ "प्रभूचें तेज." मोठें तेज—विलक्षण प्रभा. हा देखावा चमत्कारिक होता आणि शाऊलाला दमास्कसाच्या वाटेवर पडला त्यासारिखा असेल. प्रे. २२:११.

१०—१२ "ख्रीस्त प्रभु." ज्या मशीहाची वाट देवाचे सर्व भक्त पाहत आले आहेत तो हाच आहे. "हीच खुण." शोध केल्यावर जो बाळक असल्या अवस्थेंत सांपडेल तोच जगाचा तारणारा आहे असें जाणावें.

१३—१५ "सैन्याचा समुदाय." जे बुद्धिवंत तेजस्वी प्राणी नेहमीं ईश्वराच्या सेवेंत असतात त्यांतील बहुतेक त्या दुताला मिळून देवाचें चांगुलपण, प्रीति, व दया वर्णून मोठ्या आनंदानें त्याचें स्तवन करूं लागले. "परम उंचामध्यें." यावरून अनेक अर्थ सुचण्यांत येतात. (१) सर्वांहून उंच स्वरानें, देवाची स्तुति करावी. (२) सर्वांहून उंच व थोर प्राण्यांनीं देवाची

१५ आणि असें झालें कीं ते दूत त्यांपासून आकाशांत गेले तेव्हां ते
मेंढपाळ एकमेकांस ह्मणाले, चला, आपण बेथलहेमापावेतों जाऊं व ही
जी झालेली गोष्ट प्रभूनें आह्मास कळविली ती पाहूं.
१६ तेव्हां ते घाईनें गेले, आणि, मारया व योसेफ व गव्हाणींत निज-
विलेलें बाळक हीं त्यांस सांपडलीं.

पापी मनुष्यावरील दया पाहून त्याला मान द्यावा. (३) सर्वांहून उंच आकाशलोकांत; म्हणजे या पृथ्वीवर मात्र असें नव्हे तर सगळ्या सृष्टीमध्यें देवाची स्तुति केली असावी. (४) सर्वांहून उंच व थोर देव याची स्तुति केली असावी. यांतून कोणताहि अर्थ घेतला तरी विशेष भेद नाहीं. सर्व मिळून हाच अर्थ उघड आहे कीं पाप्यांस उद्धारण्याचा उपाय योजल्या वरून देवाला विशेष गौरव, स्तुति व मान देणें भाग आहे. सर्व पवित्र प्राणी देतात. सर्व माणसांनीहि दिल्हीं तर किती बरें होतें. "पृथ्वीवर शांति." मशीहा शांतीचा राजा अथवा कल्याणाचा अधिकारी होईल असें त्याविषयीं भविष्य लिहिलें होतें. यश. ९:६. जग देवाशीं लढत आहे पापी देवाचे व एकमेकांचेहि शत्रू आहेत. दुष्टांस कांहीं शांति नाहीं. परंतु समेट व शांति करावी म्हणून येशू आला. हें काम सिद्धीस नेण्याला त्यानें (१) आपलें जीवार्पण करून पापाबदल प्रायश्चित केलें. (२) पाप्यांनीं वैरभाव सोडून देवासीं समेटानें मिळावें म्हणून तो त्यांस प्रेरितो. (३) पाप्यांनीं आपला गर्व, अकस, इर्षा, लोभ, हेवा, वांच्छा वगैरे दुर्गुण मनांतून दूर करून एकमेकांचें कल्याण करावें असें तो प्रेरीत असतो. (४) सर्व राष्ट्रांमध्यें सर्वत्र शांति असावी असे नेम व बोध शुभवर्त्तमानें करून तो देतो. शुभवर्त्तमान सर्वत्र चालेल आणि सर्व लोक ख्रीस्तानें शिकविल्याप्रमाणें एकमेकांवर प्रीति करतील तेव्हां द्वेष, कज्जा, भांडण, लढाया हीं बंद होतील व शांति सर्वत्र साऱ्या पृथ्वीवर राज्य करील. "माणसांवर कृपा." येशूला जगांत पाठविल्यानें देवानें माणसांवर अतिशय प्रीति दाखविली. ही प्रीति नरकाचें दुःख व आकाशलोकचें सुख याकडूनच मोजण्यांत येती. तारणोपाय ईश्वराच्या प्रीतीनेंच योजला होता, असें सर्वदा दर्शविलें आहे. यो. ३:६; एफ. ५:२.१; यो. ४:१०; प्रग. १:५. कितीएक पापी मनांत आणितात कीं देवानें पवित्र आज्ञा दिल्या नसल्या व शुभवर्त्तमान कळविलें नसलें तर बरें. त्यांचा केवढा भ्रम आहे? सूर्य नसला तर बरें असें अंधारांत चालणारा मनुष्य म्हणतो त्यासारिखे ते आहेत. जो रोगी मनुष्य मरणास टेंकला असतां म्हणतो कीं माझ्या रोगाला औषध कळलें नसतें तर बरें होतें त्यासारिखे ते आहेत. जो समुद्रांत बुडणारा काढणाऱ्या मित्राला धिःकारितो त्यासारिखे ख्रीस्ताला धिःकारणारे असतात. देवानें आम्हा पाप्यांवर पहिल्यानें प्रीति केली तर आह्मी त्यावर केवढी प्रीति करावी बरें? १ यो. ४:१९.

१६–१८ "ते घाईनें गेले." हे गरीब धार्मिक मेंढपाळ मशीहाची वाट पाहत होते ह्मणून तो जन्मास आला आहे असें ऐकून त्याच्या भेटीस जायाला ते आनंदानें निघाले.

१७ मग त्यांनीं पाहिल्यावर त्या बाळकाविषयीं जी गोष्ट आपणांस सांगितली होती ती त्यांनीं कळविली.

१८ आणि सर्व ऐकणाऱ्यांनीं आपणांस मेंढपाळांनीं सांगितलेल्या गोष्टींविषयीं आश्चर्य केलें.

१९ परंतु मारयेनें या सर्व गोष्टींचें मनन करून त्या आपल्या अंतःकरणांत ठेविल्या.

२० नंतर त्यांस सांगितलें होतें त्याप्रमाणें मेंढपाळ सर्व गोष्टी ऐकून व पाहून, त्यांमुळें देवाचें गौरव व स्तुति करीत माघारे फिरले.

२१ मग आठ दिवस भरल्यावर[1] बाळकाची सुंता झाली तेव्हा त्याचें नांव येशू ठेविलें, हें नांव तो पोटांत संभवल्यापूर्वीं दुतानें[2] दिल्हें होतें.

२२ नंतर मोश्याच्या नेमशास्त्राप्रमाणें[3] तिचे शुद्धीचे दिवस भरले तेव्हां त्यांनीं त्याला यरूशलेमास आणिलें,

२३ यासाठीं कीं प्रत्येक प्रथम जन्मलेला नर[4] प्रभूसाठीं पवित्र ह्मणावा, असें जें प्रभूच्या नेमशास्त्रांत लिहिलें आहे त्याप्रमाणें त्याला प्रभूजवळ सादर करावें;

---

(१) ले. १२:३. (२) मात्थ. १:२१; लूका. १:३१. (३) ले. १२:२. (४) निर्ग. १३:१२; २२:२९; गण. ८:१७.

तसें आतां सर्वांनीं ख्रीस्ताची गोष्ट ऐकून त्याला आनंदानें स्वीकारावें. "त्यांनीं पाहिल्यावर." दुतांनीं ह्मटलें होतें त्यावर भरवसा ठेवून ते पाहायाला आले आणि बाळक पाहिल्यावर त्यांची पूर्ण खातरी झाली असतां ते इतर लोकांस सांगूं लागले तसेंच आतां जे ख्रिस्ती होतात त्यांनीं आपले इष्ट मित्र सोयरे धायरे यांस उत्सुकतेनें ख्रीस्ताची गोष्ट सांगावी, आणि त्यांनींहि आपल्या जिवात्म्याचें तारण साधून घ्यावें ह्मणून त्यांस आग्रहानें मथवावयास झटावें.

१९—२१ "या सर्व गोष्टींचें." बाळकाविषयीं घडल्या व लोकांनीं म्हटल्या त्या सर्व गोष्टी आईच्या काळजीनें मारया ध्यानांत ठेवून विचार करीत गेली. "देवाचें गौरव." मशीहा खरोखर आला आहे असें पाहून ते मेंढपाळ, देवाची स्तुति करीत, आपल्या घरीं गेले. "आठ दिवस." आठवा दिवस नेमला होता. उत्प. १७:१२. "त्यानें नांव येशू." मात्थ. १:२१ पाहा.

२२, २३. "तिचे शुद्धीचे दिवस." आई मुलगा प्रसवल्यावर सुमारें चाळीस दिवस आणि मुलगी प्रसवल्यावर ऐंशी दिवस घरीं राहून तिनें अशुद्ध मोजलें जावें असी चाल होती. ले. १२:३,४. "प्रभूजवळ सादर करावें." प्रथम जन्मलेला नर पवित्र म्हणजे उपाध्याचें काम करण्यास नेमला असा होता. निर्ग. १३:२. मागून देवळांतल्या

२४ आणि प्रभूच्या नेमशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें पारव्यांचा जोडा
किंवा खबुत्रांचीं दोन पिलें यांचा यज्ञ करावा.
२५ तेव्हां पाहा, शिमोन नामें कोणीएक माणूस यरूशलेमांत होता,
आणि तो न्यायी व धार्मिक माणूस असतां इस्राएलाच्या शांतवनाची [1]
वाट पाहत असे, व त्यावर पवित्र आत्मा होता.
२६ आणि प्रभूच्या ख्रीस्ताला पाहिल्यापूर्वीं तुला मरण येणार नाहीं [2]
असी पवित्र आत्म्यानें त्याला सूचना केली होती.
२७ तेव्हां तो आत्म्यानें देवळांत आला आणि आईबापांनीं त्या येशू
बाळकाविषयीं नेमशास्त्राच्या विधीप्रमाणें करण्याकरितां त्याला आंत आणिलें.
२८ तेव्हां त्यानें त्याला आपल्या हातांवर घेऊन देवाची असी स्तुति
केली कीं,

---

(१) मार्क. १५:४३; लूक. २:३८; यश. ४०:१. (२) गीत. ८९:४८; इब्री. ११:५.

सेवेसाठीं देवानें वडील पुत्राच्या बदल लेवीचा घराणा नेमिला. गण. ८:१३–१८. असें असतांहि प्रथम जन्मलेला आपणासुद्धां देवाजवळ सादर करायाचा होता.

२४ "पारव्यांचा जोडा." ज्यांस सामर्थ्य होतें त्यांनीं होमासाठीं मेंढा व पापहारक यज्ञासाठीं पारव्यांचीं पिलें आणावीं असें होतें. मारयेनें केवळ पारवे अथवा कबुत्रांचीं पिलें आणिलीं यावरून तीं गरीब होतीं असें दिसतें. येशूनें दरिद्रावस्थेंत जन्म घेऊन दाखविलें आहे कीं दरिद्र असल्यावरून अपमान नाहीं. दरिद्रावस्थेंत असल्यावरून जर माणसें सद्गुणी व धार्मिक होतात तर ती अवस्था रुपें व सोनें यांपेक्षां चांगली आहे. येशू पापाविरहित जन्मला असतां व अगदीं शुद्ध असतां हें शुद्धीचें यज्ञार्पण व त्याची सुंता हीं त्यानी नेमानें कां केलीं, असें कोणी विचारिलें तर नेमशास्त्र रद्द करावयास नव्हे तर पूर्ण करायास तो आला असें ध्यानांत ठेविलें पाहिजे. शिवाय त्याची सुंता झाली नसती तर सभास्थानांत त्याला येऊं दिलें नसतें आणि हा आमचा खरा मशीहा आहे, असें कोणाच्यानें मानवलें नसतें. तर नेमशास्त्र व देवाचा कायदा यांस मानून त्यानें आम्हास अनुसरण्याजोगा असा कित्ता दाखविला आहे. मात्थ. ३:१५ यावर टीका पाहा.

२५ "शिमोन." सान्हीद्रिम सभेचा अध्यक्ष हिल्लेल जो प्रख्यात व विद्वान उपाध्या होता त्याचा पुत्र हा शिमोन होता असें कोणी कल्पितात. परंतु याचें कांहीं प्रमाण नाहीं. तो वृद्ध, सद्गुणी व धार्मिक मनुष्य होता हें उघड आहे. "इस्राएलाच्या शांतवनाची वाट." ह्मणजे मशीहाची वाट. मशीहा येईल तेव्हां इस्राएलाला मोठें शांतवन होईल असें मानून त्याला ही संज्ञा दिल्ही होती. यहुदी इस्राएलाचें शांतवन, या शब्दांकडुन कचेरींत शपथ वाहत असत. "त्यावर पवित्र आत्मा होता." पवित्र आत्म्यानें त्याला प्रेरिलें व शिकविलें.

२६, २७. प्रभूच्या अभिषिक्ताला ह्मणजे मशीहाला. वृद्ध व धार्मिक शिमोन

२९ हे प्रभू, आतां तूं आपल्या वचनाप्रमाणें आपल्या सेवकाला शांतीनें
(१) सोडतोस.

३० कारण कीं, जें तुझें तारण (२) त्वां सर्व लोकांच्या देखतां तयार
केलें.

३१ तें म्या आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे.

३२ तें विदेश्यांस (३) प्रकाश होण्यासाठीं व तुझ्या इस्राएल लोकांच्या
गौरवासाठीं उजेड होईल.

३३ तेव्हां त्याविषयीं सांगितलेल्या गोष्टींवरून योसेफ व त्याची आई
यांस आश्चर्य वाटलें.

३४ मग शिमोनानें त्यांस आशीर्वाद दिल्हा, व त्याची आई मारया
इला ह्मटलें, पाहा, हा इस्राएलांत बहुतांचें पडणें (४) व फिरून उठणें
यासाठीं, व ज्याविरुद्ध (५) बोलतील असें चिन्ह यासाठीं ठेविला आहे.

---

(१) उत्प. ४६:३०; यश. ५७:२; प्रग. १४:३. (२) यश. ५२:१०; लूक. ३:६; प्रेषि. ४:१२.
(३) यश. ४२:६; ४९:६; ६०:३; प्रेषि. १३:४७, ४८. (४) यश. ८:१४; रोम. ९:३२,३३;
१ करिं. १:२३,२४; २ करिं. २:१६; १ पेत्र. २:७,८. (५) प्रेषि. २:३२;७:५२.

बहुत वर्षांपासून त्याची वाट पाहत आला असतां त्याला पाहिल्याशिवाय तूं मरणार नाहींस असें देवानें कळविल्यावरून त्याला केवढा आनंद झाला असावा बरें? त्याप्रमाणें हल्लीं सर्वांनीं ख्रीस्ताला विश्वासाच्या डोळ्यानें पाहून व त्याजवर भाव ठेवून पापांची क्षमा व जिवात्म्याचें तारण साधून घेऊन आकाश लोकांत त्याजवळ राहण्याचा व सर्वकाळचें सुख भोगण्याचा भरवसा आनंदानें करून घ्यावा. "देवळांत." म्हणजे ज्या अंगणांत लोक मिळून भजन करीत असत त्यांत. मात्थ. २१:१२. यावर टीका पाहा.

२९—३१ "सोडतोस." मरूं देतोस. देवानें आपल्या वचनाप्रमाणें त्याला मशीहाला पाहूं दिलें होतें म्हणून तो आनंदानें मरायास तयार होता. ईश्वर आपलें वचन सर्वदा पूर्ण करितो. जे त्याजवर भरंवसा ठेवितात त्यांची आशा कधीं भग्न होत नाहीं. "जें तुझें तारण." ज्याकडून लोकांचें तारण होणार तो— म्हणजे तारणारा.

३२–३४. विदेशांस प्रकाश." भविष्यवाद्यांनीं म्हटल्या प्रमाणें. यश. ४९ व ९:६,७; गीत.९८:३; मल. ४:२. जे अंधारांत व पापांत आहेत त्यांस ख्रीस्त प्रकाश असा होतो, कारण तो खरा देव व तारणोपाय प्रगट करितो. सूर्य उगवल्यानें अंधार उडून जातो, तसा येशूकडून मनाला प्रकाश होतो. राष्ट्रें त्याच्या प्रकाशाकडे व राजे त्याच्या प्रभेकडे येतील. यश. ६०:२३.

"इस्राएल." इस्राएलांतून ख्रीस्त आला. त्यांजवळ भविष्य लेख होते. त्यांचें तारण व्हावें ह्मणून आधीं त्यानें त्यांस उपदेश

३५ आणि तुझ्याच जिवांतूनहि (१) तरवार पार जाईल; बहुत अंतः-
करणांच्या कल्पना (२) प्रगट व्हाव्या म्हणून.

---

(१) यो. १९:२५. (२) न्या. ५:१६; १ करिं. ११:१९.

केला, आणि त्यांस विशेषेंकरून तो गौरव व प्रकाश असा होता. यो. ४:२२; लु. २४:४७. परंतु विदेशांचेंहि तारण व्हावें म्हणून तो त्यांस प्रकाश झाला यावरून आह्मीं फार आभारी असावें. कारण (१.) आम्हीं विदेशी आहों, आणि जर तो आह्मा-साठींहि आला नसता तर आह्मास तारण कधीं मिळालें नसतें. (२.) तो आह्मासाठीं येऊन मरण पावला असतांहि आम्हीं त्याजवर खरा विश्वास ठेवून शिमोनासारिखें धार्मिक असावें मग त्यासारिखें शांतीचें मरण येईल. २ पेत्र ३:११, १२.

"आशीर्वाद दिल्हा." ह्मणजे मारया व योसेफ यांस आशीर्वाद दिल्हा. "पडणें." ह्मणजे दुःख, विपत्ति, इ. गोष्टींवरून बहुत अडखळून नाश पावतील. यश. ८:१४, १५. मशीहा ऐहिक राजा होईल असें बहुतेकांस वाटलें ह्मणून त्याची नम्रता पाहून व त्याचें राज्य या जगाचें नव्हे असें समजून त्यांनीं ख्रीस्ताला धिःकारिलें व वधस्तंभावर जिवें मारिलें. यावरून ते रोमी लोकांच्या हातीं पडले, हजारों पाडाव होऊन दूर नेले गेले, आणि हजारों नाश पावले. रोम. ९:३२, ३३; १ पेत्र. २:८; १ करिंथ. १:२३, २४. "फिरून उठणें." फिरून, हा शब्द मूलभाषेंत नाहीं. जे पडले तेच फिरून उठतील असा कांहीं अर्थ नाहीं. परंतु ख्रीस्ताविषयीं बहुतेक अडखळून नाश पावतील इतक्यांत दुसरे बहुतेक त्याला अंगीकारून तारण पावतील असा अर्थ आहे आणि तसेंच आजपर्यंत होत चाललें आहे. "चिन्ह यासाठीं." याप्रमाणें आजपर्यंत ख्रिस्त हा, नास्तिक, लुच्या आणि वाईट लोकांमध्यें उपहासास्पद आहे. हें भविष्य वचन अगदीं पूर्ण झालें आहे. यश. ८:१ ८ व प्रेषि. २८:२२ बरोबरीस आणून पाहा. हजारों हजार अद्यापि ख्रीस्ताची लाज धरून व त्याला धिःकारून नाश पावतात, परंतु, ईश्वराची स्तुति असो, इतर हजारों हजार ख्रीस्ताला शरण जाऊन त्याकडून नवें अंतःकरण पावून व धार्मिक होऊन त्याबरोबर आकाश लोकांत राहण्यास व सर्वकाळचें सुख भोगण्यास सिद्ध होत चालत आहेत.

३५ "तुझ्याच जिवांतूनहि." तुझ्या पुत्राचें दुःख व मरण पाहून तुलाहि तीक्ष्ण दुःख प्राप्त होईल. याप्रमाणें पूर्वीं मारयेला समजलें नसतें तर तिच्यानें येशूचीं दुःखें पाहून सोसवलीं नसतीं. पूर्वीं समजून ती सिद्ध झाली. "बहुत अंतःकरणांच्या कल्पना." इ. हें मागल्या वाक्यासीं संबंध ठेवितें. तो द्वेषास्पद होईल; बहुत लोक त्याची निंदा व द्वेष करून आपल्या अंतःकरणाच्या कल्पना प्रगट करतील असा अर्थ होतो. तसेंच सांप्रतकाळीं बहुत लोक ख्रीस्ताचा फार द्वेष करितात. जरी पाप्यांचें तारण करायास त्यानें अतिदयेंकरून आपला जीव दिल्हा तरी बहुतेक त्याचा द्वेष करून हा शास्त्रलेख पूर्ण करितात. १ करिं. १२:३.

३६ आणखी आशेराच्या वंशांतील फानूवेलाची कन्या हान्ना नामें भविष्यवादीण होती, ती फार म्हातारी झाली होती, ती आपल्या कुंवारपणापासून नवऱ्याजवळ सात वर्षें राहिली होती.

३७ आणि ती सुमारें चौऱ्यायशीं वर्षांची विधवा असतां देऊळ न सोडून रात्रंदिवस उपासांनीं व प्रार्थनांनीं [1] सेवा करीत असे.

३८ तीहि त्याच वेळेस जवळ येऊन प्रभूची स्तुति करूं लागली, व यरूशलेमांत जे खंडणीची [2] वाट पाहत होते त्या सर्वांस त्याविषयीं बोलली.

३९ नंतर प्रभूच्या नेमशास्त्राप्रमाणें अवघें समाप्त केल्यावर, तीं गालीलांत आपलें नगर नाजारेथ तेथें माघारीं गेलीं.

४० आणि तो बाळक वाढला व आत्म्यानें बळकट होऊन ज्ञानेंकरून पूर्ण झाला, [3] व देवाची कृपा त्याजवर होती.

(१) प्रेषि. २६:७; १ तीम. ५:५. (२) लूक. २:२५ (३) यश. ११:२,३; लूक. २:५२.

३६, ३७ "आशेराच्या वंशांतील." हा वंश कनानाच्या उत्तरेकडल्या प्रांतांत राहत असे. हान्ना ही भविष्यवादीण असी कशावरून म्हटली होती हें दर्शविलें नाहीं. तिचा नवरा भविष्यवादी यावरून असेल; अथवा ती आपली वेळ देवाची सेवा व स्तुति करण्यांत घालवीत असे यावरून असेल. १ काळ. २५:१,२,४; १ शमु. १०:५. अथवा कदाचित् ती स्वतां भविष्य सांगे यावरून असेल. ती धार्मिक होती आणि देवळांत नेमलेली सेवा व भजन यांत तत्पर राहत असे. देवाची भक्ति एकांतीं व लोकांनीं नेमानें करीत जातात त्यांस ईश्वर विशेष आशीर्वाद देत असतो.

३८—४० "खंडणीची वाट" म्हणजे उद्धारणाऱ्याची वाट. खंडणी, तारण, उद्धार व इस्राएलाचें शांतवन हीं कृत्यें ख्रीस्ताकडूनच होतात म्हणून हे शब्द वरचेवर त्याच्या बदलीं योजण्यांत येतात. "नाजारेथ तेथें." इ. लागलेंच गेलीं असे नाहीं. आधीं तीं मिसरांत जाऊन कांहीं दिवस राहिलीं मग माघारीं गेलीं. लूकानें त्यांचें मिसर देशांत जाणें वर्णिलें नाहीं. बखरकर्ते वरचेवर अमुक गोष्टी सोडतात. पाऊलसाविषयीं म्हटलें आहे कीं तो ख्रिस्ती झाल्यावर यरूशालेमास गेला. प्रेषि. ९:२६. हें वाचून बहुतेकांस वाटेल कीं तो यरूशालेमास लागलाच गेला, परंतु मागून कळण्यांत येतें कीं तीन वर्षें मध्यें पडलीं. गल. १:१७, १८. "आत्म्यानें बळकट." जसा मनुष्य देह तसा मनुष्यात्माहि ख्रीस्ताला होता आणि जनरूढीप्रमाणें त्याचा देह, बुद्धि वगैरे मनुष्यगुण वाढले. त्याचा मानवी देह वाढणें त्याच्या देवपणाला बाधक नाहीं, तसेंच त्याचा मानवी आत्मा व बुद्धि वाढणें त्याच्या देवपणाला विपरीत नाहीं. तो लहान होता इतक्यांत मोठें ज्ञान दाखवून प्रख्यात झाला. येशूच्या लेंकुरपणा-

४१ आणि प्रतिवर्षी [१] त्याचे आईबाप वल्हांडण सणाला यरूशलेमास जात असत.

४२ आणि तो बारा वर्षांचा झाला तेव्हां ते त्या सणाच्या चालीप्रमाणें यरूशलेमास गेले.

४३ मग दिवस संपल्यावर, ते माघारे जाते वेळेस तो मुलगा येशू योसेफाला व त्याच्या आईला न कळतां यरूशलेमांत मागें राहिला.

४४ परंतु तो वाटेच्या सोबत्यांत आहे असें समजून ते एका दिवसाची वाट गेले, नंतर नातलग व ओळखी यांमध्यें त्यांनीं त्याचा शोध केला.

४५ परंतु तो त्यांस सांपडला नाहीं, ह्मणून ते त्याचा शोध करीत यरूशलेमास माघारे गेले.

४६ आणि असें झालें कीं तीन दिवसांनंतर तो देवळांत गुरूंच्या मध्यें बसून त्यांचें ऐकतां व त्यांस प्रश्नहि करितां त्यास सांपडला.

---

(१) निर्ग. २३:१५; अनु. १६:१.

विषयीं एवढेंच शुभवर्त्तमानांत लिहून ठेविलें आहे. तो बारा वर्षांचा असतां येरूशालेमास गेला याविषयीं संक्षिप्त वर्णन आहे. मग तो तीस वर्षांचा झाला तोंवर कांहीं वर्णलें नाहीं. तो एकांतीं कसा होता हें नव्हे तर तो लोकांत कसा उपदेश करीत असे, मनुष्यांच्या पापाबद्दल त्याने आपला जीव कसा दिल्हा, मग मेलेल्यांतून कसा उठला, या भारी गोष्टींचें वर्णन करावें हें विशेष अगत्याचें आहे ह्मणून शुभवर्त्तमान कर्त्यांस वाटलें, तरी तो एकांतीं कसा वागत असे याविषयीं जें सांगितलें आहे त्यावरून उघड होतें कीं, तो ज्ञानी, शुद्ध, देवाला आवडता व ईश्वरी विद्येंत निगुण होता. आईबापांस मान्य होऊन व सदाचरण दाखवून त्यानें सर्व लेंकरांस चांगला कित्ता दाखविला.

४१—४३ "वल्हांडण सणाला." मात्थ. २६:२ ज्या वरील टीका पाहा. "तो बारा वर्षांचा झाला." हें वय भरल्यावर मुलांनीं दर वर्षीं तीनदां विधी प्रमाणें देवळांत येऊन भक्ति करावी असा नेम होता. निर्ग. २३:१४-१७; अनु. १६:१६ नाजारेथापासून यरूशालेम सुमारें ७० मैल म्हणजे ३५ कोस आहे. "दिवस संपल्यावर" सणाचे आठ दिवस. निर्ग. १२:१५; ले. २३:५,६.

४४—४६ नातलग, शेजारी पाजारी असे बहुत मिळून सणास जात असत. निघण्याच्या खटपटींत असतां त्यांनीं निघाल्यापूर्वीं थोड्या वेळानें येशूला पाहिलें असेल, मग निघते वेळेस तो नाहीं असें पाहून जे नातलग आधीं निघाले त्यांबरोबर असावें असें त्यांस वाटलें. "तीन दिवसांनंतर." एका दिवसाची मजल चालून रात्रीं मुक्काम केल्यावर येशूचा शोध लागला नाहीं मग दुसऱ्या दिवशीं तीच मजल करून परत यरूशालेमास आले, मग तिसऱ्या दिवशीं तो सांपडला, असें समजायाचें ह्मणून दिसतें. मात्थ. २७:६३; मार्क. ८:३१ यावरून

४७ तेव्हां त्याचें सर्व ऐकणारे त्याच्या बुद्धीवरून[१] व उत्तरांवरून थक्क झाले.

४८ तेव्हां ते त्याला पाहून आश्चर्य पावले, व त्याची आई त्याला ह्मणाली, मुला, त्वां आह्मासीं असें कां केलें? पाहा, तुझा बाप व मी कष्टी होऊन तुझा शोध करीत आलों.

४९ त्यानें त्यांस ह्मटलें, माझा शोध कां केला? जें माझ्या बापाचें[२] त्यांत म्या असावें हें तुह्मास ठाऊक नव्हतें काय?

५० परंतु त्यानें त्यांस सांगितलेली गोष्ट ते समजले नाहींत.

५१ मग तो त्यांच्या संगतीं उतरून नाजारेथास गेला व त्यांच्या आज्ञेंत राहिला, आणि त्याच्या आईनें या सर्व गोष्टी आपल्या अंतःकरणांत ठेविल्या.[३]

५२ नंतर येशू ज्ञानांत व शरीरांत व देवाच्या व माणसांच्या कृपेंत वाढत चालला.[४]

---

(१) गीत. ११९:९९; मात्थ. ७:२८; मार्क. १:२२; लूक. ४:२२,३२; यो. ७:१५,४६. (२) यो. ५:१७; ९:४. (३) दान. ७:२८; लूक. २:१९. (४) १ शमु. २:२६; लूक. २:४०.

सिद्ध होतें कीं तीन दिवसभर असें समजण्याचें अगत्य नाहीं. "गुरूंच्यामध्यें" हे उपाध्ये लोकांस धर्म शिकविणारे होते. सर्व त्यांस मान देत असत. येशू ज्ञान मिळविण्यास साधारण उपाय लावीत होता. त्यानें त्यांस कांहीं अवमानिलें असें दिसत नाहीं. वृद्धांस मान द्यावा व सर्वांसीं सभ्यतेनें वागावें हा सर्वांचा धर्म होय. आणि खिस्ती शास्त्रावरून असें शिकविलें आहे. १ पेत्र. २:१७; ३:८,९; निर्ग. २०:१२; मात्थ. २३:२; रोम. १३:७.

४७—४९ "त्वां आह्मासीं असें कां केलें." आह्मास एवढे कष्ट व काळजी कां दिल्ही? "तुझा बाप." योसेफ त्याचा वास्तविक बाप नव्हता, परंतु येशू पवित्र आत्म्यानें संभवला हें लोकांस माहित नसतां आणि योसेफ त्याचा कायद्याचा बाप असतां बाप म्हणत असत. म्हणून मारयाहि ह्मणत असे. "माझा शोध कां केला? इ." हें उत्तर देऊन खीस्तानें त्यांस दाखविलें कीं, मी देवापासून आलों, तर तो माझा संभाळ करील असें मनांत आणून एवढे कष्ट व काळजी धरायाची नव्हती. देव जो बाप त्याचें काम करणें इतर सर्व गोष्टींपेक्षां जरूर आहे.

५०—५२ "ते समजले नाहींत." हा येशू खरा मशीहा व जगाचा तारणारा आहे हें दर्शविण्यास बहुत चमत्कारिक गोष्टी घडल्या असतांहि त्याचे आईबाप देखील समजले नाहींत, यावरून मोठें आश्चर्य आहे खरें; परंतु प्रमाणें पाहिलीं असतांहि लोक विश्वास धरायाला किती मंद आहेत हें दिसून येतें. "त्यांच्या आज्ञेंत राहिला." तो विश्वासू व आज्ञाधारक मुलगा होता. योसेफ सुतार होता आणि येशूहि तेंच काम चाल-

३ अध्याय.—मग तिबेरयस कैसर याच्या अधिकाराच्या पंधराव्या वर्षी पंतयस पिलातस यहूदाचा अधिकारी असतां, व हेरोद गालीलाचा राजा असतां व त्याचा भाऊ फिलिप्पस हा इतुराया व त्राखोनितिस या देशांचा राजा असतां, व लूसानयस अविलेनेचा राजा असतां,

---

र्वीत असे याविषयीं अंदेशा नाहीं. येशू परात्पराचा पुत्र असतां आपल्या मानवी आईबापांस मान्य असे; तो प्रभूंचा प्रभू असतां साधारण काम तीस वर्षें करीत गेला; तर लेंकरांस व सर्वांस हा केवढा उत्कृष्ट कित्ता आहे. श्रम घेण्याची, कांहीं चांगला कामधंदा चालविण्याची लाज कोणी धरूं नये. मेहनत करावी, धंदा चालवावा, यापेक्षां सुस्त बसून कुरकूर करावी व भीक मागावी ही लाजेची गोष्ट असें सर्वांनीं मोजावें. जीं लेंकरें ख्रीस्ताचा कित्ता अनुसरून आईबापांस मान्य होतात, व नेमस्त, मेहनती व सद्गुणी होऊन ज्ञानांत आणि देवाच्या व माणसाच्या कृपेंत वाढतात तीं धन्य होत.

अध्याय ३.

१ "तिबेरयस कैसर." हा औगुस्तस कैसर याच्या बदलीं होऊन सन १४ आगस्त महिन्याच्या १९ व्या तारिखेस गादीवर बसला. हा अगदीं लुच्चा व दुर्व्यसनी होऊन रोमी लोकांस पीडा असा झाला. त्यानें २३ वर्षें राज्य केलें आणि त्याच्या मागून कायस कालिगुला गादीवर बसला, तो अतिदुष्ट होता, यामुळें तिबेरियसानें त्याला नेमिलें यासाठीं कीं त्यानें रोम्यांस सापाप्रमाणें व्हावें. "पंधराव्या वर्षी," ह्मणजे औगुस्तसा बरोबर २ वर्षें त्यानें राज्य चालविलें, तीं धरून पंधराव्या वर्षी. पंतयस पिलातस." महान हेरोद आपलें राज्य विभागून आपल्या तीन पुत्रांस देऊन मेला. मात्थ. २:२२ यावर टीका पाहा. आर्खेलावस याला हुद्दा दिल्हा होता. हा ९ वर्षें राज्य केल्यावर अपराधामुळें हद्दपार केला होता आणि यहुदा अगदीं रोमी अमलांत येऊन रोमी सुभेदारांनीं त्याचा अधिकार चालविला. हा पंतयस पिलातस पांचवा सुभेदार होता व नुक्ताच आला होता. "हेरोद गालीलाचा राजा" हा हेरोद वल्द आंतिपास होता. त्याचा बाप महान हेरोद यानें त्याला गालील प्रांत दिल्हा होता. योहान्न बाप्तिस्मा करणारा याला ज्यानें बंदिशाळेंत कोंडलें तो हाच हेरोद होता, आणि याकडेच पिलातसानें ख्रीस्ताला धरल्यावर पाठविलें. "इतुराया." या प्रांताचें हें नाम इस्राएलाच्या यटूर नामक पुत्रावरून पडलें. उत्प. २५:१५; १ काल. १:३१. हा प्रांत यार्देन नदीच्या पूर्वेस होता, याला रऊबेनाचें संतान व गादी व मनाशाचा अर्धा वंश यांनीं यटूरच्या संतानांस जिंकून त्यापासून काढून घेतलें. १ काल. ५:१९. "त्राखोनितीस." हे देशहि यार्देनेच्या पूर्वेस होते. त्यांच्या उत्तरेस दमास्कस, पूर्वेस अर्बस्थान, पश्चिमेस गालानितिस आणि दक्षिणेस बास्त्रा असें होतें. या देशांत बहुत लुटारू व दरोडेखोर असत, व यांचा नाश करण्याचें वचन देऊन फिलिप्पसानें ते देश रोमी बादशाहा पासून मागून घेतले होते, ह्मणजे आपल्या बापानें नेमले ते कायम असावे असा हक्क दाखवून ते घेतले. "लूसानयस अबिलेनेचा राजा." या प्रांताचें मुख्य शहर अबिले यावरून हें नांव पडलें. हा प्रांत सुरिया देशाच्या आंत लबानोन डोंगर व दमास्कस यांमध्यें गालीला जवळ होता.

२ आन्ना [१] व कायफा हे प्रमुख याजक असतां, जखर्याचा पुत्र यो-
हान्न याला रानांत देवाचें वचन प्राप्त झालें;

३ तेव्हां तो पापांच्या क्षमेसाठीं जो पश्चात्तापाचा बाप्तिस्मा [२] तो
गाजवीत यार्देनेच्या चहुंकडल्या सर्व प्रांतांत गेला, [३]

४ यशाया भविष्यवादी [४] याच्या वचनांच्या पुस्तकांत लिहिलें त्या-
प्रमाणें झालें, तें असें कीं, रानांत ओरडणाऱ्याची वाणी झाली कीं, प्रभू-
चा मार्ग तयार करा, त्याच्या वाटा नीट करा,

५ प्रत्येक खोरें भरेल, व प्रत्येक डोंगर व टेंकडी नीच होईल, आणि
वांकड्या वाटा सरळ, व खरबरीत गुळगुळीत होतील.

६ आणि मनुष्यमात्र [५] देवाचें तारण पाहातील.

७ तेव्हां जे समुदाय त्यापासून बाप्तिस्मा घ्यायास बाहेर आले त्यांस तो
बोलला, अहो सापांच्या पिलांनो, [६] जो क्रोध होणार त्यापासून पळायास
तुह्माला कोणी सुचविलें?

८ तर पश्चात्तापास योग्य जीं फळें तीं द्या; आणि अब्राहाम आमचा
बाप आहे असें आपल्या मनांत ह्मणूं लागूं नका, कारण मी तुह्मास सां-
गतों कीं, अब्राहामासाठीं या दगडांचीं लेंकरें देवाच्यानें करवतात.

---

(१) यो. ११:४९,५१;१८:१३; प्रेषि. ४:६. (२) लूक. १७:७. (३) मात्थ. ३:१; मार्क. १:४.
(४) यश. ४०:३ (५) गीत. ९८:२; यश. ४०:५;४९:६;५२:१० रोम. १०:१२,१८.
(६) मात्थ. ३:७.

---

२ "आन्ना व कायफा." इ. वास्तविक पाहिलें असतां एकच याजक एका वेळेस असे, परंतु जो याजक प्रतिष्ठित झाला त्याला याजकपणा सोडल्यावर याजक म्हणत जात असत. यावेळेस कायफा याजक होता असें दिसतें. आन्ना त्याचा सासरा होता. यानें फार वेळ याजकपण चालविल्यावर सोडलें होतें, आणि यावेळेस तो यहुदी सान्हिद्रिमाचा अध्यक्ष होता असें दिसतें. असल्या वर्णनावरून सर्वांच्या मनांत कांहीं पटावें कीं हें शुभवर्त्तमान वास्तविक खरें आहे. गोष्टी तपशीलवार लिहिल्या असतां कांहीं खोटें असलें तर दाखविण्यास सोपें पडतें. तिबेरयसाच्या कारकिर्दीच्या १५ व्या वर्षीं जर योहान्न उपदेश करूं लागला नाहीं, आणि त्यावेळेस पिलातस यहुदाचा अधिकारी नव्हता आणि फिलिप्पस इतुऱ्या प्रांताचा राजा नव्हता तर हें दाखवून शुभवर्त्तमान खोटें असें पटवायाला किती सोपें पडतें. परंतु या तपशीलवार वर्णनांत कांहीं खोटें आहे असें कोणी कधीं दाखविलें नाहीं. उलट्याप्रमाणें साधारण इतिहास यासीं मिळून शुभवर्त्तमान खरेंच आहे असें दाखवितो.

३–९ योहान्नानें केलेला बाप्तिस्मा व उपदेश याविषयीं मात्थ. ३ यावरील टीका पाहा.

९ आणि आतां कुऱ्हाड झाडांच्या मुळावर ठेविली आहे, यास्तव जें जें
झाड [१] चांगलें फळ देत नाहीं तें तोडून अग्नींत टाकिलें जातें.
१० मग समुदायांनीं त्याला विचारिलें कीं, आह्मी तर काय करावें?
११ तेव्हां त्यानें त्यांस उत्तर दिल्हें कीं, ज्याला दोन अंगरखे आहेत
त्यानें ज्याला नाहीं त्याला द्यावा, व ज्याला अन्न आहे त्यानें तसेंच करावें, [२]
१२ मग जकातदारहि [३] बाप्तिस्मा घ्यायास आले व त्याला ह्मणाले,
हे गुरू, आह्मी काय करावें?
१३ त्यानें त्यास ह्मटलें, तुह्मास जें नेमिलें त्याहून कांहीं अधिक उगवूं
नका. [४]
१४ आणि शिपायांनींहि त्याला विचारिलें कीं, आह्मींहि काय करावें?

---

(१) मात्थ. ७:१९; लूक. १३:७,९. (२) लूक. ११:४१; २ करिं. ८:१४; १ यो. ३:१७.
(३) मात्थ. २१:३२; लूक. ७:२९. (४) लूक. १९:८; १ करिं. ६:१०.

१०—१२. "काय करावें" योहान्नानें त्यांस सांगितलें होतें कीं, मी पश्चात्ताप करितों असें ह्मणणें पुरें नाहीं, पश्चात्तापास योग्य असीं फळेंहि दिल्हीं पाहिजेत. त्यावर ते लोक विचारितात कीं, तीं फळें तर कोणतीं? पश्चात्ताप खराच आहे असें काय करून दाखवावें? "दोन अंगरखे." मात्थ. ५.४० यावर टीका. स्वार्थ बुद्धि दाखवून परोपकारिक बुद्धि बाळगिली पाहिजे असें योहान्न दाखवितो. आपलें स्वार्थ पाहूं नये तर इतरांचें बरें पाहा. इतरांचें कल्याण करा. असें बोलून योहान्नानें खऱ्या धर्माचीं मूळचीं गुणलक्षणें दाखविलीं. आपणाला नाकारावें आणि इतरांचें हित पाहावें हा सर्वांचा धर्म होय. असें करून ख्रीस्त जो धनवान असून आह्माकरितां धनहीन झाला त्याला आह्मी अनुसरतों. "जकातदारहि." मात्थ. ५:४७. टीका. जसे आतां तसे त्यावेळेस हे जकात व वसूल उगविणारे लोकांवर कांहीं जुलूम करीत असत, व वाजवी यापेक्षां ज्यास्ती उगवीत असत. त्यांनीं लांच खाणें व सर्व अन्याय व जुलूम हीं सोडलीं म्हणजे पश्चात्ताप खरा आहे असें योहान्नानें त्यांस समजाविलें.

१३. "जें नेमिलें." सरकारानें नेमिलें. त्यांनीं जकात उगवूं नये अथवा तें काम सोडावें असें योहान्न ह्मणत नाहीं. सरकाराला पोषणार्थ पाहिजे तें देणें भाग आहे; आणि जे कामदार तें उगविण्यास नेमिले आहेत ते जर कोणी एकाचा अन्याय न करितां आपलें काम बरोबर करितात तर मान पावण्यास योग्य आहेत. रोम. १३:१—६. ते लांच खातात व जुलूम करितात तेव्हां ते दोष व दंड पावण्यास योग्य होतात खरे.

१४. "शिपायांनींहि." हे शिपाई यहुदी किंवा रोमी असले तरी रोमी सरकारच्या चाकरींत होते. हे लोकांवर जुलूम व जबरदस्ती करीत असत असें दिसतें, आणि आपला हेतु साधण्यास बलात्कार चालेना तेव्हां उगीच आळ घालून लोकांचा माल हरवून घेत असत; ह्मणून योहान्नानें हा

तेव्हां त्यानें त्यास सांगितलें, कोणावर बलात्कार करूं नका व आळ [१]
घालूं नका व आपल्या पगारानें तृप्त असा. [२]

१५ तेव्हां लोक वाट पाहत असतां व योहान्नाविषयीं हाच ख्रीस्त
असेल काय? असा सर्व आपल्या अंतःकरणांत विचार करीत असतां.

१६ योहान्नानें सर्वांस ह्मटलें, मी तुमचा बाप्तिस्मा पाण्यानें करितों
खरा, परंतु मजपेक्षां जो समर्थ ज्याच्या वाहणांचा बंद सोडायास मी योग्य
नाहीं तो येत आहे तो पवित्र आत्म्यानें व अग्नीनें तुमचा बाप्तिस्मा करील.

१७ त्याचें सूप [३] त्याच्या हातांत आहे व तो आपलें खळें अगदीं निर्मळ
करील व गहूं आपल्या कोठारांत [४] सांठवील व भूस [५] न विझणाऱ्या
अग्नींत [६] जाळून टाकील.

१८ अणखी त्यानें दुसराहि बहुत बोध करितांना लोकांस शुभवर्त्तमान
सांगितलें.

१९ परंतु [७] हेरोद राजाला याच्या फिलिप्पस भावाची बायको
हेरोदियस इजविषयीं व जीं कुकर्मे हेरोदानें केलीं होतीं त्या अवघ्यांविषयीं
योहान्नानें निषेध केला असतां.

२० त्या सर्वांखेरीज त्यानें हेंहि केलें कीं, योहान्नाला बंदिशाळेंत कोंडिलें.

२१ आणि असें झालें कीं सर्व लोक बाप्तिस्मा घेत असतां येशूनेंहि
बाप्तिस्मा घेतला, [८] आणि तो प्रार्थना करीत असतां आकाश उघडलें.

---

(१) निर्ग. २३:१; ले. १९:११. (२) १ तीम. ६:८. (३) इर्म. १५:७. (४) मीख. ४:१२; मात्थ. १३:३०. (५) गीत. १:४. (६) गीत. २१:९; मार्क. ९:४४,४८. (७) मात्थ. १४:३; मार्क. ६:१७. (८) मात्थ. ३:१३; यो. १:३२.

बोध केला. "पगारानें तृप्त असा." आपल्या पगारापेक्षां ज्यास्ती जबरदस्तीनें उगवण्यास पाहूं नका. शिपाई नसावें, हें काम अगदीं सोडून दिल्हें पाहिजे, असें योहान्नानें ह्मटलें नाहीं; केवळ सर्व प्रकारचे अन्याय व वाईट करणें सोडलें पाहिजे असें ह्मटलें. तर सर्वांनीं आपापलें काम चालवून देवाला भिऊन वागावें व देवाचे खरे भक्त असें असावें.

१५. "वाट पाहत असतां." ख्रीस्ताची वाट सर्व पाहत होते आणि योहान्नाचे गुण स्वभाव, उपदेश वगैरे पाहून बहुतेकांस वाटलें, हाच ख्रीस्त असावा.

१६—१८. मात्थ. ३:११,१२ यावर टीका पाहा.

१९, २०. मात्थ. १४:१–१२ पाहा. त्यानें बहुत अपराध केले होते. त्याशिवाय त्यानें हेंहि केलें ह्मणजे योहान्नाला कोंडिलें. योहान्नाची गोष्ट संपवावी ह्मणून लूकानें हा परिणाम एथें वर्णिला. कांहीं वेळ झाल्यावर हेरोदानें त्याला कोंडिलें.

२१, २२ मात्थ. ३:१३–१७ पाहा.

२२ आणि पवित्र आत्मा आकारानें खबुत्रासारिखा त्याजवर उतरला, व आकाशांतून असी वाणी झाली कीं, तूं माझा प्रिय पुत्र आहेस, तुजविषयीं मी संतुष्ट आहें.

२३ आणि येशू सुमारें तीस वर्षांचा व्हायास आला; आणि असें मानीत असत कीं, तो योसेफाचा [१] पुत्र आहे, तो एलीचा,

२४ तो मात्थाताचा, तो लेवीचा, तो मलखीचा, तो यान्नाचा, तो योसेफाचा,

२५ तो मात्ताथियाचा, तो आमोसाचा, तो नहूमाचा, तो एस्लीचा, तो नाग्गायाचा,

२६ तो माहाथाचा, तो मात्ताथियाचा, तो शिमीचा, तो योसेफाचा, तो यहूदाचा,

२७ तो योहान्नाचा, तो रेसाचा, तो जरूबाबेलाचा; तो शलतियेलाचा, तो नेरीचा.

२८ तो मलखीचा, तो आद्दीचा, तो कोसामाचा, तो अल्मोदामाचा, तो एराचा.

२९ तो योसेयाचा, तो अलिजेराचा, तो योरीमाचा, तो मात्थाताचा; तो लेवीचा,

३० तो शिमोनाचा, तो यहूद्याचा, तो योसेफाचा, तो योनानाचा, तो एल्याकीमाचा.

---

(१) मात्थ. १३:५५; यो. ६:४२.

"तो प्रार्थना करीत असतां." हें कलम दुसऱ्या प्रेषितांनीं नव्हे, केवळ लूकानें वर्णिलें आहे. या कलमावरून दिसून येतें कीं (१) येशूला प्रार्थना करण्याची सवई होती. (२) धर्मसंबंधी संस्कार पाळितांना विशेष प्रार्थना करावी हें योग्य आहे. (३) मोठ्या समुदायामध्यें मनांत प्रार्थना करितां येईल. असी प्रार्थना सर्वत्र सर्व ठिकाणीं आणि सर्व वेळेस करितां येईल. "खबुत्रासारखा." खबुत्र ही निर्दोषत्वाची व शुद्धतेची खूण आहे. पवित्र आत्मा जेणेंकडून त्याचें काम व हेतु दर्शविण्यांत येतील असलीं वेगळीं रूपें धरितो. पन्नासाव्या दिवसीं शिष्यांस अन्य भाषांनीं बोलायाचें होतें हें दर्शविण्यास त्यानें अग्नीच्या जिभांचें रूप धरिलें. प्रेषि. २:३.

२३. "तीस वर्षांचा." याजकांनीं याच वयांत असून देवळांतली सेवा करूं लागावें असा नेम होता. गण. ४:३, ४७.

२४—३८. या वंशावळीविषयीं मात्थ. १:१६. पाहा.

३१ तो मल्याचा, तो मैनानाचा, तो मात्ताथाचा, तो नाथानाचा, [१]
तो दावीदाचा.

३२ तो इशायाचा, [२] तो ओबेदाचा, तो बवाजाचा, तो सल्मोनाचा,
तो नहशोनाचा,

३३ तो अमीनादाबाचा, तो अरामाचा, तो हेस्रोनाचा, तो फारेसाचा,
तो यहूदाचा,

३४ तो याकोबाचा, तो इझाकाचा, तो अब्राहामाचा, [३] तो थारा-
हाचा, तो नाहोराचा.

३५ तो सरूगाचा, तो रगूचा, तो पेलेगाचा, तो एबेराचा, तो शालाहाचा,

३६ तो कैनानाचा, तो अर्पाक्षादाचा, [४] तो शेमाचा, तो नोहाचा,
तो लामेखाचा. [५]

३७ तो मथूशालाहाचा, तो हनोखाचा, तो यारेदाचा, तो माहला-
लेलाचा, तो कैनानाचा.

३८ तो अनोशाचा, तो शेथाचा, तो आदामाचा, तो देवाचा. [६]

४ अध्याय.—नंतर येशू पवित्र आत्म्यानें पूर्ण होऊन [७] यार्देनेपासून
माघारा आला, तेव्हां आत्म्यानें त्याला रानांत नेलें, आणि सैतानाकडून
चाळीस दिवस त्याची परीक्षा झाली;

२ आणि त्या दिवसांमध्यें [८] त्यानें कांहीं खाल्लें नाहीं; ते संपल्यानंतर
त्याला भूक लागली.

३ मग सैतान त्याला ह्मणाला, तूं देवाचा पुत्र असलास तर या धों-
ड्याला भाकर हो असें सांग.

---

(१) जख. १२:१२; २ शमु. ५:४. (२) रूथ. ४:१८,२२. (३) उत्प. ११:२४–२६.
(४) उत्प. ११:१२. (५) उत्प. ५. (६) उत्प. १:२६; २:७; यश. ६४:८; १ कारिं. १५:४५,४७.
(७) मात्थ. ४:१; मार्क. १:१२; लूक. ४:१४. (८) निर्ग. ३४:२८; १ राज. १९:८.

अध्याय ४.

१–१३. येशूच्या परीक्षेविषयीं मात्थ. ४. १–११. यांवर टीका पाहा. २. "चाळीस दिवस." हे सर्व दिवस त्याची वेगळ्या प्रकारची परीक्षा होत चालली, परंतु ज्या परीक्षांचें वर्णन मात्थीनें व लूकानें केलें आहे त्या हे चाळीस दिवस भरल्यावर झाल्या. मात्थ. ४:२,३. "कांहीं खाल्लें नाहीं." ईश्वरी सामर्थ्यानें त्याला कांहीं खाल्ल्यावांचून सजीव राखिलें.

४ तेव्हां येशूनें त्याला उत्तर दिल्हें कीं, असें लिहिलें आहे,(१) मनुष्य
केवळ भाकरीनें वांचेल असें नाहीं, तर देवाच्या प्रत्येक वचनानें वांचेल.

५ मग सैतानानें त्याला उंच डोंगरावर नेऊन जगांतलीं सर्व राज्यें
त्याला एका क्षणांत दाखविलीं.

६ आणि सैतानानें त्याला ह्मटलें, हा सर्व अधिकार व त्यांचें गौरव मी
तुला देईन, कारण कीं (२) तें मला सोपून दिल्हें आहे, व माझ्या मनास
येईल त्याला मी तें देतों.

७ यास्तव तूं मला नमसील तर अवघें तुझें होईल.

८ तेव्हां येशूनें त्याला उत्तर दिल्हें कीं, अरे सैताना, माझ्या मागें हो,
कारण कीं तुझा देव प्रभू याचें भजन कर व याचीच सेवा कर,(३) असें
लिहिलें आहे.

९ नंतर त्यानें त्याला यरूशलेमांत नेलें, आणि देवळाच्या कंगोऱ्यावर
त्याला उभें केलें, व त्याला ह्मटलें, तूं देवाचा पुत्र असलास तर एथून
खालीं उडी टाक.

१० कां तर असें लिहिलें आहे कीं,(४) तो तुला संभाळण्याकरितां
आपल्या दुतांस तुजविषयीं आज्ञा करील;

११ आणि तुझा पाय धोंड्यावर कधीं आपटूं नये ह्मणून ते तुला
हातांनीं धरतील.

१२ तेव्हां येशूनें त्याला उत्तर दिल्हें कीं, तुझा देव प्रभु त्याची परीक्षा
पाहूं नको, (५) असें सांगितलें आहे.

१३ तेव्हां सैतान ही सर्व परीक्षा संपवून (६) कांहीं वेळ त्याजपासून गेला.

---

(१) अनु. ८:३. (२) यो. १२:३१; १४:३०; एफ. २:२; प्रग. १३:२,७. (३) अनु. ६:१३; १०:२०. (४) गीत. ९१:११. (५) अनु. ६:१६. (६) इब्री. ४:१५.

---

१३. "कांहीं वेळ त्यापासून गेला." यावरून असें दिसतें कीं मागून सैतानानें त्याची अणखी परीक्षा केली. गेथसेमनी बागेंत तो मरणापर्यंत खिन्न झाला त्यावेळेस त्याची सैतानाकडून परीक्षा झाली असेल. यो. १४:३०. शास्त्री परोशी व सादुकी यांसहि येशूला फाशांत पाडायास व त्याचा जीव घ्यायास सैतानानें प्रेरिलें. तरीं ईश्वरानें त्याला त्याच्या सर्व परीक्षांनून सोडविलें, आणि त्याप्रमाणें जे त्याचे खरे भक्त त्याजवर भरवसा ठेवीत जातात त्या सर्वांस तो सर्व परीक्षांनून सोडवीलच. १ करिं. १०:१३.

१४ नंतर येशू आत्म्याच्या सामर्थ्यानें गालीलांत माघारा आला, [१]
व त्याची कीर्त्ति चहुंकडल्या सर्व प्रांतांत पसरली.
१५ आणि तो त्यांच्या सभास्थानांमध्यें उपदेश करीत असतां सर्वांनीं
त्याला गौरविलें.
१६ मग तो लहानाचा मोठा झाला तेथें नाजारेथांत गेला, [२] आणि
आपल्या चालीप्रमाणें शाब्बाथ दिवशीं सभास्थानांत [३] जाऊन वाचा-
यास उभा राहिला.
१७ तेव्हां यशाया भविष्यवाद्याचें पुस्तक त्याला दिलें, आणि त्यानें तें
पुस्तक सोडून जें ठिकाण काढिलें तेथें असें लिहिलें होतें कीं,
१८ प्रभूचा आत्मा [४] मजवर आहे कारण कीं गरिबांस शुभवर्त्तमान
सांगायास त्यानें मला अभिषेक केला आहे, हृदय फुटलेल्यांस [५] बरें

---

(१) यो. ४:४२; प्रेषि. १०:३७. (२) मात्थ. २:२३. (३) मात्थ. १३:५४; यो. १८:२०; प्रेषि. १३:१४;१७:२. (४) यश. ६१:१. (५) २ काल. ३४:२७; गीत. ३४:१८; ५१:१७; १४७:३; यश. ५७:१५.

१४, १५. "त्याची कीर्त्ति." मात्थ. ४:२४ पाहा. "सर्वांनीं त्याला गौरविलें." त्याचा उपदेश ऐकून व त्याचें ज्ञान पाहून त्यांनी त्याची स्तुति केली.

१६. आपल्या चाली प्रमाणें." यावरून दिसतें कीं येशू सभास्थानांत भजनास नेमानें जात असे. ते भजन करितांना प्रार्थना करीत व जुन्या करारांतलें शास्त्र वाचून उलगडून सांगत असत. मा. ४.२३. त्या वेळेस विश्वासप्रकरण व आचरण हीं फार अशुद्ध होतीं तरी यामुळें ख्रीस्त भजन सोडीत नसे अथवा सभास्थानापासून दूर राहत नसे, तर नेमानें देवाचें भजन पोथी प्रार्थना करायाला जमावें हा सर्वांचा धर्म होय. जरी उपदेश सर्व प्रकारें पसंत नाहीं तरीं नेमानें जावें. देवाचें भजन लोकांतीं चालवावें याचें मोठें अगत्य आहे. म्हणून सर्वांनीं भजनास येऊन चांगला कित्ता दाखवावा. इब्री. १०:२५. असें असतांहि खऱ्या देवाला भजत नाहींत, मूर्त्तिपूजा करितात, अथवा खोटीं मतें शिकवितात, तेथें आपण जाऊंच नये. "सभास्थानांत." मात्थ. ४:२३. "वाचायास उभा राहिला." मोशानें केलेलीं पांच पुस्तकें विभागून असे धडे नेमिले होते कीं दर वर्षीं तीं सगळीं वाचण्यांत येत असत. त्यांस भविष्यवाद्यांतून बहुत प्रकरणें मिळवून तींहि दर वर्षीं वाचण्यांत येत असत.

१७. "त्याला दिलें." म्हणजे सभास्थानांतल्या सेवकानें दिल्हें. तो शास्त्रांतलीं पुस्तकें पेटींत राखीत असे, आणि वाचायाला काढून देत असे. त्या वेळेस सर्व पुस्तकें चर्मपटावर हातानें लिहिलीं होतीं. आणि शास्त्रांतलीं पुस्तकें निरनिराळीं करून गुंडाळून ठेवीत असत. "जें ठिकाण काढिलें" तें यश. ६१:१,२ एथें आहे.

१८, १९. "प्रभूचा आत्मा मजवर आहे." म्हणजे मी ईश्वरी प्रेरणेनें बोलतों. यहुदी

करायास, पाडाव केलेल्यांस सुटी व अंधळ्यांस दृष्टि [1] हीं गाजवायास, जांचलेल्यांस मोकळें करायास.[2]

१९ व प्रभूचें मान्य केलेलें वर्ष [3] गाजवायास त्यानें मला पाठविलें आहे.

---

(१) गीत. १४६:८; यश. २९:१८. (२) यश. ४२:३; मात्थ. १२:२०. (३) यश. ६१:२; ६३:४.

बाबेलांतून परत येण्याविषयीं हें भविष्यवचन आधीं सांगितलें होतें. परंतु भविष्यलेख वारंवार अनेक गोष्टींला लागतात. बाबेलच्या सत्तर वर्षांच्या दासत्वांतून निघण्याला हें वर्णन बरोबर लागलें, खरें, तर पापाच्या व सैतानाच्या दासत्वांतून ख्रीस्ताकडून मोकळें होण्याला किती विशेषेंकरून लागतें ?

"मला अभिषेक केला आहे." प्राचीन काळीं राजे, भविष्यवादी व याजक अभिषेक करून त्याच्या कामासाठीं सिद्ध करीत असत. १ राज. १९:१५, १६. निर्ग. २९:७.१ शमु. ९:१६. अनेक पदार्थ मिश्रित करून हें अभिषेकाचें तेल करीत असत. आणि तें दुसऱ्या साधारण कामास लावायाचें नव्हतें व त्यासारिखें अगदीं करायाचें नव्हतें. निर्ग. ३०:२२–३८. यावरून जे ईश्वराच्या कामासाठीं सिद्ध करून ठेविले होते त्यांस प्रभूचे अभिषिक्त असें म्हणत असत. १ शमु. १६:६; गीत. ८४:९; यश. ४५:१. यावरून देवाच्या पुत्राला इब्री भाषेंत मशीहा व ग्रीकभाषेंत ख्रीस्त, असें म्हटलें आहे; कारण या शब्दांचा एकच अर्थ म्हणजे अभिषिक्त असा आहे. परंतु ख्रीस्ताला अभिषिक्त म्हणण्याचा अभिप्राय, हा मनुष्याच्या हातांनीं अभिषिक्त झाला, असा नाहीं, तर देवानें त्याला आपल्या लोकांचा भविष्यवादी, तारणारा, उपाध्या, व राजा असें नेमिलें, हाच अभिप्राय आहे. जें काम करायास ख्रीस्त अभिषिक्त झाला त्याचें पहिलें कलम गरिबांस शुभवर्त्तमान सांगणें असें आहे. गरीब म्हणजे (१) जे द्रव्यहीन, दरिद्री आहेत ते. (२) जे दुःखित, क्लेशित आहेत ते. (३) जे आत्म्यानें दीन ते. हे गरीब, आपण गरजवंत व लाचार पापी आहों असें समजून तारणाची सत्सुवार्ता मातबर व धनवान यांपेक्षां अधिक हर्षानें अंगीकारितात. मी गरिबांस शुभवर्त्तमान सांगतों, हें मी खरा मशीहा असण्याचें एक प्रमाण आहे म्हणून ख्रीस्तानें दाखविलें. मात्थ. ११:५. परोशी व सदोकी गरिबांस तुच्छ मानीत असत. परंतु गरिबांस सुखसमाधान द्यावें हा शुभवर्त्तमानाचा अभिप्राय आहे. द्रव्यांकडून गर्व, हेवा वगैरे वाईट गुण मनांत फार करून भरतात. हें जग देऊं शकत नाहीं तसलें सुख आम्हांस पाहिजे म्हणून गरिबांस समजतें, आणि याकरितां धनवानांपेक्षां अधिक गरीब लोक शुभवर्त्तमान अंगीकारितात. यावरून शुभवर्त्तमानाच्या सत्यतेविषयीं एक बळकट प्रमाण मिळतें. हें शुभवर्त्तमान मनुष्यकृत असलें तर ज्यांनीं रचिलें त्यांनीं मातबर व थोर लोकांस पसंत असें केलें असतें, परंतु देवानें तें गरीब व दुःखित यांचें कल्याण करण्याजोगें असें केलें. "हृदय फुटलेल्यांस." संकट व विपत्ति यांकडून ज्यांचीं हृदयें फुटलेलीं अथवा आपल्या पापांची आठवण करून ज्यांस खरा-

२० मग पुस्तक गुंडाळून तो सेवकाजवळ देऊन बसला, तेव्हां सभा-
स्थानांतील सर्वांचे डोळे त्याजकडे लागले होते.

२१ मग तो त्यांस ह्मणूं लागला कीं, आज तुमच्या ऐकण्यांत हा
लेख पूर्ण झाला आहे.

२२ तेव्हां सर्वांनीं त्याविषयीं साक्ष दिल्ही, आणि जीं कृपेचीं वचनें[1]
त्याच्या तोंडांतून निघालीं त्याविषयीं आश्चर्य करून ह्मटलें, हा योसेफाचा
पुत्र आहेना? [2]

२३ आणि त्यानें त्यांस ह्मटलें, खचीत तुह्मी मला हा दाखला द्याल

---

[1] गीत. ४५:२; यश. ५०:४; मात्थ. १३:५४; मार्क. ६:२; लूक. २:४७. [2] यो. ६:४२.

खर खेद होतो त्यांस समाधान द्यावें हें ख्रीस्ताच्या कामाचें दुसरें कलम आहे. "पाडाव केलेल्यांस सुटी." बाबेलांत जे पाडाव करून नेलेले होते त्यांविषयीं हें मुळींच ह्मटलें होतें. ते दुःखांत होते. त्यांस सुटी देऊन परत आपल्या देशांत आणावें, बंदिवानांस सोडावें, गुलामांस मोकळें करावें; यांपेक्षां काय मोठे उपकार या जगांत मनुष्यांवर होतात? तथापि काळापेक्षां अनंतकाळ दीर्घ आहे, ऐहिक सुखापेक्षां आकाश लोकांतलें सुख श्रेष्ठ आहे, तेवढ्यानें शुभवर्त्तमानाकडून मनुष्यांवर अधिक श्रेष्ठ उपकार होतात; ह्मणजे पापाचे व सैतानाचे जे पाडाव झालेले पापी ते जर शुभवर्त्तमान स्वीकारितील तर तें त्या सर्वांस मोकळें करील व सौख्यलोकांत पोंहचवील. "अंधळ्यांस दृष्टि." ख्रीस्त दृष्टि देई. मात्थ. ११:५; यो. ९:११; मात्थ. ९:३० इ. "जांचलेल्यांस" जे जुलूम, जांचणूक वगैरे भोगितात त्यांस दुःखापासून मुक्त करायास. "प्रभूचें मान्य केलेलें वर्ष." ज्या समयीं ईश्वर अनुकूळ होऊन पाप्यांची क्षमा करून त्यांस अंगीकारायास तयार होतो तो. यहुदी दर पन्नासाव्या वर्षी करणा वाजवून सर्व इब्री दास व देणेकरी साऱ्या देशांतून मुक्त आहेत असें जाहिर करीत असत. त्या वर्षाला ह्मणजे उत्साहाचें वर्ष असें ह्मणत. ले. २५:८–१३. त्या वर्षाला लक्षून हें ह्मटलें असेल. अभिप्राय हाच कीं आतां तारणारा आला आहे, ईश्वर अनुकूल आहे. तर पाप्यानीं हर्षानें येऊन देवापाशीं क्षमा मागावी व तारण घ्यावें.

आज सोईची वेळ.
प्रसन्नतेचा काळ.

२०, २१. "सर्वांचे डोळे." इ. हा या शास्त्राचें कसें व्याख्यान करील असें मनांत आणून त्याकडे ते फार उत्सुकतेनें पाहूं लागले. "हा लेख पूर्ण झाला आहे." हा भविष्यलेख मुळींच मजविषयीं आहे. तर माझ्या येण्याकडून ह्मणजे पापापासून व पापाला जो योग्य दंड त्यांपासून जी मुक्तता मी करितों तिजकडून हा लेख पूर्ण होतो, हा त्याच्या बोलण्याचा अभिप्राय आहे. अधिक उपदेश त्यानें केला असेल, पण मुख्य गोष्ट हीच होती.

२२, २३. "साक्ष दिल्ही." त्यानें असा उपदेश केला कीं सर्वांच्या मनांत ठसला, आणि हा बोलतो तें खरें असें तें ह्मणूं

कीं, हे वैद्या, तूं आपल्याला बरें कर; जीं कामें कपरणाहूमांत [1] झालेलीं आह्मी ऐकिलीं तीं एथेंहि आपल्या देशांत कर.

२४ तेव्हां तो बोलला, मी तुह्मास खचीत सांगतों कीं, कोणीहि भविष्यवादी [2] आपल्या देशांत मान्य होत नाहीं.

२५ अणखी मी तुह्मास खरें सांगतों, एलीयाच्या दिवसांत साडेतीन वर्षें [3] आकाश बंद होतें, सर्व देशामध्यें मोठा दुकाळ पडला, त्या वेळेस इस्राएलांत [4] बहुत विधवा होत्या.

२६ परंतु सीदोनाकडील सारफाथांतील विधवे बायकोशिवाय त्यांतील कोणी एकीकडेहि एलीया पाठविला नाहीं.

२७ आणि अलीशा भविष्यवाद्याच्या वेळेस इस्राएलांत बहुत [5] कोडी होते, परंतु अरामी नामान याशिवाय त्यांतील कोणीहि शुद्ध झाला नाहीं.

---

(१) मात्थ. ४:१३; ११:२३. (२) मात्थ. १३:५७; यो. ४:४४. (३) याक. ५:१७.
(४) राज. १७:९. (५) २ राज. ५:१४.

लागले. मग त्याचीं कृपेचीं वचनें ध्यानांत आणून हा आमचा ओळखीचा आहे असें पाहून ते आश्चर्य पावले. हा जो सुताराचा मुलगा आह्मांमध्यें राहत असतो त्यानें एवढें ज्ञान दाखवावें आणि मशीहा असण्याचा हक्क दाखवावा हें त्यांस मोठें आश्चर्य झालें. "आपल्याला बरें कर." ह्मणजे मी मशीहा आहें असें तूं ह्मणतोस; रोग, पापें, दुःखें यांपासून आह्मांस मुक्त करायास मी समर्थ आहें, असें तूं ह्मणतोस; तर जसें कपर्णाहूमांत झालें ह्मणून ह्मणतात तसें एथेंहि चमत्कार करून आपला पराक्रम दाखीव असें तुम्ही ह्मणाल. "कपर्णाहूम." हें शहर नाजारेथापासून लांब नव्हतें. मात्थ. ४:१३ यावर टीका पाहा.

२४, २५ "भविष्यवादी आपल्या देशांत," इ. म्हणजे तो खचीत भविष्यवादी आहे, असें फारकरून ओळखीचे जे आहेत ते मानणार नाहींत. मात्थ. १३:५७ टीका पाहा.

"एलीयाच्या दिवसांत," याचें वर्णन १ राज. १७:८–२४ एथें पाहा. "इस्राएलांत." देवाच्या लोकांतल्या सर्व विधवांस सोडून त्यानें एका परक्या विधवेकडे पाठविलें जावें हें इस्राएलाच्या अविश्वासामुळें झालें. तसें आतां तुमचा अविश्वास पाहून मी तुम्हास चमत्कार दाखवीत नाहीं.

२६, २७ "सारफाथांतील." सारफाथ हें सोर व सीदोन यांमध्यें भूमध्य समुद्राच्या कांठावर वसलें होतें. तें यहुदी नव्हे तर विदेशी शहर होतें. "बहुत कोडी होते." कोड या रोगाविषयीं मात्थ. ८:१,२ टीका पाहा. "अरामी नामान." हा कसा बरा झाला याविषयीं २ राजे. ५ पाहा. या दोन उदाहरणांवरून ख्रीस्तानें दाखविलें कीं जे खरोखर भविष्यवादी होते त्यांस त्यांचे लोक मान देईनात म्हणून त्यांनीं त्यांस सोडून परक्या लोकांवर उपकार केले. हीं दोन उदाहरणें दाखविण्याचा हाच अभिप्राय कीं त्याप्रमाणें आतां तुम्ही विश्वास

२८ तेव्हां हें ऐकून सभास्थानांतील सर्व लोक रागें भरले;

२९ आणि त्यांनीं उठून त्याला नगराच्या बाहेर घालविलें व ज्या डोंगरावर त्यांचें नगर वसलें होतें त्याच्या कड्यावरून त्याला लोटून देण्यास [१] तेथवर नेलें.

३० परंतु तो त्यांच्या मधून निघून गेला. [२]

३१ नंतर तो गालीलांतील कपरणाहूम नगरांत खालीं आला व शाब्बाथ दिवसीं त्यांत उपदेश करूं लागला.

३२ आणि त्याच्या उपदेशावरून ते थक्क झाले, कारण कीं त्याचें बोलणें अधिकाराचें [३] होतें.

---

(१) गीत. ३७:१४; ३२,३३. (२) यो. ८:५९;१०:३९. (३) इर्म. २३:२९; मात्थ. ७:२८,२९; तीत. २:१५; इब्री. ४:१२.

धरीत नाहीं ह्मणून तुह्मांमध्यें मी चमत्कार करीत नाहीं तर परक्यांमध्यें जाऊन आपल्या ईश्वरी कामाविषयीं चमत्कार करून प्रमाण पाठवीन.

२८,२९ "सर्व लोक रागें भरले." आदीं त्याचीं कृपेचीं वचनें ऐकून ते आश्चर्य पावले, तर लवकर कां रागें भरले? याचें कारण. (१) हा काढलेलीं उदाहरणें आह्मास लागू करून अविश्वासामुळें निषेधितो असें त्यांनीं पाहिलें. (२) आम्हां यहुद्यांस योग्य मान देत नाहीं, परंतु आह्मास सोडून परदेश्यांकडे जाऊन त्यांस उपदेश करणार व चमत्कार दाखविणार आहे, असें पाहून रागें भरले. या गोष्टीवरून सिद्ध होतें कीं (१) लोकांकडून आपली प्रशंसा थोडक्या मोलाची आहे. ते क्षुल्लक कारणावरून मैत्री सोडून द्वेष करितात. (२) लोक फार अविचारी आहेत. त्यांस सत्यबोध ऐकून पदरांत घ्यायास बरें वाटत नाहीं. "कड्यावरून." हें ठिकाण अद्यापि दाखवितात व "येशूला लोटून देण्याचा डोंगर" असें त्याला म्हणतात. तें नाजारेथाच्या दक्षिणेस जराशा अंतरावर आहे. मात्थ. २:२३ यावर टीका पाहा. "लोटून देण्यास." हें रागाचें व गडबडीचें फळ होतें. यावरून दिसतें कीं नाजारेथकर फार दुष्ट असें जें इतिहासांत ह्मटलें आहे तें खरें. त्यांस अपराध्यांचा देखील जीव घेण्याचा अधिकार नव्हता तरी निर्दोष्याला एकाएकीं मारूं लागले. मनुष्य जन्मस्वभावानें एवढे भ्रष्ट आहेत कीं ते खरेपणाचा द्वेष करितात व ईश्वराची मोठी कृपा अव्हेरितात.

३० "त्यांच्या मधून निघून गेला." हें कसें झालें याचें मोठें आश्चर्य वाटतें. रागीट दंगेखोर कोणी एकाला धरून मारूं लागले तर ते आपखुशीनें त्याला सोडीत नाहींत. तरी ख्रीस्तानें जसें लाटांस तसें या दुष्ट लोकांसहि ईश्वरी सामर्थ्यानें व प्रेरणेनें शमविलें हें उघड आहे. अणखी एका वेळेस तसें झालें म्हणून वर्णिलें आहे. यो. ८:५९. मनुष्यांस असें वळण लावण्यास ख्रीस्ताला सामर्थ्य होतें हें यो. १८:६ यावरून दिसून येतें.

३१–४४ यांचें व्याख्यान मार्क. १: २१–३९ एथें केलें आहे.

३३ तेव्हां सभास्थानांत [1] अशुद्ध भुताचा आत्मा लागलेला कोणीएक माणूस होता, व तो मोठ्यानें ओरडत बोलला.

३४ अरे येशू नाजारेथकरा, आमचा व तुझा काय [2] संबंध? आमचा नाश करायास आलास काय? तूं कोण आहेस हें मला ठाऊक आहे, [3] देवाचा पवित्र तो. [4]

३५ तेव्हां येशू त्याला धमकावून बोलला, उगाच राहा, व त्यांतून नीघ. मग भूत त्याला मध्यें पाडून त्याला कांहीं उपद्रव दिल्ह्यावांचून त्यांतून निघालें.

३६ तेव्हां सर्व थक्क होऊन आपल्यांमध्यें ह्मणाले, ही गोष्ट कसी? कारण कीं तो अधिकारानें व सामर्थ्यानें अशुद्ध आत्म्यांस आज्ञा करितो [5] ह्मणजे ते निघतात.

३७ नंतर त्याविषयींची कीर्ति चहुंकडल्या प्रांतांत सर्व ठिकाणीं गेली.

३८ मग तो सभास्थानांतून उठून शिमोनाच्या घरांत गेला; शिमोनाच्या सासूला [6] तर भारी ताप लागला होता, आणि तिच्या साठीं त्यांनीं त्याजवळ विनंती केली.

३९ मग त्यानें तिच्या जवळ उभें राहून तापाला धमकाविलें, तेव्हां तिचा ताप निघून गेला, व ती तेव्हांच उठून त्यांची सेवा करूं लागली.

४० मग सूर्य मावळतांना ज्यांच्या जवळ नाना प्रकारच्या रोगांनीं दुखणाईत होते त्या सर्वांनीं त्यांस त्याजकडे आणिलें, आणि त्यानें त्यांतील प्रत्येकावर हात ठेवून त्यांस बरें केलें.

४१ तेव्हां तूं देवाचा पुत्र ख्रीस्त आहेस, असें भुतें देखील ओरडत बोलून बहुतांतून निघालीं; आणि त्यानें त्यांस धमकाविलें व बोलूं दिल्हें नाहीं, कारण कीं, तो ख्रीस्त आहे हें त्यांस ठाऊक होतें.

४२ मग दिवस उगवल्यावर तो निघून रानांतल्या जागेंत गेला, तेव्हां समुदाय त्याचा शोध करून त्याच्या जवळ आले, मग आपणांपासून त्यानें जाऊं नये ह्मणून त्यांनीं त्याला आडविलें.

---

(१) मार्क. १:२३. (२) याक. २:१९. (३) लूक. ४:४१. (४) गीत. १६:१०; दान. ९:२४; लूक. १:३५; प्रेषि. ३:१४. (५) १ पेत्र. ३:२२. (६) मात्थ. ८:१४; मार्क. १:२९.

४३ परंतु तो त्यांस ह्मणाला, दुसऱ्या नगरांतहि मला देवाच्या राज्या-
चें शुभवर्त्तमान सांगितलें पाहिजे, कां कीं, यासाठींच [1] मला पाठ-
विलें आहे.

४४ मग तो गालिलाच्या सभास्थानांमध्यें गाजवीत गेला.

५ अध्याय.—आणि असें झालें [2] कीं तो गेन्नेसरेत सरोवराजवळ
उभा असतां देवाचें वचन ऐकायास समुदाय येऊन त्यासीं खेटला.

२ तेव्हां त्यानें सरोवराच्या कांठीं लागलेलीं दोन तारवें पाहिलीं;
धीवर तर त्यांवरून उतरून जाळीं धूत होते.

३ आणि त्या तारवांतून एक शिमोनाचें होतें त्यांत बसून, तें कांठा-
पासून थोडेसें लोटावें ह्मणून त्यानें त्याजवळ मागितलें; मग तो बसून
समुदायांस तारवांतून उपदेश करूं लागला.

४ नंतर त्यानें बोलणें संपविल्यावर शिमोनाला ह्मटलें, खोल पाण्यांत
हाकार, [3] व मासे धरण्यासाठीं तुह्मी आपलीं जाळीं खालीं सोडा.

---

(१) मार्क. १:३८. (२) मात्थ. ४:१८; मार्क. १:१६. (३) यो. २१:६.

अध्याय ५.

१–२ "गेन्नेसरेत." या सरोवराला गालीलाचा समुद्र व तिबिरयसाचाहि समुद्र ह्मणत असत. ख्रीस्त या सरोवराजवळ बहुत वेळ राहत, फिरत, उपदेश करीत व चमत्कार दाखवीत असे. एथें त्यानें आपल्या शिष्यांस बोलावून घेतलें. एथें या लहानशा सरोवराच्या कांठीं त्यानें आपल्या खऱ्या धर्माची स्थापना केली आणि इतक्यांत या धर्माकडून मोठा आशीर्वाद जगाला मिळाला आहे, हजारों हजार पापी तारण पावले आहेत, आणि हाच धर्म तर सर्व जगाचा व्यापून शेवटपर्यंत चालेल. "त्यासीं खेटला." वारंवार ख्रीस्ताचें ऐकायास हजारोंहजार दाटीनें जमत असत आणि त्यांपैकीं बहुतेक त्याचे खरे शिष्य झाले याविषयीं अंदेशा नाहीं. शास्त्री व परोशी यांनीं प्रतिकूळ होऊन अडथळे केले नसते आणि हेवा व द्वेष करून लोकांस हटवायास व आपल्या ताब्यांत राखायास प्रयत्न केले नसते तर सर्व साधारण लोकांनीं त्याजवर विश्वास ठेविला असता असें दिसतें.

"दोन तारवें." हीं लहान होतीं असें समजावें. योसेफस ह्मणतो कीं असलीं २३० तारवें त्या सरोवरावर चालत असत.

३,४ "शिमोनाचें." शिमोन पेत्रसाचें. ही गोष्ट मात्थ. ४:१८ इ. व मार्क. १:१६ इ. एथें वर्णिली आहे. लोक दाटीनें खेटत होते म्हणून उपदेश करण्याचा हा उपाय सोईचा होता. तारूं होतें त्या ठिकाणीं लहान आखात असेल, असें कीं पुढें व दोन बाजूंला भूमीवर लोक जवळ जमून त्यांस ऐकण्याची सोई पडली. देवळांत अथवा सभास्थानांत मात्र उपदेश करावा असें ख्रीस्ताला वाटलें नाहीं; तर कारण पडलें म्हणजे घरीं दारीं जेथें कोठें लोक जमले तेथें

५ तेव्हां शिमोनानें त्याला उत्तर दिल्हें कीं, हे प्रभू, आह्मी सारी रात
कष्ट करून कांहीं धरिलें नाहीं, [१] तरी तुझ्या आज्ञेवरून मी जाळें
सोडितों.

६ मग त्यानी तसें केल्यावर [२] मास्यांचा मोठा घोळका वेढिला,
व त्यांचें जाळें फाटूं लागलें.

७ तेव्हां जे भागीदार दुसऱ्या तारवांत होते त्यांनीं येऊन आपलें
सहाय करावें [३] ह्मणून त्यांनीं त्यांस खुणाविलें; मग ते आले व त्यांनीं
दोन्हीं तारवें इतकीं भरलीं कीं, तीं बुडूं लागलीं.

८ तेव्हां शिमोन पेत्रस हें पाहून येशूच्या पायां पडून [४] बोलला, हे
प्रभू, मजपासून जा, कारण कीं मी पापी माणूस आहें.

---

(१) गीत. १२७:१,२; यहेज्क. ३७:११,१२. (२) उप. ११:६; गल. ६:९. (३) निर्ग. २३:५; गल. ६:२; गी. १२:२४. (४) न्या. १३:२२; २ शमु. ६:९; १ राज. १७:१८; यश. ६:५.

देवाचें भजन करावें व त्याची गोष्ट सांगावी. "खोल पाण्यांत हाकार." हा हुकूम पेत्रसाला विलक्षण वाटला असेल. त्यानें श्रम घेतले होते ते सर्व व्यर्थ पडले होते; शिवाय फार खोल पाण्यांत जाळीं सोडण्याची चाल नव्हती. कांठाजवळ पाणी जरासें कमी असतें तेथें सोडीत असत.

५,६ "तुझ्या आज्ञेवरून." साऱ्या रात्रीचे श्रम व्यर्थ झाल्यावर आणि खोल पाण्यांत देखील मासे मिळणें जरी अगदीं असंभाव्य वाटलें तरी येशूचें ऐकायास पेत्रस एकाएकीं मान्य झाला. असें करून पेत्रसानें मोठा विश्वास दाखविला. त्यानें त्या वेळेस ख्रीस्ताला ओळखिलें नव्हतेंसें दिसतें तरी त्याजवर भरंवसा ठेवून व त्याची आज्ञा मानून तो आशीर्वाद पावला. तसें आतां पापी ख्रीस्तावर भाव ठेवितील तर तारण पावतील.

७,८ "जे भागीदार." हे याकोब व योहान्न होते. हे जरासे दूर होते ह्मणून खूण करून त्यांस बोलवावें लागलें. "पेत्रस हें पाहून" इ. हा चमत्कार पाहून पेत्रसाला भय वाटलें. हा कोणी ईश्वरी पुरूष असावा असी त्याची खातरी झाली. "मजपासून जा." हें बोलून पेत्रसानें नम्र बुद्धि दाखविली. मी पापी असून तुझ्याजवळ असण्यास योग्य नाहीं हा त्याच्या बोलण्याचा अभिप्राय होय. असी नम्रतेची भावना सर्व पाप्यांस शोभती खरी; तथापि ख्रीस्त पाप्यांस तारायास आला व त्यांस बोलावितो म्हणून त्यानें जावें असें त्यांनीं इच्छूं नये. तर, हे प्रभू, मज पाप्यावर दया कर, माझें पाप दूर करून माझ्याठायीं पवित्रात्म्यानें वस्ती करून माझें अंतःकरण शुद्ध कर व मला तुझ्या जवळ सर्वकाळ राहण्यास योग्य कर, ही प्रार्थना सर्व पाप्यांनीं करावी.

९ कां कीं जी मास्यांची धरणी [१] त्यांस मिळाली होती ती पाहून
त्याला व त्याजवळच्या सर्वांस विस्मयानें व्यापिलें.

१० आणि शिमोनाचे भागीदार जबदीचे पुत्र याकोब व योहान्न
यांसहि तसेंच झालें. तेव्हां येशू शिमोनाला ह्मणाला, भिऊं नको,
आतांपासून तूं माणसांस धरसील.

११ मग ते तारवें कांठीं लावून सर्व सोडून त्याच्या मागें चालले. [२]

१२ आणि असें झालें [३] कीं तो एका नगरांत असतां पाहा, कोडा-
नें भरलेला असा माणूस होता, त्यानें येशूला पाहून तोंडावर पडून त्याला
विनंती केली कीं, हे प्रभू, मला शुद्ध करावयाची तुला इच्छा असली
तर शक्ति आहे.

१३ तेव्हां तो हात लांब करून त्याला शिवला व ह्मणाला, माझी
इच्छा आहे, [४] शुद्ध हो; तेव्हांच त्याचें कोड गेलें.

१४ मग त्यानें त्याला निक्षून सांगितलें कीं, कोणाला सांगूं नको, तर
जा, आपणास याजकाला दाखीव, आणि त्यांस साक्ष व्हावी ह्मणून [५]
मोशानें नेमून दिल्ह्याप्रमाणें आपल्या शुद्धीविषयीं अर्पण कर.

१५ तथापि त्याविषयींची गोष्ट अधिक पसरली, मग बहुत समुदाय
[६] ऐकायास व त्याकडून आपले रोग बरे करून घ्यायास जमले.

१६ तेव्हा तो रानामध्यें एकीकडे जाऊन [७] प्रार्थना करिता झाला.

---

(१) गीत. ८:६,८. (२) मात्थ. ४:२०;१९:२७; फिलि. ३:७,८. (३) मात्थ. ८:२; मार्क. १:४०. (४) २ राज. ५:१०,१४. (५) ले. १४:४. (६) मात्थ. ४:२५; मार्क. ३:७; यो. ६:२. (७) मात्थ. १४:२३; मार्क. ६:४६.

९–११ "माणसांस धरसील." शिमोनाचें भय घालवून ख्रीस्तानें त्याला समजाविलें कीं लोकाचें तारण व्हावें म्हणून त्यांस शुभवर्त्तमान गाजवून मजकडे वळवावें हें तुझें काम होईल. "सर्व सोडून त्याच्या मागें चालले." हें सर्व पाप्यांस चांगलें उदाहरण आहे. जीवात्म्याचें मोल सगळ्या जगापेक्षां मोठें आहे, तर तारण पावण्याकरितां माल, मित्र वगैरे यांस सोडून ख्रीस्ताला अनुसरून त्यावर अधिक प्रीति केली पाहिजे व त्याच्या आज्ञा पाळणें भाग असें आहे.

१२–१६ मात्थ. ८:२–४ पाहा.

१७ नंतर असें झालें कीं, एका दिवशीं तो उपदेश करीत असतां गालीलांतील व यहूदांतील प्रत्येक गांवाहून व यरूशलेमाहून आलेले परोशी व शास्त्री [1] बसले होते. आणि त्यांस निरोगी करायास प्रभूचें सामर्थ्य प्रगट झालें.

१८ तेव्हां पाहा [2] माणसांनीं कोणीएक वातरोगी माणसाला बाजेवर घालून आणिलें, व त्याला आंत नेऊन त्याच्या समोर ठेवायास यत्न केला.

१९ परंतु दाटीमुळें त्याला आंत न्यायास सांपडेना, ह्मणून त्यांनीं घरावर चढून त्याला बाजेसुद्धां कवलारांतून येशूच्या समोर मध्यें उतरिलें.

२० तेव्हां तो त्यांचा विश्वास पाहून त्याला ह्मणाला, माणसा, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे.

२१ तेव्हां शास्त्री व परोशी असा विचार करूं लागले कीं, हा दुर्भाषण करणारा कोण आहे? एक जो देव त्यावांचून कोणाच्यानें [3] पापांची क्षमा करवती?

२२ येशूनें त्यांचे विचार जाणून त्यांस उत्तर दिलें कीं, तुह्मी आपल्या अंतःकरणांमध्यें काय विचार करितां?

२३ तुझ्या पापांची क्षमा झाली आहे हें बोलणें, किंवा उठून चाल हें बोलणें, यांतून कोणतें सोपें?

२४ परंतु पृथ्वीवर पापांची क्षमा करायास मनुष्याच्या पुत्राला अधिकार आहे हें तुह्मी जाणावें; तेव्हां तो वातरोग्याला ह्मणाला, मी तुला सांगतो, ऊठ, [4] आपली बाज उचलून घेऊन आपल्या घरीं जा.

२५ तेव्हां तो लागलाच त्यांच्या देखतां उठून ज्या बाजेवर निजला होता ती उचलून देवाचें गौरव करीत आपल्या घरीं गेला.

२६ तेव्हां सर्वांस विस्मय [5] झाला, आणि ते देवाचें गौरव करूं

---

(१) यो. ३:२९. (२) मात्थ. ९:२; मार्क. २:३. (३) गीत. ३२:५;१०३:३; १३०:४; यश. १:१८;४३:२५. (४) यो. ५:८,१२. (५) लूक. ५:८.

१७—२६ याचें व्याख्यान मात्थ. ९:१–७ एथें केलें आहे. ही गोष्ट कपर्णाहूमांत झाली. मात्थ. ९:१. "कवलारांतून." हें करायाला जे श्रम पडले तेणेंकरून त्यांनीं आग्रह व विश्वास दाखविला.

लागले, [१] व फार भयभीत होऊन ह्मणाले, आह्मी आज अद्भुतें पाहिलीं आहेत.

२७ त्यानंतर [२] तो बाहेर गेला तेव्हां त्यानें लेवी नामें जकातदार जकातीच्या नाक्यावर बसलेला पाहिला, व त्याला ह्मटलें, माझ्या मागें ये.

२८ तेव्हां तो सर्व सोडून उठून त्याच्या मागें चालला.

२९ नंतर लेवीनें आपल्या घरीं त्याच्या साठीं मोठी जेवणावळ केली, तेव्हां त्यांच्या बरोबर जकातदार व दुसरे लोक यांचा मोठा समुदाय [३] जेवायास बसला.

३० तेव्हां त्यांचे शास्त्री व परोशी त्याच्या शिष्यांसीं कुरकूर करीत बोलले, जकातदार व पापी यांबरोबर तुह्मी कां खातां व पितां.

३१ तेव्हां येशूनें त्यांस उत्तर दिलें कीं, निरोग्यांस वैद्याची गरज नाहीं, [४] तर दुखणाइतांस आहे.

३२ मी पुण्यवंतांस नाहीं, तर पाप्यांस [५] पश्चात्तापासाठीं बोलावण्यास आलों.

३३ तेव्हां त्यांनीं त्याला ह्मटलें, योहान्नाचे शिष्य वारंवार उपास करितात व प्रार्थना करितात, व तसे परोश्यांचेहि, तुझे शिष्य तर खातात व पितात, [६] हें काय?

---

[१] प्रेषि. ४:२१; गल.१:२४. [२] मात्थ. ९:९; मार्क. २:१३. [३] लूक. १५:१.
[४] इर्मे. ८:२२. [५] लूक. १५:७,१०; १ करिं. ६:९-११; १ तीम. १:१५; २ पेत्र. ३:९.
[६] लूक. ७:३४,३५.

२७–३२ मात्थ. ९:९–१३ एथें पाहा.

२९ "लेवीनें." लेवी म्हणजे मात्थी. मात्थीनें शुभवर्त्तमान लिहितांना या गोष्टीचा सारांश वर्णिला, पण आपण ती जेवणावळ केली असें दाखविलें नाहीं. यावरून दिसतें कीं शुभवर्त्तमानकर्त्यांस आपली प्रशंसा करायास बरें वाटलें नाहीं. आपला महिमा पाहावा अथवा वर्णावा हा सत्यधर्माचा गुण नाहीं. नी. २७:२. लेवीनें ही जेवणावळ करून पुष्कळ जकातदार व पापी यांस बोलाविलें. त्यांनीं ख्रीस्ताचें ऐकावें व त्याला पाहावें हा त्याचा हेतु असेल. ख्रीस्तहि आला. लोक दोष ठेवतील असें जाणून तो दूर राहिला नाहीं. मात्थ. ११:१९. पाप्यांचें कल्याण करावें ह्मणून तो त्यांचा सहवास करीत असे. तसें आम्ही जेथें कोठें जातों, खातों, पितों अथवा जें काय करीत असतों त्या सर्वांकडून सर्वदा आम्हीं देवाचें सौख्य पाहावें व पापी लोकांचें तारण साधण्यास झटावें.

३३—३९ याची व्याख्या मात्थ. ९: १४—१७ येथें पाहा.

२४ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, वऱ्हाड्यांच्या बरोबर वर आहे तोंपर्यंत त्याकडून उपास करवाल काय?

२५ परंतु असे दिवस येतील कीं, वर त्यांपासून काढून घेतला जाईल त्या दिवसांमध्यें [१] ते उपास करितील.

२६ आणखी त्यानें त्यांस दाखलाहि सांगितला [२] कीं, जुन्या वस्त्राला नव्या वस्त्राचें ठिगळ कोणी लावीत नाहीं; लाविलें तर तें नवें जुन्याला फाडितें व नव्याचें ठिगळ जुन्याला [३] जमत नाहीं.

२७ आणि नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत कोणी घालीत नाहीं; घातला तर नवा द्राक्षारस बुधले फोडून वाहून जाईल, व बुधलेहि नासतील.

२८ तर नवा द्राक्षारस नव्या बुधल्यांत घालावा, ह्मणजे दोन्ही कायम राहतात.

२९ आणखी कोणी जुना द्राक्षारस पिऊन तेव्हांच नवा मागत नाहीं, कां कीं तो ह्मणतो, जुना त्यापेक्षां चांगला आहे [४].

६ **अध्याय.**—मग असें झालें कीं, सणाच्या दुसऱ्या दिवसानंतर [५] पहिल्या शाब्बाथ दिवशीं तो शेतांमधून जात असतां त्याचे शिष्य कणसें मोडून हातांवर चोळून खाऊं लागले.

२ तेव्हां परोश्यांतील कोणी त्यांस बोलले, शाब्बाथ दिवसांमध्यें जें करूं नये [६] तें तुह्मी कां करितां.

३ तेव्हां येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं दावीदाला व त्याच्या बरोबरच्या माणसांस भूक लागली तेव्हां त्यानें काय केलें हें तुह्मी वाचिलें नाहीं काय? [७]

---

(१) यश. २२:१२. (२) मात्थ. ९:१६,१७; मार्क. २:२१,२२. (३) लें. १९:१९; अनु. २२:११; २ करिं. ६:१६. (४) इर्म. ६:१६. (५) मात्थ. १२:१; मार्क. २:२३. (६) निर्ग. २०:१०; यश. ५८:१३. (७) १ शमु. २१:६.

"जुना त्यापेक्षां चांगला आहे." या दाखल्याचा हा अर्थ कीं तुम्हां परोश्यांचीं मतें आतां शोभत नाहींत. नवी व्यवस्था सुरू झाली आहे. नेमशास्त्रांतल्या उपास वगैरे क्रियासंबंधीं गोष्टी आतां पाळायाच्या नाहींत. नेमशास्त्रांत सांगितलेल्या नीतीच्या आज्ञा सर्वदां काळाच्या समाप्तिपर्यंत पाळायाच्या आहेत, पण त्यांतील फक्त क्रिया व विधि हीं ख्रीस्ताकडून रद्द झालीं.

अध्याय ६.

१—११. याची व्याख्या मात्थ. १२: १—१३ येथें पाहा.

४ तो देवाच्या मंदिरांत कसा गेला आणि पुढें ठेवलेल्या ज्या भाकरी
याजकांशिवाय कोणी खाऊं नयेत [१] त्या त्यानें घेऊन कशा खाल्ल्या व
आपल्या बरोबरच्यांसहि दिल्ह्या ?

५ आणखी तो त्यांस ह्मणाला, मनुष्याचा पुत्र शाब्बाथाचाहि धनी आहे.

६ नंतर असें झालें कीं, [२] दुसऱ्या शाब्बाथ दिवसीं त्यानें सभास्थानांत
जाऊन उपदेश केला, आणि उजवा हात वाळलेला असा माणूस तेथें होता.

७ तेव्हां शास्त्री व परोशी हे त्याजवर दोष ठेवावा ह्मणून तो शाब्बाथ
दिवसीं बरें करील काय, [३] हें पाहायास टपत राहिले.

८ परंतु त्यानें त्याचे विचार जाणून [४] त्या हात वाळलेल्या माणसाला
सांगितलें कीं, [५] ऊठ व मध्यें उभा राहा. तेव्हां तो उठून उभा राहिला.

९ मग येशू त्यांस ह्मणाला, मीं तुह्मास पुसतों, शाब्बाथ दिवसीं बरें
करणें किंवा वाईट करणें, जिवाला राखणें किंवा मारणें, कोणतें योग्य ?

१० मग सभोंवतें त्या सर्वांकडे पाहून [६] त्यानें त्या माणसाला सांगि-
तलें कीं, आपला हात लांब कर. तेव्हां त्यानें तसें केलें, आणि त्याचा
हात दुसऱ्यासारिखा बरा झाला.

११ मग ते वेडेपणानें भरले, व आपण येशूला काय करावें असा
एकमेकांसीं विचार [७] करूं लागले.

१२ आणि असें झालें कीं, [८] त्या दिवसांमध्यें तो प्रार्थना करायास
[९] डोंगरावर गेला, व देवाची प्रार्थना करीत रात्रभर राहिला.

---

(१) ले. २१:४. (२) मात्थ. १२:१०; मार्क. ३:१; लूक. १३:१४;१४:३. (३) यो. ९:१६. (४) ईयो. ४२:२. (५) यश. ४२:४; प्रेषि. २६:२६. (६) मार्क. ३:५. (७) गीत. २:१२. (८) मात्थ. १४:२३. (९) मात्थ. ६:६.

"ते वेडेपणानें भरले." या चमत्कारा-कडून फार दयेचें काम झालें व देवाचा मोठा पराक्रम दिसून आला आहे असें पाहून हा येशू वास्तविक देवापासून आहे असी खातरी धरून ईश्वराचे मोठे उपकार मानायाचे होते; परंतु असें न करितां, यानें आमच्या मर्जाविरुद्ध शाब्बाथ दिवसीं हा चमत्कार करून लोकांस असें दाखविलें आहे कीं तो आमचें ऐकत नाहीं व आमच्या पेक्षां मोठे चमत्कार करायास समर्थ आहे, असें मनांत आणिल्यावरून त्यांस वेड लागलें; ह्मणजे ते रागें भरले आणि अशा गोष्टी विषयींचा राग हें वेडेपण होतें. तसले लोक आजप-र्यंत आहेत, ह्मणजे इतर लोक चांगलें देखील करितात तरी यांस वाटतें त्या प्रकारचें अथवा त्या रीतीनें न केलें तर हेवा व द्वेष करून ते रागें भरतात.

१२ "डोंगरावर गेला." अशा ठिकाणीं

१३ मग दिवस उगवल्यावर त्यानें आपल्या शिष्यांस बोलाविलें, व त्यां-
तून [1] बारा जण निवडून त्यांस प्रेषित असें नांव दिल्हें.

१४ ते असे, शिमोन, त्याला [2] त्यानें पेत्रसहि ह्मटलें, व त्याचा भाऊ
अंद्रयास, याकोब व योहान्न, फिलिप्पस व बार्थलमी.

१५ मात्थी व थोमा, अल्फीचा पुत्र याकोब व जेलोतेस ह्मटलेला
शिमोन.

१६ याकोबाचा भाऊ यहूदा [3] व पराधीन करणारा झाला जो यहू-
दा इस्कारयोते तो.

१७ नंतर तो त्यांबरोबर खालीं उतरून मैदानांत उभा राहिला, तेव्हां
त्याच्या शिष्यांचा समुदाय, [4] आणि जे लोक त्याचें ऐकायास व आपले
रोग [5] बरे करून घ्यायास सगळा यहूदा व यरूशलेम यांपासून, व सोर
व सीदोन यांकडल्या समुद्रकांठापासून आले होते त्यांचा मोठा मेळा
मिळाला.

---

(१) मात्थ. १०:१; मार्क. ३:१३; ६:७. (२) यो. १:४२. (३) यहूद. १. (४) मात्थ. ४:२५; मार्क. ३:७. (५) गीत. १०३:३; १०७:१७-२०.

येशू प्रार्थना करायाला जात असे. मार्क. ६:४६. "रात्रभर." हा विशेश मोठा प्रसंग होता. आपल्या शिष्यांस शुभवर्तमान गाजवायास पाठवावें, व आपल्या धर्माचा व मंडळीचा पाया घालावा, असी वेळ आली होती; ह्मणून अधिक वेळ व विशेष आग्रहानें प्रार्थना करावी हें बरें वाटलें. ख्रीस्त देव असतां त्याला प्रार्थना करण्याचें काय अगत्य होतें असें विचारिलें तर, जसा तो देव होता तसा मनुष्यहि होता, ह्मणून त्याला खाणें पिणें यांचें अगत्य होतें. तसें त्याला प्रार्थनाहि करण्याचें अगत्य होतें. ख्रीस्तानें प्रार्थना करून आह्मास कित्ता दाखविला आहे. जेव्हां कांहीं पापमोह अथवा अडचण प्राप्त होती, अथवा कांहीं भारी काम देवाच्या गौरवार्थी करायाचें आहे, तेव्हां ईश्वरी ज्ञान व साह्य मिळविण्यास विशेष आग्रहानें प्रार्थना करावी हें योग्य आहे.

१३—१६. याचा अर्थ मात्थ. १०:१—४ एथें दाखविला आहे.

१७. "मैदानांत उभा राहिला." मात्थीनें वर्णिलें त्याच्या बरोबरीस हें लावून पाहिलें ह्मणजे असें दिसून येतें कीं येशू डोंगरावरून उतरला तेव्हांच मोठा मेळा मिळाला, आणि त्यानें त्यांस बरें केलें, मग उपदेश करण्याची सोई पाहून जरासें एकीकडे वळून टेंकडावर चढून व बसून हा उपदेश केला. "सोर व सीदोन." यांविषयां मात्थ. ११:२१ यावर टीका पाहा.

१८ आणि अशुद्ध आत्म्यांनीं पिडलेले हेहि ; आणि ते बरे झाले.

१९ आणि सगळा समुदाय त्याला शिवायास [१] झटला, कारण
कीं, [२] त्यांतून सत्व निघून सर्वांस बरें करीत असे.

२० आणि त्यानें [३] आपल्या शिष्यांकडे आपली दृष्टि लावून ह्मटलें,
अहो गरिबानो, [४] तुह्मी धन्य, कां कीं देवाचें राज्य तुमचें आहे.

२१ अहो जे आतां भुकेले [५] ते तुह्मी धन्य, कां कीं तृप्त [६] व्हाल.
अहो जे आतां रडतां [७] ते तुह्मी धन्य, कां कीं हंसाल.

२२ जेव्हां मनुष्याच्या पुत्राकरितां माणसें तुमचा द्वेष करितील [८] व
तुह्मास दूर करितील [९] व निंदितील व तुमचें नांव वाइटासारिखें वर्जतील
तेव्हां तुह्मी धन्य आहां.

२३ त्या दिवसीं आनंद करा, [१०] उड्याहि मारा, कां कीं पाहा,
आकाशामध्यें तुमचें वेतन मोठें, कां तर त्याप्रमाणें [११] त्यांच्या पूर्वजांनीं
भविष्यवाद्यांस केलें होतें.

२४ परंतु तुह्मा धनवानांस [१२] हायहाय, कां कीं तुह्मास तुमचें स-
माधान [१३] मिळालेंच आहे.

२५ अहो तृप्त झालेले, [१४], त्या तुह्मास हायहाय, कां कीं तुह्मास भूक

---

(१) गग. २१:८, ९; मात्थ. १४:३६; यो. ३:१४, १५. (२) मार्क. ५:३०, लूक. ८:४६.
(३) मात्थ. ५:२. (४) याक. २:५. (५) यश. ५५:१. (६) गीत. १०७:९.
(७) यश. ६१:३; प्रग. २१:४. (८) यो. १७:१४. (९) १ पेत्र. २:१९, २०, ३:१४, ४:१४.
(१०) प्रेषि. ५:४१, कल. १:२४, यो. १:२. (११) प्रेषि. ७:५२; इब्री. ११:३२:३९.
(१२) हब. २:९; याक. ५:१. (१३) लूक. १६:२५. (१४) यश. २८:७; ६५:१३.

१८, १९ "अशुद्ध आत्म्यानीं." हे अमंगल, अपवित्र व दुष्ट प्राणी सैतानाकडले व सैतानाच्या कामासाठीं पाठविलेले असे होते. ते लोकांस दुष्ट प्रेरणा, रोग व पीडा करण्यास समर्थ होते. "सत्व." बरें करण्याची शक्ति. जो केवळ मनुष्यच त्याच्या ठायीं हें सत्व राहत नाहीं.

२०—२९ याची व्याख्या विस्तारानें मात्थ. ५:६,७ एथें केली आहे.

२१ "जे आतां भुकेले." ज्यांस न्यायीपणाची भूक व तान्ह लागली आहे ते एथें लूकानें संक्षेपानें तेंच मात्थीनें विस्तारानें लिहिलें आहे.

२४—२६ मात्थीनें हें लिहिलें नाहीं. येशू हें परोश्यांस बोलला असेल. "धनवानास." जे धनलोभी असून द्रव्याकडूनच मिळतें तेंच मात्र सुख पाहतात परंतु आकाश लोकांतलें वेतन पावण्याची आशा धरीत नाहींत, त्यांस हाय हाय, खरें. द्रव्याकडून मिळेल तें सगळें सुख मिळालें तरी दोन दिवसांचें व अगदीं हलकेंहि आहे, आणि मरण आलें ह्मणजे सर्वकाळचें दुःख

लागेल. अहो जे आतां हंसतां [१] त्या तुह्मास हायहाय, कां कीं तुह्मी खेद पावाल व रडाल.

२६ जेव्हां सर्व माणसें तुह्मास बरें ह्मणतील [२] तेव्हां तुह्मास हायहाय, कां कीं त्याप्रमाणें त्यांच्या पूर्वजांनीं खोट्या भविष्यवाद्यांस केलें होतें.

२७ परंतु तुह्मां ऐकणाऱ्यांस मी सांगतों, तुह्मी आपल्या वैऱ्यावर प्रीति करा [३], जे तुमचा द्वेष करितात त्यांचें बरें करा.

२८ जे तुह्मास शाप देतात त्यांस आशीर्वाद द्या [४], व जे तुह्मास गांजितात त्यांसाठीं प्रार्थना करा.

२९ जो तुझ्या एका गालावर [५] मारितो त्याला दुसराहि पुढें कर. आणि जो तुझें अंगवस्त्र घेतो [६] त्याला अंगरखाहि घ्यायास मना करूं नको.

---

(१) नी. १४:१३; एफ. ५:४. (२) यो. १५:१९; १ यो. ४:५. (३) निर्ग. २३:४,५; नी. २५:२१; मात्थ. ५:४४; लूक. ६:३५; रोम. १२:२०. (४) लूक. २३:३४; प्रेषि. ७:६०. (५) मात्थ. ५:३९. (६) १ करिं. ६:७.

त्यांस प्राप्त होणें. "अहो तृप्त झालेले." द्रव्यानें व ऐहिक सुखानें तृप्त जे आहेत ते. कितीएक असे आहेत. आपण थोर, मातबर, पुण्यवान आहों असें मनांत आणून परलोकवास व जिवात्म्याचें तारण यांविषयीं निष्काळजी होऊन व हयगय करून तृप्त असतात. असें असतांहि ते गरीब, लाचार व पापी आहेत आणि त्यांस अवघ्यांची गरज आहे. "भूक लागेल." तुमचें द्रव्य जाईल, अथवा तें सोडून तुह्मी मरून जाल तेव्हां ऐहिक सुख किती पोकळ आहे व जीवात्म्याला सर्वकाळचें सुख पाहिजे असें त्यांस समजेल. "जे आतां हंसतां." ख्याली खुशाली करितां, विलास सुख भोगितां, पण देवाची भक्ति करीत नाहीं व जीवात्म्याविषयीं काळजी धरीत नाहीं, त्या तुह्मांस हायहाय. "रडाल." विपत्ति, रोग व मरण हीं येतात, मग रडाल. अरेरे मूर्खपणानें आयुष्य घालवितात मग सर्वकाळपर्यंत शोक करितात असे किती लोक आहेत? सर्वकाळचें सुख मिळावें ह्मणून आतांच पापें पदरांत घेऊन खऱ्या तारणाऱ्यावर विश्वास ठेविला पाहिजे आणि नम्र, विवेकी, भक्तिशील असलें पाहिजे, ह्मणजे मरणाचें भय नाहींसें होऊन सर्वकाळचें सुख प्राप्त होईल. "बरें ह्मणतील." तुमची प्रशंसा व बढाई करतील. लोकांस सत्यता आवडत नाहीं ह्मणून जर तुह्मी माझें शुभवर्त्तमान घोषण करितां तर ते तुमचा द्वेष करतीलच. खोटे भविष्यवादी आले तेव्हां लोकांची मर्जी पाहून त्यांस गोड वाटेल तेंच मात्र ते बोलत असत, ह्मणून लोक त्यांची स्तुति व वाहवा करीत असत. तर त्यासारिखे तुह्मी होऊं नका. जे भविष्यवादी अथवा उपदेशक होतात त्यांनीं लोकांची मर्जी पाहून व फूस लावून बोलूं नये, तर ईश्वराची मर्जी पाहून सत्यबोध केला पाहिजे.

२७, २८ त्याविषयीं मात्थ. ५:४४,४५ एथें पहा.

२९ ,, मात्थ. ५:३९,४० पहा.

३० आणि जो कोणी तुझ्या जवळ मागतो त्याला दे [1], व जो तुझ्या वस्तु घेतो त्यापासीं परत मागूं नको.

३१ आणि जसें माणसांनीं तुह्मासीं वर्त्तावें [2] ह्मणून तुमची इच्छा आहे तसेंच तुह्मीहि त्यांसीं वर्त्ता.

३२ आणि जे तुह्मावर प्रीति करितात त्यांवर तुह्मी प्रीति केली तर तुमचा उपकार काय मानायाचा आहे? कां कीं पापीहि आपल्या प्रीति करणाऱ्यांवर प्रीति करितात.

३३ आणि जे तुमचें बरें करितात त्यांचें तुह्मी बरें केलें तर तुमचा उपकार काय मानायाचा आहे? कां कीं पापीहि तसेंच करितात.

३४ आणि ज्यांपासून तुह्मास परत घेण्याची आशा आहे त्यांस तुह्मी उसनें दिल्हें तर तुमचा उपकार काय मानायाचा आहे? कां कीं दिल्हें तितकें परत मिळेल या आशेनें पापीहि पाप्यांस उसनें देतात.

३५ परंतु तुह्मी आपल्या वैऱ्यांवर [3] प्रीति करा, व कांहीं परत घेण्याची आशा न धरितां [4] उसनें द्या, ह्मणजे तुह्मास मोठें वेतन मिळेल व तुह्मी परात्पराचे पुत्र [5] व्हाल, कारण कीं अनुपकारी व वाईट यांवर तो उपकारिक आहे.

३६ यास्तव जसा तुमचा बाप दयाळू आहे तसे तुह्मीहि दयाळू व्हा.

३७ आणि तुह्मी दोष [6] लावूं नका, ह्मणजे तुह्माला दोष लावणार नाहींत; कोणाला अन्यायी ठरवूं नका, ह्मणजे तुह्माला अन्यायी ठरविणार नाहींत, क्षमा करा ह्मणजे तुमची क्षमा होईल.

३८ द्या, ह्मणजे तुह्मास देतील, [7] चांगलें माप, दडपून व हालवून व शींग भरून तुमच्या पदरीं [8] घालतील, कां कीं [9] ज्या मापानें तुह्मी मोजून देतां त्याच मापानें तुह्मास परत मोजून देतील.

---

(१) अनु. १५:७,८,१०; नीं. १९:१७;२१:२६; मात्थ. ५:४२. (२) मात्थ. ७:१२. (३) लूक. ६:२७. (४) गीत. ३७:२६;११२:५. (५) मात्थ. ५:४५. (६) मात्थ. ७:१. (७) नी. १९:१७; मात्थ. १०:४२. (८) गीत. ७९:१२. (९) मात्थ. ७:२; मार्क. ४:२४; याक. २:१३.

---

३० त्याविषयीं मात्थ. ५:४२.
३१ ,, ,, ७:१२.
३२–३६ ,, ,, ५:४६–४८.
३७–४२ ,, ,, ७:१–९.

३८ "चांगलें माप." जो कृपण कोणाला देत नाहीं आणि व्यापारांत माप कमी करून घ्यायास पाहतो त्यासीं त्याच रीतीनें वागायास लोक पाहतील, आणि त्याला

३९ आणि त्यानें त्यांस दाखला सांगितला [१] अंधळ्याच्यानें अंधळ्याला नेववतें काय? दोघेहि खांचेंत पडतील कीं नाहीं?

४० शिष्य [२] आपल्या गुरूपेक्षां थोर नाहीं, तर पूर्ण झालेला प्रत्येक शिष्य आपल्या गुरूसारिखा होईल.

४१ आणि तूं आपल्या डोळ्यांतलें मुसळ ध्यानांत न आणितां आपल्या भावाच्या डोळ्यांतलें कुसळ कां पाहतोस?

४२ अथवा आपल्या डोळ्यांतलें मुसळ न पाहतां आपल्या भावाला कसें ह्मणसील कीं, हे भाऊ, तुझ्या डोळ्यांतलें कुसळ मला काढूं दे? अरे ढोंग्या, पहिल्यानें आपल्या डोळ्यांतलें मुसळ काढ [३] ह्मणजे आपल्या भावाच्या डोळ्यांतलें कुसळ काढायास तुला साफ दिसेल.

४३ कां कीं [४] वाईट फळ देणारें झाड चांगलें नव्हे, व चांगलें फळ देणारें झाड वाईट नव्हे.

४४ कारण कीं [५] प्रत्येक झाड आपल्या फळावरून कळतें, कां तर कांट्यांच्या झाडावरून अंजीर काढीत नाहींत, व झुडपावरून द्राक्षें तोडीत नाहींत.

४५ चांगला माणूस [६] आपल्या अंतःकरणाच्या चांगल्या भांडारांतून चांगलें काढितो, व वाईट माणूस आपल्या अंतःकरणाच्या वाईट भांडारांतून वाईट काढितो; कां कीं जें अंतःकरणांत भरलें आहे त्याप्रमाणेंच त्याचें तोंड बोलतें.

४६ आणि तुह्मी मला प्रभू प्रभू [७] असें ह्मणून, जें मी सांगतों तें कां आचरत नाहीं.

(१) मात्थ. १५:१४. (२) मात्थ. १०:२४; यो. १३:१६; १५:२०. (३) नी. १८:१७; रोम. २:१, २१. (४) मात्थ. ७:१६, १७. (५) मात्थ. १२:३३. (६) मात्थ. १२:३५. (७) मल. १:६; मात्थ. ७:२१; २५:११; लूक. १३:२५; गल. ६:७.

अडचण प्राप्त झाली तर फारकरून कोणी त्याला मदत करणार नाहीं. जो कृपाळू व उदार आहे त्यांसीं लोक कृपेनें व उदारपणानें वागतात. माप वेगानें व हलकें भरून दिलें आणि दडपून हलवून व शीग भरून दिल्हें. यांत केवढें अंतर हें सर्वांच्या लक्षांत आहे.

३९ मात्थ. १५:१४ पाहा.

४० तुह्मी अंधळे असलां तर तुमचे शिष्यहि अंधळे होतील. हाच अर्थ असें संबंधावरून दिसतें. तर त्यांनीं अंधळ्याचे अंधळे शिक्षक असें न व्हावें ह्मणून शास्त्र बरोबर समजून घ्यावें असा बोध समजून घ्यायाचा होता.

४१, ४२ मात्थ. ७:३–५ पाहा.

४३, ४४. "७:१६–१८."

४५ मात्थीनें वर्णलेल्या डोंगरावरील उपदेशांत हें वाक्य सांपडत नाहीं, परंतु मात्थ. १२:३५ ह्या ओवींत लिहिलें आहे.

४६—४९ मात्थ. ७:२१–२७ पाहा.

४७ जो कोणी मजकडे येतो व माझ्या गोष्टी ऐकून त्यांप्रमाणें करितो तो कोणासारिखा आहे, हें मी तुह्मास दाखवितों.

४८ तो कोणीएका घर बांधणाऱ्यासारिखा [१] आहे; त्यानें खोल खणून खडकावर पाया घातला; मग पूर येऊन त्या घरासीं आदळला, तरी त्याच्यानें त्याला हालवेना [२], त्याचा पाया खडकावर [३] घातला होता ह्मणून.

४९ परंतु जो ऐकून [४] त्याप्रमाणें करीत नाहीं तो पायावांचून भूमीवर घर बांधणाऱ्या माणसासारिखा आहे; त्या घरासीं पूर आदळतांच तें पडलें, आणि त्या घराचा [५] मोठा नाश झाला.

७ अध्याय.—नंतर लोक ऐकत असतां तो आपलीं सर्व वचनें संपवून [६] कपरणाहूमांत गेला.

२ तेव्हां कोणी एका शतपतीचा जो चाकर त्याला [७] प्रिय होता तो दुखणाईत असतां मरणास टेंकला.

३ मग त्यानें येशूविषयीं ऐकून यहूद्यांच्या वडिलांस त्याकडे पाठवून त्याला विनंती केली कीं, आपण येऊन माझ्या चाकराला वांचवावें.

४ नंतर त्यांनीं येशूकडे येऊन त्याला आग्रहानें विनंती केली कीं, ज्यावर हा उपकार करायाचा तो योग्य आहे.

५ कारण कीं तो आपच्या लोकांवर प्रीति करितो [८], व त्यानें आह्मासाठीं सभास्थान बांधिलें आहे.

६ मग येशू त्यांबरोबर गेला, आणि तो घराजवळ आला इतक्यांत त्या शतपतीनें त्याकडे मित्रांस पाठवून त्याला ह्मटलें, हे प्रभू, [९] श्रम करूं नको, कारण कीं त्वां माझ्या छपराखालीं यावें असा मी योग्य नाहीं.

७ यामुळें म्या आपणाला तुजकडे येण्यास योग्य मोजिलें नाहीं, परंतु तूं शब्द [१०] बोल ह्मणजे माझा चाकर बरा होईल.

---

(१) मात्थ. ७:२५,२६. (२) २ पेत्र. १:१०; यहूद. २४. (३) गीत. ४६:१-३; ६२:२. (४) याक. १:२४-२६. (५) नी. २८:१८; हो. ४:१४. (६) मात्थ. ८:५. (७) ईयो. ३१:१५; नी. २९:२१. (८) १ राज. ५:१; गल. ५:६; १ यो. ३:१४;५:१,२. (९) लूक. ८:४९. (१०) गीत. १०७:२०.

अध्याय ७.

१—१० मात्थ. ७:५–१३ पाहा.

८ कारण कीं मी हाताखालचा माणूस असतांहि माझ्या स्वाधीन शिपाई आहेत, आणि एकाला जा असें सांगतो ह्मणजे तो जातो, व दुसऱ्याला ये ह्मणजे तो येतो, व माझ्या चाकराला अमुक कर ह्मणजे तो करितो.

९ तेव्हां त्या गोष्टी ऐकून येशू त्याविषयीं आश्चर्य पावला, व मुरडून आपल्या मागें चालणाऱ्या समुदायाला ह्मणाला, मी तुह्मास सांगतों कीं, इस्राएलांतहि एवढा विश्वास मला अढळला नाहीं.

१० नंतर जे पाठविले होते ते माघारे घरास आल्यावर, जो चाकर रोगी होता तो त्यांस बरा असा दिसून आला.

११ आणि असें झालें कीं दुसऱ्या दिवसीं तो नाईन नामें नगरास जात होता, आणि त्याचे बहुत शिष्य व मोठा समुदाय त्याच्या संगतीं चालला.

१२ तेव्हां तो नगराच्या वेसीजवळ आल्यावर पाहा, कोणी एका मेलेल्या माणसाला बाहेर नेत होते, तो आपल्या आईचा एकुलता एक पुत्र, व ती विधवा होती; आणि त्या नगरांतील मोठा समुदाय तिच्याबरोबर होता.

१३ तेव्हां तिला पाहून प्रभूला तिचा कळवळा आला, व तो तिला ह्मणाला रडूं नको.

१४ मग जवळ जाऊन त्यानें तिरडीस हात लाविला, तेव्हां खांदेले उभे राहिले, आणि तो बोलला, तरण्या, मी तुला सांगतों, (१) ऊठ.

१५ तेव्हां तो मेलेला (२) उठून बसला व बोलूं लागला; मग त्यानें त्याला त्याच्या आईजवळ दिल्हें.

---

(१) लूक. ८:५४; प्रेषि. ९:४०; रोम. ४:१७. (२) २ राज. ४:३२-३७;१३:२१; १ यो. ११:४४.

११—१८ "नाईन." हें शहर गालीलांत तेबोर डोंगराच्या दक्षिणेस सुमारें एका कोसाच्या अंतरावर कपर्णाहूमाजवळ होतें. तो हल्लीं लाहान गांव आहे. त्यांतील राहणारे यहुदी व मुसलमान व कितीएक ख्रिस्तीहि आहेत.

१२ "बाहेर नेत होते." प्राचीन काळीं यहुदी आपले राजे व प्रख्यात जे होते त्यांस खेरीज करून कोणालाहि गांवकुसाच्यांत पुरीत नसत. १ शमु. २८:३. २ राजे २१:१८. गांवाच्यांत मेलेल्यांस पुरणें ही चाल चांगली नाहीं. उष्ण देशांत प्रेतें जाळावीं, नाहीं तर गांवाच्या बाहेर बऱ्याच अंतरावर स्मशान बांधून पुरावीं हें बरें आहे.

१६ तेव्हां सर्वांस भय प्राप्त झालें, आणि ते देवाला गौरवीत बोलले कीं, आह्मामध्यें मोठा भविष्यवादी [1] उठला आहे, व देवानें आपल्या लोकांची भेट [2] घेतली आहे.

१७ नंतर त्याविषयींची ही गोष्ट सगळ्या यहूदांत व चहुंकडल्या सर्व प्रांतांत पसरली.

१८ तेव्हां या सर्व गोष्टी योहान्नाला त्याच्या शिष्यांनीं सांगितल्या.

१९ मग योहान्नानें [3] आपल्या शिष्यांतील दोघांस बोलावून येशूकडे असें विचारायास पाठविलें कीं, जो यायाचा होता तो तूंच आहेस [4], किंवा आह्मी दुसऱ्याची वाट पाहूं?

२० आणि तीं माणसें त्याजकडे येऊन ह्मणालीं, बाप्तिस्मा करणाऱ्या योहान्नानें आह्मास तुजकडे असें विचारायास पाठविलें कीं, जो यायाचा होता तो तूंच आहेस, किंवा आह्मी दुसऱ्याची वाट पाहूं?

२१ त्याच घटकेस त्यानें बहुतांचीं दुखणीं व पटक्या व वाईट आत्मे काढून त्यांस बरें केलें, व बहुत अंधळ्यांस दृष्टि दिल्ही.

२२ मग येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मी ज्या गोष्टी पाहिल्या व ऐकिल्या त्या योहान्नाला जाऊन सांगा [5] कीं, अंधळे [6] पाहतात, पांगळे

---

(१) लूक. २४:१९. (२) लूक. १:६८. (३) मात्थ. ११:२. (४) जख. ९:९. (५) यो. १:४६. (६) यश. ३५:५,६.

---

१६ "सर्वांस भय प्राप्त झालें." त्यांची खातरी झाली कीं हा ईश्वरी पुरुष असावा. तो तरूण मेलाच होता याविषयीं अंदेशा नव्हता. प्रेत थंड होऊन गेलें होतें, व त्याला पुरायाला ते नेत होते. रडणारी आईहि प्रेताच्या मागें चालत होती. येशू त्यांस परका असून व त्या वाटेनें अवचित येऊन भेटला आणि त्या आईचें दुःख पाहून कळवळला. मग जवळ येऊन त्यानें तिरडीस स्पर्श करून व शब्द मात्र बोलून त्या मेलेल्या तरुण्यास सजीव करून त्याच्या आईच्या स्वाधीन केलें. तो तरूण एकाएकीं उठून बोलूं लागला व लोकांमध्यें वहिवाट करून कितीएक वर्षांपर्यंत जगला. तर मोठा व खरोखर चमत्कार झाला आहे असी सर्वांची खातरी झाली ह्मणून त्यांनीं देवाला गौरवावें हें योग्य होतें. आणि आतांहि ही गोष्ट वाचून लोकांनीं खातरी धरावी कीं हा येशू देवाचा एकच अवतार व जगाचा एकच तारणारा आहे. तर त्याजवर भाव ठेवून त्याकडून आपलें तारण साधून घ्यावें.

१९—३५ याची टीका मात्थ. ११:२–१९ एथें पाहा.

चालतात, कोडी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले उठतात, व दरि-
द्र्यांस [१] शुभवर्त्तमान सांगण्यांत येतें.
२३ आणि जो कोणी मजविषयीं अडखळत नाहीं [२] तो धन्य आहे.
२४ मग योहान्नाचे दूत गेल्यावर तो योहान्नाविषयीं समुदायांस ह्मणूं
लागला, तुह्मी काय पाहायास रानांत गेलां? वाऱ्यानें हालविलेला बोरू काय?
२५ तर काय पाहायास गेलां? मऊ वस्त्रें ल्यालेल्या माणसाला काय?
पाहा, सुंदर वस्त्रें लेणारे व ख्यालीखुशाली करणारे राजवाड्यांत असतात [३].
२६ तर तुह्मी काय पाहायास गेलां? भविष्यवाद्याला काय? [४] होय,
मी तुह्मास सांगतों कीं, भविष्यवाद्याहून जो मोठा त्याला.
२७ पाहा, मी आपल्या दुताला तुझ्या पुढें पाठवितों, तो तुझी वाट
तुझ्या समोर तयार करील, असें ज्याविषयीं लिहिलें [५] तो हाच आहे.
२८ कां कीं मी तुह्मास सांगतों, बाप्तिस्मा करणाऱ्या योहान्नापेक्षां
बायकांपासून जन्मलेल्यांमध्यें कोणी मोठा भविष्यवादी नाहीं तरी देवा-
च्या राज्यांत जो लहान तो त्यापेक्षां मोठा आहे.
२९ आणि सर्व लोकांनीं व जकातदारानींहि ऐकून योहान्नाचा
बाप्तिस्मा घेतला [६] होता ह्मणून देवाला न्यायी [७] लेखिलें.
३० परंतु परोशी व शास्त्री यांनीं त्यापासून बाप्तिस्मा घेतला नव्हता
ह्मणून आपल्या विषयींचा देवाचा बेत [८] अव्हेरिला.
३१ तेव्हां प्रभूनें ह्मटलें, या पिढीच्या माणसांस तर मी कशासारिखें
लेखूं? [९] आणि ते कशासारिखे आहेत?

---

(१) लूक. ४:१८; याक. २:५. (२) यश. ८:१४,१५; मात्थ. ११:६;१३:५७; लूक. २:३४; यो. ६:६६; १ करि. १:२१-२८. (३) २ शमु. १९:३५; एस्त. १:३,११. (४) लूक. १:७६. (५) मल. ३:१; लूक. १:१५-१७. (६) मात्थ. ३:५,६; लूक. ३:१२. (७) गीत. ५१:४; रोम. ३:४. (८) प्रेषि. २०:२७. (९) मात्थ. ११:१६.

---

२९ "सर्व लोकांनीं." ह्मणजे साधारण लोकांनीं. शास्त्री व परोशी फारकरून येईनात. कोणी कोणी आले असें मात्थ. ३:७. यावरून दिसतें, परंतु बहुत्येकांनीं देवाचा दयाळू हेतु अव्हेरिला. कोणाच्यानें ही देवाची दया अव्हेरवती, परंतु जे अव्हेरितात ते आपली हानि, होय आपला सर्वकाळचा नाश करून घेतात.

३१—३५ याचें व्याख्यान मात्थ. ११:१६–१९ एथें पाहा. शास्त्रांतल्या कितीएक नकलांत हें कलम सांपडत नाहीं.

३२ जीं लेंकरें चवाठ्यामध्यें बसून एकमेकांस हाक मारून ह्मणतात, आह्मी तुह्माजवळ पांवा वाजविला तरी तुह्मी नाचलां नाहीं, आणि आह्मी तुह्माजवळ विलाप केला तरी तुह्मी रडलां नाहीं, त्यांसारिखे ते आहेत.

३३ कारण कीं बाप्तिस्मा करणारा योहान्न येऊन [१] भाकर खात नसे व द्राक्षारस पीत नसे, आणि तुह्मी ह्मणतां कीं, त्याला भूत लागलें.

३४ मनुष्याचा पुत्र [२] येऊन खात पीत असतो, आणि तुह्मी ह्मणतां पाहा, खादाड माणूस व दारूबाज, जकातदारांचा व पाप्यांचा मित्र.

३५ परंतु [३] ज्ञान आपल्या सर्व लेंकरांकडून न्यायी ठरतें.

३६ आणि परोश्यांतील कोणीएकानें [४] त्याला आपल्याबरोबर जेवायास बोलाविलें, मग तो त्या परोश्याच्या घरीं जाऊन पंक्तीस बसला.

३७ तेव्हां पाहा, त्या नगरांत कोणीएक पापी [५] बायको होती, ती तो परोश्याच्या घरांत जेवीत आहे हें जाणून सुगंध तेलाची अलाबास्त्र कुपी घेऊन आली.

३८ आणि ती मागें त्याच्या पायांजवळ रडत उभी राहून आसवांनीं त्याचे पाय भिजवूं लागली, व तिनें आपल्या डोक्याच्या केंसांनीं पुसून त्याच्या पायांचें चुंबन घेतलें व सुगंध तेल लाविलें.

---

(१) मात्थ. ३:४; मार्क. १:६; लूक. १:१५. (२) यो. २:२;१२:२; लूक. ७:३६. (३) नी. ८:३२-३६,१७:१६. (४) मात्थ. २६:६; मार्क. १४:३; यो. ११:२. (५) लूक. ५:३२;७:३४; १ तीम. १:१५.

---

३६ "परोश्यांतील कोणीएकानें." याचें नाम शिमोन होतें. (४० ओ.) याविषयीं एथें वर्णिलें त्याशिवाय दुसरें कांहीं कळलें नाहीं. त्याला रोग लागला असतां ख्रीस्तानें त्याला बरें केलें असेल आणि याबद्दल त्यानें ही जेवणावळ करून ख्रीस्ताला बोलाविलें असेल.

३७ "पापी बायको." कळवंतीण असेल. तिचा स्वभाव, गुणलक्षण व आचरण हीं सर्वांस माहित होतीं असें दिसतें. ज्यांची क्षमा व्हायाची अशीं तिनें बहुत पापें केलीं होतीं हें उघड आहे. "अलाबास्त्र कुपी" मात्थ. २६:७ याची टीका पाहा.

३८ "पायांचें चुंबन." असें करून या बायकोनें आपल्या पापाचा पश्चात्ताप व ख्रीस्तावरील प्रीति दाखविली. तिची खातरी कशानें झाली होती हें दर्शविलें नाहीं, परंतु ख्रीस्तानें केलेले उपदेश व चमत्कार तिनें ऐकिले व पाहिले असतील, आणि हा प्रसंग पाहून तिनें आसवांनीं त्याचे पाय भिजवून व केंसांनीं पुसून व त्याचें चुंबन घेऊन आणि हें मोलवान सुगंध तेल लावून आपल्या पापांचा पश्चात्ताप व ख्रीस्तावर पक्का विश्वास व मोठी प्रीति दाखविली. पापांची क्षमा व प्रभूची कृपा मिळविण्याकरितां आपलें सर्वस्व

३९ तेव्हां त्याला बोलाविणाऱ्या परोश्यानें पाहून आपल्यामध्यें ह्मटलें
कीं, हा [1] भविष्यवादी असता तर त्याला शिवती ती कोण व कसी बाय-
को आहे, हें त्याला कळलें असतें, कां कीं ती [2] पापी आहे.

४० तेव्हां येशूनें त्याला उत्तर दिल्हें कीं, शिमोना, तुजसीं मला
कांहीं बोलायाचें आहे ; तेव्हां तो ह्मणाला, हे गुरू, बोल.

४१ एका सावकाराचे दोन कर्जदार होते, एकाला शंभर रुपये देणें
होतें. व एकाला दाहा.

४२ परंतु फेडायास त्याजवळ कांहीं नव्हतें [3] ह्मणून त्यानें कृपा करून दो-
घांस सोडिलें. तर त्यांतून कोणता त्याजवर अधिक प्रीति करील, हें सांग.

४३ तेव्हां शिमोनानें उत्तर दिल्हें कीं, ज्याला अधिक सोडिलें तो,
असें मला वाटतें. मग तो त्याला ह्मणाला [4] ठीक ठरविलेंस.

४४ तेव्हां त्यानें त्या बायकोकडे मुरडून शिमोनाला ह्मटलें, या बाई-

(१) यो. ९:२४. (२) लूक. १५:२. (३) गीत. ४९:७,८; रोम. ५:६.
(४) गीत. ११६:१६-१८; १ करिं. १५:९; २ करिं. ५:१४; १ तीम. १:१३-१६.

खर्चून आयुष्यभर त्याची प्रीति व सेवा करावी हें योग्य आहे.

३९,४० "हा भविष्यवादी असता." इ. ख्रीस्तानें तिला दूर घालविलें नाहीं ह्मणून त्या परोश्याला अंदेशा वाटूं लागला. यावरून दिसतें कीं हा निदान खरा भविष्यवादी असावा असें बोलाविते वेळेस त्याला वाटलें. परोशी बोलला नाहीं, तरी त्याची मनांतली कल्पना ख्रीस्ताला कळली. ती बायकोहि कोण व कशी आहे याविषयीं त्या परोश्याला समजलें त्यापेक्षां ख्रीस्ताला फार चांगलें कळलें होतें. ती बायको पापी होती हें ख्रीस्ताला कळलें, असें केवळ नव्हे तर ती खरोखर पश्चात्ताप करून मजवर प्रीति व विश्वास ठेविती हेंहि त्याला कळलें. परोश्याला वाटलें कीं त्यानें तिला दूर करावें. ख्रीस्तानें पाहिलें कीं ती पापें पदरांत घेऊन रडती तर अशा पाप्यांस तारावें ह्मणून मी जगांत आलों, आणि ज्यापेक्षां ती पापांमुळें रडती व विश्वास धरती त्यापेक्षां ती क्षमा व तारण पावण्यास योग्य आहे. तर ती या परोश्यापेक्षां चांगली आहे असें ख्रीस्तानें पाहिलें.

४१,४२ "एका सावकराचे दोन कर्जदार." या दाखल्यांत सावकार ह्मणून ईश्वर, कर्जदार म्हणून पापी माणसें, ज्याला शंभर देणें होतें ती ही पापी बायको आणि ज्याला दाहा रुपये देणें होतें तो हा परोशी असें समजलें पाहिजे. फेडायास एकएकाजवळ कांहीं नव्हतें ह्मणून प्रत्येकाला कृपाकरून सोडावें लागलें. नाहीं तर दोघेहि नाश पावते. मनुष्यांमध्यें किती जरी फरक असेल तरी सर्वांस व एकएकाला पापांची क्षमा देवाच्या कृपेनें असली पाहिजे व मिळाल्याशिवाय नरकवास प्राप्त होईलच.

४३, ४४ "या बाईला पाहतोसना?"

ला पाहतोस ना? मी तुझ्या घरीं आलों तेव्हां त्वां माझ्या पायांसाठीं पाणी दिल्हें नाहीं; परंतु इनें आसवांनीं माझे पाय भिजवून आपल्या डोक्याच्या केंसांनीं पुसले.

४५ त्वां माझें चुंबन घेतलें नाहीं, परंतु मी आंत आल्यापासून ही माझ्या पायांचें चुंबन घेतां राहिली नाहीं.

४६ त्वां माझ्या डोक्याला [१] तेल लाविलें नाहीं. इनें माझ्या पायांत सुगंध तेल लाविलें आहे.

४७ या कारणास्तव मी तुला सांगतों, इचीं बहुत पापें सोडिलीं आहेत कां कीं इनें फार प्रीति केली, परंतु ज्याला थोडकें सोडिलें तो थोडकी प्रीति करितो.

---

(१) गीत. २३:५.

शिमोनानें ठीक उत्तर दिल्हें होतें, परंतु ख्रीस्तानें केलेला प्रश्न आपल्याला लागतो असें मनांत आणिलें नाहीं, म्हणून ख्रीस्त त्याला लागू करितो, असें कीं इनें तुझ्यापेक्षां मला अधिक मान व प्रीति दाखविली आहे. त्वां मला बोलाविल्याप्रमाणें मी तुझ्या घरीं आलों, तरी आतिथ्याच्या रितीप्रमाणें त्वां केलें नाहीं.

४५,४६ "त्वां माझें चुंबन घेतलें नाहीं." प्राचीन काळीं अतिथ्याची रीत. उत्प. १८:४; ३३:४; न्या. १९:४१; निर्ग. १८:७; मात्थ. २६:४९ एथें पाहा. केवढा फरक? शिमोनानें पाय धुण्याला पाणी दिल्हें नव्हतें, व त्याचें चुंबन घेतलें नव्हतें. त्या बाईनें त्याचे पाय आसवांनीं भिजवून केंसांनीं पुसले व त्याच्या पायांचें देखील चुंबन घेतलें. "डोक्याला तेल" तेल लावण्याची रीत रूथ. ३:३; २ शमु. १२, २०; १४:२; गीत. २३:५. यांत पाहा. हें सुगंध तेल अनेक वेगवेगळ्या मसाल्याचें असून फार मोलवान व उंच किमतीचें होतें. शिमोनानें केवळ साधारण तेल ख्रीस्ताच्या डोक्याला देखील लाविलें नव्हतें; या बाईनें हें मोलवान सुगंध तेल त्याच्या पायांसही लाविलें होतें. इनें तर शिमोनापेक्षां बहुत प्रीति दाखविली.

४७ "या कारणास्तव." इनें हें केलें. यामुळें शिमोनाला वाटलें होतें कीं ही पापी असतां ख्रीस्तानें तिला आपणाला शिवूं देऊं नये. ख्रीस्तानें दाखविलें कीं ती पापी असली तरी एवढी मोठी प्रीति केल्यावरून सिद्ध होतें कीं खरोखर पश्चात्ताप करून ती क्षमा पावली आहे. तिनें फार प्रीति केली ह्मणून ख्रीस्तानें तिच्या पापांची क्षमा केली, असें नाहीं, तर तिची क्षमा झाली होती ह्मणून तिनें फार प्रीति केली. फार प्रीति करणें हें क्षमा झालेल्याचें प्रमाण असें आहे. ख्रीस्ताचा अभिप्राय येणेंप्रमाणें होता. या बाईच्या वर्तणुकीवरून उघड होतें कीं, तुला वाटतें तसी ती मोठी पापी नाहीं. पापी होती, होय तिनें बहुत पापें केलीं आहेत खरें, परंतु तिचें आचरण पाहा. ती पापामुळें रडती. खरोखर पश्चात्ताप झाला आहे आणि तिच्या अंतःकरणांत मोठी प्रीति

४८ तेव्हां त्यानें तिला ह्मटलें, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे.
४९ मग संगतीं बसणारे आपल्यांमध्यें ह्मणूं लागले, जो पापांची क्षमा
देखील करितो तो हा [1] कोण?
५० तेव्हां त्यानें त्या बायकोला ह्मटलें, तुझ्या विश्वासानें [2] तुला तारि-
लें आहे, शांतीनें जा.
८ **अध्याय.**—नंतर असें झालें कीं तो गाजवीत व देवाच्या राज्याचें
शुभवर्त्तमान सांगत नगरोनगरीं व गांवोगांवीं फिरूं लागला; तेव्हां बारा
जण त्याबरोबर होते.
२ आणि वाईट आत्मे व दुखणीं यांपासून मुक्त केलेल्या कित्येक [3] बाय-
का, ज्या माग्दालिणी ह्मटलेल्या मारयेमधून [4] सात भुतें निघालीं होतीं ती,

(१) मात्थ. ९:२,३; मार्क. २:७. लूक. ८:४८;१८:४२; एफ. २:८. (२) हब. २:४; मात्थ. ९:२२; मार्क. ५:३४;१०:५२. (३) मात्थ. २७:५५. (४) मार्क. १६:९; लूक. ८:३०.

भरली आहे असें सिद्ध होतें. ज्यां बहुत पापें केलीं आहेत असें मनांत आणून क्षमा पावल्यामुळें ती फार प्रीति करिती. तूं आपलीं पापें हलकीं आहेत असें मोजून थोडकी प्रीति करितोस. शिमोनानें ठीक ठरविलें होतें त्याप्रमाणें बोलून ख्रीस्तानें त्याला हा बोध बरोबर लागू केला. वास्तविक पाहिलें असतां हा नेम चुकत नाहीं. जे आपलीं पापें बरोबर समजून पदरांत घेतात त्यांस पौलसासारिखें आपण पाप्यांमध्यें मुख्य असें वाटेल, आणि देवापासीं क्षमा पावलों आहों असी त्यांची खातरी झाली ह्मणजे त्यांच्या अंतःकरणांत फार प्रीति उत्पन्न होईल व आपलें धन, मन, तन, सर्वस्व प्रभूला अर्पावें व त्याजवर प्रीति करितांना आपला जीव त्याच्या सेवेंत खर्चावा यांत सुखच आहे असें त्यांस वाटेल.

४८ "तुझ्या पापांची क्षमा झाली आहे." तिची क्षमा झाली असें प्रमाण पटलें होतें, परंतु शिमोनाला बोध अधिक लागू करावा व त्या बाईची खातरी पूर्ण करून घ्यावी व विशेषेंकरून आपला ईश्वरी अधिकार सर्वांस दाखवावा, याकरितां ख्रीस्त हे कृपेचे व आनंदाचे शब्द बोलला. ईश्वराशिवाय कोणी पापाची क्षमा करायास समर्थ नाहीं. तर हे शब्द बोलून मी ईश्वर आहें असें ख्रीस्तानें दाखविलें. कोणी ह्मणतात कीं ख्रीस्त हा सर्वांहून चांगला मनुष्य, पण मनुष्यच होता. तर त्यांनीं लक्षांत आणावें कीं मी ईश्वर आहें असा अधिकार व हक्क त्यानें दाखविला, ह्मणून जर वास्तविक देव नाहीं तर ढोंगी, कपटी, आणि वाईट मनुष्य असा ठरेल. परंतु त्यानें खरोखर ईश्वरी अधिकार दाखविला, पापांची क्षमा केली व हजारों क्षमा पावलेल्या पाप्यांच्या मनांत मोठा आनंद व शांति भरविली.

४९,५० "तो हा कोण?" हा प्रश्न ठीक होता. त्यांस ठाऊक होतें कीं पापांची क्षमा करायास समर्थ असा ईश्वराशिवाय कोणी नाहीं. तर ते चकित झाले यावरून आश्चर्य नाहीं. "तुझ्या विश्वासानें." क्षमा पावण्याचें व फार प्रीति करण्याचें मूळ कारण हें तिचा विश्वास असें होतें. मार्क ५:३४ पाहा.

अध्याय ८.

१, २ "राज्याचें." मात्थ. ३:२ यावर

३ व हेरोदाचा कारभारी खुजा याची बायको योहान्ना, व सुसान्ना
व बहुत दुसऱ्या होत्या, त्या आपल्या द्रव्यानें (१) त्याची सेवा करीत असत.
४ तेव्हां मोठा समुदाय मिळत असतां व प्रत्येक नगरचे लोक त्या-
जवळ निघून येत असतां तो दाखला देऊन बोलला.
५ कोणी पेरणारा (२) आपलें बीं पेरायास निघाला; आणि तो पेरीत
असतां कांहीं वाटेवर पडलें, मग तें तुडवून गेलें (३), व आकाशांतील
पांखरांनीं तें खाऊन टाकिलें.
६ आणि कांहीं खडकाळीवर (४) पडलें, आणि तें उगवल्यावर वाळून
गेलें, कारण कीं त्याला ओलावा नव्हता.
७ आणि कांहीं कांट्यांच्या झाडांमध्यें (५) पडलें, आणि कांट्यांच्या
झाडांनीं बरोबर वाढून तें गुदमारिलें.
८ आणि कांहीं चांगल्या भूमीवर पडलें, मग त्यानें उगवून शंभरपट
(६) पीक दिल्हें. असें ह्मटल्यावर तो मोठ्यानें बोलला कीं, ज्याला ऐका-
यास कान आहेत तो ऐको. (७)
९ तेव्हां त्याच्या शिष्यांनीं त्याला विचारिलें कीं, हा दाखला काय असेल?

---

(१) २ करिं. ८:९. (२) मात्थ १३:३; मार्क. ४:३. (३) गीत. ११९:११८; मात्थ. ५:१३.
(४) इर्म. ५:३. (५) इर्म. ४:३. (६) उत्प. २६:१२. (७) नी. २०:१२; इर्म. १३:१५; २५:४.

टीका पाहा. "बारा जण." बारा प्रेषित "माग्दालिणी." हें नांव तिचा जन्मभूमी माग्दाला यावरून पडलें. माग्दाला गालील समुद्राच्या कांठावर कपर्णाहूमाच्या दक्षिणेस होता. "सात भुतें निघालीं." खीस्तानें काढलीं असें समजावें. सात या शब्दावरून अनेक, असें वारंवार दर्शविलें आहे. हीं भुतें निघाल्यावर व ती क्षमा पावल्यावर ही मारयाहि फार प्रीति करीत असे. खीस्त वधस्तंभीं दिल्हा व थडग्यांत ठेविला तेव्हां ती जवळ होती. यो. १९:२५; मार्क. १५:४७. सुगंध द्रव्यें तयार करून थडग्याजवळ आल्या त्यांतली ती एक होती. मार्क. १६:१. खीस्त उठल्यावर थडग्याला प्रथम पोहोंचली ती हीच होती आणि येशूनें तिलाच प्रथम दर्शन दिल्हें. मार्क. १६:९; यो. २०:११, १८.

३ "हेरोदाचा कारभारी." हा हेरोद आंतिपास महान हेरोदाचा पुत्र होता. तो गालीलांत राज्य करीत होता. त्याच्या कारभाऱ्याची बायको खीस्ताला अनुसरून शिष्यीण झाली होती. "द्रव्यानें त्याची सेवा." त्या वेळेस जे खिस्ती झाले त्यांस समजलें कीं जसें अंतःकरण, तसें माल, द्रव्य, सर्वस्वहि खीस्ताला देणें भाग आहे. तसेंच आतांहि जे खीस्तावर विश्वास ठेवून त्याकडून तारण पावण्याची आशा धरितात त्यांनीं सर्वस्व त्याला व त्याच्या सेवेस अर्पण करावें.

४–१५ याचें व्याख्यान मात्थ. १३:१–२३. एथें पाहा.

१० तेव्हां तो बोलला, देवाच्या राज्यांत गुप्त गोष्टी जाणणें हें तुह्मास दिल्हें आहे, परंतु वरकडांस दाखल्यांनीं सांगितल्या आहेत, यासाठीं कीं त्यांनीं पाहत असतां [1] पाहूं नये, व ऐकत असतां समजूं नये.

११ तर [2] दाखला असा आहे; बीं [3] देवाचें वचन आहे.

१२ वाटेवरील हे आहेत कीं, ऐकतात, नंतर सैतान येऊन त्यांच्या अंतःकरणांतून वचन [4] काढून घेतो, त्यांनीं विश्वास धरून तारण पावूं नये ह्मणून.

१३ आणि खडकाळीवरचे हे आहेत कीं, ऐकतात तेव्हां आनंदानें [5] वचन घेतात, परंतु त्यांमध्यें मूळ [6] नाहीं, ते कांहीं वेळापर्यंत विश्वास धरितात, व परीक्षेच्या वेळेस फितून जातात.

१४ आणि कांट्यांच्या झाडांमध्यें पडलेले हे आहेत कीं, ऐकतात, मग संसाराच्या चिंता व धन व विषयसुखें यांमध्यें [7] चालून गुदमरतात, व पूर्ण फळ [8] देत नाहींत.

१५ परंतु चांगल्या भूमींतले हे आहेत कीं, वचन ऐकून [9] भल्या व चांगल्या अंतःकरणांत धरितात, मग धिरानें [10] फळ देत जातात.

१६ आणि [11] कोणी दिवा लावून भांड्यानें तो झांकितो किंवा पलंगाखालीं ठेवितो असें नाहीं, तर आंत येणाऱ्यांस उजेड दिसावा ह्मणून दिवठणीवर ठेवितो.

१७ कां तर प्रगट होणार नाहीं असें [12] कांहीं गुप्त नाहीं, आणि कळणार नाहीं व उघडें होणार नाहीं, असें कांहीं झांकलेलें नाहीं.

१८ यास्तव तुह्मी कसे ऐकतां याविषयीं [13] जपा, कां कीं ज्याजवळ आहे [14] त्याला मिळेल, आणि ज्याजवळ नाहीं त्याचें जें आहे ह्मणून दिसतें, तें देखील त्यापासून काढून घेतलें जाईल.

---

(१) यश. ६:९. (२) मात्थ. १३:८; मार्क. ४:१४. (३) १ पेत्र. १:२३. (४) नी. ४:५; यश. ६५:११; याक. १:२३,२४. (५) गीत. १०६:१२,१३; यश. ५८:२; गल. ३:१,४; ४:१५. (६) नी. १२:३; हो. ६:४. (७) १ तीम. ६:९,१०; २ तीम. ४:१०; १ यो. २:१५-१७. (८) यो. १५:६. (९) इर्म. ३२:३९. (१०) इब्री. १०:३६; याक. १:४. (११) मात्थ. ५:१५; मार्क. ४:२१; लूक. ११:३३. (१२) उप. १२:१४; मात्थ. १०:२६; लूक. १२:२; १ कारिं. ४:५. (१३) याक. १:२१-२५. (१४) मात्थ. १३:१२; २५:२९; लूक. १९:२६.

१६-१८ याचें व्याख्यान मार्क. ४:२१-२५ पाहा.

१९ तेव्हां त्याची आई व भाऊ त्याकडे आले[१] परंतु दाटीमुळें त्याची भेट होईना.

२० मग कोणी त्याला सांगितलें कीं, तुझी आई व तुझे भाऊ बाहेर उभे राहून तुला भेटायास पाहतात.

२१ तेव्हां त्यानें त्यांस उत्तर दिल्हें कीं, जे देवाचें वचन ऐकतात व पाळितात तेच माझी आई व माझे भाऊ आहेत.

२२ आणि असें झालें[२] कीं एका दिवसीं तो आपल्या शिष्यांसुद्धां तारवांत बसून, आपण सरोवराच्या पलीकडे जाऊं, असें त्यांस ह्मणाला, आणि त्यांनीं हाकारिलें.

२३ नंतर ते हाकारून जात असतां तो झोंपीं गेला, मग सरोवरांत वाऱ्याचें मोठें वादळ सुटलें, आणि तारूं भरूं लागलें व ते संकटांत पडले.

२४ तेव्हां ते जवळ येऊन त्याला जागे[३] करून ह्मणाले, प्रभू, प्रभू, आह्मी बुडतों. तेव्हां त्यानें उठून वाऱ्याला व पाण्याच्या लाटांस धमकाविलें, मग तीं राहिलीं व शांति झाली.

२५ नंतर त्यानें त्यांस ह्मटलें, तुमचा विश्वास कोठें आहे? मग ते भयभीत होऊन आश्चर्य पावले, व एकमेकांस ह्मणाले, हा आहे तरी कोण? कां कीं वारे व पाणी यांस देखील आज्ञा करितो व तीं याचें ऐकतात.

२६ मग ते गालीलाच्या समोर जो गादारेकरांचा देश[४] तेथें पोहंचले.

२७ आणि तो जमिनीवर उतरला तेव्हांच तेथल्या नगरांतील कोणी माणूस त्याला भेटला, त्याला बहुत काळ भुतें लागलीं होतीं व तो वस्त्र नेसत नसे व घर सोडून थडयांमध्यें राहत असे.

२८ तेव्हां तो येशूला पाहून ओरडला व त्याच्या पुढें पडून मोठ्यानें बोलला, हे येशू परात्पर देवाच्या पुत्रा, माझा तुझा काय संबंध? मी तुला विनंती करितों कीं, त्वां मला पिडूं नये.[५]

---

(१) मात्थ. १२:४६; मार्क. ३:३२. (२) मात्थ. ८:२३; मार्क. ४:३५. (३) गीत. ४४:२३; यश. ५१:९,१०. (४) मात्थ. ८:२८; मार्क. ५:१. (५) यश. २७:१; याक. २:१९; रोम. २०:१०.

१९–२१ याचें व्याख्यान मात्थ. १२:४६–५० पाहा.

२२–३९ याचें व्याख्यान मात्थ. ८:२३–३४ व मार्क. ५:१–२० पाहा.

२९ त्यानें तर तूं या माणसांतून नीघ, असी त्या अशुद्ध आत्म्याला
आज्ञा केली होती; कां कीं तो त्याला पुष्कळ वेळां धरीत असे, आणि
लोकांनीं त्याला सांखळ्यांनीं व बेड्यांनीं बांधून ठेविलें असतांहि तो तीं
बंधनें तोडी व भूत त्याला रानांत घालवी.

३० मग येशूनें त्याला पुसलें कीं, तुझें नांव काय? तेव्हां त्यानें ह्मटलें,
सैन्य; कां कीं त्यामध्यें पुष्कळ भुतें गेलीं होतीं.

३१ आणि त्यांनीं त्याला विनंती केली कीं, आह्मास डोहांत [1] जा-
याला सांगूं नको.

३२ तेव्हां तेथें डोंगरांत बहुत डुकरांचा कळप चरत होता, आणि
त्यांनीं त्याला विनंती केली कीं, त्यामध्यें आह्मास जाऊं दे. मग त्यानें
त्यांस परवानगी दिल्ही.

३३ तेव्हां भुतें त्या माणसांतून निघून त्या डुकरांत गेलीं, आणि तो
कळप धडक धावत कड्यावरून समुद्रांत पडला व गुदमरून मेला.

३४ मग जें झालें तें पाहून चारणारे पळाले [2] व ते नगरामध्यें व
खेड्यांमध्यें वर्त्तमान सांगूं लागले.

३५ तेव्हां जें झालें तें पाहायास लोक निघाले, आणि येशूकडे आ-
ल्यावर ज्या माणसांतून भुतें निघालीं होतीं तो वस्त्र ल्यालेला व [3] शु-
द्धीवर आलेला व येशूच्या पायांजवळ बसलेला, असा त्यांनीं पाहिला;
तेव्हां ते भ्याले.

३६ मग ज्यांनीं पाहिलें होतें त्यांनींहि तो भूतग्रस्त कसा बरा झाला,
हें त्यांस सांगितलें.

३७ तेव्हां त्या गादरेकरच्या चहुंकडल्या सर्व समुदायानें त्वां [4]
आह्मापासून जावें, असें त्याजवळ मागितलें; कां कीं ते मोठ्या भयानें
व्याप्त झाले, मग तो तारवांत बसून माघारा आला.

३८ आणि ज्या माणसांतून भुतें निघालीं होतीं त्यानें म्या आपल्या
जवळ असावें [5] असी त्याला विनंती केली; परंतु येशूनें त्याला निरोप
देऊन सांगितलें कीं,

---

(१) प्रग. २०:३. (२) प्रेषि. १९:१६,१७. (३) गीत. ५१:१०. (४) प्रेषि. १६:३९.
(५) अनु. १०:२०,२१; गीत. ११६:१२,१६.

३९ आपल्या घरीं माघारा जा [१] व देवानें तुजसाठीं [२] जें जें केलें तें सांग. मग त्यानें निघून आपल्यासाठीं येशूनें जें जें केलें होतें तें सर्व नगरांत गाजविलें.

४० मग असें झालें कीं येशू माघारा आल्यावर समुदाय त्याला खुशीनें भेटला, कां कीं सर्व त्याची वाट पाहत होते.

४१ तेव्हां पाहा [३] याइरस नामें कोणी सभेचा अधिकारी माणूस आला, व त्यानें येशूच्या पायां पडून, माझ्या घरीं यावें, असी त्याला विनंती केली.

४२ कारण कीं त्याला सुमारें बारा वर्षांची एकुलती एक कन्या होती, व ती मरणास टेंकली होती; मग तो जात असतां समुदायांनीं त्याला चेंगरलें.

४३ आणि कोणी बारा वर्षें रक्तस्राव लागलेली जी बायको आपलें सर्वस्व [४] वैद्यांस देऊन कोणाकडूनहि [५] बरी होईना.

४४ ती त्याच्या मागें येऊन त्याच्या वस्त्राच्या कांठाला शिवली, तेव्हांच [६] तिचा रक्तस्राव राहिला.

४५ मग येशू बोलला, मला कोण शिवला? तेव्हां सर्व नाहीं ह्मणत असतां पेत्रस व त्याचे सोबती बोलले, हे प्रभू, समुदाय तुला वेढितात व चेंगरतात, आणि मला कोण शिवला असें ह्मणतोस काय?

४६ तेव्हां येशू बोलला, कोणी तरी मला शिवला, कां कीं माझ्यांतून सत्व [७] निघालें हें मला ठाऊक आहे.

४७ मग ती बायको, मी गुप्त राहिलें नाहीं [८] असें पाहून कांपत आली आणि त्याच्या पुढें पडून [९] कोणत्या कारणाकरितां आपण त्याला शिवली व तेव्हांच कसी बरी झाली, हें तिनें सर्व लोकांच्या देखतां त्याला सांगितलें.

---

(१) १ तीम. ५:८. (२) गीत. १२६:२,३. (३) मात्थ. ९:१८; मार्क. ५:२२. (४) २ काल. १६:१२; यश. ५५:२. (५) ईयो. १३:४. (६) मात्थ. ८:३; २०:३४. लूक. १३:१३. (७) लूक. ६:१९; १ पेत्र. २:९. (८) गीत. ३८:९; हो. ५:३. (९) यश. ६६:२; हो. १३:१; प्रेषि. १६:२९.

४०–५६ याचें व्याख्यान मात्थ. ९:१८–२६ व मार्क. ५:२१–४३ पाहा.

४८ तेव्हां त्यानें तिला ह्मटलें, मुली धीर धर, तुझ्या विश्वासानें तुला तारिलें आहे; शांतीनें जा.

४९ तो बोलत आहे [१] इतक्यांत सभेच्या अधिकाऱ्याच्या [२] एथून कोणी येऊन त्याला सांगितलें कीं, तुझी कन्या मेली; गुरूला श्रम देऊं नको.

५० येशूनें ऐकून त्याला उत्तर दिल्हें कीं, भिऊं नको [३] विश्वास मात्र धर ह्मणजे ती वांचेल.

५१ नंतर घरास आल्यावर त्यानें पेत्रस व याकोब व योहान्न व मुलीचीं आईबापें यांशिवाय कोणाला आंत येऊं दिल्हें नाहीं.

५२ मग सर्व तिच्यासाठीं रडत व बडवून घेत होते, तेव्हां तो बोलला, रडूं नका, ती मेली नाहीं, ती झोंपेंत [४] आहे.

५३ तेव्हां ती मेली आहे असें जाणून [५] ते त्याला हांसले.

५४ मग त्यानें सर्वांस बाहेर घालविल्यावर तिचा हात धरून हाक मारिली कीं, मुली, [६] ऊठ.

५५ तेव्हां तिचा आत्मा फिरून आला व ती लागलीच उठली; मग तिला खायास द्यावें ह्मणून त्यानें आज्ञा केली.

५६ तेव्हां तिचीं आईबापें थक्क झालीं; परंतु जें घडलें तें कोणाला सांगूं नका, असें त्यानें त्यांस सांगितलें. [७]

९ अध्याय.—नंतर [८] त्यानें आपल्या बारा शिष्यांस एकत्र बोलावून त्यांस सर्व भुतें काढण्याचें व रोग बरे करण्याचें सामर्थ्य व अधिकार दिल्हा.

२ मग त्यानें त्यांस देवाचें राज्य गाजवायास व रोग्यांस बरें करायास पाठविलें.

३ आणि त्यांस सांगितलें कीं, वाटेसाठीं [९] कांहीं घेऊं नका, काठ्या किंवा भाकर किंवा रुपेंहि घेऊं नका, व एकएकाला दोन दोन अंगरखे नसावे.

---

(१) मात्थ. ९:२३. मार्क. ५:३५. (२) लूक. ८:४२,४३. (३) यो. ११:२५; रोम. ४:१७. (४) यो. ११:११,१३. (५) गीत. २२:७; लूक. १६:१४. (६) लूक. ७:१४; यो. ११:४३. (७) मात्थ. ८:४; ९:३०; मार्क. ५:४३. (८) मात्थ. १०:१; मार्क. ३:१३; ६:७. (९) लूक. १०:४; २२:२२.

अध्याय ९.

१–६ याविषयीं मात्थ. १०:१, इ. पाहा.

४ आणि ज्या ज्या घरांत तुह्मी जाल, तेथेंच राहा व तेथूनच निघा.

५ आणि जे कोणी तुह्माला अंगीकारीत नाहींत त्याविषयीं साक्ष पटावी ह्मणून तुह्मी त्या नगरांतून निघते वेळेस आपल्या पायांची धूळ [१] झाडून टाका.

६ तेव्हां ते निघून सर्व ठिकाणीं शुभवर्त्तमान सांगत व लोकांस बरें करीत गांवोगांवीं फिरूं लागले.

७ आणि त्याकडून घडलेल्या सर्व कामांविषयीं ऐकून हेरोद [२] राजाला पंचाईत पडली, कारण कीं योहान्न मेलेल्यांमधून उठला आहे असें कित्येकांनीं ह्मटलें;

८ आणि कित्येकांनीं असें कीं, एलीया दिसून आला, आणि दुसऱ्यांनीं असें कीं, पुरातन भविष्यवाद्यांतील एक उठला आहे.

९ तेव्हां हेरोद बोलला, योहान्नाचें शीर म्या तोडिलें, पण ज्याच्या अस्या गोष्टी मी ऐकतों तो हा कोण असेल? आणि त्याला पाहावें [३] असें त्यास वाटलें.

१० नंतर प्रेषितांनीं माघारें येऊन आपण जें केलें तें त्याला सांगितलें. मग तो त्यांस घेऊन बेथसाइदा नामें नगराकडल्या रानांतील जागेंत एकीकडे गेला.

११ परंतु समुदाय हें समजून [४] त्याच्या मागें चालले, तेव्हां त्यानें त्यांस खुशीनें भेटून [५] देवाच्या राज्याविषयीं त्यांस उपदेश केला, [६] व ज्यांस बरें होण्याची गरज होती त्यांस बरें केलें. [७]

१२ नंतर [८] दिवस उतरूं लागला तेव्हां बारा जण जवळ येऊन त्याला ह्मणाले, समुदायाला निरोप दे, ह्मणजे ते चहुंकडल्या गांवांत व खेड्यांत

---

(१) नहे. ५:१३; प्रेषि. १३:५१;१८:६. (२) मात्थ. १४:१; मार्क. ६:१४. (३) लूक. २३:८. (४) रोम. १०:११,१७. (५) यो. ६:३७. (६) प्रेषि. २८:३१. (७) लूक. १:५३;५:३१; इब्री. ४:१६. (८) मात्थ. १४:१५; मार्क. ६:३५; यो. ६:५.

७–९ याविषयीं मात्थ. १४:१,२ व मार्क. ६:१४–१६ पाहा.

१०–१७ याविषयीं मात्थ. १४:१३–२१, व मार्क. ६:३०–४४ पाहा.

१० "बेथसाइदा." हें शहर तिबेरयस समुद्राजवळ यार्देन नदीच्या पूर्व कांठावर वसलें होतें. त्या नगराजवळ मोठमोठीं रानें असत.

जाऊन उतरतील व खायाला मिळवितील, कां कीं एथें [1] रानांतल्या
जागेंत आहों.

१३ परंतु तो त्यांस ह्मणाला, तुह्मीच त्यांस खायाला द्या. तेव्हां ते
बोलले, पांच भाकरी व दोन मासे यांहून अधिक आह्माजवळ नाहीं, तर
आम्ही जाऊन या सर्व लोकांसाठीं अन्न विकत घेऊं काय?

१४ तेथें तर सुमारें पांच हजार पुरुष होते. तेव्हां त्यानें आपल्या
शिष्यांस सांगितलें कीं, पन्नास पन्नासांच्या पंक्ति करून त्यांस बसवा. [2]

१५ मग त्यांनीं त्याप्रमाणें करून सर्वांस बसविलें.

१६ तेव्हां त्यानें त्या पांच भाकरी व ते दोन मासे घेऊन वर आका-
शाकडे पाहून त्याविषयीं आशिर्वाद मागितला. मग तीं मोडून समुदा-
याला वाढण्याकरितां शिष्यांजवळ दिल्हीं.

१७ तेव्हां सर्व जेवून [3] तृप्त झाले; नंतर जेवणाऱ्यांच्या उरलेल्या
तुकड्यांनीं बारा टोपल्या भरून त्यांनीं उचलून नेल्या.

१८ आणि असें झालें [4] कीं तो एकीकडे प्रार्थना करीत असतां शिष्य
त्याच्या जवळ जमले; तेव्हां त्यानें त्यांस विचारिलें कीं, समुदाय मला
कोण ह्मणून ह्मणतात?

१९ तेव्हां त्यांनीं उत्तर दिल्हें कीं, बाप्तिस्मा करणारा योहान्न, [5]
व कित्येक पुरातन भविष्यवाद्यांतील कोणीएक उठला आहे, असें ह्मणतात.

२० मग त्यानें त्यांस ह्मटलें, तुह्मी तर मला कोण ह्मणून ह्मणतां?
तेव्हां पेत्रसानें [6] उत्तर दिल्हें कीं, तूं देवाचा ख्रीस्त आहेस.

२१ मग हें कोणाला सांगूं नका असें त्यानें त्यांस निक्षूण सांगितलें.

२२ व ह्मटलें कीं, मनुष्याच्या [7] पुत्रानें फार दुःखें सोसावीं, आणि

---

(१) गीत. ७८:१९,२०; यहेज्क. ३४:२५; हो. १३:५. (२) १ करिं. १४:४०. (३) गीत. १०७:९. (४) मात्थ. १६:१३; मार्क. ८:२७. (५) मात्थ. १४:२; लूक. ९:७,८. (६) यो. ६:६९. (७) मात्थ. १६:२१:१७:२२.

---

१२ "दिवस उतरूं लागला." रात्र जवळ आली.

१८–२६ यावर मात्थ. १६:१३–२७; मार्क. ८:२७–३८ पाहा.

२० "देवाचा ख्रीस्त." देवानें नेमिलेला व अभिषेक केलेला जो जगांत यायाचा होता तोच म्हणजे मशीहा. मात्थ. १:१ यावर पाहा.

वडील व मुख्य याजक व शास्त्री यांनीं त्याला अव्हेरावें, व त्याला जिवें
मारावें, व त्यानें तिसऱ्या दिवसीं पुन्हां उठावें, याचें अगत्य आहे.

२३ तेव्हां त्यानें सर्वांस ह्मटलें, जर कोणी माझ्या मागें [1] यायास
इच्छितो तर त्यानें आपणाला नाकारावें व प्रति दिवसीं आपला खांब
उचलून घेऊन माझ्या मागें यावें.

२४ कारण कीं जो कोणी आपला जीव राखायास इच्छितो तो त्याला मुके-
ल, परंतु जो कोणी मजकरितां आपल्या जिवाला मुकेल तो त्याला राखील.

२५ कारण कीं माणूस सगळें जग मिळवून आपला नाश किंवा आ-
पल्या जिवाची हानि पावला तर त्याला काय लाभ होईल?

२६ कां कीं जो कोणी मजविषयीं व माझ्या वचनाविषयीं लाजेल
[2] त्याविषयीं मनुष्याचा पुत्र आपल्या व बापाच्या व पवित्र दुतांच्या
गौरवानें जेव्हां येईल तेव्हां लाजेल.

२७ आणि [3] मी तुह्मास खचीत सांगतों कीं, एथें उभे राहणाऱ्यां-
तील कोणी असे आहेत कीं, ते देवाचें राज्य पाहतील तोंपर्यंत त्यांस
मरणाचा [4] अनुभव होणारच नाहीं.

२८ आणि असें झालें [5] कीं या गोष्टीनंतर सुमारें आठ दिवसांनीं
पेत्रस व योहान्न व याकोब यांस घेऊन तो प्रार्थना करायास डोंगरावर गेला.

२९ तेव्हां तो प्रार्थना करीत असतां त्याच्या तोंडाचें रूप पालटलें व
त्याचें वस्त्र पांढरें लखलखीत झालें.

३० आणि पाहा, दोन माणसें त्यासीं संभाषण करीत होतीं, तीं मोशे
व एलीया होतीं.

३१ तीं तेजस्वी दिसलीं, आणि त्याची जी गति तो यरूशलेमांत पूर्ण
करणार होता तिजविषयीं बोलत होतीं.

---

(१) मात्थ. १०:३८; १६:२४; मार्क. ८:३४; लूक. १४:२७; रोम. ८:१३; कल. ३;५.
(२) मात्थ. १०:३३; मार्क. ८:३८; २ तीम. २:१२. (३) मात्थ. १६:२८; मार्क. ९:१.
(४) यो. ८:५९; इब्री. २:९. (५) मात्थ. १७:१; मार्क. ९:२.

---

२७ यावर मात्थ. १६:२८ पाहा.

२८–३६ याविषयीं मात्थ. १७:१–१३; व मार्क. ९:२–१३ पाहा.

३१ "त्याची जी गति." ह्मणजे मरण –मरणास गति, जाणें, असें म्हणावें. जे देवाचे खरे भक्त त्या सर्वांची गति मरनें

३२ तेव्हां पेत्रस व त्याचे सोबती झोपेनें [१] जड झाले होते, परंतु
जागे होऊन त्यांनीं त्याचें तेज [२] व तीं दोन माणसें त्याच्या संगतीं उभीं
राहिलेलीं पाहिलीं.

३३ मग असें झालें कीं तीं त्यापासून जात असतां पेत्रसानें आपण
काय ह्मणतों हें न जाणून [३] येशूला ह्मटलें, हे प्रभू, आपण एथें असावें
[४] हें बरें आहे, तर तीन मंडप करूं, तुझ्यासाठीं एक व मोश्यासाठीं
एक व एलीयासाठीं एक.

३४ तो असें बोलत असतां ढगानें येऊन त्याजवर सावली केली, मग
ते ढगांत जात असतां हे भ्याले.

३५ आणि त्या ढगांतून असी वाणी झाली कीं, [५] हा माझा प्रिय पुत्र
आहे, त्याचें [६] तुह्मी ऐका.

३६ आणि ही वाणी झाल्यावर येशू मात्र दिसला; नंतर ते उगेच
राहिले, व ज्या गोष्टी त्यांनीं पाहिल्या होत्या त्यांतील कांहींच त्या दिवसां-
मध्यें [७] कोणाला सांगितलें नाहीं.

३७ आणि असें झालें [८] कीं त्याच्या दुसऱ्या दिवसीं ते डोंगरावरून
खालीं आल्यावर मोठा समुदाय त्याला भेटला.

३८ तेव्हां पाहा, समुदायांतील माणूस मोठ्यानें ओरडून बोलला,
हे गुरू, मी तुला विनंती करितों, माझ्या पुत्राकडे पाहा, कां कीं तो
माझा एकुलता [९] आहे.

३९ आणि पाहा, आत्मा त्याला धरितो, मग एकाएकीं ओरडतो, आणि

(१) दान. ८:१८;१०:९. (२) यो. १:१४. (३) गीत. २७:४;७३:२८. (४) मार्क. १०:३८ (५) मात्थ. ३:१७; २ पेत्र. १:१७,१८. (६) अनु. १८:१५; प्रेषि. ३:२२. (७) उप. ३:७. (८) मात्थ. १७:१४; मार्क. ९:१७. (९) जख. १२:१०.

वेळेस या दुःखावस्थेंतून सौख्य लोकांत होईल. प्रेषि. १४:२६ पाहा.

३२ "झोपेनें जड." अशा प्रसंगीं शिष्यांस झोंप कसी आली? असा विच्यार केला तर लक्षांत आणिलें पाहिजे कीं ते दमून आले असतील व रात्र पडली होती. शिवाय खीस्त रूपांतर पावते वेळेस ते झोंपीं गेले असें दिसत नाहीं, तर तो प्रार्थना करीत होता अथवा कदाचित् प्रार्थना केल्यावर त्यांस झोंप लागली. मग त्याजकडून जागे होऊन त्यांनीं त्याचें पालटलेलें रूप व तेजस्वी वस्त्रें व तीं दोन माणसें हीं सर्व पाहिलीं.

३६ "येशू मात्र दिसला." मोशे व एलिया गेले होते.

३७–४३ याविषयीं मात्थ. १७:१४–२१; मार्क. ९:१४–२९ पाहा.

फेंस आणवून त्याला पिळतो व त्याला ठेंचूनहि त्याला लवकर सोडीत नाहीं.

४० तर तुझ्या शिष्यांनीं तो काढावा ह्मणून म्या त्यांच्या जवळ विनंती
केली, परंतु [१] त्यांच्यानें काढवेना.

४१ तेव्हां येशूनें उत्तर दिल्हें कीं, अहा! अविश्वासी [२] व विपरीत
[३] पिढी, मी कोठवर तुह्माबरोबर राहूं व तुमचें सोसूं! तूं आपल्या पुत्रा-
ला इकडे आण.

४२ नंतर तो त्याजवळ येत आहे इतक्यांत भुतानें त्याला आपटलें व
पिळून टाकिलें; तेव्हां येशूनें त्या अशुद्ध आत्म्याला धमकाविलें [४], व
मुलाला बरें करून त्याच्या बापाजवळ परत दिल्हें.

४३ मग देवाच्या महत्वावरून सर्व [५] थक्क झाले; आणि येशूनें जीं
कामें केलीं त्या अवघ्यांवरून सर्व आश्चर्य करीत असतां तो आपल्या
शिष्यांस ह्मणाला,

४४ या गोष्टी आपल्या लक्षांत ठेवा, कारण कीं [६] मनुष्याचा पुत्र
माणसांच्या [७] हातीं पडणार आहे.

४५ परंतु [८] ही गोष्ट ते समजले नाहींत, व त्यांस समजूं नये ह्मणून त्यांज-
पासून ती झांकली होती, आणि या गोष्टीविषयीं त्याला विचारायास ते भ्याले.

४६ नंतर [९] आपणामध्यें कोण मोठा आहे याविषयीं त्यांच्या मध्यें
वादविवाद उत्पन्न झाला.

४७ तेव्हां येशूनें त्यांच्या अंतःकरणांतील विचार जाणून एक बाळक
घेऊन त्याला आपल्या जवळ उभें केलें.

---

(१) प्रेषि. १९:१३-१६. (२) यो. २०;२७; इब्री. ४:२. (३) अनु. ३२:५; गीत. ७८:८. (४) मार्क. १:२७. (५) गीत. १३९:१४; जख. ८:२. (६) मात्थ. १७:२२. (७) २ शमु. २४:१४. (८) मार्क. ९:३२; लूक. २:५०;१८:३४. (९) मात्थ. १८:१; मार्क. ९:३४.

---

४४ "या गोष्टी." म्यां केलेले उपदेश व चमत्कार ध्यानांत ठेवा, कारण कीं मी तुह्मांजवळ सर्वकाळ राहणार नाहीं. लोक मला धरून मारतील.

४५ "झांकली होती." त्यांच्या अविश्वासानें झांकली होती. त्यांस वाटलें कीं आमचा मशीहा राजगादीवर बसून आमचे सर्व शत्रू मारील व आमचें राष्ट्र मोठें करील आणि असें समजून हा वधस्तंभीं जाईल व मरण पावेल हें खरें वाटेना. खोटीं मतें बाळगल्यानें जें खरें तें समजेना. तसें सांप्रतकाळीं, खोटीं मतें बाळगून बहुतेक ख्रिस्ती शास्त्र बरोबर समजत नाहींत.

४६-५० यावर मात्थ. १८:१-५, मार्क. ९:३३-३८ पाहा.

४८ व त्यांस ह्मटलें, [1] जो कोणी माझ्या नांवानें या बाळकाला अंगीकारील तो मला अंगीकारील, आणि जो कोणी मला अंगीकारील तो माझ्या पाठविणाऱ्याला अंगीकारील; कां तुह्मां सर्वांमध्यें जो [2] लहान आहे तोच मोठा होईल.

४९ योहान्नानें उत्तर दिल्हें कीं, हे प्रभू, आह्मी कोणीएकाला तुझ्या नांवानें भुतें काढतांना [3] पाहिलें, तेव्हां आह्मी त्याला मना केलें, कां कीं तो आह्मासंगतीं तुझ्या मागें चालत नाहीं.

५० तेव्हां येशूनें त्याला ह्मटलें, मना करूं नका, कारण कीं [4] जो आह्माला प्रतिकूल नाहीं तो आह्माला अनुकूल आहे.

५१ आणि असें कीं त्याचा वर जाण्याचा समय [5] जवळ आल्यावर त्यानें यरूशलेमास निश्चयें जावें ह्मणून तिकडे तोंड केलें.

५२ मग त्यानें आपल्यापुढें दूत पाठविले, तेव्हां ते निघून त्याच्या साठीं तयार करायास [6] शोमरोनी यांच्या कोणीएका गांवांत गेले.

५३ परंतु त्यांनीं त्याला अंगीकारिलें नाहीं, कां कीं तो चालत असतां त्याचें तोंड यरूशलेमाकडे होतें.

---

(१) मात्थ. १०:४०; यो. १२:४४;१३:२०. (२) मात्थ. २३:११,१२; लूक. १४:११. (३) गण. ११:२७-२९. (४) मात्थ. १२:३०; लूक. १६:१३. (५) मार्क. १६:१९; प्रेषि. १:२. (६) यो. ४:४.

---

५१ "वर जाण्याचा." आकाश लोकांत परत जाण्याचा. प्रेषि. १:११, २२; मार्क. १६:१९;१ तीम. ३:१६. या जगांत राहण्याची वेळ शेवटास आली होती, आणि यरूशालेमास जाऊन मरावें असा त्यानें निश्चय केला. यावरून दिसतें कीं येशूनें स्वखुशीनें आपला जीव दिल्हा. तो गालीलांत राहिला असता तर निर्भय असता, तरी स्वखुशीनें आपल्या शत्रूंमध्यें जाऊन जीव द्यावा असा निश्चय त्यानें केला.

५२ "दूत पाठविले." दूत, या शब्दावरून दिव्य दूत असें फारकरून समजायाचें आहे. परंतु या ठिकाणीं याचा अर्थ जासूद असा दिसतो. "तयार करायास." यावरून दिसतें कीं ज्याची गरज लागणार तें पुढें पाहून सिद्ध करावें हें अनुचित असें नाहीं. "शोमरोनी" मात्थ. १०:५; यो. ४:९.

५३ "त्यांनीं त्याला अंगीकारिलें नाहीं." कांहीं आतिथ्य दाखविलें नाहीं. कारण हा यरूशालेमाकडे चालतो असें त्यांनीं पाहिलें. देऊळ कोठें असावें याविषयीं ते वाद व भांडण करीत असत. यरूशालेमांत असावें असें यहुदी ह्मणत. गिरजिम डोंगरावर असावें असें शोमरोनी ह्मणून तेथें एक देऊळ त्यांनीं बांधिलें होतें. येशूनें त्यांच्या मताप्रमाणें ठरविलें असतें तर त्यांनीं त्याला अंगीकारिलें असतें; परंतु तो यरूशालेमा-

५४ तेव्हां हें पाहून त्याचे शिष्य याकोब व योहान्न बोलले, हे प्रभू,
एलीयानें केल्याप्रमाणें (१) आकाशांतून अग्नीनें पडून त्यांचा नाश करावा
ह्मणून आह्मीहि आज्ञा करावी, अशी तुझी इच्छा आहे काय?

परंतु त्यानें मुरडून त्यांस असें धमकाविलें कीं, तुह्मी कोणत्या आत्म्याचे आहां हें तुह्मास ठाऊक नाहीं.

५६ कां कीं (२) मनुष्याचा पुत्र माणसांच्या प्राणांचा नाश करायास
आला नाहीं, तर तारायास आला. मग ते दुसऱ्या गांवास गेले.

५७ आणि असें झालें (३) कीं ते वाटेनें चालत असतां कोणीएकानें
त्याला ह्मटलें, हे प्रभू, जेथें तूं जासील तेथें मी तुझ्या मागें येईन.

(१) २ राज. १:१०,१२. (२) यो. ३:१७,१२.४७. (३) मात्थ. ८:१९.

कडे जातो, तें भजन करण्याचें मुख्य स्थान आहे असें ठरवितो, हें पाहून त्यांनीं त्याला नाकारिलें. तसें आतांहि उपदेशकांनीं आमचीं मतें अनुसरावीं ह्मणून लोकांची मर्जी आहे. त्याच्या स्वार्थ बुद्धीला पसंत नाहीं असें विश्वासप्रकरण त्यांच्या ऐकण्यांत आलें तर ते फारकरून धिक्कारतात. कोणी कोणी शोमरोन्यांसारिखे स्वमताभिमानी असून ख्रीस्ताकडून सिद्ध झालेला तारणोपाय अव्हेरून आपला नाश करून घेतात.

५४ "याकोब व योहान्न." हे शुभवर्त्तमान गाजविण्यांत यशस्वी व आवेशी असल्यावरून बवानर्गेस ह्मणजे गर्जनेचे पुत्र असें ह्मटलें होतें. मार्क. ३:१७. एलियानें केलें तें २ राज. १:१०–१२ एथें पाहा. सूड उगविणें हें ईश्वराचें काम आहे असें त्यांनीं ध्यानांत ठेविलें नव्हतें. ख्रीस्ताकरितां व एलियाचें उदाहरण पाहून ही आज्ञा करावी असें जरी उचित वाटलें तरी योग्य नव्हतें ह्मणून ख्रीस्तानें त्यांस निषेधिलें.

५५ "कोणत्या आत्म्याचे आहां." तुमची कसी बुद्धि आहे हें तुह्मास समजत नाहीं. मजवर प्रीति करून हें करायास पाहतां असें तुमच्या मनांत आहे, परंतु वास्तविक पाहिलें, शोमरोन्याचा द्वेष करून सूड उगवण्याची इच्छा आहे. या गोष्टीवरून समजावें कीं, (१) ईश्वराच्या कांहीं एक सेवेविषयीं फार आवेश दाखवितात, त्यांचा आवेश केवळ कितीएक माणसांचा द्वेष करणें असा आहे. (२) ईश्वराला मान द्यावा अथवा ख्रिस्ती धर्म स्वीकारावा असी इच्छा असली तर आपल्या अंतःकरणांत कांहीं अयोग्य हेतु व भावना असतील यांविषयीं जपावें. (३) आपण ख्रीस्तासारिखें शत्रूंवर प्रीति करून त्यांचें हित पाहावें.

५६ "कांकीं मनुष्याचा पुत्र." इ. नाश करायास आला, तर या शोमरोन्यांचा नाश त्यानें केला असला खरा; परंतु नाश नव्हे तर पाप्यांस तारायास तो आला. तो अति दयाळू व क्षमाशील होता, आणि जे त्याचे शिष्य होतात त्यांनीं त्यासारिखें असावें.

५७–६० यावर मात्थ. ८:१९—२२ एथें पाहा.

५८ तेव्हां येशू त्याला ह्मणाला, कोकडांस बिळें व आकाशांतल्या पांख-
रांस कोटीं आहेत, परंतु मनुष्याच्या पुत्राला डोकें टेंकण्यासहि ठिकाण नाहीं.
५९ मग त्यानें दुसऱ्याला सांगितलें, माझ्या मागें ये. परंतु तो
बोलला, हे प्रभू, पहिल्यानें माझ्या बापाला पुरायास मला जाऊं दे.[1]
६० तेव्हां येशूनें त्याला ह्मटलें, मेलेल्यांस आपल्या मेलेल्यांस पुरूं दे,
परंतु तूं जाऊन देवाच्या राज्याचें वर्तमान सांग.
६१ तेव्हां अणखी एक ह्मणाला, हे प्रभू, मी तुझ्या मागें येईन,
परंतु पहिल्यानें माझ्या घरांत जे आहेत त्यांचा निरोप मला घेऊं दे.
६२ तेव्हां येशूनें त्याला ह्मटलें, जो कोणी नांगराला आपला हात
घालून मागें पाहतो तो देवाच्या राज्याविषयीं उपयोगीं नाहीं.

---

(१) १ राज. १९:२०.

---

६१ "त्याचा निरोप मला घेऊं दे." घरीं जाऊन बंदोबस्त करितों मग कुटुंबांतल्या माणसांस सलाम करून येतों. ख्रीस्तानें त्याला परवानगी दिल्ही नाहीं, याचीं दोन कारणें दिसतात.

(१) ख्रीस्ताला अंगीकारून आपल्या जिवात्म्याचें तारण साधून घ्यावें हें इतर सर्व गोष्टीपेक्षां भारी व अगत्याचें आहे ह्मणून किंचित् उशीर लावूं नये. प्रथम देवाचें राज्य व त्याचें नीतिमत्त्व यांचा शोध केला पाहिजे.

(२) घरीं जाऊन कुटुंबांतल्या माणसांसीं संभाषण करूं लागला ह्मणजे तीं आडवीं येतील व अडथळा करतील आणि याचें मन बदलून हा येणार नाहीं असें ख्रीस्तानें पाहिलें असेल. याप्रमाणेंच अनुभवास आलें आहे. असे या देशांत हजारों असतील. मन लागलें तेव्हां त्यांस वाटतें कीं बंदोबस्त करून घरच्या माणसांस समजावून खिस्ताला अंगीकारूं. परंतु घरीं जाऊन मनांतला बेत कळविला ह्मणजे तीं सर्व अडथळे करूं लागतात. ह्मणून ख्रीस्ती व्हावें असा ज्याचा बेत झाला होता ते खोळंबा करितात मग जीवात्म्याविषयीं काळजी कमी होत जाती, आणि उत्तरोत्तर निष्काळजी होऊन ते शेवटीं अपश्चात्तापी असून मरून नरकांत पडतात. हा मार्ग खरा आहे असी मनाची खातरी झाली म्हणजे तेव्हांच, किंचित् उशीर न लाविता धैर्य व पक्का निश्चय धरून ख्रीस्ताला माणसांसमोर अंगीकारून आपलें तारण खचीत करून घ्यावें, हाच मात्र खरा उपाय आहे.

६२ "नांगराला आपला हात घालून." ही ह्मण आहे. इचा अर्थ अमुक काम सुरू करणें असा आहे. काम सुरू केल्यावर जो मागें हटतो तो चंचळ बुद्धि दाखवितो व त्या कामांत यश पावणार नाहीं. तसेंच खिस्ती होण्याविषयीं, चंचळ बुद्धि चालत नाहीं. जो मंडळीस मिळतो, मग मंडळीच्या नेमानें चालत नाहीं त्याचें तारण होईल असें समजायाचें नाहीं. जो बाप्तिस्मा घेतल्यावर लोटाच्या बायकोसारिखें मागें पाहतो त्याचा नाश मात्र होईल. सौख्य लोकांत पोहंचावें असी ज्याची इच्छा आहे त्यानें आदीं पक्का निश्चय करावा. मग

१० अध्याय.—त्यानंतर [१] प्रभूनें अणखी सत्तर जण नेमून, ज्या ज्या नगरांत व ठिकाणीं आपण जाणार होता तेथें त्यांस दोघा दोघांस आपल्या पुढें पाठविलें.

२ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, [२] पीक फार आहे खरें, परंतु कामकरी थोडके [३] आहेत. यास्तव पिकाच्या धन्यानें आपल्या पिकांत कामकरी पाठवावे ह्मणून त्याची प्रार्थना करा.

३ जा; पाहा, लांडग्यांमध्यें जसें कोंकरांस तसें तुह्मास मी पाठवितों.

४ पिशवी किंवा झोळणा किंवा वाहाणा [४] घेऊं नका, व वाटेनें कोणाला [५] मुजरा करूं नका.

---

(१) मात्थ. १०:१; मार्क. ६:७. (२) मात्थ. ९:३७, यो. ४:३५. (३) १ करिं. ३:९, १ तीम. ५:१७. (४) लूक. ९:३. (५) उत्प. २४:३३,५६, २ राज. ४:२९, नी. ४:२५.

धैर्य धरून ख्रिस्ताला माणसांसमोर अंगीकारून नेट लावून पुढें चालत जावें. जग, ऐहिक लाभ, व विलाससुख हीं सोडलीं पाहिजेत, आणि देवावर संपूर्ण अंतःकरणानें, जिवानें व बुद्धीनें, प्रीति करून त्याच्या सेवेंत शेवटपर्यंत टिकून राहिलें पाहिजे. तारण पावण्याकरितां जो आपलें सर्वस्व सोडून द्यायास मान्य नाहीं तो आत्म्याचें मोल व आकाशलोकांतल्या सुखाचें मोल समजत नाहीं.

अध्याय १०.

१ "अणखी सत्तर जण." बारा प्रेषितांशिवाय. या सत्तर जणांचें काम वेगळें होतें. बारा प्रेषितांनीं जवळ राहावें, त्याचा उपदेश ऐकावा व चमत्कार पाहावे आणि त्याचीं दुःखें, मरण, मेलेल्यांतून उठणें व आकाशांत चढणें यांविषयीं साक्षी व्हावें आणि ह्या गोष्टी त्यांनीं जाऊन लोकांस गाजवाव्या, याकरितां ख्रीस्तानें त्यांस नेमिलें. या सत्तरांनीं गांवोगांवीं जाऊन ख्रीस्ताच्या येण्याबद्दल लोकांस उपदेश करून सिद्ध करावें यांसाठीं ते नेमिले होते. सत्तर ही संख्या यहुद्यांमध्यें फार रूढींत असे. मिसरांत आलेले याकोबाच्या कुटुंबांतले सत्तर होते. उत्प. ४६:२७. जे वडील मोशानें आपल्या साह्यार्थ नेमिले ते सत्तर होते. गण. ११:१६, २५. राष्ट्रांची सान्हीद्रिम नामक मोठी सभा इतले सत्तर जण असत. मोशाचा कित्ता लक्षून ख्रीस्तानें ती संख्या धरली असेल, तरी यास प्रमाण नाहीं. त्या सत्तरांचें काम केवळ त्या काळचें होतें असें दिसतें.

"दोघां दोघांस." त्यांनीं एकमेकांचें साह्य करावें ह्मणून असें पाठविलें असेल. त्या वेळेस सर्कार देखील प्रतिकूळ होतें आणि बहुत पाठलाग व जांचणूक भोगायाची होती, याकरितां दोघांदोघांनीं जावें याचें विशेष अगत्य होतें, आणि आतांहि बरें आहे.

२ यावर मात्थ. ९:३६, ३७. पाहा.

३ ,, ,, १०:१६.

४ ,, ,, १०:१०.

"मुजरा करूं नका." उशीर लावूं नये काम निकडीचें आहे. त्वरेनें करून आटोपा. २ राज. ४:२९ पाहा.

५ आणि कोणत्याहि घरांत जाल तेथें पहिल्यानें ह्मणा, या घरास
शांति असो.

६ आणि शांतीचा [१] पुत्र तेथें असला तर तुमचा आशीर्वाद त्यावर
राहील [२], नसला तर तुह्माकडे परत येईल.

७ आणि एकाच घरांत राहून ते देतील तें खात पीत जा, कां कीं
कामकरी आपल्या मजुरीला [३] योग्य आहे; घरोघर [४] फिरूं नका.

८ आणि तुह्मी एखाद्या नगरांत गेलां असतां त्यांनीं तुह्मास अंगीका-
रिलें, तर तुह्मास वाढतील [५] तें खा;

९ आणि त्यांतल्या दुखणाइतांस बरें करा, व त्यांस सांगा कीं, देवाचें
राज्य [६] तुह्माकडे आलें आहे.

१० परंतु तुह्मी एखाद्या नगरांत गेलां असतां त्यांनीं तुह्मास अंगीका-
रिलें नाहीं तर त्याच्या मार्गांत बाहेर जाऊन असें बोला कीं,

११ तुमच्या नगराची [७] धूळ आह्मास लागली ती देखील तुमची तुह्मास
झाडून टाकितों, तथापि हें जाणा कीं, देवाचें राज्य तुह्माकडे आलें आहे.

१२ आणि मी तुह्मास सांगतों कीं त्या नगरापेक्षां सदोमाला त्या
दिवसीं सोपें पडेल.

१३ हे खोराजीना, [८] तुला हायहाय, हे बेथसाइदा, तुला हायहाय;
कां कीं तुह्मामध्यें [९] जे चमत्कार घडले ते सोर व सीदोन यांत घडले
असते तर त्यांनीं मागेंच तरट व राख यांत बसून पश्चात्ताप केला असता.

१४ अणखी न्यायकालीं तुमच्या पेक्षां सोर व सीदोन यांस सोपें पडेल.

१५ आणि हे कपरणाहूमा, जें [१०] आकाशापर्यंत उंचावलेलें तें तूं
मृतलोकापर्यंत [११] खालीं टाकिलें जासील.

---

(१) यश. ९:६,२ थेस. ३:१६. (२) याक. ३:१८. (३) १ करिं. ९:४-१४; १ तीम. ५:१८. (४) १ तीम. ५:१३. (५) १ करीं. १०:२७. (६) मात्थ. ३:२. (७) लूक. ९:५. (८) मात्थ. ११:२१. (९) यहेज्क. ३:६. (१०) यश. १४:१३-१५; इर्म. ५१:५३; आम. ९:२,३. (११) यहेज्क. २६:२०;३१:१८.

---

५ यावर मात्थ. १०:१३ पाहा.

६ "शांतीचा पुत्र" शांतीचा स्वभाव, शांतीचा आत्मा. त्या घराचें कुटुंब तुह्मांस अंगीकारील तर त्यावर आशीर्वाद राहील.

७ यावर मात्थ. १०:११ पाहा.

८-१२ ,, ,, १०:१४, १५ पाहा.

१३-१५ ,, ,, ११:२१-२४ पाहा.

१६ जो [१] तुमचें ऐकतो तो माझें ऐकतो, आणि जो [२] तुह्मास अव्हेरितो तो मला अव्हेरितो, आणि जो [३] मला अव्हेरितो तो माझ्या पाठविणाऱ्याला अव्हेरितो.

१७ नंतर ते सत्तर जण आनंदानें माघारें येऊन बोलले, हे प्रभू, तुझ्या नामानें भुतें देखील आमच्या स्वाधीन होतात.

१८ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, म्यां सैतानाला [४] विजेसारिखें आकाशांतून पडतांना पाहिलें.

१९ पाहा, साप [५] व विंचू यांवर पाय द्यायाचा व वैऱ्याच्या सर्व शक्तीवरचा अधिकार मी तुह्मास देतों, आणि तुह्मास कांहींएक बाधणारा नाहींच;

(१) यो. १३.२०. (२) प्रेषि. ५:४. (३) यो. ५:२३. (४) प्रग. १२:८,९. (५) मार्क. १६:१८; प्रेषि २८:५.

१६ यावर मात्थ. १०:४० पाहा.

१७ "आमच्या स्वाधीन होतात." आमचें ऐकतात व निघतात. परंतु हें केवळ ख्रिस्ताच्या नामानें झालें. प्रेषित आपल्या नामानें चमत्कार कधीं करीत नसत.

"सैतानाला पडतांना पाहिलें." जशी वीज आकाशांतून मोठ्या वेगानें पडती तसेंच तुमच्या आज्ञेवरून म्यां त्याला पडतांना पाहिलें. हा अधिकार व हें सामर्थ्य म्यां तुह्मांस दिल्हें आणि तुह्मी माझ्या नामानें चालवीत जावें, मी तुमचें रक्षण करीत जाईन.

१९ "साप व विंचू." सर्व जनावरांमध्यें हीं विशेष धूर्त व विषकारक आहेत, आणि त्यांपासून प्रेषितानें रक्षण करावें असा अर्थ असेल. परंतु या नाशकारक जनावरांकडून धूर्त, कपटी, व दुष्ट माणसें वरचेवर दर्शविलीं आहेत. मात्थ. २: ७; यहेज्क. २:६. या ठिकाणीं संबंधावरून हाच अर्थ उघड आहे. "वैऱ्याच्या." मुख्य वैरी हा सैतान आहे. तर ख्रिस्ताच्या बोलण्याचा अभिप्राय हाच आहे कीं भुतें काढण्याचा अधिकार तुह्मांस दिल्हा आहे. तुह्मी हा अधिकार चालवून पाहिलें कीं भुतें ऐकतात व निघतात तर मजवर भरवसा ठेवीत जा. सैतान व त्याचे दूत व याकडलीं सर्व माणसें यांपासून तुमचें रक्षण करीत जाईन, त्या सर्वांवर तुमचा अधिकार चालावा असें मी करीन. या वचनाप्रमाणें ख्रिस्त करीत आला आहे, आणि सैतान व भुतें व दुष्ट माणसें हीं ख्रिस्ती लोकांचा पाठलाग, जांचणूक व सर्व प्रकारचा विरोध करीत असतांहि ख्रिस्ताची मंडळी आजपर्यंत वाढत चालली आहे. यावरून बळकट प्रमाण आहे कीं हा धर्म देवानेंच लावून दिल्हा आहे आणि सगळें जग व्यापून शेवटपर्यंत चालेल. येशू ख्रिस्त देव आहे असेंहि यावरून सिद्ध होतें. देव नसता तर एवढा अधिकार आपल्या प्रेषितांस कसा दिल्हा असता, आणि एवढ्या बळकट शत्रूंपासून आपली मंडळी कशी राखली व कशी वाढविली असती?

२० तथापि भुतें तुमच्या स्वाधीन होतात यामुळें आनंद करूं नका, तर तुमचीं नांवें आकाशामध्यें [१] लिहिलीं आहेत यामुळें आनंद करा.

२१ त्यावेळेस येशू आत्म्यांत हर्षित होऊन बोलला, हे बापा आकाशाच्या व पृथ्वीच्या प्रभू, मी तुझी स्तुति करितों, कारण कीं या गोष्टी त्वां ज्ञानी व तर्कवान यांपासून लपवून लेकरांस प्रगट केल्या आहेत; होय बापा, कां कीं असेंच तुला बरें वाटलें.

२२ माझ्या बापानें माझ्या हातीं [२] सर्व दिल्हें आहे, आणि पुत्र कोण आहे हें बापावांचून कोणाला [३] ठाऊक नाहीं, आणि बाप कोण आहे हें पुत्रावांचून व ज्याजवळ प्रगट करायास पुत्राची इच्छा असेल त्यावांचून कोणाला ठाऊक नाहीं.

२३ तेव्हां तो शिष्यांकडे मुरडून एकांतीं ह्मणाला, तुह्मी जें पाहतां तें जे डोळे पाहतात ते धन्य.

२४ कारण मी तुह्मास सांगतों कीं, जें तुह्मी पाहतां तें बहुत भविष्यवाद्यांनीं [४] व राजांनीं पाहायास इच्छिलें परंतु पाहिलें नाहीं, आणि जें तुह्मी ऐकतां तें ऐकायास इच्छिलें परंतु ऐकिलें नाहीं.

२५ मग पाहा, कोणीएक शास्त्री उभा राहून त्याची परीक्षा पाहण्याकरितां बोलला, हे गुरू, मी [५] काय केल्यानें सर्वकालच्या जीवनाचें [६] वतन पावेन?

---

(१) निर्ग. ३२:३२; गीत. ६९:२८; यश. ४:३; दान. १२:१; फिल. ४:३; इब्री. १२:२३; प्रग. १३:८; २०:१२; २१:२७.　(२) मात्थ. २८:१८; यो. ३:३५.　(३) यो. ६:४४,४६.　(४) १ पेत. १:१०.　(५) प्रेषि. १६:३०,३१.　(६) गल. ३:१८.

---

२० "तुमचीं नांवें आकाशामध्यें लिहिलीं आहेत यामुळें." प्राचीन काळीं अमुक गांव, शहर, प्रांत, वगैरे यांतील प्रजेचीं नांवें दफ्तरांत लिहीत असत, मग कोणी अपराधी अथवा अयोग्य ठरला तर त्याचें नांव काढीत असत. ही चाल लक्षून हा बोलण्याचा संप्रदाय पडला. गीत. ६९:२८, निर्ग. ३२:३२; अनु. ९:१४; प्रग. २:५. पाहा. तर नांवें आकाशांत लिहिलीं म्हणजे ते आकाशलोकांतली प्रजा, देवाचे खरे भक्त, असे झाले होते. आणि हें तर सर्व ऐहिक मान, कीर्त्ति, विद्या, द्रव्य होय, चमत्कार करण्याचा अधिकार, यांसर्वांपेक्षां फार मोलाचा आहे. यास्तव चमत्कार करण्याची शक्ति असली तर किती बरें असें ज्यांस वाटतें त्यांस समजावें कीं आपलें नांव जीवनी पुस्तकांत लिहिलें जावें हें अधिक बरें आहे.

२१, २२ यावर मात्थ. ११:२५-२७ पाहा.

२३, २४ „ „ १३:१६, १७ पाहा.

२५ "कोणी एक शास्त्री." शास्त्र्यांचें काम मोशानें दिल्हेल्या नेमशास्त्रांत निपुण होऊन तें उलगडून सांगावें असें होतें. हा कांहीं

२६ त्यानें त्याला ह्मटलें, नेमशास्त्रांत काय लिहिलें आहे? तूं कसें वाचितोस?

२७ त्यानें उत्तर दिल्हें कीं, तुझा देव प्रभू [1] यावर तूं आपल्या सर्व अंतःकरणानें व आपल्या सर्व जीवानें व आपल्या सर्व शक्तीनें व आपल्या सर्व मनानें प्रीति कर, आणि जसी आपणावर तसी आपल्या शेजाऱ्यावर [2] प्रीति कर.

२८ मग त्यानें त्याला ह्मटलें, ठीक उत्तर केलेंस, हें कर, ह्मणजे जीवन [3] पावसील.

२९ तेव्हां आपण न्यायी ठरावें [4] असें मनावर धरून तो येशूला ह्मणाला, तर माझा शेजारी [5] कोण?

---

(१) अक. ६:५. (२) ले. १९:१८. (३) ले. १८:५; यहे. ९:२९; यहेज्क. २०:११,२१; रोम. १०:५; गल. ३:१२. (४) ईयो. ३२:२; लूक. १६:१५; रोम. ४:२; गल. ३:११, याक. २:२४. (५) मात्थ. ५:४३,४४.

ख्रीस्तापासून ऐकावें व समजून घ्यावें अशा धोरणानें व सभ्यतेनें प्रश्न करूं लागला; इतक्यांत ख्रीस्ताची परीक्षा पाहून त्याला फांशांत पाडावें म्हणून पाहत होता. "काय केल्यानें." इ॰ यहुद्यांमध्यें हाच मोठा विचार होता आणि सर्व पाप्यांसाठीं सर्वदा हा प्रश्न सर्वांहून मोठा व भारी आहे. नेमशास्त्र पाळलें पाहिजे असें यहुदी शास्त्री म्हणत असत.

२६ "काय लिहिलें आहे." आचरणाचा जो नेम तो शास्त्री मानीत होता त्याकडे त्याचें लक्ष्य ख्रीस्तानें लाविलें. त्याला ठाऊक होतें कीं देवाच्या पवित्र आज्ञा बरोबर समजून त्याच्या बरोबरीस जो कोणी आपली वर्त्तणूक व अंतःकरण लावून पाहील त्याची खातरी होईल कीं म्यां आज्ञा मोडल्या, म्हणून नेमशास्त्राकडून तारण होत नाहीं. नेमशास्त्र पाहून मी किती उणा, किती पापी आहें असें मनांत येतें. तर पापांची क्षमा होईल असा कांहीं तरी उपाय पाहिजे म्हणून नेमशास्त्रावरून कळतें, आणि नेमशास्त्राचा हाच उपयोग आहे. गल. ३:२४.

२७,२८ यांचें व्याख्यान मात्थ. २२:३७–४० एथें पाहा.

२९ "आपण न्यायी ठरावें." आपण नेमशास्त्र बरोबर पाळिलें असें त्या स्वमताभिमानी शास्त्र्याला वाटलें असेल, तरी नेमशास्त्राचा सकल आत्मिक अर्थ त्याला समजला नाहींसें दिसतें. "माझा शेजारी कोण?" या प्रश्नाकडून ख्रीस्ताची परीक्षा पाहावी असा त्याचा हेतु दिसतो. विदेशी नव्हेत; केवळ यहुदी आमचे शेजारी असें यहुद्यांचें मत होतें. विदेशीहि आमचे शेजारी आहेत व त्यांवरहि प्रीति केली पाहिजे असें जर ख्रीस्त म्हणेल तर सर्व यहुदी त्याचा अधिक द्वेष करतील, आणि विदेशी नव्हेत, यहुदी मात्र आमचे शेजारी आहेत असें आमचें मत धरून ठरवील तर विदेशी त्याचा द्वेष करतील असें त्या शास्त्र्याच्या मनांत होतें म्हणून दिसतें.

३० तेव्हां येशूनें उत्तर दिल्हें कीं, कोणी माणूस यरूशलेमापासून खालीं यरीहोस जात असतां लुटाऱ्यांमध्यें सांपडला, ते त्याला उघडें करून मार देऊन, त्याला अर्धमेला असें सोडून गेले.

३१ मग कोणी याजक त्याच वाटेनें सहज खालीं जात होता, तो त्याला पाहून दुसऱ्या बाजूनें [१] चालून गेला.

३२ आणि तसाच कोणी लेवीहि त्या ठिकाणीं आल्यावर, जवळ जाऊन पाहून [२] दुसऱ्या बाजूनें चालून गेला.

---

(१) गीत. ३८:११.　　(२) गीत. १०९:२५,नी. २७:१०.

---

३० "येशूनें उत्तर दिल्हें." त्या शास्त्र्याला वाटलें त्याहून अगदीं वेगळें उत्तर मिळालें. तुमचें मत खरें असें खीस्तानें म्हटलें नाहीं, आणि विदेशी तुमचे शेजारी आहेत असेंहि म्हटलें नाहीं; परंतु ही उत्कृष्ट विशेष रसिक व हृदयवेधक गोष्ट कथून त्यानें त्या शास्त्र्याच्या तोंडानेंच उत्तर करून घेतलें. याजक व लेवी हे आपला देशस्थ भाऊबंद संकटांत पाहून त्याचें साह्य करीनात, असें असतांहि ज्या शोमरोन्यांचा यहुदी अतिद्वेष करीत असत त्यांतील एकानें साह्य करून त्याचा जीव वांचविला; तर तो शोमरोनी त्या यहुद्यांचा शेजारी आहे असें त्या शास्त्र्याला कबूल करावें लागलें "यरीहोस." हें शहर यरूशालेमाच्या उत्तरपूर्वेस सुमारें साडेसात कोसांवर व यार्देन नदीच्या पश्चिमेस चार कोसांवर वसलें होतें. आसपास देश डोंगरवट व रानवट असून लुटाऱ्यांस लपून राहण्याची सोई मिळत असे. योसेफस (प्र० ग.१५: ७) म्हणतो कीं देऊळ नीट करण्यांत जे लाविले होते त्यांपैकीं महान हेरोद राजानें एकदम ४०,००० कामावरून काढून सोडिले, आणि फारकरून हे सर्व लुटारू झाले; म्हणून त्यावेळेस त्या देशांत बहुत लुटारू असत.

३१ "कोणी याजक." सुमारें १२,००० याजक व लेवी यरीहोंत राहत असत असें म्हटलें आहे. त्यांचें काम यरूशालेमांत होतें म्हणून बहुतेक दररोज मार्गे पुढें चालत असत. हा याजक त्या गरीब माणसाला अवचित पाहून त्याची कांहीं चौकसी करीना परंतु त्यावरून पुढें चालला.

३२ "तसाच कोणी लेवीहि." याजक व लेवी हे दोन्ही लेवीच्या वंशांतले होते, पण काम वेगवेगळें होतें. याजकांचें काम हें देवळांत यज्ञार्पण करणें, सांजसकाळीं धूप दाखविणें, व भजन करणें असें होतें. या कामांत लेवी त्यांची मदत करीत असत. ते तेल, धूप, द्राक्षारस वगैरे तयार करीत असत, आणि दाविदाच्या दिवसांनंतर ते देवळांतले गायक व वाजंत्री असत. गण. ८: ५—२२; १. काल. २३:३–५, २४–३२; २४: २७–३१ या लेवीनें त्या घायाळ मनुष्याला लक्ष लावून पाहिलें, परंतु यानेंहि कांहीं साह्य केलें नाहीं.

३३ परंतु कोणी शोमरोनी[१] वाटेनें चालत असतां त्याजकडे आला, व त्याला पाहून[२] कळवळला;

३४ तेव्हां जवळ जाऊन त्यानें तेल व द्राक्षारस लावून त्याचे घाय बांधिले,[३] मग त्याला आपल्या पाठाळावर बसवून धर्मशाळेंत आणिलें, व त्याचा सांभाळ केला.

३५ आणि दुसऱ्या दिवसीं निघते वेळेस त्यानें दोन पावल्या काढून धर्मशाळकऱ्याला देऊन त्याला सांगितलें कीं, याचा सांभाळ कर, आणि यापेक्षां जें कांहीं अधिक खर्चिसील तें मी माघारें आल्यावर तुला[४] भरून देईन.

३६ तर या तिघांतून लुटाऱ्यांमध्यें सांपडलेल्याचा शेजारी तुझ्या मतानें कोणता झाला?

३७ तेव्हां तो बोलला, त्याजवर[५] दया करणारा तो. येशूनें त्याला ह्मटलें, तूं जाऊन तसेंच कर.

---

(१) यो. ४:९. (२) निर्ग. २:६. (३) गीत. १४७:३, यश. १:६. (४) नी. १९:१७, लूक. १४:१४. (५) नी. १४:२१, हो. ६:६, मीख. ६:८, मात्थ. २३:२३.

---

३३ "कोणी शोमरोनी." मात्थ. १०:५. यावर टीका पाहा. यहुदी व शोमरोनकर हे एकमेकासीं कांहीं वहिवाट अथवा सहवास करीनात. असें असतांहि जेव्हां याजक व लेवी आपल्या यहुदी भावाचें साह्य न करितां त्याला संकटांत मरायास सोडून गेले तेव्हां या शोमरोन्यानें आपल्या शत्रूचें संकट पाहून त्याची दया व साह्य करून शेजाऱ्याचे खरोखर गुण दाखविले आणि शोमरोनी वास्तविक यहुद्याचा शेजारी आहे असें प्रमाण पटविलें. शोमरोनी यहुद्यांचे शेजारी आहेत असें जर ख्रीस्तानें आधीं म्हटलें असतें तर तो शास्त्री अगदीं नाकबूल झाला असता, परंतु ही गोष्ट ऐकून त्याला कबूल करणें प्राप्त झालें.

३४ "तेल व द्राक्षारस लावून." ही खरोखर मेहर्बानी होती. हा शोमरोनीहि सहज त्या वाटेनें आपल्या कामावर जात होता, तरी त्या घायाळ मनुष्याला पाहून तो जवळ जाऊन, पोकळ दया दाखवितो असें नाहीं, तर खर्च करून औषध लावितो, याचे घाय बांधितो व आपल्या जनावरावर त्याला बसवून धर्मशाळेंत आणून संभाळितो. जर यहुद्यानें हें केलें असतें तर त्याची मेहर्बानी मोठी असें वाटलें असतें. कोणत्याहि विदेश्यानें केलें तर त्यानें त्या बापड्यावर मोठे उपकार केले असें सर्वांनीं म्हटलें, परंतु ज्यानें हें केलें तो शोमरोनी होता म्हणजे ज्या लोकांचा अनिर्द्वेष सर्व यहुदी करीत असत त्यांतला एक होता, असें जेव्हां मनांत आणितों तेव्हां संकटांत पडलेल्या मित्रांसीं किंवा शत्रूंसीं आम्ही कसें वागावें हें या उदाहरणावरून सिद्ध होतें.

३५–३७ "तुला भरून देईन." त्यानें त्या गरिबाची त्या दिवसाची गरज पुरविली असें केवळ नाहीं, परंतु ज्यास्ती खर्च लाग-

३८ आणि असें झालें कीं ते चालत असतां तो एका गांवांत आला, तेव्हां मार्था [१] नामें कोणी बाईनें आपल्या घरांत त्याला घेतलें.

३९ अणखी तिला मारया नामें बहीण होती, ती येशूच्या पायांजवळ [२] बसून त्याचें बोलणें ऐकत होती.

४० तेव्हां मार्था बहुत खटपटीमुळें गोंधळली व जवळ येऊन बोलली, हे प्रभू, माझ्या बहिणीनें मज एकटीवर खटपटीचें काम टाकिलें, याची तुला चिंता नाहीं काय? यास्तव तिला माझें सहाय करायास सांग.

---

(१) यो. ११:११,१२:२,३.　　(२) लूक. ८:३५, प्रेषि. २२:३.

ला तर तोहि भरण्याचें वचन दिलें. "तर त्या तिघांतून." इ. त्या गरिबाचा शेजारी कोण? तुझें काय मत? शास्त्र्यानें आदीं जो प्रश्न केला होता तोच आतां खीस्त त्याला करितो. आणि त्या शास्त्र्याला कबूल करणें प्राप्त झालें कीं त्याजवर दया करणारा तोच. सर्व वाद राहिला, बिनदिकत तो कबूल झाला. मग खीस्तानें त्याला सुबोध केला कीं तूं जाऊन तसेंच कर. तसा स्वभाव व आचरण दाखीव म्हणजे तूं नेमशास्त्र बरोबर पाळितोस असें दिसून येईल. हा बोध त्या शास्त्र्याच्या मनांत ठसला असें दिसतें. मी खचीत उणा व पापी आहें असी त्याची खातरी झाली असेल, परंतु पुढें त्याचें कसें काय झालें हें आम्हास कळलें नाहीं. या सुंदर गोष्टीवरून समजण्यांत येतें कीं (१) आपण पापी असून तारणाऱ्याचें अगत्य आहे असें नेमशास्त्रावरून कळून येतें. (२) जो प्रीतीचा बाणा दाखवितो तो नव्हे, तर जो आपणाला नाकारून संकटांत आमचें साह्य श्रम घेऊन करितो तोच खरी प्रीति करितो (३) शत्रूंचें संकट पाहून त्यांचें साह्य करणें भाग आहे (४) जो आपल्या शत्रूंचें हित पाहतो तो खरा शेजारी होतो. (५) खिस्ती धर्माचा सत्वगुण एथें साफ दिसून येतो. या देशांत वेगवेगळ्या बहुत जाती असल्यावरून लोकांच्या फार गैरसोयी व अडचणी होतात. ते एकमेकांचा हेवा, अकस व द्वेष करून एकमेकांचें कल्याण पाहत नाहींत. खिस्ती शास्त्र शिकवितें कीं प्रत्येक मनुष्य आमचा शेजारी आहे व त्याचें हित पाहिलें पाहिजे. हा खिस्ती धर्माचा एक नेम सर्वत्र चालेल तेव्हां पृथ्वीवरल्या सर्व लोकांचें मोठें कल्याण होईल.

३८–४० "एका गांवांत." हा बेथानी होता. हा जाईत डोंगराच्या पूर्वेच्या उतरणीवर वसला होता. "मार्था नामें." मार्था ही घरची धनीण अथवा वडील बहीण असेल. "पायाजवळ बसून." ही शिष्याची जागा असे. प्रेषि. २२:३. मारया शिष्यीण होऊन खीस्ताचें ऐकावें असी इच्छा दाखवीत असे. "मार्था बहुत खटपटीमुळें गोंधळली." खीस्ताचें आतिथ्य बरोबर करावें ही तिला काळजी होती. ही तिची काळजी कांहीं जास्त झाली असेल. "याची तुला चिंता नाहीं!" खीस्ताला हें बोलणें मार्थेला योग्य नव्हतें म्हणून त्यानें तिचा थोडा निषेध केला.

४१ येशूनें तिला उत्तर दिल्हें कीं, मार्थे, मार्थे, तूं बहुत गोष्टींविषयीं
[1] चिंताक्रांत व घाबरी आहेस;

४२ परंतु [2] एकाच गोष्टीची गरज आहे, आणि मारयेनें चांगला
वांटा निवडून घेतला आहे, तो तिजपासून घेतला जाणार नाहीं.

---

(१) मार्क. ४:१९; लूक. २१:३४; १ करिं. ७:३२,३५. (२) गीत. २७:४;७३:२५; उप. १२:१३; मार्क. ८:३६; लूक. १८:२२;१. करिं. १३:२.

४१, ४२ "मार्थे, "मार्थे. इ." माझ्या आतिथ्याविषयीं एवढें चिंताक्रांत व घाबरी होऊं नये. "एकाच गोष्टीची गरज आहे." प्रपंच, संसार, ऐहिक गोष्टी, ह्या सर्व हलक्या आहेत. जीवात्म्याचें तारण, देवाची कृपा, पापाची क्षमा म्हणजे सुभक्ति, या एका गोष्टीचें अगत्य आहे. ही प्रथम साधून घेतली पाहिजे, मग बाकीचें सर्व दिल्हें जाईल. १ तीम. ४:८: मात्थ. ६:३३. "चांगला वांटा" म्हणजे सुभक्ति. देवावरील प्रीति आकाशलोकांतलें अविनाशी वतन खिस्ती व्हावें असें मारयेनें निवडून घेतलें होतें. जे असें निवडून घेतात त्यांस ईश्वर कधीं घालविणार नाहीं आणि त्याच्या हातांतून कोणी त्यांस हिसकून घेणार नाहीं यो. १०:२८,२९.

या रसिक गोष्टीवरून दिसतें कीं (१) संसार व प्रपंच यांविषयींची मोठी काळजी बाधकारक आहे. खीस्ताचें आतिथ्य करावें यापेक्षां योग्य असी ऐहिक गोष्ट कोणती? तरी या खटपटींत फार निमग्न असल्यावरून प्रभूनें मार्थेचा निषेध केला. आपल्या कुटुंबाचा निर्वाह करावा, हें योग्य आहे, होय आपलें कर्त्तव्य काम आहे. असें असताहि यांत निमग्न होऊन तारणाविषयीं निष्काळजी असून आपल्या आत्म्याचा नाश पावावा हें मोठें पाप आहे. (२) खीस्ताचें ऐकावें व आपलें तारण साधून घ्यावें हें जगांतलें काम चालविण्यापेक्षां बरें आहे. जग लवकर होऊन जाईल, परंतु जीवात्मा सर्वकाळ वांचेल. (३) सगळें संसारांतलें काम एकीकडे ठेवून आपलें तारण साधून घेण्याची काळजी धरावी असे समय येतात. (४) योग्य समयीं असी काळजी धरली पाहिजे, नाहीं तर वेळ निघून जाईल आणि जिवात्म्याचा नाश होईल. (५) मुख्य गोष्ट पाहिजे ती ही म्हणजे सुभक्तिशीलता, धार्मिकपणा असी आहे. या जगांतल्या सर्व गोष्टी नाशवंत आहेत. सगळें जग मिळविलें तरी आम्हास तें लवकर सोडून जावें लागेल. परंतु जीवात्मा वांचेल. न्यायदिवस येत आहे. सौख्य लोक आहे. नरकवासहि आहे. हा चुकावा व सर्वकाळचें सुख मिळावें म्हणून आतांच खीस्त आपला मित्र असें करून घेऊन त्याचें ऐकावें. (६) खिस्ती धर्माकडून बायका लोकांस विशेष आशीर्वाद प्राप्त होतात. त्यांनीं खीस्तावर फार प्रीति करून त्याचे उपकार मानावे हें बायकांस योग्य आहे. सर्वांहून सुंदर बाईनें खीस्तावर विश्वास ठेवून आपल्या अंगीं सुस्वभाव, धार्मिकपण वगैरे खीस्ती सद्गुण करून घेतले म्हणजे ती अधिक सुंदर व प्रियकर होती. सर्वांस खीस्ताकडूनच मात्र तारण व मनाची शांति मिळण्यास साध्य आहे.

११ **अध्याय.**—आणि असें झालें कीं, तो एका ठिकाणीं प्रार्थना
करीत होता, ती संपविल्यावर त्याच्या शिष्यांतील कोणीएकानें त्याला
ह्मटलें, हे प्रभू, जसें योहान्नानें आपल्या शिष्यांस प्रार्थना करायास शि-
कविलें तसें तूंहि आह्मास शिकीव.
२ मग तो त्यांस ह्मणाला, तुह्मी प्रार्थना कराल तेव्हां असें ह्मणा, हे
आमच्या [1] आकाशांतील बापा, तुझें नाम पवित्र मानिलें जावो, तुझें
राज्य येवो; जसें आकाशांत तसें पृथ्वीवरहि तुझ्या इच्छेप्रमाणें होवो.
३ आमची रोजची भाकर आह्मास नित्य दे.
४ आणि आमचीं पापें आह्मास सोड, कां कीं [2] आह्मीहि आपल्या
प्रत्येक ऋण्याला सोडितों; आणि आह्मास परीक्षेंत नेऊं नको, तर आ-
ह्मास वाइटापासून सोडीव.

---

(1) मात्थ. ६:९. (2) मार्क. ११:२५,२६.

अध्याय ११.

१ "प्रार्थना करीत होता." ख्रीस्त वरचेवर प्रार्थना करीत असे; असें लुकानें लक्षांत आणिलें आहे, म्हणजे बाप्तिस्मा घेतेवेळेस (३:२१;) रानांत, (५:१६;) बारा प्रेषित नेमून पाठविल्यापूर्वी सारी रात्र प्रार्थना करीत होता, (९:१८;) त्याच्या तोंडाचें रूप पालटलें त्यावेळेस तो प्रार्थना करायाला डोंगरावर गेला होता (९:२८,२९.) "आम्हांस शिकीव." ख्रीस्ताची प्रार्थना फार उत्सुकतेची व उत्कृष्ट असें त्यांच्या लक्षांत आलें असेल, आणि योहान्नानें आपल्या शिष्यांस प्रार्थना करायाला शिकविलें हें मनांत आणून त्यांनीं ही अर्जी केली असें दिसतें. इतरांचे सद्गुण पाहून आपण तसले सद्गुण इच्छावे. ईश्वराचें साह्य व प्रेरणा यांशिवाय आमच्यानें, त्याला पसंत होईल, असी प्रार्थना करवत नाहीं. अगोदर विचार करून कसें काय मागावें हें मनांत आणून प्रार्थना करणें ठीक आहे.

२–४ यावर मात्थ. ६:९–१३ एथें टीका पाहा.

४ "आह्मीहि ....सोडितों." मात्थीनें वर्णिलें त्याहून हें वाक्य शब्दांनीं वेगळें पण अर्थानें त्यासारिखें आहे. दोन्ही वाक्यांचा अर्थ हाच आहे कीं आम्ही आपल्या ऋण्यांस सोडीत नाहीं, तर ईश्वर आमचीं पापें सोडणार नाहीं. आम्ही त्यांस सोडून कांहीं पुण्य मिळवितों असें कीं ईश्वराला आमचीं पापें सोडणें भाग होतें, असें कांहीं नाहीं, तर आम्हांस क्षमाशील बुद्धि असावी, नाहीं तर आमची क्षमा व्हावी हें योग्य नाहीं. "आपल्या प्रत्येक ऋण्याला." ज्या कोणी आमचा अन्याय केला आहे त्याला हें व्यावहारिक देण्याघेण्याविषयीं नाहीं, परंतु ईश्वराविरुद्ध जीं पापें केलीं त्यासारिखे जे मनुष्यांचे अन्याय होतात त्यांविषयीं म्हटलें आहे. या प्रार्थनेच्या लूकानें केलेल्या वर्णनांत सदई फेरफार आला आहे असें केवळ नव्हे तर शेवटचें ईश्वरस्तवन लूकानें अगदीं

५ अणखी त्यानें त्यांस ह्मटलें, तुह्मामध्यें असा कोण आहे कीं, त्याला मित्र असतां तो त्याकडे मध्यरात्रीं जाऊन त्याला ह्मणेल, हे मित्रा, मला तीन भाकरी उसन्या दे.

६ कारण कीं माझा एक मित्र वाटेंतून मजकडे आला आहे, आणि त्याला वाढायास मजपासीं कांहीं नाहीं.

७ मग तो आंतून उत्तर देईल कीं, मला श्रम देऊं नको, आतां दार लाविलें आहे व माझीं मुलें माझ्या जवळ अंथरुणावर आहेत, माझ्यानें उठून तुला देववत नाहीं.

८ मी तुह्मास सांगतों, तो त्याचा मित्र आहे यामुळें जर तो उठून त्याला देणार नाहीं तरी त्याच्या आग्रहामुळें[1] उठून त्याला पाहिजेत तितक्या देईल.

---

[1] लूक. १८:१-८.

सोडिलें आहे. यावरून सिद्ध होतें कीं हेच शब्द हमेशा बोलावे असें नव्हे, तर या पद्धतीच्या अर्थाप्रमाणें मात्र प्रार्थना करीत जावें असें समजलें पाहिजे.

५,६,७. "अणखी" इ. मागितलें तें मिळावें म्हणून आग्रहानें मागत गेलें पाहिजे, हें दाखविण्यास ख्रीस्तानें हें म्हटलें. हा दाखला मनोरंजक व बोधकारक व्हावा म्हणून तपशिलानें वर्णिला आहे. तरी हरएक कलमाचा अर्थ नव्हे तर सारांश मात्र पाहायाचा आहे. ईश्वराला प्रार्थना ऐकायास व आशीर्वाद द्यायास श्रम वाटत नाहीं. ऐकायास व द्यायास तो हमेशा तयार आहे. तरी त्याच्या लोकांनीं आग्रहानें मागावें व प्रार्थनेंत टिकावें असी त्याची मर्जी आहे.

८ "मी तुम्हास सांगतों" इ. लातिन भाषेंतल्या एका शास्त्रप्रतींत "तो टोकीत गेला म्हणजे," हे शब्द मध्यें घातले आहेत. मूळ ग्रीकभाषेंत जरी घातले नाहींत तरी पोटांत आहेत. प्रार्थना करितांना आग्रह दाखविला पाहिजे व टिकून राहिलें पाहिजे. कधीं कधीं ईश्वर आपल्या लोकांचा विश्वास व सहनशीलता पारखितो. ते आशीर्वाद पावण्यास तयार नाहींत असें पाहतो म्हणून ऐकत नाहीं. परंतु कोणी निराश होऊंनये. मागितलें तें आम्हास वास्तविक हितकारक, व देवानें द्यावें म्हणून योग्य आहे तर भरवसा धरून मागत जावें. एकदां मागितल्यावर मिळालें नाहीं म्हणजे प्रार्थना सोडतात असे बहुतेक आहेत. मनुष्यांसीं आपण असें करीत नाहीं पण फिरून मागत जातों. तसेंच देवापासीं पुनः पुन्हा मागत जावें. इर्म-२९:१३.

९ अणखी मी तुह्मास सांगतों, [1] मागा ह्मणजे तुह्मास मिळेल, शोधा ह्मणजे तुह्मास सांपडेल, ठोका ह्मणजे तुह्मास उघडेल.

१० कां कीं जो कोणी मागतो तो पावतो, व जो शोधितो त्याला सांपडतें, व जो ठोकितो त्यासाठीं उघडेल.

११ आणि तुह्मांमध्यें कोण असा बाप आहे कीं, त्याजवळ पुत्रानें भाकर मागितली असतां त्याला धोंडा देईल? आणि मासा मागितला असतां माशाच्या बदल त्याला साप देईल?

१२ किंवा अंडें मागितलें असतां त्याला विंचू देईल?

१३ यास्तव तुह्मी वाईट असतां आपल्या लेंकरांस चांगलीं देणीं द्यायास समजतां, मग आकाशांतील बापाजवळ जे मागतात त्यांस तो किती विशेषेंकरून पवित्र आत्मा देईल?

१४ आणि तो [2] भूत काढीत होता, आणि तें मुकें होतें; मग असें झालें कीं भूत निघाल्यावर मुका बोलूं लागला, आणि समुदाय आश्चर्य पावले.

१५ परंतु त्यांतील कित्येक बोलले, भुतांचा अधिकारी बालजबूल याच्या योगानें तो भुतें काढितो.

१६ आणि दुसऱ्या कित्येकांनीं परीक्षा पाहण्याकरितां [3] त्याजवळ आकाशांतील चिन्ह मागितलें.

१७ तेव्हां त्यानें त्यांच्या कल्पना जाणून [4] त्यांस ह्मटलें, जें जें राज्य [5] आंतल्या आंत विभागलें आहे तें ओसाड होतें व घर आंतल्या आंत विभागलें असतां पडतें.

१८ आणि सैतानहि आपल्यामध्यें विभागला तर त्याचें राज्य कसें टिकेल? तुह्मी तर असें ह्मणतां कीं, मी बालजबूलाकडून भुतें काढितों.

१९ आणि जर मी बालजबूलाकडून भुतें काढितों, तर तुमचे पुत्र कोणाकडून काढितात? याकरितां ते तुमचे न्यायाधीश होतील.

---

(१) मात्थ. ७:७;२१:२२; यो. १५:७; याक. १:६. १ यो. ३:२२. (२) मात्थ. ९:३२,१२:२२. (३) मात्थ. १२:३८,१६:१. (४) यो. २:२५. (५) मात्थ. १२:२५, मार्क. ३:२४.

९-१२ यावर मात्थ. ७:७-११ एथें पाहा. | १४-२३ यावर मात्थ १२:२२-३० एथें पाहा.

२० परंतु मी देवाच्या बोटानें [१] जर भुतें काढितों तर देवाचें राज्य तुमच्या मध्यें येऊन पोहंचलें आहे.

२१ बळकट माणूस हातेरबंद होऊन आपला वांटा राखितो तेव्हां त्याची मालमत्ता निर्भय राहती.

२२ परंतु कोणी त्यापेक्षां [२] बळकट येऊन त्याला जिंकितो तेव्हां त्याच्या ज्या हातेरांवर त्यानें विश्वास ठेविला तीं तो घेऊन जातो, व त्याची लूट वांटून देतो.

२३ जो मला अनुकूल नाहीं तो मला प्रतिकूल आहे, आणि जो माझ्या संगतीं गोळा करीत नाहीं तो विखरितो.

२४ जेव्हां अशुद्ध आत्मा माणसांतून निघतो तेव्हां तो कोरड्या जागामध्यें विसांवा पाहत फिरतो, व न पावून ह्मणतो, ज्या आपल्या घरांतून मीं निघालों, त्यांत परत जाईन.

२५ मग तो आल्यावर तें झाडलेलें व सुंदर केलेलें आहे असें पाहतो.

२६ नंतर तो जाऊन आपल्यापेक्षां वाईट असे दुसरे सात आत्मे संगतीं घेतो, आणि ते आंत जाऊन तेथें राहतात मग त्या माणसाची शेवटली दशा पहिल्यापेक्षां [३] वाईट होती.

२७ आणि असें झालें कीं तो या गोष्टी बोलत असतां समुदायांतील कोणी बायको ओरडून त्याला ह्मणाली, ज्या पोटानें तुला वागविलें व जीं थानें त्वां चोखिलीं तीं धन्य. [४]

२८ मग तो बोलला, देवाचें वचन ऐकणारे व तें पाळणारे निश्चयें धन्य. [५]

---

(१) निर्ग. ८:१९. (२) यश. ५३:१२, कल. २:१५. (३) यो. ५:१४, इब्री. ६:४,१०:२६,२७, २ पेत्र. २:२०,२१. (४) लूक. १:२८,४८. (५) गीत. ११९:१,२; मात्थ. ७:२१, लूक ८:२१, याक. १:२५.

२४–२६ यवर मात्थ १२:४३–४५ एथें पाहा.

२७,२८ "तीं धन्य." या बाईला वाटलें कीं अशा माणसाची आई व्हावी यांत मोठा मान आहे. मान नाहीं असें येशूनें म्हटलें नाहीं, तरी दाखविलें कीं सर्वांहून मोठा मान व सुख ईश्वराचें ऐकून त्याचा खरा भक्त होणें असें आहे. ईश्वराच्या पवित्र आज्ञा पाळून आकाशलोकांत राहण्यास सिद्ध व्हावें यांत मनुष्यांचा उत्कृष्ट मान व थोरपण आहे. याच्या पुढें सर्व ऐहिक मान व पदव्या अगदी हलक्या आहेत.

२९ आणि समुदाय दाटी करीत असतां तो असें बोलूं लागला, ही पिढी वाईट आहे, चिन्ह मागती, परंतु योना भविष्यवादी याच्या चिन्हावांचून तिला चिन्ह मिळणार नाहीं [1].

३० कां कीं जसा योना [2] निनवेकरांस चिन्ह झाला तसा मनुष्याचा पुत्रहि या पिढीला होईल.

३१ दक्षिणेची राणी [3] न्यायकालीं या पिढीच्या माणसांसंगतीं उभी राहून त्यांस अन्यायी ठरवील, कां कीं ती शलमोनाचें ज्ञान ऐकायास पृथ्वीच्या शेवटांपासून आली, आणि पाहा, एथें शलमोनपेक्षां कोणी मोठा आहे.

३२ निनवेचीं माणसें न्यायकालीं या पिढीच्या संगतीं उभीं राहून हिला अन्यायी ठरवितील, कां कीं त्यांनीं योनाच्या गाजविण्यावरून [4] पश्चात्ताप केला, आणि पाहा, एथें योनापेक्षां कोणी मोठा आहे.

३३ आणि कोणी [5] दिवा लावून गुप्त ठिकाणीं किंवा मापाखालीं ठेवीत नाहीं, तर आंत येणाऱ्यांस उजेड दिसावा ह्मणून दिवठणीवर ठेवितो.

३४ डोळा शरिराचा [6] दिवा आहे; यास्तव तुझा डोळा निर्दोष असला तर तुझें अवघें शरीर उजेडमय होईल, परंतु वाईट असला तर तुझें [7] शरीरहि अंधारमय होईल-

३५ यास्तव तुझ्या मध्यें जो उजेड तो अंधार न व्हावा ह्मणून सावध ऐस.

३६ याकरितां तुझें अवघें शरीर उजेडमय असलें [8] व त्यांतील कोणताहि भाग अंधारमय नसला, तर जसा दिव्याच्या ज्योतीनें [9] तुला उजेड होतो त्याप्रमाणें तें अवघें उजेडमय होईल.

३७ आणि तो बोलत आहे इतक्यांत कोणी परोश्यानें त्याला आपल्या संगतीं जेवायास बोलाविलें; तेव्हां तो आंत जाऊन जेवायास बसला.

---

(१) मात्थ. १२:४०, मार्क. ८:१२. (२) योन. १:१७,२:१०. (३) १ राज. १०:१. (४) योन. ३:५,१०. (५) मात्थ. ५:१५, मार्क. ४:२१, लूक. ८:१६. (६) मात्थ. ६:२२. (७) नी. २८:२२, मार्क. ७:२२. (८) गीत. ११९:१०५, नी. ६:२३, यश. ८:२०, २ कोरिं.४:६. (९) नी. ४:१८,२०:२७.

२९–३२ यावर मात्थ. १२:३८–४२ एथें टीका पाहा.

३३–३६ यावर मात्थ ५:१५; ६:२२,२३. ऐथें यांचा संबंध वेगळा आहे.

३७ "कोणी परोश्यानें बोलाविलें." येशू आपला उत्कृष्ट उपदेश करून सर्वांस लागू करीत होता, इतक्यांत यानें मध्यें बोलून त्याला बोलाविलें. यानें वैरभावानें हें केलें

३८ आणि त्यानें जेवणाच्या पूर्वी अंघूळ केली नाहीं हें पाहून परो-
श्याला [१] आश्चर्य वाटलें.

३९ तेव्हां प्रभूनें त्याला ह्मटलें, अहो परोश्यानो, तुह्मी ताटवाटी
बाहेरून साफ [२] करितां, परंतु आंत [३] लुटीनें व दुष्टाईनें भरले आहां.

४० अहो मूर्खांनो, ज्यानें बाहेरचें केलें त्यानें आंतलेंहि केलें नाहीं
काय?

४१ आणखी तुह्माजवळ जें आहे त्यांतून गरिबांस द्या [४] मग पाहा,
सगळे पदार्थ तुह्मास शुद्ध आहेत.

---

(१) मार्क. ७:३. (२) मात्थ. २३:२५. (३) तीत. १:१५. (४) यश. ५८:७, लूक. १२:३३.

असेल. जे लोकांसमोर येशूसीं वाद करायास पुढें होतात ते सर्व कुंठित होतात असें पाहून त्याला एकांतीं घेऊन धमकावावें अथवा निषेधून त्याला एकीकडे वळवून त्याचा उपदेश बंद करावा हा त्या परोश्याचा हेतु असेल. तरी येशू मान्य होऊन त्याबरोबर गेला. त्याच्या घरींहि चांगलें करायाची सोई होईल हें येशूला ठाऊक होतें. एथें दोन गोष्टी लक्ष्यांत ठेवण्याजोग्या आहेत. (१) कोणीहि जकातदारानें किंवा परोश्यानें त्याला बोलाविलें तरी तो नाकबूल झाला नाहीं; म्हणून हा दारूबाज आणि जकातदार व पापी यांचा मित्र असा दोष त्यावर ठेवीत असत. (२) असल्या सर्व प्रसंगीं तो देवाची गोष्ट प्रशस्तपणें बोलून आपलें काम चालवीत असे. याविषयीं सर्व ख्रिस्ती लोकांनीं त्याचा कित्ता अनुसरला तर किती बरें.

३८ "हें पाहून." हा अंघूळ न करितां एकाएकीं जेवायाला बसला आहे असें पाहून. अंघूळ करणें येशूला वाईट वाटलें असें समजायाचें नाहीं, तर अंग स्वच्छ राखावें यापेक्षां अंतःकरण शुद्ध राखण्यास अधिक जपावें असा बोध त्या बाह्य क्रिया पाळणाऱ्या परोश्यांच्या मनांत ठसावा म्हणून त्यानें हें केलें असें दिसतें. मार्क. ७:४. पाहा.

३९ मात्थ. २३:२५. पाहा. "लुटीनें." इ. तुम्ही कपट, बळ, जुलूम व गरीब लोकांचे अन्याय हीं करून आपला पोटनिर्वाह करितां. हा भारी दोष प्रभूनें आपल्या आतिथ्य करणाऱ्यावर देखील ठेविला; एवढ्या विश्वासुपणानें तो लोकांच्या जीवात्म्यांचें कल्याण पाहत असे.

४० "अहो मूर्खांनो." या शब्दावरून अज्ञान असें केवळ नव्हे तर दुष्टपणहि दाखविलें आहे. तुमचें आचरण अविचारी व दुष्टहि आहे. गीत. १४:१; नी. १३:१९; १४:९. पाहा. "ज्यानें बाहेरचें केलें." ज्यानें देह केला त्या देवानें आत्माहि केला नाहीं काय? आणि देह राखिला पाहिजे असें जर तुम्हास वाटतें तर अंतःकरणहि शुद्ध राखिलें पाहिजे कीं नाहीं? ईश्वर अंतःकरणाकडे पाहतो आणि हें तर देहापेक्षां शुद्ध राखण्याचें विशेष अगत्य आहे.

४१ "जें आहे त्यांतून." इ. ज्यांनीं लोभ धरून माल व द्रव्यें अन्याय करून मिळविलीं आहेत त्यांनीं होईल तितके प्रयत्न

४२ परंतु तुह्मां परोश्यांस [1] हायहाय! कां कीं पुदिना व सताप व प्रत्येक भाजी यांचा तुह्मी दाहावा भाग देतां, पण न्याय व देवाची प्रीति सोडितां; या गोष्टी करायाच्या होत्या व त्या सोडायाच्या नव्हत्या.

४३ तुह्मां परोश्यांस हायहाय? कां कीं सभास्थानांमध्यें मुख्य आसनें [2] व चवाठ्यामध्यें मुजरे घेणें हीं तुह्मास आवडतात.

४४ अहो शास्त्री व परोशी, तुह्मां ढोंग्यांस हायहाय! कां कीं ज्या गुप्त कबरांवरून माणसें न जाणतां चालतात [3] त्यासारिखे आहां.

४५ तेव्हां शास्त्र्यांतील कोणीएकानें त्याला उत्तर दिल्हें कीं, हे गुरू, असें बोलल्यानें आमचीहि निंदा करितोस.

४६ तेव्हां तो बोलला, तुह्मां शास्त्र्यांसहि हायहाय! कां कीं वाहायास अवघड असीं ओझीं तुह्मी माणसांवर घालितां, आणि आपण आपलें एक बोट [4] देखील त्या ओझ्यांस लावीत नाहीं.

(१) मात्थ. २३:२३,२७. (२) मात्थ. २३:६, मार्क. १२:३८. (३) गीत. ५:९. (४) यश. ५८:६.

करून भरून द्यावें, मग जें आहे त्यांतून गरिबांस देऊन दाखवावें कीं स्वार्थ बुद्धि मोडिली, आणि वाईट करीत आले त्याबद्दल खरोखर खेद झाला आहे. माल देवाला व देवाच्या कामाला अर्पून दिल्हे अथवा गरिबांस वांटून दिल्हे म्हणजे सिद्ध होतें कीं लोभ सुटला व जीवात्म्याची काळजी लागली आहे "मग पाहा." इ॰ माल दिला म्हणजे पश्चात्तापास योग्य असें फळ दिसून येईल. त्या परोश्यानें आपलीं पापें समजून पश्चात्ताप करावा व वाईट करणें सोडावें आणि असें करून जसा देह तसें अंतःकरणहि शुद्ध करून दाखवावें ही ख्रीस्ताची इच्छा होती. म्हणून दिसतें.

४२ यावर मात्थ. २३:२३ पाहा "सताप." ही एका प्रकारची भाजी होती. त्याचा वास उग्रट व चव तीक्ष्ण असी होती.

४३,४४ यावर मात्थ. २३:६,२७ पाहा.

४५ "असें बोलल्यानें आमचीहि." इ॰ शास्त्र्यांतले अनेक वर्ग असत. आणि ज्याला लक्षून चवथ्या ओवींत शास्त्री असें ह्मटलें त्या वर्गांतला हा शास्त्री नसेल. तरी येशूनें सांगितलें तें आम्हांसहि लागतें असें त्याला समजलें, आणि जो योग्य निषेध झाला त्याला त्यानें रागेंभरून निंदा असें म्हटलें. ख्रीस्तानें निंदा केली नाहीं, पण त्याचा वास्तविक दोष काढून निषेध केला. तसें आतां विश्वासू उपदेशक प्रशस्तपणें उपदेश करून लोकांचा दोष काढून त्यांस लागू करितात तेव्हां त्यानें आमची निंदा केली असें बोलून कुरकुर करितात.

४६ यावर मात्थ. १३:४ पाहा.

४७ तुह्मास हायहाय! कां कीं तुह्मीं भविष्यवाद्यांचीं थडीं बांधितां व तुमच्या पूर्वजांनीं त्यांस जिवें मारिलें.

४८ यास्तव तुह्मी आपल्या पूर्वजांच्या[1] कामांविषयीं साक्ष देतां व मान्य आहां, कां कीं त्यांनीं त्यांस जिवें मारिलें व तुह्मी त्यांचीं थडीं बांधितां.[2]

४९ यास्तव देवाच्या ज्ञानानें ह्मटलें कीं, मी त्यांकडे भविष्यवादी व प्रेषित यांस पाठवीन आणि त्यांतील कित्येकांस ते जिवें मारितील व कित्येकांच्या पाठीस लागतील.

५० सर्व भविष्यवाद्यांचें जें रक्त जगाच्या मांडण्यापासून पाडिलें गेलें त्याचा सूड या पिढीपासून[3] घ्यावा ह्मणून.

५१ हाबेलाच्या रक्तापासून[4] वेदीच्या व देवळाच्या मध्यें ज्याचा घात झाला त्या जखर्याच्या[5] रक्तापर्यंत, होय मी तुह्मास सांगतों, त्याचा सूड या पिढीपासून[6] घेतील.

५२ तुह्मां शास्त्र्यांस हायहाय! कां कीं तुह्मी ज्ञानाची किल्ली नेली आहे[7] तुह्मीं स्वतां आंत गेलां नाहीं व आंत जाणाऱ्यांस मना केलें.

---

(१) यहेज्क. १८:१९. (२) इब्री. ११:२५,३७. (३) निर्ग. २०:५, इर्म. ५१:५६. (४) उत्प. ४:८. (५) २ काल. २४:२०. (६) इर्म. ७:२८. (७) मल. २,७.

४७-५१ यावर मात्थ २३:२९-३६ पाहा.

४९ "देवाच्या ज्ञानानें." म्हणजे देवपणांत दुसरा जो ख्रीस्त त्यानें ख्रीस्ताला देवाचा शब्द असें म्हटलें आहे. यो. १:१. कारण कीं त्याकडून ईश्वराचे गुण व इच्छा कळण्यांत येतात. त्याला देवाचें ज्ञान म्हटलें आहे, कारण त्याकडून सृष्टि निर्माण करण्याचें व तारणोपाय योजून सिद्ध करण्याचें ईश्वराचें ज्ञान प्रगट झालें आहे. कल. १:१३-१८. हें नांव १ करिंथ. १:३० यांत ख्रीस्ताला दिलें आहे, आणि नी. ८. या अध्यायांतल्या या शब्दावरून ख्रीस्त दर्शविला आहे असें बहुतेकांस वाटतें. "मी त्यांकडे." इ. लूक. १:३; मात्थ. १०:१६. पाहा. "ते जिवें मारितील." यो. १६:२; प्रेषि. ७:५२,५९; या. ५:१०, प्रेषि. १२:२;२२:१९.२. करिं. ११:२४,२५;२ काल. ३६:१५:१६.

५२ यावर मात्थ. २३:१३ एथें टीका. पाहा. "ज्ञानाची किल्ली." किल्ली ही उघडण्यासाठीं आहे. परंतु त्यांनीं शास्त्राचा खोटा अर्थ सांगून लोकांस गैरमार्गांत लावून त्यांपासून ज्ञानाची किल्ली हरवून घेतली. या शास्त्र्यांचा विशेष दोष हाच होता कीं मशीहाविषयीं जीं बहुत शास्त्रवाक्यें तीं त्यांनीं बरोबर उलगडून सांगितलीं नाहींत. मशीहा आला तेव्हां त्यांनीं आपण त्यावर विश्वास ठेविला नाहीं, आणि इतर लोकांनीं

५३ आणि तो त्यांस या गोष्टी बोलत असतां, शास्त्री व परोशी त्यावर फार संतापून बहुत गोष्टींविषयीं [1] त्याला प्रश्न करूं लागले.

५४ आणि त्याजवर दोष ठेवावा ह्मणून त्याला टपत बसून ते त्याच्या तोंडांतील कांहीं गोष्ट [2] धरायास पाहत होते.

१२ अध्याय. –इतक्यांत [3] हजारों लोक दाटीनें मिळून एकमेकांस तुडवीत असतां येशू आपल्या शिष्यांस पहिल्यानें ह्मणूं लागला, तुह्मी आपणांस परोश्यांच्या खमीरापासून संभाळा, तें तर ढोंग आहे.

---

(१) १ करिं. १३:५. (२) मार्क. १२:१३. (३) मात्थ. १६:६, मार्क. ८:१५.

विश्वास न ठेवावा म्हणून प्रयत्न केले. जे खोटा उपदेश करून अज्ञानी व गरीब लोकांस फसवून गैरमार्गांत लावितात त्यांसारिखे पापी व दोषी असे क्वचितच आहेत.

५३ "फार संतापून." ते रागें भरून त्याला फासांत पाडायास प्रयत्न करीत गेले. याकरितां उत्तर देण्यास अवकाश न देतां पुष्कळ प्रश्न उतावळीनें करून त्याला कुंठित करावें अथवा त्यानें कांहीं गैर बोलावें म्हणून ते टपत बसले.

५४ "त्याजवर दोष ठेवावा."सान्हीद्रिम नामक राष्ट्रिक सभेसमोर त्यावर दोष ठेवून त्याला मरणदंड ठरवावा असे प्रयत्न ते करीत होते.

या गोष्टींवरून सिद्ध होतें कीं (१) वाईट लोकांचा निषेध केला तर ते फारकरून रागें भरतील. निषेध खरा व योग्य आहे असें किती जरी त्यांचें मन साक्ष देतें तरी ते निषेधणाऱ्यांचा द्वेष करतीलच. (२) वाईट लोक आपल्यामनाचा निषेध टाळायास कसे प्रयत्न करितात हे दिसून येतात. पश्चात्ताप न करितां ते निषेधणाऱ्याचा जीव घ्यायास पाहतात.

(३) येशू ख्रीस्त माणसांचा सर्वांहून प्रिय मित्र असतांहि ते त्याचा अतिशय द्वेष करितात.

(४) येशूचें ज्ञान, स्थिर बुद्धि व पवित्रता हीं दिसून येतात. ते कितीहि टपत बसले व रागें भरले तरी त्याच्या तोंडांतून अनुचित असा एक शब्द निघाला नाहीं. तो सर्वदा शांत, सौम्य, सुज्ञ, व स्थिर असून त्यांचे कपट व फांस टाळीत असे. तो अद्यापि सर्वज्ञानी व सर्वसमर्थ आहे. तो आपल्या लोकांचें रक्षण या जगांत करील आणि शेवटीं त्यांस आपल्याजवळ सौख्य लोकांत घेईल.

अध्याय १२.

१ "इतक्यांत." तो परोश्याच्या घरीं संभाषण करीत होता इतक्यांत. "हजारों." मोठा समुदाय मिळाला होता, आणि हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं तो लोकांचा पापाबद्दल निषेध विश्वासुपणानें करीत असे तेव्हां ते रुसून निघत असत असें नाहीं, तर दाटीनें जमत असत, जो विश्वासु उपदेशक पाप्यांचा निषेध करितो तो ठीक ईश्वराच्या शास्त्राप्रमाणें उपदेश करितो असें त्यांचें मन ह्मणतें. "खमीरापासून." मात्थ. १६:६. यावरील टीका पाहा. "ढोंग." मात्थ. ७:५ यावरील टीका पाहा. ढोंग खमीरासारिखें आहे, कारण (१) तें गुप्त राहतें, एकाएकीं कळत नाहीं. (२) तें फार

२ कारण कीं जें प्रगट होणार नाहीं असें कांहीं [1] झांकलेलें नाहीं, व जें कळणार नाहीं असें कांहीं गुप्त नाहीं.

३ यास्तव जें जें तुह्मी अंधारांत बोललां तें सर्व उजेडांत ऐकण्यांत येईल, आणि जें तुह्मीं एकांतीं कानांत सांगितलें तें धाब्यांवर गाजवितील.

४ अणखी तुह्मा माझ्यां मित्रांस [2] मी सांगतों, जे शरिराला जिवें मारितात, व त्यानंतर अणखी कांहीं करायाला समर्थ नाहींत त्यांस [3] भिऊं नका.

५ तुह्मीं तर कोणाला भ्यावें हें मी तुह्मास दाखवितों; जिवें मारल्यावर जो नरकांत टाकायाला समर्थ आहे त्याला भ्या, होय मी तुह्मास सांगतों, त्याला भ्या.

६ पांच चिमण्या दोन पैस्यांस विकतात कीं नाहीं? तथापि त्यांतून एकहि देवासमोर विसरलेली नाहीं.

७ परंतु तुमच्या डोक्याचे सर्व केंस देखील मोजलेले आहेत; यास्तव भिऊं नका, तुमचें मोल बहुत चिमण्यांहून अधिक आहे.

८ अणखी मी तुह्मास सांगतों, जो कोणी माणसांसमोर मला अंगीकारील [4] त्यालाहि मनुष्याचा पुत्र देवाच्या दुतांसमोर [5] अंगीकारील.

९ आणि जो माणसांसमोर मला नाकारील [6] तो देवाच्या दुतांसमोर [7] नाकारण्यांत येईल.

१० आणि जो कोणी मनुष्याच्या पुत्राविरुद्ध कांहीं गोष्ट बोलेल त्याला तिची क्षमा होईल, परंतु जो पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करील त्याला क्षमा होणार नाहीं. [8]

---

(१) मात्थ. १०:२६, लूक. ८:१७, मार्क. ४:२२. (२) यो. १५:१४. (३) यश. ५१:७-१३, मात्थ. १०:२८. (४) १ शमु. २:३०, गीत. ११९:४६, २ तीम. २:१२, प्रग. २:१०. (५) यहूद. २४. (६) प्रेषि. ३:१३,१४, प्रग. ३:८. (७) मात्थ. २५:३१. (८) मात्थ. १२:३१, १ यो. ५:१६.

व्यापक आहे. खमीर सगळा गोळा लवकर व्यापितें. तसेंच ढोंग जर दूर केलें नाहीं तर तें लवकर आमचें करणें बोलणें चालणें या सर्वांत, होय देवाची भक्ति करणें यांत देखील व्यापून राहील. (२) तें उगवितें. ढोंगी गर्विष्ठ होतो. ख्रीस्ताचा खरा शिष्य हा प्रामाणिक, भगर्दी ढोंगाविरहित होतो. जो ख्रीस्तासारिखा व्हायास पाहतो त्यानें सर्व ढोंग दूर करावें व नम्रबुद्धि बाळगावी.

२–९ यावर मात्थ. १०;२६–३२ एथली टीका पाहा.

१०यावर मात्थ.१२:३२ एथील टीका पाहा.

११ आणि ते तुह्मास सभा व सरकार व अधिकारी यांसमोर नेतील,
तेव्हां कसें काय उत्तर द्यावें किंवा काय बोलावें याविषयीं (१) काळजी
करूं नका.
१२ कारण कीं जें कांहीं बोलायाचें तें पवित्र आत्मा त्याच घटकेस
तुह्मास शिकवील. (२)
१३ तेव्हां समुदायांतील कोणीएकानें त्याला ह्मटलें, हे गुरू, मला
वतनाचा वांटा द्यावा (३) ह्मणून माझ्या भावाला सांग.
१४ मग तो त्याला ह्मणाला, माणसा, (४) मला तुह्मावर न्यायाधीश
किंवा वांटणारा असें कोणी नेमिलें?
१५ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, संभाळा (५) लोभाविषयीं जपा, कां कीं
कोणाचेंहि (६) जीवन त्याच्या अतिशय द्रव्यानें नाहीं.

(१) मात्थ. १०:१९; मार्क. १३:११; लूक. २१:१४. (२) प्रेषि. ६:१०,२६. (३) यहेज्क. ३३:३१. (४) यो. १८:३५. (५) १ तीम. ६:७-१०. (६) ईयो. २:४, मात्थ; ६:२५

११,१२ यावर मात्थ. १०:१७-२० एथली टीका पाहा.

१३ "कोणी एकानें." याचें भावासीं कांहीं भांडण झालें असेल आणि ख्रीस्ताचा लोकांवर अधिकार व वजन पाहून यानें मनांत आणिलें असेल कीं त्यानें माझा पक्ष धरून ठरविलें तर भावाला ऐकावें लागेल. "वतनाचा वांटा." वतनाविषयीं यहुद्यांचा नेम होता कीं जेष्ठ पुत्राला दोन वांटे व बाकीच्या एकएक लेंकराला एक वांटा द्यावा. अनु. २१:१७.

१४ "मला तुह्मावर न्यायाधीश." इ. असल्या खटल्याचा इनसाफ करावा हें माझें काम नव्हे, सरकाराकडे जा. येशू लोकांच्या जीवात्म्यांचें तारण व्हावें व त्यांस अविनाशी वतन मिळावें ह्मणून आला. सर्व ऐहिक वतन व माल हलकीं आहेत आणि यांविषयींचे खटले पाहायाला अमलदार नेमिले आहेत. ख्रीस्त असल्या संसारिक खटल्यांत हात घालीना. लोकांनीं एकमेकांचे अन्याय करूं नयेत तर एकमेकांचें कल्याण पाहून जें योग्य तेंच मात्र करीत जावें, असा उपदेश तो करीत असे. त्याला ठाऊक होतें कीं अंतःकरण शुद्ध असलें व शास्त्राप्रमाणें चालणें झालें म्हणजे अन्याय व जुलूम होत नाहीं. यास्तव तारणोपाय सिद्ध करावा व आत्मिक गोष्टींकडे लक्ष देऊन उपदेश करावा हेंच माझें काम असें तो मानीत असे. तसेंच उपदेशक व पालक जे आहेत त्यांनीं करावें. भांडण झालें म्हणजे बोध करून समेट करितां येईल तर अवश्य करावा, परंतु सरकारी कामदाराचा अधिकार चालवावा हें त्यांस योग्य नाहीं. हें हिंदु लोकांस समजलें म्हणजे बरें होईल. बहुत्येक आपले संसारांतले खटले मिशनेरी साहेबांकडे व नेटिव पाळकांकडे आणितात. त्यांस समजावें कीं हें योग्य नाहीं.

१५ "लोभाविषयीं जपा." या दोन भावांतून निदान एक लोभिष्ट आहे असें पाहून ख्रीस्तानें लोभाचा निषेध केला. लोभ हा फार रूढीन, बाधक, होय नाशकारक पाप

१६ आणि त्यानें त्यांस दाखला सांगितला कीं, कोणीएका धनवान
माणसाच्या जमिनीला फार पीक आलें.
१७ तेव्हां त्यानें आपल्या मनांत असा विचार केला कीं, काय करूं!
कारण कीं माझीं पिकें सांठवायास मला जागा नाहीं.
१८ मग त्यानें ह्मटलें, मी हें करीन, [1] आपलीं कोठारें मोडून
त्यांहून मोठीं बांधीन, मग तेथें मी आपलें सर्व उत्पन्न व आपला माल
सांठवीन.
१९ नंतर मी आपल्या जिवाला [2] ह्मणेन, हे जिवा, तुला बहुत वर्षां-
पुरता पुष्कळ [3] माल ठेविला आहे विसांवा घे, खा, पी, आनंद कर.
२० परंतु देवानें त्याला ह्मटलें, अरे मूर्खा, याच रात्रीं तुझा [4] प्राण
तुजजवळ मागतील; तेव्हां त्वां तयार केलें तें कोणाचें होईल? [5]

---

(१) याक. ४:१५,१६. (२) गीत. ४९:१८. (३) उप. ११:९; १ करिं. १५:३२; याक. ५:५.
(४) ईयो. २०:२०–२३,२७:८; गीत. ५२:७; याक. ४:१४. (५) गीत. ३९:६,४९:१६,१७;
इर्म. १७:११.

आहे. निर्ग. २०:१७; कल. ३:५; एफ. ५:३; इब्री. १३:५. "कोणाचेंहि जीवन." इ. द्रव्य मिळविण्यास फार काळजी बाळगूं नका. मिळविलें तरी जीवन ज्यास्त होईल अथवा आयुष्य वाढेल असें नाहीं. आयुष्य थोडें किंवा दीर्घ होईल हें ईश्वराच्या मर्जीवर अवलंबून राहतें.

१६ "दाखला." मात्थ. १३:३ एथली टीका पाहा.

१७ "विचार केला." तो श्रमी व चिंताक्रांत झाला. हें द्रव्याचें फळ आहे. तें संभाळावें म्हणून बहुत श्रम व मेहनत पडते.

१८,१९ तो उपाय योजितो. कोठारें मोडून अधिक मोठीं बांधावीं मग आपलें सगळें पीक माल वगैरे भरून सुख व समाधान भोगावें, असें मनांत आणून तो तसें करितो, मग जिवाला म्हणतो, भरपूर आहे. "खा, पी, आनंद कर." प्राचीन एपक्युरियन व नास्तिक यांचें हेंच मत व हीच वहिवाट होती; आणि हल्लीं हजारों हजार तसेंच करितात. ते जग हुडकून उंच खाणें मिळवितात, ख्यालीखुशाली करितात व विलाससुख मात्र भोगायास पाहतात. अभ्यासेंकरून अक्कल मिळविली पाहिजे, अंतःकरण शुद्ध केलें पाहिजे व जीवात्म्याचें तारण साधून घेतलें पाहिजे, असें मनांत न आणितां केवळ पशूवाणी दैहिक सुख पाहावें हें केवढें मूर्खपण आहे.

२० "अरे मूर्खा, याच रात्रीं." इ. तो सुख भोगण्यास तयार झाला इतक्यांत त्याचें आयुष्य भरलें. एका क्षणीं त्याची आशा भंग झाली आणि त्याचा जीवात्मा ईश्वरापासीं हिशोब द्यायाला गेला. तसीच हजारों लोकांची गोष्ट होती. ऐहिक सुखापासून ते एकाएकीं काढिले जाऊन परलोकीं कांहींच सुख कधीं पावत नाहींत. किती जरी द्रव्य त्यांनीं या जगांत मिळविलें तरी तेणेंकडून परलोकीं एक क्षणभर चैन मिळत नाहीं. तें द्रव्य त्यांच्यानें परलोकीं नेववत नाहीं.

२१ जो आपल्यासाठीं[1] द्रव्य सांचवितो व देवाविषयीं[2] धनवान नाहीं, तो तसाच आहे.

२२ तेव्हां त्यानें आपल्या शिष्यांस ह्मटलें, यास्तव मी तुह्मास सांगतों, आपण काय खावें असी आपल्या जिवाविषयीं, अथवा आपण काय पांघरावें असी शरिराविषयीं[3] काळजी करूं नका.

२३ अन्नापेक्षां जीव व वस्त्रापेक्षां शरीर अधिक आहे.

२४ कावळ्यांकडे[4] लक्ष द्या, ते पेरीत नाहींत, व कापीतहि नाहींत, त्यांस बळद नाहीं व कोठारहि नाहीं, तरी देव त्यांस पोसितो; पांखरांपेक्षां तुह्मी किती श्रेष्ठ आहां?

(१) हब. २:२. (२) १ तीम. ६:१८; याक. २:५; लूक. १२:३३. (३) मात्थ. ६:२५. (४) ईयो. ३८:४१; गीत. १४७:९.

त्यावर लोभ ठेवून त्यांनीं आपल्या जिवात्म्याचा नाश करून घेतला, आणि मग ज्यांच्या हातीं तें द्रव्य पडतें त्यांचीहि बिघडणूक व नाश वरचेवर होतात. गीत १७:१४.

२१ "देवाविषयीं धनवान नाहीं." आकाशलोकांतलें वतन आपलें असें करून घेत नाहीं. जो धनलोभी असून देवावर प्रीति करीत नाहीं तो तसाच आहे, ह्मणजे तो या जगांत दोन दिवसांचें हलकें सुख कदाचित् पावेल, मग त्याला सर्वकाळचें दुःख प्राप्त होईल. या दाखल्यावरून हाच बोध होतो कीं, १ संसारांत दुष्टलोक वारंवार यशस्वी होतात. त्यांची जमीन फार सुपीक होती. तरी यावरून देवाची कृपा त्यांवर आहे, असें समजायाचें नाहीं. यापेक्षां "तो त्यांचें मागणें देतो परंतु त्यांच्या आत्म्यांत रोडपण घालितो" असें समजायाचें आहे. २ धन द्रव्य हीं आपल्या बरोबर बहुत श्रम व काळजी आणितात. ३ धनाकडून लोभ वाढतो व अंतःकरण देवापासून अधिक दूर होतें म्हणून तें जीवात्म्याला बाधकारक होतें. ४ माझ्या द्रव्यानें काय चांगलें काम साधण्यांत येईल असें नाहीं, तर तें कोठें सांचवून ठेवूं हीच धनलोभ्याची काळजी असती. ५ धनलोभी जे आहेत त्यांच्यानें आपल्या द्रव्याच्या योगानें मरण चुकवत नाहीं. मरण येईलच येईल: त्यांस वाटत नाहीं तेव्हां एकाएकीं कदाचित् येईल, मग लक्षावधि रुपये खर्चून त्यांच्यानें आपलें आयुष्य एक क्षणभर वाढवत नाहीं, व एका क्षणाचें चैन मिळवत नाहीं. ६ जो याप्रमाणें आपल्या द्रव्यावर भरवसा ठेवून अविनाशी वतनावर नजर ठेवीत नाहीं तो देवाच्या दिसण्यांत मूर्ख आहे, आणि वास्तविक मूर्ख आहे असी त्याचीहि खातरी लवकर होईल. ७ सुज्ञान हेंच आहे कीं प्रथम देवाचें राज्य शोधून मरणास सिद्ध व्हावें, मग इहलोकीं आमचा वांटा कसा होईल अथवा मरण किती लवकर येईल यांविषयीं चिंता नाहीं. आमचा संग्रह सौख्यलोकांत सांठवून ठेवला तर तेथें जाऊन तें अविनाशी वतन पाहावें ती फार सुखाची वेळ होईल.

२२–३१ यांवर मात्थ. ६:२५–३३ एथली टीका पाहा.

२५ आणि काळजी करून आपली उंची हातभर वाढवायास तुह्मा-
मध्यें कोण समर्थ आहे?
२६ यास्तव अति लहान गोष्ट देखील तुमच्यानें होत नाहीं तर
वरकडांविषयीं काळजी कां करितां?
२७ फुलझाडें कसीं वाढतात, हें लक्षांत आणा, तीं श्रम करीत नाहींत
व कांतीत नाहींत, तरी मी तुह्मास सांगतों, शलमोन देखील आपल्या
सर्व वैभवांत त्यांतल्या एकासारिखाहि त्याला नव्हता.
२८ तर अहो अल्पविश्वासी, रानांतलें गवत आज आहे व उद्यां भट्टींत
पडेल त्याला देव असा पोशाक देतो, तर किती विशेषेंकरून तुह्मास देईल?
२९ आणि आपण काय खावें किंवा काय प्यावें याविषयीं काळजी
करूं नका, व चिंताक्रांत असूं नका.
३० कां कीं जगांतील राष्ट्रं तीं अवघीं मिळावयास झटतात, आणि
त्यांची गरज तुह्मास आहे हें तुमचा बाप जाणतो.
३१ परंतु [१] तुह्मी देवाचें राज्य मिळवायास झटा, मग तींहि सर्व
तुह्मास मिळतील. [२]
३२ हे लहान कळपा, भिऊं नको, [३] कारण कीं, तुह्मास राज्य
द्यावें [४] असा तुमच्या बापाचा मनोदय आहे.
३३ तुह्मी आपली मालमत्ता विकून [५] गरिबांस द्या; ज्या पिशव्या जुन्या
होत नाहींत व जी संपत्ति [६] सरत नाहीं, ती आकाशामध्यें चोर जवळ
येत नाहीं व कसर नाश करीत नाहीं तेथें तुह्मी आपल्यांसाठीं करून ठेवा.

(१) मात्थ. ३:३३. (२) गीत. ३४:१०; यश. ३३:१६; रोम. ८:३१,३२. (३) यश. ४०:११; यो. १०:२७,२८. (४) मात्थ. २५:३४; यो. १८:३६; इब्री. १२:२८; याक. २:५; २ पेत्र. १:११; प्रग. १:६,२२:५. (५) मात्थ. १९:२१; प्रेषि. २:४५,४:३४. (६) मात्थ. ६:२०; १ तीम. ६:१९.

३२ "हे लहान कळपा." मी मेंढपाळ आहें, व माझे शिष्य कळप असें ख्रीस्त वरचेवर लक्षून बोलत असे. ही उपमा सुंदर व बोधकारक आहे. मेंढपाळ आपल्या मेंढरांचें पोषण व रक्षण करीत असतो, रात्रंदिवस त्याजवळ असतो. तसा येशू चांगला मेंढपाळ आहे, आपल्या भक्तांचा संभाळ व संरक्षण करीत असतो; त्यांस कोवळ्या कुरणांत व निवांत पाण्यावर नेत असतो. त्यावेळेस त्याचे कळप लहान होते. थोडके त्याच्या मागें चालले, तरी तोच मेंढपाळ असतां त्यांस कांहीं भय धरायाचें नव्हतें; आणि त्यांस राज्य द्यावें असा जो मनोदय त्यानें दाखविला तो आजपर्यंत तो पूर्ण करीत आला आहे.

३३ "आपली मालमत्ता विकून गरिबांस द्या." त्या वेळचे ख्रिस्ती लोक या बोधा-

३४ कां कीं जेथें तुमची संपत्ति आहे तेथें तुमचें चित्तहि लागेल.

३५ तुमच्या कंबरा बांधलेल्या[१] व दिवे पाजळलेले[२] असोत.

३६ आणि जीं माणसें आपला धनी लग्नापासून माघारा येण्याची
वाट पाहतात, त्यानें येऊन ठोकल्यावर त्यासाठीं लागलेंच आपण उघ-
डावें ह्मणून, त्यांसारिखे तुह्मी व्हा.

३७ धनी येऊन ज्या चाकरांस जागें राहतांना पाहील तेच[३] धन्य;
मी तुह्मास खचीत सांगतों कीं, तो कंबर बांधून त्यांस जेवायाला बसवील,
व जवळ येऊन त्यांची चाकरी करील.

३८ आणि तो रात्रीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रहरांत आला व त्यांस
असें करितांना पाहिलें तर ते चाकर धन्य आहेत.

३९ अणखी हें समजा कीं, अमक्या घटकेस चोर येईल,[४] हें घर
धन्याला कळलें असतें, तर तो जागा राहिला असता, आणि त्यानें
आपलें घर फोडूं दिल्हें नसतें.

---

(१) एफ. ६:१४; १ पेत्र. १:१३. (२) मात्थ. २५:१,१३. (३) मात्थ. २४:४६.
(४) १ थेस. ५:२; २ पेत्र. ३:१०; प्रग. ३:३;१६:१५.

प्रमाणें करीत असत. प्रेषि. २:४४;४:३२; ५:२; यो. १२:६. "ज्या पिशव्या." इ. या जगांत सर्व पिशव्या झिजून जातात, द्रव्य उडून जातें, नाहीं तर आम्हास तें सोडून जावें लागतें. परंतु सौख्यलोकांत जो संग्रह तो अविनाशी आहे; तो कधीं उडून जात नाहीं आणि एकदां मिळाला म्हणजे आह्मांस कधीं सोडावा लागणार नाहीं.

३४ "जेथें तुमची संपत्ति." इ. कोणी-एका माणसाचे प्रिय देश व मित्र कोण व कोठें आहेत हें त्याच्या संभाषणावरून लवकर कळतें. तसेंच माझी संपत्ति आकाशलोकीं आहे असें कोणीएकाला समजलें म्हणजे त्याचें बोलणें चालणें यावरून कळेल.

३५ "तुमच्या कंबरा." इ. मेहनती व उद्योगी असून आपलें कर्त्तव्य करण्यास व परलोकीं जाण्यास सिद्ध असा. २ राजे. ४:२९; ९:१; यर्मे. १:१७; प्रेषि. १२:८. "दिवे पाजळलेले." इ. याचा तोच अर्थ. चाकर जागें राहून आपल्या धन्याची वाट पाहतात, तसेंच तुम्हीं मरण पावण्यास हमेशा सिद्ध असावें.

३६ यावर मात्थ. २५:१–१३ एथली टीका पाहा.

३७ "तो कंबर बांधून." इ. यावरून प्रभूची अतिशय कृपा व विनय दिसून येतात. तो देव असून आपलें वैभव व तेज एकीकडे ठेवून आम्हां गरीब पाप्यांसाठीं दासाचें रूप धरून या जगांत आला, व आम्हासाठीं अति दुःख सोसून मरण पावला. याचे एवढे उपकार आम्ही कसें मानूं. याजवर केवढी प्रीति करावी? व एकमेकांचीहि कसी प्रीति व सेवा करण्यास सिद्ध असावें?

३८—४६ यावर मात्थ. २४:४२–५१; १४:२५ एथें टीका पाहा.

४० यास्तव तुह्मीहि [१] तयार असा, कां ज्या घटकेंत तुह्मास वाटत नाहीं त्या घटकेंत मनुष्याचा पुत्र येईल.

४१ तेव्हां पेत्रसानें त्याला ह्मटलें, हे प्रभू, हा दाखला तूं आह्मास किंवा सर्वांसहि सांगतोस?

४२ तेव्हां प्रभु बोलला, तर आपल्या परिवाराला नेमलेल्या वेळेस अन्न वांटून द्यायास ज्याला धनी त्यांवर ठेवील असा विश्वासू व बुद्धिमान [२] कारभारी कोण आहे?

४३ ज्या चाकराला त्याचा धनी येऊन तसें करितांना पाहील [३] तो धन्य.

४४ मी तुह्मास खचीत सांगतों कीं, त्याला तो आपल्या सर्व मालमत्तेवर ठेवील.

४५ परंतु माझा धनी येण्यास उशीर करितो असें तो चाकर आपल्या अंतःकरणांत ह्मणाला, आणि चाकरांस व चाकरिणींस मारूं [४], व खाऊं पिऊं व झिंगूं लागला.

४६ तर ज्या दिवसीं तो वाट पाहत नाहीं त्या दिवसीं, व जी घटका तो जाणत नाहीं त्या घटकेंत त्या चाकराचा धनी येईल व त्याला [५] कापून टाकील, आणि अविश्वास्यांबरोबर त्याला वांटा देईल.

४७ आणि जो चाकर आपल्या धन्याची इच्छा जाणून [६] तयार झाला नाहीं व त्याच्या इच्छेप्रमाणें वर्त्तला नाहीं तो बहुत फटके [७] खाईल.

४८ परंतु ज्यानें न [८] जाणून फटके मारण्याजोगीं कामें केलीं तो थोडके खाईल. कां कीं ज्या कोणाला [९] बहुत दिल्हें आहे त्यापासीं बहुत मागतील आणि ज्याच्या जवळ बहुत ठेविलें [१०] त्यापासीं अधिक मागतील.

---

(१) लूक. २१:३४,३६. (२) करिं. ४:२. (३) लूक. १२:३७. (४) मात्थ. २२:६.
(५) गीत. ३७:९; ९४:१४. (६) याक. ४:१७. (७) अनु. २५:२. (८) प्रेषि. १७:३०.
(९) ले. ५:१७; यो. १५:२२; १ तीम. १:१३. (१०) १ तीम. ६:२०.

---

४७ "धन्याची इच्छा जाणून." इ. जे शुभवर्त्तमान समजून व तारण पावावें म्हणून काय केलें पाहिजे हें जाणून करीत नाहींत त्यांचा दोष व दंड इतरांपेक्षां भारी होईल.

४८ यहुदी एका अपराधाबदल चाळीसांपेक्षां अधिक फटके मारीत नसत. अनु. २५:३. अपराध लहान असला तर योग्यते प्रमाणें चार, पांच, साहा फटके मारीत

४९ मी पृथ्वीवर आग लावायास आलों आहें आणि ती लवकर पेटावी ह्मणून मी किती इच्छितों बरें!

५० आणि मला बाप्तिस्मा घ्यायाचा आहे, आणि तो अटोपेपर्यंत मी कसा पेंचलों आहें!

५१ मी पृथ्वीवर शांति करायास आलों[1] असें तुह्मास वाटतें काय? मी तुह्मास ह्मणतों, असें नाहीं, तर फूट.

५२ कां कीं आतांपासून एका घरांत पांच, दोघांवर तिघे व तिघांवर दोघे फुटलेले असे होतील.

५३ पुत्रावर बाप[2] व बापावर पुत्र, कन्येवर आई व आईवर कन्या, सासु आपल्या सुनेवर व सून आपल्या सासुवर, असे ते फुटतील.

५४ अणखी तो समुदायांस ह्मणाला, तुह्मी ढग पश्चिमेकडून चढतांना पाहतां[3] तेव्हांच ह्मणतां पाऊस येतो, आणि तसें होतें.

---

(१) मात्थ. १०:३४. (२) मीख. ७:६. (३) मात्थ. १६:२.

असत. ही वहिवाट लक्षून येशूनें हें म्हटलें, एकएकाला त्याचें ज्ञान, अक्कल, प्रसंग यांप्रमाणें जाब द्यावा लागेल. मात्थ. २५:१४-३० यावरील टीका पाहा.

४९ "आग लावायास." इ. एथें आग हें फूट, तंटा भांडण याचें चिन्ह आहे. गीत. ६५:१२; यश. ४३:२. पृथ्वीवर शांति व्हावी म्हणून येशू जगांत आला खरा, तरी माणसांचा स्वभाव भ्रष्ट असतां बहुतेक सत्सुवार्त्ता अंगीकारीत नाहींत, असें केवळ नव्हे तर अंगीकारणाऱ्यांचा द्वेष करितात व पाठीस लागतात, असें होईल आणि असें घडल्यानेंच खरा धर्म प्रवृत्त होईल व ख्रिस्ती मंडळी वाढत जाईल हें ख्रीस्ताला ठाऊक होतें, म्हणून त्यानें ही इच्छा दाखविली. एथें लक्ष्यांत ठेवावें कीं, १. जेव्हां लोक आपल्या तारणाविषयीं काळजी धरून ख्रीस्ताला अंगीकारितात, तेव्हां बहुत एक द्वेष व विरोध करितील. २ माणसांचें अंतःकरण अति दुष्ट आहे. नाहीं तर त्यांनीं ख्रीस्ताचा व त्याच्या धर्माचा विरोध कधीं केला नसता. सर्व प्रकारची दुष्टाई जरी देवाला नापसंत व त्रासदायक आहे तरी तेणेंकरून चांगलें फळ यावें म्हणून तो दुष्टाईला घडूं देतो.

५० "मला बाप्तिस्मा." इ. मात्थ. २०:२३ पाहा. "पेंचलों आहें." मला दुःख व वेदना सोसून जीव द्यायाचा आहे हें ख्रीस्ताला ठाऊक होतें, म्हणून लवकर सोसून माझें काम सिद्धीस न्यावें असी त्याची इच्छा होती. तसली इच्छा आम्हींहि बाळगावी हें अनुचित नाहीं.

५१—५३ यावर मात्थ. १०:३४-३६ यांची टीका पाहा.

५४—५७ यावर मात्थ. १६: २, ३ यांची टी. पा.

५५ आणि दक्षिण वारा सुटतो तेव्हां तुह्मी ह्मणतां ऊन पडेल, आणि तसें होतें.

५६ अहो ढोंगी, पृथ्वीचीं व आकाशाचीं लक्षणें पारखून जाणायास तुह्मास येतें, तर ही वेळ तुह्मी कसी जाणत नाहीं?

५७ अणखी जें यथार्थ तें तुह्मी आपणच[१] कां ठरवीत नाहीं?

५८ तूं आपल्या वाद्याच्या संगतीं अधिकाऱ्याकडे[२] जासील तेव्हां वाटेवर[३] त्यापासून सुटायास यत्न कर, नाहीं तर कदाचित् तो तुला न्यायाधिशाकडे ओढून नेईल, आणि न्यायाधीश तुला शिपायाच्या हातीं देईल, व शिपाई तुला बंदिशाळेंत घालील.

५९ मी तुला सांगतों, तूं शेवटली दमडी देखील फेडसील तोंपर्यंत तेथून सुटणारच नाहींस.

१३ अध्याय.—आणि त्या वेळेस तेथें कित्येक होते त्यांनीं ज्या गालील्यांचें
[४] रक्त पिलातसानें त्यांच्या यज्ञासीं मिळविलें[५] त्यांविषयीं त्याला सांगितलें.

---

(१) १ करिं. ११:१४. (२) मात्थ. ५:२५. (३) यश. ५५:६. (४) प्रेषि. ५:३७.
(५) विल. २:२०.

"ही वेळ." ढग चढतांना पाहून पाऊस येणार आणि दक्षिण वारा सुटला म्हणून ऊन पडणार असें तुम्ही समजतां; तर माझा उपदेश ऐकून व म्यां केलेले चमत्कार पाहून मशीहा येण्याची हीच वेळ आहे असें सहज कां समजत नाहीं बरें?

५८,५९ यावर मात्थ. ५:२५,२६ यांची टीका पाहा.

अध्याय १३.

१ "गालील्यांचें रक्त." इ. जे गालिलांत राहणारे त्यांचें. गालीलाविषयीं मात्थ. २:२२ पाहा. या वेळेस हेरोद आंतिपास गालील प्रांतांत आणि पिलातस यहुदांत राज्य करीत होता. ही गोष्ट वास्तविक घडली होती असें दिसतें. ती ख्रीस्ताच्या ऐकण्यांत तोंवर आली नसेल. ती कसी घडली व पिलातसानें त्या गालीलांस कशासाठीं मारिलें हें तपसीलवार माहीत नाहीं. गालीली फार दुष्ट होते आणि पिलातस व हेरोद यांचा परस्पर द्वेष व भांडण चालत होतीं हें माहीत आहे. हे गालीली यज्ञ करण्यास यरूशालेमास आले असतील आणि देवळांत तंटा भांडण करितांना पिलातसानें त्यांच्या हेरोद राजाचा द्वेष करून एकाएकीं त्यांस हल्ला करून मारिलें असें कीं त्यांनीं मारलेल्या यज्ञपशूंच्या रक्तासीं त्यांचेंहि रक्त पडून मिश्रित झालें. पिलातसानें बुद्ध्या त्यांचें रक्त त्यांच्या जनावरांच्या रक्तासीं मिसळलें असें समजायाचें नाहीं. त्यानें त्यांस मारिलें आणि रक्त रक्तासीं अवचित मिसळलें. ज्यांनीं ही गोष्ट ख्रीस्ताला सांगितली त्यांस त्या गालील्यांचा एवढा भयंकर नाश झाला यावरून ते फार पातकी असतील असें वाटलें.

२ तेव्हां येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं या गालील्यांची असी दुर्दशा
झाली, यावरून ते सर्व गालील्यांहून पापी होते असें तुह्मास वाटतें काय?
३ मी तुह्मास सांगतों, नव्हते, परंतु जर तुह्मी पश्चात्ताप करीत नाहीं
(१) तर त्याप्रमाणें तुह्मी सर्व नाश पावाल.
४ किंवा ज्या अठरांवर शिलोहांतील बुरूज पडल्यावरून त्यांचा
घात झाला, ते यरूशलेमांत सर्व राहणाऱ्या माणसांपेक्षां अन्यायी होते,
असें तुह्मास वाटतें काय?
५ मी तुह्मास सांगतों, नव्हते, परंतु जर तुह्मी पश्चात्ताप करीत नाहीं
तर त्याप्रमाणें तुह्मी सर्व नाश पावाल.

(१) प्रेषि. ३:१९; प्रग. २:२१,२२.

२,३ "मी तुम्हास सांगतों, नव्हते." तुम्ही असें मनांत आणूं नका. तुम्हीहि पापी आहां आणि पश्चात्ताप केला पाहिजे, नाहीं तर तुम्हीहि त्याप्रमाणें भयंकर नाश पावाल. हें भविष्य वचन पूर्ण झालें. यरूशालेमाचा नाश झाला त्यावेळेस बहुत यहुदी देवळांत व कित्येक यज्ञ करितांना मारिले गेले. मात्थ. २४ यावर टीका पाहा. कोणीएकांस मोठें संकट प्राप्त झालें तर ते फार दुष्ट असें फारकरून इतर लोकांस वाटतें. ईयोबाची गोष्ट व त्याचे तीन मित्र त्यावर कसा दोष ठेवूं लागले, पाहा. हें मत कधीं खरें कधीं खोटें असें होतें. कोणी दारू पिऊन अथवा सातवी आज्ञा मोडून आपल्या अंगीं नाशकारक रोग करून घेतो तेव्हां त्याचा नाश दुष्टाईचें फळ आहे असें सिद्ध होतें. परंतु कोणीएकाच्या घरास आग लागून तें जळून गेलें अथवा कोणी विजेनें मरून पडला, अथवा, अमक्या देशांत दुष्काळ किंवा पटकी लोकांस लागली तर ते इतर लोकांपेक्षां वाईट असें कल्पायाचें नाहीं. ही प्रतिफळ पावण्याची वेळ नाहीं. या जगांत चांगले व वाईट, भक्त व अभक्त, सर्वांस कमी ज्यास्त दुःख प्राप्त व्हायाचें आहे. परलोकीं न्याय ठरेल. तेथें एकएकाला त्याच्या कर्मांप्रमाणें फळ प्राप्त होईल. इतर लोक फार दुष्ट आहेत असें जेव्हां कोणी मनांत आणूं लागतात तेव्हां आपण कसे, आह्मास काय प्रतिफळ योग्य, असी आपली परीक्षा पाहावी. इतर लोक किती जरी वाईट असले तरी आम्हीहि पापी आहों आणि आह्मासहि मरण येत आहे व ईश्वरा समोर हिशोब द्यावा लागेल. एथें जें संकट पडतें तें कितीहि भारी असो तें लवकर ढळतें, परंतु परलोकीं येईल तें संकट सर्वकाळचें आहे, तें कधीं सरणार नाहीं.

४ "किंवा ज्या अठरांवर." इ. हा बोध त्यांच्या मनांत ठसावा या हेतूनें येशूनें हेंहि उदाहरण दाखविलें. ही गोष्ट घडल्याला फार वेळ झाली नव्हती; व त्या सर्वांस कळलीं असेल. शिलोहाचें तळें जीयोन डोंगराच्या पायथ्यास होतें, आणि हा बुरूज जवळ बांधिला होता असें कीं तेंच नांव त्याला पडलें. या बुरूजानें पडून त्या अठरांस मारिलें यावरून लोकांस वाटलें कीं ते विशेष दुष्ट होते.

५ "मी तुह्मास." इ. येशूनें त्यांस समजाविलें कीं हें मत योग्य नाहीं. इहलोकीं

६ तेव्हां त्यानें हा दाखला सांगितला, कोणीएकाच्या [1] द्राक्षमळ्यांत
अंजिराचें झाड लाविलेलें होतें, तो त्यावर फळ पाहायास आला [2] परंतु
त्याला मिळालें नाहीं.
७ तेव्हां त्यानें माळ्याला ह्मटलें, पाहा, तीन वर्षें या अंजिरावर फळ
पाहायास येतों परंतु मला मिळत नाहीं, तें तोडून टाक; उगीच भूमीला
भार [3] कां असावा?
८ तेव्हां त्यानें त्याला उत्तर दिल्हें कीं, महाराज, यंदांहि तें असूं
दे [4], ह्मणजे मी त्याच्या भोंवतें खणीन व खत घालीन.
९ मग फळ दिल्हें तर बरें, नाहीं तर [5] मग तें तोडून टाकावें.
१० आणि तो शाब्बाथ दिवसीं एका सभास्थानांत उपदेश करीत होता.
११ तेव्हां पाहा, जिला अठरा वर्षें [6] विकाराचा आत्मा होता असी
बायको तेथें होती, आणि ती कुबडी असतां तिला अगदीं उभें राहवत नव्हतें.

---

(1) यश. ५:१; मात्थ. २१:१९. (2) यो. १५:१६; गल. ५:२२; फिल. ४:१७. (3) निर्ग. ३२:१०. (4) १०६:२३; २ पेत्र. ३:९. (5) यो. १५:२; प्रग. ६:८. (6) गीत. ६:२.

प्रतिफळ पावायाचें नाहीं. जे अतिदुष्ट ते कधीं कधीं या जगांत सुख पावतात, इतक्यांत देवभक्त दुःख भोगतात. गीत ७३. तरी ईश्वर न्यायी आहे आणि शेवटीं सर्वांस योग्य प्रतिफळ प्राप्त होईलच.

६,७ "तीन वर्षें." फळ यावें ह्मणून धन्याला वाटलें तेव्हांपासून बरीच वेळ तो वाट पाहत आला. त्याला वाटलें कीं अद्यापि फळ देत नाहीं तर देणार नाहीं, आणि एथें उगेंच राखावें कां बरें? यापेक्षां तोडून टाकावें आणि त्याच्या ठिकाणीं उपयोगी झाड लावावें हें बरें. यहुदी कसे कृतघ्न, निरूपयोगी व दुष्ट झाले होते हें या दाखल्यावरून दर्शविलें आहे. द्राक्षमळ्याचा धनी ह्मणजे देव असें समजावें; द्राक्षमळा ह्मणजे यहुदी लोक; तो त्यावर फळ पाहायास आला म्हणजे त्यांनीं पश्चात्ताप करून व सदाचरण दाखवून देवाचें गौरव पाहावें ह्मणून तो वाट पाहत आला; फळ मिळालें नाहीं ह्मणजे ते अपश्चात्तापी व दुष्ट राहून देवाची सेवा करित नात. माळी यावरून ख्रीस्त, प्रेषित, उपदेशक वगैरे जे यहुदी लोकांनीं पश्चात्ताप करून देवाकडे वळावें आणि तारण पावावें ह्मणून प्रयत्न करीत होते, ते दर्शविले आहेत.

८,९ यंदांहि तें असूं दे." ही विनंती ऐकून ईश्वर पाप्यांचें सहन करीत असतो, परंतु जे पापें पदरांत घेत नाहींत व देवासीं समेटानें मिळत नाहींत त्यांस तोडून तो शेवटीं दंड करीलच, आणि हें योग्य आहे असें सर्व ह्मणतील. याप्रमाणें ईश्वर प्राचीन काळीं यहुद्यांसीं वागत असे, आणि सांप्रतकाळींहि तो तसाच सर्वांसीं वागतो; अणि जे पश्चात्ताप करीत नाहींत व त्याची सेवा करीत नाहींत त्या सर्वांस तो तोडून नरकांत पाडील.

१०,११ "विकाराचा आत्मा." हा रोग सैतानानें तिजवर आणिला होता, व तो बहुत

१२ तेव्हां येशूनें तिला पाहून बोलाविलें व तिला ह्मटलें, बाई, तूं
आपल्या विकारापासून [१] सुटली आहेस.
१३ मग तो तिजवर [२] हात ठेवितांनाच ती नीट झाली, व देवाला
गौरवूं लागली.
१४ परंतु येशूनें शाब्बाथ दिवसीं [३] बरें केलें यामुळें सभेचा अधि-
कारी रागें भरून समुदायाला बोलला, ज्यांमध्यें काम करावें असे [४] साहा
दिवस आहेत, तर त्यांत येऊन बरे होत जा, परंतु शाब्बाथ दिवसीं येऊं नको.
१५ यावरून प्रभूनें त्याला उत्तर दिल्हें कीं, अरे ढोंग्या, [५] तुह्मा-
मधील प्रत्येक जण आपल्या बैलाला [६] किंवा गाढवाला शाब्बाथ दिवसीं
गव्हाणींतून सोडून पाजायास नेतो कीं नाहीं ?

---

(१) योए. ३:१०. (२) मार्क. १६:१८; प्रेषि. ९:१७. (३) मात्थ. १२:१०; मार्क. ३:२; लूक. ६:७;१४:३, यो. ५:१६. (४) नीर्ग. २०:९. (५) नी. ११:९; मात्थ. ७:५;२३:१३,२८; लूक. १२:१. (६) लूक. १४:५.

दिवसांचा असल्यावरून हा मोठा व खरा चमत्कार असें सर्वांस दिसून आलें.

१२,१३ "विकारापासून सुटली आहेस." हें आश्चर्यवंत बोलणें आहे. तिनें आपण बरें व्हावें ह्मणून ख्रीस्तापाशीं अर्जी केली होती असें दिसत नाहीं. परंतु तिला पाहून तो बोलला, तेव्हांच ती नीट झाली. यावरून किती बळकट प्रमाण पटलें कीं हा येशू खरा मशीहा आहे. "देवाला गौरवूं लागली." देवाची स्तुति केली. तिजवर मोठे उपकार झाले होते, आणि हे ओळखून मी आभारी आहें असें तिने दाखविलें. अशा वेळेस कृतघ्न बुद्धि दाखवावी हें मोठें पाप आहे. जे मोठे उपकार पावून कृतघ्न राहतात त्यांस देवाची अवकृपा प्राप्त झाली तर काय आश्चर्य!

१४ "अधिकारी रागें भरून......बोलला." त्यानें जर योग्य विचार केला असता तर एवढा मोठा चमत्कार पाहून, हा खरा मशीहा असावा असी खातरी धरली असती. तरी त्यासारिखे हल्लीं बहुत लोक आहेत. किती जरी चांगलें काम साधलें आहे, जर त्यांच्या मर्जीप्रमाणें साधलें नाहीं तर ते उगाच दोष ठेवितात. २. ते इतर लोकांचें चांगलें काम लक्षांत आणीत नाहींत, परंतु त्याचें जें उणें तें फुगवून प्रसिद्ध करितात. ३. ते एवढे वाईट होतात कीं ज्यांनीं उपकार केले त्यांवर, असें केवळ नाहीं, तर ज्यांवर उपकार झाले त्यांवरहि ते रागें भरतात. जे बरे होण्यासाठीं आले त्यांवर सभेचा अधिकारी रागें भरला. ४. जे असें करितात ते हेवा व मत्सर बाळगून करितात. हे लोक यहुदी धर्माधिकाऱ्यांस सोडून ख्रीस्तामागें चालतात असें पाहून त्यानें रागें भरून व द्वेष करून त्यांस धमकाविलें. ईर्षा, मत्सर व द्वेष हीं एवढीं प्रबळ होतात कीं ईश्वरी तेज व सामर्थ्य झांकून ठेवितात हें केवढें आश्चर्य !

१५ "अरे ढोंग्या" ! तूं आपल्या पशूंवर करितोस तेवढी दया म्यां या बायकोवर केल्यामुळें तूं मजवर दोष ठेवितोस काय ?

१६ आणि ही आब्राहामाची कन्या [१] असतां जिला सैतानानें अठरा वर्षें बांधिलें आहे, तिला या बंधनापासून शाब्बाथ दिवसीं सोडायाचें नव्हतें काय?

१७ तो हें बोलत असतां त्याचे सर्व अडविणारे लाजले [२] आणि त्यानें जे चमत्कार केले त्या सर्वांवरून [३] सर्व समुदाय आनंद करूं लागला.

१८ मग तो बोलला, देवाचें राज्य [४] कशासारिखें आहे, व मी तें कशासारिखें लेखूं?

१९ मोहरीच्या दाण्यासारिखें आहे; तो एका माणसानें घेऊन आपल्या मळ्यांत टाकिला. मग तो वाढून असें मोठें झाड झाला कीं, आकाशांतील पांखरें त्याच्या फांद्यांमध्यें वस्तीस राहिलीं.

२० आणि तो फिरून बोलला, मी देवाचें राज्य कशासारिखें लेखूं?

२१ तें खमिरासारिखें आहे, तें बायकोनें घेऊन [५] तीन शेर पिठामध्यें लपविलें सर्व फुगून गेलें तोंपर्यंत.

---

(१) लूक. १९:९. (२) यश. ४५:२४; १ पेत्र. ३:१६. (३) नीर्ग. १५:११; गीत. १११:२; यश. ४:२. (४) मात्थ. १२:३१; मार्क. ४:३०. (५) मात्थ. १३:३३.

---

१६ "ही आब्राहामाची कन्या." ती यहुदीण होती यामुळें ती बरी झाली आहे असें पाहून या अधिकाऱ्यानें आपल्याच मताप्रमाणें विशेष आनंद करावा. "सैतानानें...बांधिलें आहे." दुष्ट आत्मा ह्मणजे भुतें यांच्या अधिकाऱ्याला सैतान, बालजबूल, अजगर, जुना साप व द्याबलस असें ह्मटलें आहे. मात्थ. १२:२४; प्रग. १२:९; २०:२. त्यानें हा विकार त्या बायकोला लाविला होता. ईश्वर सैतानाला असें कां करूं देतो? हा प्रश्न कोणी करील तर ईश्वर दुष्ट मनुष्याला आपल्या शेजाऱ्याचा अन्याय कां करूं देतो? अथवा त्याचा घात कां करूं देतो? त्याला एवढेंच उत्तर आहे कीं जे भ्रष्ट होऊन पापी झाले आहेत त्यांमध्यें अपराध होतीलच, परंतु जे अपराध करितात त्यांस हायहाय.

१७ "त्याचे सर्व अडविणारे." ह्मणजे सभेचा अधिकारी व त्याच्या तरफेचे जे ते. त्यांचा दुष्ट हेतु उघड झाला. एथें लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं, १ ख्रीस्ताचें अडविणारे हे हमेशा शास्त्री, परोशी व अधिकारी लोक असे होते. त्यांनीं स्वार्थबुद्धीनें त्याला अडविलें. लोक त्याच्यामागें चालले तर आमचें वजन व पत कमी होतील असें भय वाटलें. २ साधारण लोक ख्रीस्ताचें हर्षानें ऐकत असत व त्यांपैकीं बहुत एक त्यावर विश्वास ठेवीत असत. जे नम्र ते धन्य, कारण ते ख्रीस्ताला अंगीकारून सौख्य लोकांत पोहंचून देवाला पाहतील.

१८–२१ या दाखल्यांचा अर्थ मात्थ. १३:३१–३३ एथें पहा.

२२ तेव्हां तो उपदेश करीत नगरोनगरीं व गांवोगांवीं जाऊन यरू-
शलेमाकडे चालला.
२३ मग कोणी एकानें त्याला ह्मटलें, हे प्रभू, जे तारण पावतात ते
थोडके कीं काय?
२४ तेव्हां तो त्यांस ह्मणाला, अरूंद दरवाज्यानें आंत जायाला (१)
मोठा लगट करा, कारण कीं मी तुह्मास सांगतों, (२) बहुत आंत जायास
झटतील परंतु त्यांच्यानें जाववणार नाहीं.

(१) मात्थ. ७:१३. (२) यो. ७:३४; ८:२१; रोम. ९:३१.

२२ "तो उपदेश करीत" इ. उपदेशकांनीं व सर्व ख्रिस्ती लोकांनीं लक्षांत ठेवावें कीं ख्रीस्त आपल्या कामांत सर्वदा निमग्न होत असे, प्रवास करीत होता तेव्हां देखील अंतरत नसे, घरीं दारीं सर्वत्र व सर्वकाळ देव जो बाप त्याची इच्छा पूर्ण करावी हें त्याचें खाणें पिणें होतें, आणि याविषयीं तो आह्मांस कित्ता असा आहे.

२३ "मग कोणी एकानें." इ. हा कोण होता हें दर्शविलें नाहीं. कोणी अडविणारा असेल आणि हा प्रश्न करून त्यानें ख्रीस्ताला फाशांत पाडायास पाहिलें असेल. यहुद्यांचें मत होतें कीं थोडकेच तारण पावतील. मिसरांतून लक्षावधी निघाले त्यांपैकीं दोनच मात्र वचनरूप कनान देशांत पोहोंचले, तसेंच त्या गुणोत्तरानें सर्व मनुष्यजातींपैकीं थोडकेच सौख्यलोकांत पोंहचतील असें त्यांस वाटलें. याविषयीं त्या माणसानें ख्रीस्ताचें मत विचारिलें. हा प्रश्न पोकळ होता ह्मणून ख्रीस्तानें नाश पावण्याचें केवढें भय आहे हें सुचवून त्यानें आपलें तारण साधून घेण्यास नेट लावून प्रयत्न करावे, असा बोध केला.

२४ "अरूंद दरवाज्यानें" मात्थ. ७:१३, १४ यावर पाहा. "मोठा लगट करा." ग्रीक लोक धांव मारीत व कुस्ती वगैरे खेळ करीत असत, आणि हीं करितांना पैज जिंकायाला अतिशय नेट लावून प्रयत्न करीत असत. जे पैज जिंकायाला पाहत ते बहुत दिवस शिकून व अभ्यास करून तयारी करीत असत, मग हजारों लोकांच्या देखतां पैज व मान मिळविण्यास आपली सगळी शक्ति खर्चून व नेट लावून लगट करीत असत. ती सवई लक्षून ख्रिस्तानें हें म्हटलें. नव्या करारांत अनेक ठिकाणीं ही सवई लक्षांत आणून असला बोध केला आहे. १ करिं. ९:२४–२६; फिल. ३:१६; इब्री. १२:१. अर्थ हाच कीं; सौख्यलोकांत जें अविनाशी वतन तें या जगाचें सर्व द्रव्य, मान वगैरे यांपेक्षां अतिशय मोलवान आहे, म्हणून एथली पैज जिंकून मान मिळविण्यास कोणी नेट लावून असी मेहनत करील तर किती विशेषेंकरून सौख्यलोकांत जाण्यास आह्मीं लगट करावा? "बहुत आंत जायास झटतील." तारण पावावें, सौख्यलोकांत जावें असी इच्छा धरीत नाहीं ह्मणून कोण आहे? बहुत, होय सर्व कमी ज्यास्त प्रयत्न करितात, "परंतु त्यांच्यानें जाववणार नाहीं." कां बरें! कारण, १ ते पुरते प्रयत्न करीत नाहींत. ते जरासे प्रयत्न करितात पण लवकर दमतात; चंचळ बुद्धि धरून एका दिवसीं ते चांगला निश्चय करितात पण

२५ घरधन्यानें उठून[1] दार बंद केल्यावर[2] तुह्मी बाहेर उभे
राहून व दारावर ठोकून बोलूं लागाल कीं, हे प्रभू, प्रभू,[3] आह्मासाठीं
उघड; मग तो तुह्मास उत्तर देईल कीं, तुह्मी कोठले आहां, मी तुह्मास
ओळखत नाहीं.
२६ तेव्हां तुह्मी बोलूं लागाल, आह्मी तुझ्या देखतां खालें पिलें, आणि
त्वां आमच्या रस्त्यांमध्यें उपदेश केला आहे.

(१) गीत. ३२:६; यश. ५५:६. (२) मात्थ. २५:१०. (३) लूक. ६:४६.

लवकर मोडतात; मंडळीस मिळतात पण लवकर करार मोडतात; धावूं लागतात, पण लवकर हटतात; ऐहिक लाभ मिळविण्यास जसे नेट लावून प्रयत्न करीत जातात तसे ते करीत नाहींत ह्मणून सौख्य लोकांत जाऊं शकणार नाहींत. २ बहुतेक योग्य प्रयत्न करीत नाहींत, ह्मणजे देवानें नेमिले ते उपाय न करितां ते व्यर्थ उपाय करितात. ते तीर्थयात्रा, तपश्चर्या, देहदंड, मूर्तिपूजा वगैरे करितात, तंत्रमंत्र सांगतात, गंगातीरीं जाऊन स्नान करितात, परंतु हे सर्व उपाय व्यर्थ पडतात. किती जरी खर्च, मेहनत व नेट लावून केलें तरी फळ येत नाहीं. हे सर्व उपाय मनुष्यकृत आहेत, देवानें नेमिले नाहींत ह्मणून जे करितात ते सौख्यलोकांत जाऊं शकणार नाहींत. ३ अणखी बहुतेक, होय हजारों हजार उशिरां प्रयत्न करितात ह्मणून चुकतात. अघोर पाप केल्यावर ते रडतात पण यहुदा इस्कारयोतासारिखे क्षमा न पावतां ते नरकांत पडतात; अथवा आयुष्य विलासांत व पापांत खर्चल्यावर मरणास टेंकिले ह्मणजे ते प्रभू, प्रभू, अशी हाक मारितात पण तो ऐकत नाहीं. आकाशलोकाचें दार बंद केलें ह्मणून कितीहि ठोकिलें व नेट लावून लगट केला तरी व्यर्थ होईल. दार बंद आहे आणि ते बाहेरल्या अंधारांत सर्वकाळपर्यंत शोक करतील. लक्षावधि असे आहेत. ते ह्मणतात कीं खिस्ती शास्त्रांत वर्णलेला तारणोपाय सोपा आहे; शेवटीं आम्ही करूं, पण आतां नाहीं. ऐहिक सुख आतां पाहिजे, मग मरण जवळ आलें ह्मणजे आम्ही पश्चात्ताप करून खीस्तावर विश्वास ठेवूं; असें मनांत आणून ते उशीर करीत जातात, पवित्र आत्मा त्यांस सोडून जातो, त्यांचें मन अधिक कठीण होतें, मग एकाएकीं ते अपश्चात्तापी असून मरून नरकांत पडतात. हे सर्व सौख्य लोकांत जाऊं शकणार नाहींत.

२५ "दार बंद केल्यावर." "कृपेची वेळ गुजरती." सौख्यलोकाचें दार उघडें असें सर्वकाळ राहणार नाहीं. घरधनी आपलें दार बंद करितो तसें आकाशलोकाचें दार बंद होईल म्हणून पाप्यांनीं आतां देवाशीं समेटानें मिळायास झटावें.

"आज सोईची वेळ, प्रसन्नतेचा काळ."

२६ मात्थ. ७:२२,२३ यांवर पाहा. ज्याबरोबर कोणी जेवितो त्याशीं तो कांहीं सहवास व मैत्री ठेवितो असें दिसतें, म्हणून ही गोष्ट काढून त्यांनीं खीस्ताचे मित्र मोजले जाण्याचा हक्क दाखविला. "त्वां आमच्या रस्त्यांमध्यें उपदेश केला आहे." यावरूनहि आम्ही तुझे मित्र आहों असें दाखवावें म्हणून त्यांच्या मनांत होतें. माणसें कशीं सहज फसतात ? त्यांच्या अंतःकरणांत कांहीं सद्गुण, कांहीं धार्मिकपण, कांहीं देवा-

२७ परंतु तो बोलेल, (१) मी तुह्मास सांगतों, तुह्मी कोठले आहां मी तुम्हास ओळखत नाहीं; अहो सर्व अन्याय (२) करणारे, मजपासून दूर व्हा.

२८ अब्राहाम व इझाक व याकोब व सर्व भविष्यवादी यांस देवाच्या राज्यांत असतांना व आपणांस बाहेर टाकलेलें, असे पाहाल तेव्हां रडणें व दांत खाणें (३) होईल.

२९ आणि पूर्वेकडून व पश्चिमेकडून व उत्तरेकडून व दक्षणेकडून येतील, (४) व देवाच्या राज्यांत बसतील.

३० आणि पाहा, (५) शेवटले ते पहिले होतील असे आहेत, आणि पहिले ते शेवटले होतील असे आहेत.

३१ त्याच दिवसीं कित्येक परोशी येऊन त्याला ह्मणाले, एथून निघून जा. कांकीं हेरोद तुला जिवें मारायास पाहतो.

(१) मात्थ. ७:२२,२३; २५:१२,४१. (२) गीत. ६:८; १०१:८. (३) मात्थ. ८:१२; १३:४२; २४:५१. (४) प्रग. ७:९,१०. (५) मात्थ. १९:३०.

वरील प्रीति नसतांहि आपण त्याचे मित्र आहों व मरण पावण्यास सिद्ध आहों असें ते मनांत आणून फसतात. खरोखर पश्चात्ताप, विश्वास, प्रीति, सद्गुण व धार्मिकपणा हीं असल्यावांचून कोणी सौख्यलोकांत जाऊं शकणार नाहीं. थोडकेच तारण पावतील काय? हा प्रश्न मोठा व भारी आहे, असें दिसतें. तर ख्रीस्ताने होय किंवा नाहीं असें उत्तर कां दिल्हें नाहीं बरें? तर फारकरून त्यानें पाहिलें कीं वादविवाद करावा हाच मात्र या माणसाचा हेतु आहे, म्हणून वाद टाळून जीवात्म्याचें तारण साधून घेण्याचें किती अगत्य आहे, हें कसें साधेल, व नेट लावून प्रयत्न करणें किती जरूर आहे, यांविषयीं त्याला समजवावें हें ख्रीस्ताला बरें वाटलें. ख्रीस्ताला ठाऊक होतें कीं जीवात्म्याचें मोल सगळ्या जगापेक्षां मोठें आहे आणि तारण पावावें म्हणून पापवासना व वाईट भावना दाबून मन शुद्ध केलें पाहिजे, हें काम साधण्यास मोठे प्रयत्न लवकर, नेहमी व शेवटपर्यंत केले पाहिजेत, नाहीं तर मरण लवकर येईल व आकाशलोकांचें दार बंद केलें जाईल.

२७ मात्थ. ७:२३ पाहा.

२८—३० मात्थ. ८:११,१२ यावरील टीका पाहा.

३१ "कितीएक परोशी." यांनीं सांगितलें तें संभाव्य होतें. हेरोदानें योहान्नाला जिवें मारिलें होतें आणि ख्रीस्ताची कीर्त्ति वाढत आहे असें पाहून त्यानें ईर्षा बाळगून त्यालाहि मारावें यांत काय आश्चर्य? या परोश्यांनीं येऊन त्याला हेरोदाचा हा बेत सुचविला यावरून हे ख्रीस्ताचे मित्र असें दिसलें खरें, तथापि त्याला भय दाखवून आपल्या राज्यांतून घालवावें या हेतूनें धूर्त्त हेरोदानें स्वतः त्यांस ख्रिस्ताकडे पाठविलें असेल.

३२ त्यानें त्यांस ह्मटलें, जाऊन त्या खोंकडाला [1] सांगा, पाहा, आज
व उद्यां मी भुतें काढितों, व रोग्यांस बरें करितों, मग परवां पूर्ण [2] होईन.
३३ तरी यरूशलेमाबाहेर भविष्यवाद्यानें नाश पावावा असें होतच नाहीं.
३४ हे [3] यरूशलेमा, यरूशलेमा, भविष्यवाद्यांचा घात करणाऱ्या व
आपल्याकडे पाठविलेल्यांस धोंडमार करणाऱ्या, जसें कोंबडी आपलीं पि-
लें पंखांखालीं एकवट करिती तसें तुझ्या लेंकरांस एकवट करायास कि-
तीदा माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती.
३५ पाहा, तुमचें घर तुह्माकरितां ओसाड पडलें आहे, आणि मी
तुह्मास खचीत सांगतों कीं, प्रभूच्या नांवानें येणारा तो सुवंदित, असें ह्म-
णाल, ती वेळ येईपर्यंत तुह्मी मला पाहणारच नाहीं.

---

(१) सफ. ३:३. (२) इब्री. २:१०. (३) मात्थ. २३:३७.

---

३२ "त्या खोंकडाला." खोंकड कपटी व धूर्त असतो. हेरोदाचे हे दुर्गुण लक्षून ख्रीस्तानें त्याला खोंकड असें ह्मटलें. "आज व उद्यां मी भुतें काढितों." इ. त्याला सांगा कीं मी त्याच्या राज्यांत चमत्कार करितों व त्याचें भय न धरितां थोडी वेळ करीत जाईन; "मग परवां पूर्ण होईन." काम सिद्धीस नेऊन, मरण पावण्यास सिद्ध होईन.

३३ "तरी..मला फिरलें पाहिजे." माझें काम आटोपलें नाहीं, अणखी थोडी वेळ तें चालविलें पाहिजे. मग यरूशालेमास पोहंचून जीव द्यायास तयार होईन. हेरोद मला मारणार नाहीं. भविष्यवाद्यांचा घात होत आला तें प्रख्यात ठिकाण यरूशालेम आहे. तेथें मी जातों आणि तेथें ते मला जिवें मारतील. ख्रीस्ताला ठाऊक होतें कीं दुर्भाषणाचा दोष मजवर ठेवून ते मला मरणदंड ठरवायास पाहतील, आणि हा खटला तर यरूशालेमांत सान्हिद्रिम सभेंत आणिला पाहिजे. याविषयीं निर्णय करायाला दुसऱ्या कोणी एकाला अधिकार नव्हता. शिवाय घात पावण्याची तीच जागा असें जाणून त्यानें ह्मटलें. हेरोदाकडून नव्हे तर यरूशालेमांत माझा घात होईल. व तुम्ही परोशी व शास्त्री मला माराल.

३४,३५; मात्थ. २३:३७–३९ पाहा.

ख्रीस्तानें एथें ह्मटलें यावरून असें समजावें कीं, १ आमचा जीव देवाच्या हातांत निर्भय आहे. दुष्ट लोक, ईश्वर त्यांस करूं देतो त्यापेक्षां आह्मांविरुद्ध कांहीं करूं शकत नाहींत. २ दुष्ट लोक आह्मांस धमकावितात तेव्हां त्यांचें न ऐकतां व भय न धरितां आह्मी केवळ देवाचें ऐकावें, आणि जें काम त्यानें आमच्या हातीं सोंपून दिलें आहे तें निर्भयतेनें करीत जावें. ३ अशा दुष्टाविषयीं आह्मी सावध असावें. ते मैत्रीचें सोंग धरून वरचेवर आमचा नाश करायास पाहतात. ४ खऱ्या धर्माचीं गुणलक्षणें एथें दिसून येतात. देवाचे खरे भक्त माणसाला भीत नाहींत. ते देवावर भरवसा ठेवून जें कर्तव्य तें धैर्यानें करीत जातात. तसें ख्रीस्तानें केलें आणि या सर्वांविषयीं तो आह्मांस परिपूर्ण कित्ता असा झाला आहे.

१४ अध्याय.—आणि असें झालें कीं तो शाब्बाथ दिवसीं परोश्यां-
तील कोणीएका अधिकाऱ्याच्या घरीं जेवायास गेला, [१] तेव्हां ते त्याच्या
जपणीस बसत होते.

२ आणि पाहा, त्याच्या समोर कोणी जलोदरी माणूस होता.

३ येशूनें शास्त्र्यांस व परोश्यांस उत्तर दिल्हें कीं, [२] शाब्बाथ दिवसीं
बरें करणें योग्य आहे काय?

४ तेव्हां ते उगेच राहिले, मग त्यानें त्याला घेऊन बरें केलें व जाऊं
दिल्हें.

५ मग त्यांस उत्तर दिल्हें, [३] तुह्मामधील कोणाचें गाढव किंवा बैल
खांचेंत पडला तर तो शाब्बाथ दिवसीं त्याला लागलाच बाहेर काढणार
नाहीं काय?

६ तेव्हां त्यांच्यानें त्याला त्या गोष्टींचें उत्तर देववेना.

---

(१) गीत. ३७: ३२; यश. २९:२०,२१. (२) लूक. १३:१४. (३) लूक. १३:१५.

अध्याय १४.

१ "परोश्यांतील कोणी एका अधिकाऱ्याच्या घरीं." हा परोशी कांहींसा वजनदार होता आणि राष्ट्रिक सभेंतला एक सभासद होता असें दिसतें. ख्रीस्ताची परीक्षा पाहावी म्हणून त्यानें त्याला बोलाविलें असेल. ख्रीस्त त्याच्या घरीं शाब्बाथ दिवसीं जेवायाला गेला यावरून कोणी एकाला आश्चर्य वाटेल, तर त्यानें लक्षांत आणावें कीं, १ ख्रीस्ताला घर नव्हतें. तो प्रवास करीत होता आणि कोठेंतरीं लोकांच्या घरीं उतरावें लागलें. २ करमणूक व्हावी ह्मणून, असें नव्हे, तर देवाचें काम चालवावें ह्मणून तो त्या घरीं गेला. तेथें देवाची गोष्ट सांगायाला व चमत्कार करायाला चांगला प्रसंग होता. "जपणीस बसले होते." यावरून सिद्ध होतें कीं त्यांनीं स्नेहभावानें नव्हे तर अकस, ईर्षा व वैमनस्य बाळगून ख्रीस्ताला बोलाविलें होतें. त्यावर दोष ठेवावा ह्मणून ते त्याचें बोलणें व आचरण यांस टपत होते.

२,३. "कोणी जलोदरी." अंग अवयव यांत पाणी सांचून हा रोग होतो. हा विशेष दुःखकारक आणि फार करून असाध्य आहे. ख्रीस्ताची परीक्षा पाहण्यासाठीं परोश्यांनीं त्या रोगी माणसाला त्याजवळ ठेविलें असेल. "उत्तर दिल्हें." परोश्यांनीं कांहीं प्रश्न केला नव्हता, परंतु त्यांच्या मनांत होतें तें जाणून येशूनें त्यांस विचारिलें कीं "शाब्बाथ दिवसीं बरें करणें योग्य आहे काय?" आणि त्यांच्यानें नाहीं असें ह्मणवलें नाहीं.

४–६ "ते उगेच राहिले." जर कांहीं हरकत करायाची तर तेव्हांच करायाची होती, आणि नेमशास्त्राकडून शाब्बाथ दिवसीं बरें करणें मना झालें असतें तर त्यांनीं तें वाक्य काढून अवश्य दाखविलें अस-

७ आणि जे बोलाविले होते त्यांनीं मुख्य आसनें कसकसीं निवडून
घेतलीं, हें पाहून तो त्यांस दाखला देऊन ह्मणाला,
८ कोणीं तुला लग्नास बोलाविलें तेव्हां मुख्य आसनीं बसूं नको, [1]
कारण कीं तुजहून मोठ्या पदवीचा कोणी त्यानें बोलाविला असेल;
९ मग ज्यानें तुला व त्याला बोलाविलें तो येऊन तुला ह्मणेल, याला
जागा दे; तेव्हां तूं लाजेनें शेवटल्या जाग्यावर जाऊन बससील.
१० तर तूं बोलाविलेला अससील तेव्हां शेवटल्या जाग्यावर जाऊन
बैस, ह्मणजे ज्यानें तुला बोलाविलें तो येईल तेव्हां तुला ह्मणेल, मित्रा,
वर येऊन बैस; नंतर तुझ्या संगतीं बसणाऱ्यांसमोर तुझा मान होईल.
११ कां कीं जो कोणी आपणाला उंच करील तो नीच होईल, व
जो आपणाला नीच करील तो उंच होईल.
१२ मग ज्यानें त्याला बोलाविलें होतें त्यालाहि तो ह्मणाला, जेव्हां
दुपारचीं किंवा संध्याकाळचीं जेवणावळ करिसील तेव्हां तूं आपल्या मि-
त्रांस किंवा आपल्या भावांस किंवा आपल्या नातलगांस किंवा [2] धनवान
शेजाऱ्यांस बोलावूं नको, बोलाविलें तर कदाचित् तेहि तुला फिरून बो-
लावितील व तुझी फेड होईल.

(१) १ शमु. १५:१७; ईयो. २२:२९; गीत. १८:२७; नी. १५:३३,२९,२३; मात्थी. २३:१२, लूक. १८:१४, याक. ४:६. १ पेत्र. ५:५. नी. २५:६,७. (२) नी. २२:१६.

तें. सदर्हू प्रश्नाकडून त्यांस स्तब्ध केल्यावर ख्रीस्तानें त्या रोगी माणसाला घेऊन बरें केलें. असें करून त्यानें त्यांस निषेधलें असें केवळ नाहीं परंतु ते स्वतां शाब्बाथ दिवसीं आपल्या जनावरांस पाणी पाजीत व बरें करीत असत, असें त्यांच्या आठवणीस आणून त्यांचें ढोंग व दुष्ट बुद्धि प्रगट करून त्यांस अगदीं कुंठित केलें.

७–९ "जे बोलाविले होते;" त्या परोश्यानें आपले मित्रही बोलाविले होते असें दिसतें. "मुख्य आसनें......घेतलीं." हें त्यांचें विशेष गुणलक्षण होतें. मात्थी. २३.६ पाहा. येथें लक्षांत आणण्याजोगें आहे कीं ख्रीस्त सभ्यतेविषयीं निष्काळजी नव्हता. परोश्यांचा अहंपणा व गर्व निषेधावे हा त्याचा हेतु होता, परंतु असें करितांना त्यानें ख्रिस्ती धर्माचें एक गुणलक्षण प्रगट केलें. उद्धटपणा, गर्व, अहंपणा वगैरे सर्व दुर्गुण ख्रिस्ती शास्त्रांत निषेधिले आहेत, आणि आह्मीं नम्र कृपाळू परोपकारिक असून सर्वांसीं सभ्यतेने वागावें असें शिकविलें आहे. मात्थी. २२:२१; रोम. १३:७; १ पेत्र. २:१७.

१०-१२. "शेवटल्या जागेवर." कनिष्ठ आसनावर "जो कोणी आपणाला उंच करील." इ. माणसें गर्विष्ठ माणसाला नीच करायास पाहतात आणि ईश्वर हमेशा गर्विष्ठाला नीच करून गरीब व नम्र यांवर विशेष उपकार करीत असतो. "मित्रांस...

१३ तर तूं जेवणावळ करिसील तेव्हां (१) दरिद्र्यांस, व्यंगांस, लंगड्यांस,
अंधळ्यांस बोलाव, म्हणजे तूं धन्य होसील.
१४ कां कीं तुझी फेड करायास त्यांपासीं कांहीं नाहीं, कां न्यायींच्या
पुन्हा उठण्याच्या वेळेस तुझी फेड होईल.
१५ मग संगतीं बसणाऱ्यांतील कोणीएकानें या गोष्टी ऐकून त्याला
म्हटलें, जो देवाच्या राज्यांत भाकर खाईल (२) तो धन्य.
१६ तेव्हां त्यानें त्याला म्हटलें, (३) कोणीएका माणसानें मोठी जेवणा-
वळ केली, (४) व बहुतांस आमंत्रण केलें.
१७ मग जेवणाच्या वेळेस, आतां सर्व तयार झालें आहे, (५) यास्तव
या, असें आमंत्रितांस सांगायाला त्यानें आपला चाकर पाठविला.

(१) नहे. ८:१०,१२. (२) प्रग. १९:९. (३) मात्थ. २२:२,३. (४) यश. २५:६,७.
(५) नी. ९:२,५; यश. ५५:१,२

बोलावूं नको." एथें प्रभूनें मित्र व नातलग यांचें जेवायाला बोलावणें अगदीं मना केलें असें समजायाचें नाहीं, परंतु त्यांस बोलाविलें म्हणजे कांहीं पुण्य मिळेल असें कोणीं समजूं नये. शिवाय गरीबांस देणें हें बरें, आणि बडे लोकांसींच सहवास ठेवून त्यांपासून मान घ्यावा, व थोरपण मिरवावें हें वाईट असें दाखवावें म्हणून ख्रीस्ताचा हेतु होता. निर्ग. १६:८.१; शमु. १५:२२; इर्मया ७:२२,२३; मात्थी. ९:१३.

१३-१४ "दरिद्र्यांस;" इ. असल्या दुःखित व गरजवंत माणसांवर उपकार करा, म्हणजे तुम्ही आपला स्वार्थ पाहत नाहीं, परंतु परोपकारिक बुद्धि बाळगून गरीबांचें हित पाहतां असें उघड होईल; आणि हें पाहून ईश्वर परलोकीं तुमची फेड करील. मात्थी. १०:४२; २५:३४-३१ पाहा.

१५,१६ "जो देवाच्या राज्यांत भाकर खाईल तो धन्य." देवाचें राज्य म्हणजे जें राज्य स्थापायास ख्रीस्त आला होता तें. या राज्याविषयीं यहुद्यांनीं गैर समजून मनांत आणिलें कीं तें जगिक राज्य होईल; त्या राज्यांत भरपूर अन्न, मोठें सुख व स्वस्थता होईल. सत्ययुग होईल तेव्हां जगांतील लोकांपैकीं आपण धन्य होऊं असें यहुद्यांस वाटलें. कितीएकांस वाटलें कीं मोशे, आब्राहाम वगैरे प्रख्यात साधु संत मरून गेले आहेत ते त्या राज्यांत मेलेल्यांतून उठून या पृथ्वीवर पुन्हां जिवंत होतील. हें मत अनुसरून या माणसानें पुन्हां उठण्याविषयीं जें ख्रीस्ताचें बोलणें तें ऐकून या अर्थीं समजून घेतलें. त्याची गैरसमजूत दाखवावी म्हणून ख्रीस्तानें हा दाखला सांगितला. "बहुतांस आमंत्रण केलें." ज्यानें ही जेवणावळ केली तो ईश्वर आणि जेवणावळ म्हणजे तारणोपाय असें समजावें. हा उपाय सिद्ध करून ईश्वर आधीं यहुद्यांस मग सर्वांस आमंत्रण करितो. मात्थी.२२:१-१४ यावरील टी. पाहा.

१७-१८ "चाकर पाठविला." त्यांस पूर्वीं आमंत्रण केलें होतें, आतां जेवणावळ तयार आहे असें पाठवून कळविलें. "तें

१८ तेव्हां सगळे एकासारिखे निमित्त सांगूं लागले; पहिला [1] त्याला
ह्मणाला, म्यां शेत विकत घेतलें आहे, आणि तें मला जाऊन पाहिलें पा-
हिजे, मी तुला विनंती करितों मला क्षमा कर.

१९ आणि दुसरा बोलला, म्यां बैलांच्या पांच जोड्या विकत घेतल्या
आहेत, आणि मी त्यांची परीक्षा करायाला जातों, मी तुला विनंती करितों,
मला क्षमा कर.

२० आणि दुसरा एक बोलला, म्यां बायको केली आहे, [2] या कार-
णास्तव माझें येणें होत नाहीं.

(१) लूक. ८:१४. (२) लूक. १४:२६ ; १ करिं. ७:३३.

मला जाऊन पाहिलें पाहिजे." सर्व निमित्त सांगूं लागले. हा माझें शेत पाहायाला जाणें जरूर आहे असें बोलला. त्याला ठाऊक होतें कीं ज्यानें आमंत्रण केलें त्याचा अपमान होईल आणि तो मला आपल्या मित्रांमध्यें पुढें मोजणार नाहीं. तरी त्याचा तिरस्कार करून हा आपलेंच हित पाहतो. याप्रमाणें ईश्वर लोकांस तारण घ्यायाला बोलावितो, परंतु बहुतेक निमित्त सांगतात. या मनुष्यासारिखे ते ह्मणतात कीं, पोथी प्रार्थना करायाला अवकाश नाहीं. संसार पाठीस लागला आहे, काम धंदा चालविण्याचें अगत्य आहे. कोणी ह्मणतात कीं आतां खिस्ती झालों तर मोठी गैरसोय होईल. लोक निंदा करितील, नांव ठेवतील व सर्व प्रकारचें मोठें नुकसान होईल ह्मणून तूर्त माझ्यानें ख्रीस्ताला अंगीकारवत नाहीं. जो आमंत्रण करितो तो किती थोर व मेजवानी कसी अमोल्य आहे यांविषयीं मनांत न आणितां दोन दिवसांचा ऐहिक लाभ मिळविण्याकरितां तो सर्वकाळचें सुख व अविनाशी वतन गमावून टाकितो. जो कोणी आपल्या जीवात्म्याचें तारण साधण्याविषयीं हयगय करितो त्यानें कसेंहि निमित्त सांगितलें तरी तें ईश्वराला पसंत होणार नाहीं. तो ह्मणतो कीं प्रथम "देवाचें राज्य व त्याचें नीतिमत्त्व शोधा." जीवात्मा सगळ्या जगापेक्षां मोलवान आहे ह्मणून त्याचें तारण साधून घेणें इतर सर्व गोष्टींपेक्षां जरूर आहे.

१९–२० "त्यांची परीक्षा करायाला जातों." हें निमित्त कितो हलकें! त्यांची परीक्षा करण्याची दुसरी वेळ घेतली तर काय चिंता. परंतु पाप्यांचा हाच स्वभाव आहे. अगदीं हलकें निमित्त सांगून ते या जगाची घाणेरी माती गोळा करितात आणि उत्कृष्ट सोनें, ह्मणजे सर्वकाळचें सुख, टाकितात. "म्यां बायको केली आहे." परंतु यावरून निमित्त नसतां येण्याचें हेंच कारण होतें. मी खिस्ती झालों ह्मणजे आईबापें, बहिणभावंडें, बायको लेंकरें वगैरे नातलग हे हरकत व निंदा करितील असें ह्मणून जे ख्रीस्ताला अंगीकारीत नाहींत त्यांचा भ्रम व दोष दुपट होतात; कारण ते आपला असें केवळ नव्हे तर आपल्या प्रिय मित्रांचाहि नाश करून घेतात. ही मोठी चूक करितात असे बहुत आहेत. ते ह्मणतात कीं आईबापें वगैरे प्रिय मित्र मरून गेले ह्मणजे ख्रीस्ताला अंगीकारूं; आणि असें ह्मणून व उशीर करून ते आपण व त्याचे मित्रहि

२१ तेव्हां त्या चाकरानें येऊन आपल्या धन्याला हें वर्त्तमान सांगि-
तलें; तेव्हां घरधन्यानें रागें भरून [१] आपल्या चाकराला सांगितलें, नग-
राच्या मार्गांत व गल्ल्यांत [२] लवकर जा, आणि [३] दरिद्र्यांस व व्यंगांस,
व लंगड्यांस [४] व अंधळ्यांस इकडे आण.

२२ नंतर तो चाकर बोलला, महाराज, तुझ्या आज्ञेप्रमाणें केलें आहे,
तरी अद्याप [५] जागा आहे.

२३ मग धनी चाकराला ह्मणाला, रस्त्यामध्यें व कुंपणांमध्यें जाऊन
आग्रह [६] करून आण, माझें घर भरावें ह्मणून;

---

(१) गीत. २:१२. (२) प्रग. २२:१७. (३) १ शमु. २:८, गीत. ११३:७,८.
(४) गीत.३८:७; यश. ३३:२३,३५:६. (५) गीत. १०३,६:१३०:७. (६) गीत ११०:३.

मरून नरकांत पडतात. इतक्यांत त्यांनीं मनाच्या खातरीप्रमाणें ख्रीस्ताला एकाएकीं अंगीकारिलें ह्मणजे त्यांचें तारण झालें असतें असें केवळ नव्हे तर त्यांच्या बहुत मित्रांचेंहि तारण झालें असतें.

२१ "रागें भरून" इ० त्या घरधन्यानें असल्यांवर रागें भरावें हें जर योग्य तर ज्यांनीं देवाची अतिशय प्रीति व कृपा अव्हेरिली आहे त्यांवर देवानें रागें भरावें हें कितीं विशेषेंकरून योग्य आहे. "लवकर जा." इ० मेजवानी तयार आहे आणि जे येतात त्यांस लवकर आलें पाहिजे. किंचित् वेळ गमवायाची नाहीं. आयुष्य क्षणिक आहे, लवकर सरेल. आतांच आलें पाहिजे, नाहीं तर प्रसंग होऊन जाईल. आणि अभिमानी यहुदी निमित्त सांगून येत नाहींत तर गरीब विदेशी, होय, जे कोणी येतील त्यांस बोलावून आणा. हें बोलून ख्रीस्तानें दाखविलें कीं यहुदी मात्र तरतील असें नव्हे, त्यांतील बहुतेक निमित्त सांगून व देवाची कृपा अव्हेरून नाश पावतील इतक्यांत बहुत विदेशी येतील व तारण पावतील.

२२ "अद्याप जागा आहे." सौख्यलोक भरला नाहीं. कोट्यावधि ख्रीस्ताचें आमंत्रण ऐकून आले आहेत, तरी बहुत वासस्थानें आहेत. जो कोणी येईल त्याला ख्रीस्त घालविणार नाहीं. त्याला जागा मिळेल. ख्रीस्तानें जें प्रायश्चित्त केलें आहे तें सर्वांस पुरून उरेसें आहे; जी मेजवानी त्यानें सिद्ध केली आहे ती सर्व सृष्टीला पुरी आहे. तर सर्वांनीं यावें. जे निमित्त सांगून येत नाहींत तेच मात्र बाहेर राहतील, आणि त्यांनीं बाहेरल्या अंधारांत राहून सर्वकाळपर्यंत शोक करावा हें योग्य होईल. ते येईनात, आमंत्रण पावलें असतांहि ते येईनात, ह्मणून नाश पावले, असें होईल.

२३ "रस्त्यांमध्यें व कुंपणांमध्यें." जेथें कोठें गरीब पापी सांपडतील तेथें जाऊन त्यांस बोलाव, आग्रह करून त्यांस आण, त्यांस समजीव कीं ही मेजवानी उत्कृष्ट आहे, या; आकाशलोकांतलें सुख अमोल्य आहे, तें आपलें असें करून घ्या. याप्रमाणें ईश्वर आपल्या सर्व लोकांस आणि विशेषेंकरून आपल्या उपदेशकांस करायाला सांगतो. पाप्यांचा नाश व्हावा असी देवाची इच्छा नाहीं, तर त्यांनीं येऊन तारण घ्यावें ह्मणून त्यानें तारणोपाय सिद्ध करून त्यांस आमंत्रण केलें आहे.

२४ कारण मी तुह्मास सांगतों कीं, त्या आमंत्रित माणसांतून [1]
एकहि माझ्या जेवणापैकीं कांहीं चाखणार नाहीं.

२५ आणि त्याच्या बरोबर बहुत समुदाय चालले, तेव्हां तो मुरडून
त्यांस ह्मणाला.

२६ जर कोणी मजकडे येईल, आणि आपला बाप व आई व बायको
व लेंकरें व भाऊ व बहिणी यांचा [2] अणखी आपल्या जिवाचाहि [3] द्वेष
करीत नाहीं तर त्याच्यानें माझा शिष्य होवत नाहीं.

२७ आणि जो कोणी [4] आपला खांब वागवून माझ्या मागें येत ना-
हीं त्याच्यानें माझा शिष्य होवत नाहीं.

२८ कां तर तुह्मामधील असा कोण आहे कीं बुरूज बांधायाची इच्छा
असतां [5] संपविण्यापुरतें आपल्या जवळ आहे कीं काय, असें पहिल्यानें
बसून खर्चाचा हिशेब करीत नाहीं ?

२९ नाहीं तर कदाचित् पाया घातल्यावर त्याच्यानें संपववत नसलें,
तर सर्व पाहणारे त्याचा असा उपहास करूं लागतील कीं,

३० हा माणूस बांधूं लागला परंतु त्याच्यानें संपववेना. [6]

---

(१) नी. १:२४; मात्थ. २१:४३; इब्रि. १२:२५. (२) अनु. ३३:९; मात्थ. १०,३७.
(३) प्रेषि. २७:२४; प्रग. १२:११. (४) मात्थ. १५:२४; मार्क. ८:३४; लूक. ९:२३;
२ तीम. ३:१२. (५) नी. २४:२७. (६) इब्री. ६:११.

---

२४ "या आमंत्रित माणसांतून एकहि." इ० यावरून ख्रीस्तानें स्पष्ट करून दाखविलें आहे कीं जे असें निमित्त करून येत नाहींत ह्मणजे ख्रीस्ताला अंगीकारीत नाहींत परंतु शुभवर्त्तमान धिःकारितात ते सौख्यलोकांत कधीं पोहंचणार नाहींत. तर शुभवर्त्तमान धिःकारून देवाची कृपा अव्हेरणें हें किती भयकारक आहे!

२५–२७ यावर मात्थी. १०:३७,३८ एथें पहा.

२६ "द्वेष करीत नाहीं." एथें द्वेष करणें ह्मणजे कमी प्रीति करणें असें आहे. मात्थी. १०:३७ पाहा. आईबापांचा द्वेष करणें हें पांचवे आज्ञेविपरीत आहे. एफ. ६:१–३; कल. ३:२० पाहा. परंतु आईबापें, बायको वगैरे सर्वांहून प्रिय जे आहेत त्यांवर, होय आपल्याच जीवावर जी प्रीति करितों तिजपेक्षां अधिक प्रीति ख्रीस्तावर केली पाहिजे.

२८–३० "असा कोण आहे कीं," इ० कांहीं काम योजण्यांत आलें तर माझ्यानें सिद्धीस नेववेल कीं काय, हा पहिलाच विचार आहे. तसेंच ख्रीस्ताला अंगीकारण्याविषयीं केलें पाहिजे. आदीं पक्की खातरी असली पाहिजे, मग सोसण्याचें व शेवटपर्यंत टिकून राहण्याचें सामर्थ्य आहे कीं काय, असा विचार केला पाहिजे.

३१ अथवा असा राजा कोण आहे कीं, दुसऱ्या राजासीं लढाई करायास जात असतां पहिल्यानें बसून [1] विचार करीत नाहीं कीं, जो वीस हजार घेऊन मजवर येतो त्यासीं माझ्यानें दाहा हजार घेऊन भिडवतें काय?

३२ जर नाहीं, तर तो दूर आहे इतक्यांत हा वकिलांस पाठवून सला करण्याचें बोलणें लावितो.

३३ तर याप्रमाणें तुह्मामधील जो आपलें अवघें [2] सोडून देत नाहीं त्याच्यानें माझा शिष्य होवत नाहीं.

३४ मीठ [3] चांगलें आहे, परंतु मिठाचा खारटपणा गेला तर तें कशानें खारट होईल?

३५ तें जमिनीला किंवा उकरड्याला उपयोगी नाहीं, तें बाहेर टाकितात. [4] ज्याला ऐकायास कान आहेत तो ऐको.

(१) नी. २०:१८. (२) फिलि. ३:७,८. (३) मात्थ. ५:१३; मार्क. ९:५०. (४) यो. १५:६.

३२, ३३ "जर नाहीं, तर." इ० या दाखल्याचा अभिप्राय येणेंप्रमाणें आहे. १ जो कोणी ख्रीस्ताचा शिष्य व्हावयास पाहतो त्यानें बरोबर विचार करावा. याचा लाभ व परिणाम काय, याविषयीं बरोबर समजून त्यानें ख्रीस्ताला अंगीकारावें. इतर गोष्टींविषयीं लोक असे विचार करून काम सुरू करितात. तसें त्यांनीं आपलें तारण साधून घेण्याविषयीं करावें. २ सुमार्ग धरून चालतांना कांहीं विघ्नें लागणार नाहींत असें कल्पायाचें नाहीं. अडचणी लागतील. ख्रीस्ताकरितां निंदा, दुःख, होय मरण कदाचित् सोसावें लागेल, निदान आपल्या अंतःकरणांतल्या वाईट भावना दाखवून त्यांवर जय पावण्यास नेहमी प्रयत्न केले पाहिजेत. आणि जो एकदां सुमार्ग धरितो मग हटतो तो नव्हे, तर जो शेवटपर्यंत सर्व संकटांत प्रभूला लगटून त्याच्या सेवेंत टिकून राहतो तोच तरेल.

"सुखाच्या शेजीं निजूनी
जाईन वर्ते काय?
कीं दुःखें निंदा टाकूनी
पावेन ख्रीस्त पाय?
हे प्रभू, मला द्यावा धीर,
लढाई चालवीन,
संकटें सोसूनी गंभीर
तें राज्य मिळवीन."

३४, ३५ मात्थी. ५:१३; मार्क. ९:४९, ५० पाहा. जे धार्मिकपणाचें सोंग मात्र धरितात, ते ज्याचा खारटपणा गेला आहे त्या मिठासारिखे होतात. ते कशाच्याही उपयोगी नाहींत. खरा धार्मिकपणा फार मोलाचा आहे. हा चांगल्या मिठासारिखा संरक्षण करणारा आहे. परंतु जे ढोंग बाळगून तोंडानें मात्र ख्रीस्ताला अंगीकारितात त्या सर्वांस ख्रीस्त नाकारील. मात्थी. ७:२२,२३; ८:१२; २३:३०; २५:३०. प्रग. ३:१६; ईयो. ८:१३; ३६:१३.

१५ अध्याय.— मग सर्व जकातदार व पापी त्याचें ऐकायास[१]
त्याकडे आले.
२ तेव्हां परोशी व शास्त्री यांनीं कुरकूर केली कीं, हा पाप्यांचा अं-
गीकार करितो व त्यांबरोबर खातो.[२]
३ मग त्यानें त्यांस हा दाखला दिल्हा कीं,
४ तुह्मामधील[३] असा माणूस कोण आहे कीं, त्याच्या जवळ शंभर
मेंढरें असतां त्यांतून एक हरपलें तर तीं नव्याण्णव रानांत सोडून हरप-
लेलें सांपडे तोंपर्यंत त्याच्या शोधास जात नाहीं?
५ आणि सांपडल्यावर तो आनंद करून तें आपल्या खांद्यावर घेतो;
६ मग घरीं येऊन मित्रांस व शेजाऱ्यांस बोलावून त्यांस ह्मणतो,
माझें हरपलेलें मेंढरूं[४] सांपडलें, यास्तव माझ्या संगतीं आनंद करा.
७ मी तुह्मास सांगतों कीं, ज्यांस पश्चात्तापाची गरज नाहीं अशा
नव्याण्णव नीतिमानांपेक्षां[५] पश्चात्ताप करणाऱ्या एका पाप्याविषयीं
आकाशामध्यें अधिक आनंद होईल.

---

(१) मात्थ. ९:१०,३. (२) प्रेषि. ११:३; १ करिं. ५:९-११; गल. २:१२. (३) मात्थ. १८:१२. (४) गीत. ११९:१७६; १ पेत्र. २:२५. (५) लूक. ५:३२.

अध्याय १५.

१ "जकातदार व पापी." मात्थी. ९:१० यावरील टीका पाहा.

२ "हा पाप्यांचा अंगीकार करितो व त्यांबरोबर खातो." हें त्यांच्या वहिवाटी विपरीत होतें ह्मणून त्यांनीं त्यावर कुरकुर करून दोष ठेविला. हा परोपकारिक बुद्धीनें पाप्यांचें कल्याण करावें व त्यांस तारावें ह्मणून त्यांसीं सहवास करितो असें त्यांनीं मनांत आणिलें नाहीं.

३ "हा दाखला" मात्थी. १३:३ यावर जें व्याख्यान तें पाहा.

४–६ मात्थी. १८:१२,१३ एथें पाहा.

७ "आकाशामध्यें अधिक आनंद होईल." आपल्याजवळ सुरक्षित आहे तें बहुत असतांहि त्याविषयीं आनंद होतो, त्याहून हरपलेलें फिरून मिळविल्यावरून मोठा आनंद करावा असा मनुष्यांचा स्वभाव आहे. हें ख्रिस्तानें मेंढराचा व पावल्याचा दाखला देऊन स्पष्ट करून दाखविलें. हें रोज रोज बहुत गोष्टीवरून लक्षांत येतें. आह्मी वीस वर्षें सुरक्षित राहिलों ह्मणजे कांहीं विशेष उपकार मानीत नाहीं, परंतु एकदां प्राणसंकटांत पडलों व त्यांतून निभावलों ह्मणजे अंतःकरण हर्षानें व स्तुतीनें भरतें. घर असल्यावरून विशेष आनंद करीत नाहीं, परंतु त्याला आग लागली आणि फार कष्टेंकरून विझवून राखिलें ह्मणजे किती आनंद करितों. यासारिखा आनंद आकाशलोकांत होतो असें प्रभू शिकवितो, ह्मणजे एक पापी पश्चात्ताप करून पापमार्ग सोडून देवाकडे वळतो तेव्हां पवित्र दूत व उद्धारलेले

८ किंवा असी बायको कोण आहे कीं, आपल्या जवळ दाहा पावल्या असतां त्यांतून एक पावली हरवली तर दिवा लावून व घर झाडून ती सांपडे तोंपर्यंत मन लावून शोध करीत नाहीं?

९ आणि सांपडल्यावर ती मित्रांस व शेजाऱ्यांस बोलावून ह्मणती, जी पावली मजपासून हरवली ती मला सांपडली, यास्तव माझ्या संगतीं आनंद करा.

१० तसें मी तुह्मास सांगतों, पश्चात्ताप करणाऱ्या एका पाप्याविषयीं देवाच्या दुतांच्या समोर [1] आनंद होतो.

११ अणखी तो बोलला, कोणी एका माणसाला दोन पुत्र होते.

१२ त्यांतील धाकटा बापाला ह्मणाला, बापा, जो मालमत्तेचा वांटा मला यायाचा तो दे. मग त्यानें त्यांस संपत्ति वांटून दिल्ही. [2]

१३ मग थोडक्या दिवसांनीं धाकटा पुत्र सर्व जमा करून दूर देशांत गेला, आणि तेथें उधळेपणानें वागून आपली संपत्ति उडविली.

१४ मग त्यानें अवघें खर्चिल्यावर त्या देशांत मोठा दुष्काळ [3] पडला, त्यामुळें त्याला अडचण पडूं लागली;

---

(१) यहेज्क. १८:२३,३२;३३:११; प्रेषि. ११:१८; फिलि. १५:१६. (२) मार्क. १२:४४.
(३) आम. ८:११,१२.

लोक आनंद करितात. "नीतिमानापेक्षां." मनुष्यांमध्यें नीतिमान असा कोणी नाहीं. उप. ७:२०; गीतें. १४:२,३; रोम. ३:१०–१८. कोणी नीतिमान मनुष्य आहे असें ख्रीस्तानें ह्मटलें नाहीं. पवित्र दूत नीतिमान आहेत, आणि जीवात्म्याचें मोल समजून आणि सर्वकाळचें सुख व नरकाचें दुःखहि समजून ते पश्चात्तापी पाप्यावर आनंद करितात. तर ख्रीस्तानें पाप्यांसीं सहवास ठेवून त्यांस तारायास झटावें हें त्याला योग्य होतें. आणि आह्मासहि असें करणें भाग आहे.

८–१० या दाखल्याचा हाच अर्थ आहे. नऊ पावल्या मनांत न आणितां त्या बायकोनें हरवलेली पावली सांपडली यामुळें मोठा आनंद दाखविला. तसा आनंद पश्चात्तापी पाप्यांविषयीं आकाशांतल्या दूतांमध्यें होतो.

११, १२ हीच गोष्ट अधिक स्पष्ट करून दाखवावी ह्मणून ख्रीस्तानें हा सुंदर दाखला काढून उनाड मुलगा पश्चात्ताप करून परत येतो तेव्हां बापाची त्यावर केवढी ममता व आनंद होतो, हें लक्षांत आणिलें. "यांतील धाकटा." यावरून जकातदार व पापी असें समजावें. वडील पुत्र ह्मणजे परोशी व शास्त्री असें समजावें. "संपत्ति वांटून दिल्ही." यहुद्यांमध्यें धाकट्या पुत्राला मिळत असे त्याचें दुप्पट वडील पुत्राला मिळत असे. एथें धाकट्याला आपल्या वांट्याचें मोल मिळून तें आपल्याबरोबर घेऊन तो बापाला सोडून गेला.

१३, १४ "तेथें उधळेपणानें...संपत्ति उडविली." ख्याली खुशाली करून व विषयसुख भोगून बहुत खर्च केला ह्मणून

१५ तेव्हां तो त्या देशांतील एका गृहस्थाजवळ जाऊन राहिला त्यानें
तर त्याला डुकरें चारायास आपल्या देशांत पाठविलें.

१६ तेव्हां डुकरें जीं टरफलें खात असत त्यांवर[१] त्यानें आपलें
पोट भरावें असें त्याला वाटलें, आणि कोणीं त्याला कांहीं दिल्हें नाहीं.

१७ नंतर तो शुद्धीवर येऊन ह्मणाला, माझ्या बापाच्या किती मोल-
कऱ्यांस भरपूर भाकर आहे? आणि मी भुकेनें मरतों.

१८ मी उठून [२] आपल्या बापाकडे जाईन व त्याला ह्मणेन, हे बापा,
म्यां आकाशाच्या विरुद्ध व तुझ्या समोर पाप केलें आहे;

---

(१) यश. ४४:२०; गीत. ७३:२२, हो. १२:१. (२) गीत. ३२:५.

आपली संपत्ति लवकर उडविली. तसेंच पापी, देव बाप याला सोडून, बुद्धि, शक्ति, माल वगैरे बापानें दिल्हीं तीं वाईट कामांत खर्चून दुष्ट लोकांसीं सहवास ठेवून अधिक खराब होऊन आपला नाश करून घेतात. "मोठा दुष्काळ पडला." लोक बिघडून आळसी व दुर्व्यसनी होतात तेथें दुष्काळ पडत असतो.

१५, १६ "डुकरें चारायास." इ० डुकरें पाळणें यहुद्यांस अनुचित होतें. त्यांचें मास खाणें अगदीं मना केलें होतें. तर त्याला डुकरें चारणें भाग पडलें यावरून सिद्ध होतें कीं तो मोठ्या संकटांत व अतिनीच अवस्थेंत पडला होता. तसेंच जे देवाला सोडून पाप करितात ते अतिशय नीच अवस्थेंत व अघोर संकटांत पडतात. "त्यावर...पोट भरावें" इ० एवढा तो भुकेला होता कीं असले घाणेरे पदार्थ खायास इच्छिलें. त्यानें आपला सगळा पैका उडविला होता, आणि कांहीं पगार मिळण्यापूर्वी एका महिन्याची चाकरी करावी लागली असेल, आणि यजमान त्याला जेवण न घालितां आपल्या खाण्या पिण्याचा बंदोबस्त करावा लागला असेल, असें मनांत आणून ही कठीण अवस्था कसी प्राप्त झाली हें समजेल.

१७, १८ "तो शुद्धीवर येऊन." इ० तो वेड्यासारिखा झाला होता, खरा आणि वास्तविक पाहिलें तर, सर्व पापी पश्चात्ताप करून ईश्वराकडे फिरतात तोंवर वेडे आहेत. वेडेपणा त्यांच्या अंतःकरणांत आहे. उप. ९:३ एथें दुष्टाई या मूळ शब्दाचा मूळभाषेंनला अर्थ वेडेपणा आहे. पापी चांगल्या बुद्धीनें व विवेकानें नाहींत, तर विषयवासना व दुष्ट भावना यांच्या स्वाधीन होऊन चालतात तोंवर देवापासून अधिक लांब बहकून जातात आणि वेडेपणानें वागून आपलें अकल्याण करून घेतात. ते पापमार्ग सोडून देवाकडे फिरतात तेव्हां शुद्धीवर येतात. "आपल्या बापाकडे जाईन." इ० जरी त्याला सोडून, टाकून, दुःख देऊन त्यासीं दुष्टाईनें वागलों तरी तोच बाप आहे, माझी काळजी बाळगायाला दुसरा कोणी त्यासारिखा नाहीं असें मनांत आणून त्यानें हा निश्चय केला तसाच निश्चय पाप्यानें करावा. त्यानें देवाला सोडलें, अवमानिलें व धिक्कारिलें; असें असतांहि तोच मात्र पाप्याला पापापासून व नरकापासून तारूं शकतो.

१९ आतांपासून तुझा पुत्र ह्मणवयास मी योग्य नाहीं, आपल्या एका मोलकऱ्याप्रमाणें मला ठेव.

२० नंतर तो उठून आपल्या बापाकडे गेला, तेव्हां तो [1]दूर आहे इतक्यांत त्याचा बाप त्याला पाहून कळवळला, आणि त्यानें धावून त्याच्या गळ्यांत मिठी घातली व त्याचें चुंबन घेतलें.

(१) प्रेषि. २:३९; एफ. २:१३,१७.

पाप्याला पश्चात्ताप करून त्याकडे परतलें पाहिजे नाहीं तर त्याचा नाश होईलच. "आकाशाच्या विरुद्ध." ईश्वराच्या विरुद्ध मात्थी.२१:२५ पाहा. खरा पश्चात्ताप झाला ह्मणजे जीं पापें केलीं तीं देवाच्या विरुद्ध केलीं असें मनांत भरतें. असें दाविदाच्या अंतःकरणांत भरलें. गीत. ५१:४. "तुझ्यासमोर." बापाच्या विरुद्ध पाप केलें आहे असेंहि तो कबूल झाला. जीं पापें मनुष्याविरुद्ध झालीं तीं पदरांत घेऊन त्यांपासीं क्षमा मागावी हें खऱ्या पश्चात्तापाचें एक लक्षण आहे.

१९ "मी योग्य नाहीं." इ० हें वाक्य बोलून त्यानें खरी नम्रता पाप्याला शोभती तसी दाखविली. आपणाकडे बापाच्या कृपेचा कांहीं हक्क आहे असें दाखविलें नाहीं तरी बापाच्या घराची आवड त्यानें दाखविली; आणि देवबापाच्या सुखस्थानाची तसली आवड सर्व पश्चात्तापी पाप्यांनीं धरावी. त्यानें बापावर भरवसाहि दाखविला; आणि पश्चात्तापी पाप्यांनीं असला भरवसा देवावर दाखवावा. आपण पापी, अपराधी, लाचार, दंडास योग्य आहों. ईश्वर पवित्र, पराक्रमी, न्यायी पण कृपाळूहि आहे असें मनांत आणून आपणाला त्याच्या हातीं देऊन व कृपाच मागून जें काय तो करील तें खरें असी भावना बाळगावी, हें पाप्याला योग्य आहे. तरी या उधळ्या पुत्राला वाटलें त्यापेक्षां त्याचा बाप फार दयाळू व ममताळू होता. तसेंच देवाविषयीं सर्व पश्चात्तापी पाप्यास आढळतें.

२०. "आपल्या बापाकडे गेला," अथवा आला, ह्मणजे येऊं लागला. एकदां बरोबर विचार झाला ह्मणजे निघाला. आणखी उशीर त्यानें केला नाहीं; केला असता तर तो उपासीं राहून मेला असता. तसेंच पाप्यानें लवकर उठून देवाकडे फिरावें. "तो दूर आहे इतक्यांत." हें वर्णन सुंदर व रसिक आहे. मुलगा गरीब, रोडका, दुःखित, चिंध्या पांघरलेला असून हळू लाजेनें येतो आहे; असें असतांहि बाप दुरून त्याला ओळखितो आणि तत्क्षणीं कळवळून त्याकडे धावतो. बापाची ही केवढी ममता! पण पश्चात्तापी पाप्यावर देवाचा अधिक कळवळा व ममता दिसून येते. "चुंबन घेतलें." ही ममतेची व क्षमा करण्याची खूण होती. १ शमु. १०:१; उत्प. २९:१३. यावरून ईश्वर पश्चात्तापी व परतणाऱ्या पाप्याचा अंगीकार करायास कसा सिद्ध आहे हें दाखविलें आहे. एथें दाखल्याचा अभिप्राय स्पष्ट दिसून येतो. बापानें पश्चात्तापी मुलाचा अंगीकार याप्रमाणें करावा यामुळें परोशी देखील त्यावर दोष ठेवितात. तर देवानें पश्चात्तापी पाप्याचा अंगीकार करावा हें योग्य आहे आणि ख्रीस्तानें पाप्यांस तारायास प्रयत्न करावे हेंहि योग्य होतें.

२१ मग पुत्र त्याला ह्मणाला, बापा, आकाशाच्या विरुद्ध [१] व तुझ्या समोर म्या पाप केलें आहे, आणि आतांपासून तुझा पुत्र ह्मणवायास मी योग्य नाहीं.

२२ परंतु बापानें आपल्या चाकरास सांगितलें, [२] उत्तम झगा आणून याला घाला, आणि याच्या हातांत अंगठी व पायांत जोडे घाला.

२३ मग माजलेलें वांसरूं आणून कापा, आणि आपण खाऊन हर्ष करूं;

२४ कां कीं [३] हा माझा पुत्र मेला होता, [४] तो फिरून जीवंत [५] झाला, व हरपला होता [६] तो सांपडला आहे. तेव्हां ते हर्ष करूं लागले.

२५ त्या वेळेस त्याचा वडील पुत्र शेतांत होता, मग तो येऊन घराजवळ पोहंचल्यावर त्यानें वाद्य व नाच ऐकिले. [७]

२६ तेव्हां चाकरांतील एकाला बोलावून त्यानें विचारिलें, हें काय आहे?

२७ त्यानें त्याला सांगितलें कीं तुझा भाऊ आला आहे, आणि तो तुझ्या बापाला सुखरूप मिळाला यास्तव त्यानें माजलेलें वासरूं कापिलें आहे.

२८ तेव्हां तो रागें भरून [८] आंत जाईना, यास्तव त्याचा बाप बाहेर येऊन त्याला समजावूं लागला.

---

(१) गीत. ५१:४. (२) जख. ३:३-५. (३) लूक. १५:३२. (४) एफ. २:१;५:१४, प्रग. ३:१. (५) रोम. ६:११,१३. (६) यहेज्क. ३४:४,१६, लूक. १९:१०. (७) गीत. ३०:११;१२६:१,२. (८) यो. ४:१-३ रोम. १०:१९.

२१,२२. "उत्तम झगा." जो पश्चात्तापी पापी ईश्वराकडे परत येतो त्याला त्याच्या मळीन चिंध्याबदल सुंदर पोषाक म्हणजे ख्रीस्ताचें पुण्य मिळतें. "हातांत अंगठी" इ० असें करून बापानें आपली कृपा ममता, व आनंद हीं दाखविलीं.

२३, २४ "मेला होता." इ० मेला असें बापाला वाटलें आणि वास्तविक पाहिलें तर, तो पापांत मेला होता. जो पापमार्ग सोडून देवाचा खरा भक्त होतो तो फिरून जन्म पावतो, नवा उत्पन्न होतो, मेलेल्यांतून सजीव होतो, असें शास्त्रावरून दर्शविलें आहे. १ तीम. ५:६; मात्थी. ८.२२; रोम. ६:१३; प्रग. ३:१; एफ. २.१; पाहा.

२५ "वाद्य व नाच ऐकिले." यहुद्यांमध्यें हे रूढींत होते. मिर्यामेची गोष्ट पाहा. निर्ग. १५:२०. आणि २ शमु. ६:१४; गीत. १४९:३;१५०:४. नाचणें हें योग्य किंवा अयोग्य हें एथें ठरविलें नाहीं. जर कोणी ह्मणेल कीं योग्य असावें कां कीं शास्त्रांत असीं उदाहरणें दाखविलीं आहेत, तर निदान आनंद दाखविण्याच्या प्रसंगीं मात्र नाचावें असा नेम केला पाहिजे.

२६–२८ या वडील पुत्रावरून कुरकूर

२९ परंतु त्यानें बापाला उत्तर दिल्हें कीं, पाहा, मी इतकीं वर्षें [1]
तुझी चाकरी करितों, आणि तुझी आज्ञा म्यां कधींहि मोडिली नाहीं : [2]
तरी म्यां आपल्या मित्रांबरोबर खुशाली करावी ह्मणून त्वां मला कधीं
करडूंहि दिल्हें नाहीं.
३० आणि ज्यानें तुझी संपत्ति कसबिणींबरोबर खाऊन टाकिली तो
हा तुझा पुत्र आला, तेव्हां त्वां त्यासाठीं माजलेलें वासरूं कापिलें आहे.
३१ तेव्हां त्यानें त्याला ह्मटलें, मुला तूं सर्वदा [3] माझ्या बरोबर आ-
हेस, आणि माझी सर्व मालमत्ता तुझीच आहे.
३२ परंतु हर्ष व आनंद करावा हें योग्य होतें, [4] कारण कीं [5]

(१) यश. ६५:५, लूक. १८:११. (२) फिलि. ३:६. (३) रोम. ९:४,११:१.
(४) यो. ४:१०,११. (६) गीत. ५१:८, यश. ३५:१०, लूक. १५:२४.

करणारे परोशी दर्शविले आहेत असी आठवण केली पाहिजे. ख्रीस्तानें जकातदार व पापी यांचा अंगीकार केला यामुळें ते रागें भरले होते. तसाच हा वडील पुत्र, बापाने उधळ्या पुत्राचा अंगीकार केला म्हणून रागें भरतो.

२९,३०. "करडूंहि दिल्हें नाहीं." परंतु याला माजलेलें वासरूं दिल्हें आहे. हा वडील पुत्र परोशांच्या स्वभावानें कुरकूर करीत जातो आणि बापावर विनाकारण दोष ठेवितो.

३१,३२ "माझी सर्व मालमत्ता तुझीच आहे." जी संपत्ति राहिली ती सर्व बापानें वडील पुत्राला दिल्ही होती, तर कुरकूर करण्याचें काय कारण होतें?

यापेक्षां सुंदर मनोरंजक व बोधकारक कथन क्वचित् सांपडतें. यावरून सिद्ध होतें कीं,

१. पाप्याचा स्वभाव लोभिष्ट आहे. होईल तितकी उतावळी करून मिळवायास तो पाहतो. ओ. १२.

२. पापी उगीच खर्च करून संकटांत पडतात. ओ १३. पापाचें फळ दुःख असें आहे. तेणेंकरून अक्कल कमी होती, बुद्धि मंद होती, अंतःकरण कठीण होतें, आणि शेवटीं अति दुःखावस्था प्राप्त होती.

३. पापाचें जें फळ येईलच म्हणून ठाऊक आहे, तें पापी मनांत आणीत नाहींत. त्याविषयीं डोळे मिटून हल्लीं विषयसुख भोगावें एवढीच त्यांची काळजी होती.

४. संकटें प्राप्त झाल्यावरून कोणी विचार करूं लागतात. ओ. १४. संपत्ति होती तोंवर हा उधळ्या पुत्र बापाची आठवण करीना. ती संपून दुष्काळ पडल्यावर त्यानें बापाची आठवण केली. तसेंच संकटांत पडल्यावर त्यानें बापाची आठवण केली. तसेंच संकटांत पडल्यावर कोणी पापी विचार करून देवाकडे फिरतात.

५. पाप्यांची दुःखावस्था एथें स्पष्ट करून दाखविली आहे. त्यानें सर्व खर्चलें आहे. त्याला पुण्य नाहीं, सुख नाहीं, कांहीं नाहीं. तो भटकून बापापासून दूर लाचार व निरूपायी असा आहे.

६. पापी अशा दुःखावस्थेंत असून वारंवार व्यर्थ उपाय योजितो. ओ. १५. हा

हा तुझा भाऊ मेला होता, तो फिरून जीवंत झाला आहे, व हरपला होता तो सांपडला आहे.

पुत्र त्या देशांतील कोणीएकाच्या चाकरीस जाऊन राहिला. परंतु हा उपाय फुकट झाला. उशीर व अधिक संकट मात्र पडलें. आधीं त्याची दुःखावस्था समजली तेव्हांच बापाकडे उठून जायाचें होतें.

७. खरा पश्चात्ताप म्हणजे शुद्धीवर येणें असा आहे. जो संसारांत निमग्न होऊन व धनलोभी असून जीवात्म्याचें मोल समजत नाहीं व अविनाशी वतनावर नजर ठेवीत नाहीं तो बेशुद्ध व वेड्यासारिखा आहे. जो पश्चात्ताप करून देवाकडे फिरतो आणि आपल्या जिवात्म्याचें तारण साधून घ्यावयास प्रयत्न करितो तोच मात्र सावध व सुज्ञ होतो.

८. जेव्हां पापी शुद्धीवर येतो तेव्हां त्याला साफ दिसून येतें कीं अघोर भयावस्थेंत आहे आणि तारणोपाय पाहिजे, नाहीं तर नाश होईलच होईल. श्लो. १७. "मी भुकेनें मरतों." त्याला असेंहि समजतें कीं देव मला तारायास समर्थ आहे. "माझ्या बापाच्या किती मोलकऱ्यांस भरपूर भाकर आहे?" सर्वांसाठीं देवाजवळ कृपा पुरती आहे आणि सर्वांनीं येऊन तारण पावावें. असें समजावें म्हणजे देवाची कृपा मलाहि मिळेल असी आशा तो धरूं लागतो. मग तो निश्चय करितो. "मी उठून...जाईन." आणि एकाएकीं येऊन आपलीं पापें पदरांत घेऊन क्षमा मागतो.

९. खरा पश्चात्ताप स्वखुशीनें होतो. पाप्यानें विचार करून आपखुशीनें उठून बापाकडे गेलें पाहिजे. श्लो. १८.

१०. ज्या पापें केलीं तीं देवाच्या विरुद्ध केलीं असें खऱ्या पश्चात्तापाच्या मनांत भरतें.

११. आईबापें व इतर माणसें यांच्या विरुद्ध जीं पापें झालीं आहेत तीं त्यांस कबूल करायास खरा पश्चात्तापी मान्य होईल. तो नम्र होईल व कांहीं अपराध लपवून ठेवायास पाहणार नाहीं.

१२. पश्चात्तापी पाप्याचा अंगीकार करायास ईश्वर तयार आहे. त्यानें मोठा तारणोपाय सिद्ध केला आहे, आणि जगाला जाहीर केलें आहे कीं जो कोणी येईल त्याला मी घालविणार नाहीं. तर गरीब, बिचारी, दुःखित, दोषी, लाचार, पाप्यांनो, या आणि तारण घ्या.

१३. पापी पश्चात्ताप करून फिरतात तेव्हां त्यांविषयींचा जो आनंद तो मोठा आहे. देवदूत व सर्व पवित्र लोक फार हर्ष करितात.

१४. दुसऱ्यांवर विशेष उपकार करायास ईश्वराला बरें वाटेल तर त्यांचा कांहीं हेवा आपण बाळगूं नये. श्लो. ३२. आपण पावायास योग्य त्यापेक्षां त्यानें आम्हांस ज्यास्त दिल्हें आहे; आणि त्यानें इतरांस अधिक अक्कल, ज्ञान, माल वगैरे दिल्हीं तरी आह्मांस कुरकूर करण्याचें कारण नाहीं. त्यानें कोणालाहि एवढ्या देणग्या द्याव्या यामुळें आह्मी त्याची स्तुति करावी.

१५. जो पापी पश्चात्ताप करून फिरतो त्याविषयीं आनंद सर्वकाळ होईल खरा, तथापि फिरतांच विशेष आनंद दाखविण्यांत येईल. या बापाला आयुष्यभर परतलेल्या मुलग्याविषयीं आनंद वाटला याचा संशय नाहीं, तथापि त्यानें दररोज माजलेलें वासरूं कापलें नसेल.

१६ जर ईश्वर पश्चात्तापी पाप्यांचा अंगीकार करायास सिद्ध आहे व त्याविषयीं सर्व पवित्र लोक आनंद करीत असतात, तर

१६ अध्याय.—अणखी त्यानें आपल्या शिष्यांस ह्मटलें, कोणी धनवान माणूस होता, त्याला कारभारी होता, आणि हा तुझें द्रव्य उडवितो असा त्याजवरचा आरोप धन्याजवळ आला.

२ तेव्हां त्यानें त्याला बोलावून ह्मटलें, तुजविषयीं ऐकतों हें काय? तुझ्या कारभाराचा हिशोब दे[१] कारण कीं आतांपासून तुला कारभार करायाचा नाहीं.

---

(१) लूक. १२:४२, १ करिं. ४:२, १ तीम. ४:१४, १ पेत्र. ४:१०.

त्यांनीं फिरावें व तारण घ्यावें ह्मणून आह्मी नित्य किती प्रयत्न करावे.

१७. ईश्वर पाप्यांस आतां येऊं देतो, होय, यास आमंत्रण करितो; तर त्यांनीं एकाएकीं यावें, उशीर करूं नये; त्वरेनें व मोठा हर्ष करून यावें. तो पाप्यांचा अंगीकार करणार नाहीं अशी वेळ येत आहे. "कृपेची वेळ गुजरती;" व लवकर सरून गेली असें होईल; मग आशा राहणार नाहीं. देवापासून दूर सर्वकाळच्या क्लेशांत त्यांस राहावें लागेल. तर हे पाप्या, तूं अगत्य फीर,"

"आज तूं सुमार्ग धर,
करूं नको रे उशीर,
कोण जाणें कोठवर
भगवान् धरील धीर."

अध्याय १६.

१ "आपल्या शिष्यांस." ह्मणजे बारा प्रेषितांस अथवा सत्तरजणांस असें नव्हे तर परोशी वगैरे जे प्रतिकूळ होते त्यांस खेरीज करून बाकी जे जवळ होते त्या सर्वांस. मागल्या अध्यायांत परोश्यांस उपदेश करितांना त्यांनीं त्याजवर जो दोष ठेविला होता तो निवारण करून खीस्तानें त्यांस दाखविलें होतें कीं पाप्यांस तारायास झटावें हें योग्य आहे. त्यानें त्यांस अगदीं कुंठित केलें होतें असें कीं ते स्तब्ध राहिले. मग तो आपल्या पहिल्या ऐकणाऱ्यांकडे वळून त्यांस योग्य असा उपदेश दाखल्यानें करितो, आणि त्यांचीं पापें निषेधून व त्यांस योग्य बोध देऊन प्रमाण पटवितो कीं, वास्तविक त्यांचें हित व तारण व्हावें याच हेतूनें तो त्यांसीं सहवास ठेवीत होता. जे जकातदार व पापी ऐकायास जमले होते त्यांमध्यें बहुतेक धनवान व धनलोभी असतील, असें पाहून त्यानें धनलोभ निषेधून दाखविलें कीं जे धनलोभ व स्वार्थबुद्धि बाळगतात त्यांच्यानें देवाची सेवा बरोबर करवत नाहीं.

"कोणी धनवान माणूस." यावरून ईश्वर दर्शविला आहे असें समजावें, आणि "कारभारी" म्हणजे कोणीहि मनुष्य ज्याला ईश्वरानें बुद्धि, शक्ति, माल वगैरे दिल्हीं आहेत तो; परंतु आपले ऐकणारे जे होते त्यांतील एक एकानें तो कारभारी मीच आहें असें समजावें ह्मणून खीस्ताची इच्छा होती.

२ "हिशोब दे." ईश्वर आमचा धनी आहे, आणि शेवटीं त्या समोर आह्मा सर्वांस हिशोब द्यावा लागेल. आणि मध्यें मध्यें या जगांत देखील एक एकाचें काम व आचरण पाहून जे प्रमाणिक व विश्वासू त्यांस ईश्वर मान देऊन त्यांचा कारभार वाढवितो आणि जे अविश्वासू त्यांचा कारभार कमी करितो अथवा अगदी काढून घेतो.

३ तेव्हां त्या कारभाऱ्यानें आपल्या मनांत ह्मटलें, माझा धनी मज-
पासून कारभार काढितो, तर मी काय करूं? खणायास मला शक्ति
नाहीं, भीक मागायास मला लाज वाटती.

४ तो मला कारभारावरून काढील तेव्हां लोकांनीं आपल्या घरांत
मला घ्यावें ह्मणून म्यां काय करावें हें मला सुचलें.

५ मग त्यानें आपल्या धन्याच्या सर्व देणेकऱ्यांस बोलावून पहिल्याला
ह्मटलें, माझ्या धन्याचें तुला किती देणें आहे?

६ तेव्हां तो बोलला, शंभर मण तेल. तेव्हां त्यानें त्याला ह्मटलें,
तूं आपला लेख घे, व लवकर बसून पन्नास मांड.

---

३ "खणायास मला शक्ति नाहीं" इ० शक्ति नाहीं ह्मणजे खुशी नाहीं, असें समजावेंसें दिसतें. कारभारी झाल्यावर शेतभात करायास लागावें हें त्याला बरें वाटलें नाहीं. "भीक मागायास मला लाज वाटती." आणि लाज वाटावी, खरी, ज्याला शक्ति व आरोग्यता आहे त्यानें भीक मागूं नये. जे रोगी, लंगडे, अंधळे आहेत, त्यांस मित्र नाहींत, उपाय नाहींत तर त्यांनीं भीक मागावी हें योग्य आहे. परंतु जे निरोगी व शक्तिवान त्यांनीं भीक मागूं नये आणि त्यांनीं मागितली तर लोकांनीं देऊं नये. त्यांस काम द्यावें आणि त्यांनीं काम करून पोट भरावें.

४ "म्यां काय करावें हें मला सुचलें." आधीं विचार करून त्यानें कारभार विश्वासुपणानें चालविला असता तर किती बरें. पण आतां मी दोषी आहें आणि धनी खचीत माझा कारभार काढीलच असें जाणून तो उपाय योजितो आणि धन्याचा अन्याय करूं लागला असतां तो करीत जातो. धन्याचें अधिक नुकसान करून त्याच्या देणेकऱ्यांवर मोठे उपकार करावे असें कीं तो निराश्रित पडल्यावर त्यांस त्याचा साह्यसंभाळ करणें भाग पडले हाच उपाय त्यानें योजला. याप्रमाणें एक पाप केलें म्हणजे अनेक केलीं पाहिजेत असें पाप्यांस वाटतें. एक दुष्कर्म झांकायाला अनेक वार दुष्कर्मे करावीं लागतात, मग शेवटीं तीं सर्व उघडकीस येतीलच येतील. तर पाप्यासारिखे फसतात असे कोण आहेत? ते आपले स्वार्थ मात्र पाहून आपलें मोठें व सर्वकाळचें नुकसान करून घेतात. तरी आपण शाहाणे असें त्यांस वाटतें, आणि वास्तविक पाहिलें असतां आपल्या व्यवहारांत शाहाणे आहेत; कारण कीं जे आकाश लोकांतलें सुख पाहतात ते तें सुख मिळविण्यास करितात त्यापेक्षां हे आपलें ऐहिक सुख व स्वार्थ साधण्यास बहुत आस्था व आवेश दाखवितात आणि पुष्कळ युक्ति योजून बहुत श्रम व मेहनत करितात. जें साधण्यास पाहतात त्याविषयीं ते चुकतात, साधितांना जें शाहाणपण दाखवितात त्याविषयीं देवभक्तांस किच्चा असे होतात.

५,६ "लवकर बसून." इ० धन्यानें सांगितलें होतें कीं हिशेब दे, परंतु कारभाऱ्याला माहित होतें कीं हिशेब दिल्हा ह्मणजे तेव्हांच माझा कारभार काढून घेतील. तर उपाय लवकर केला पाहिजे, असें मनांत आणून धन्याचा हुकूम मानीत नाहीं पण त्याचा अधिक भारी अन्याय करून त्याच्या देणेकऱ्यांचीं देणीं बहुत कमी करितो.

७ नंतर त्यानें दुसऱ्याला ह्मटलें, तुला किती देणें आहे? तेव्हां तो बोलला, शंभर खंड्या गहूं. मग तो त्याला ह्मणाला, तूं आपला लेख घे व ऐंशीं मांड.

८ आणि अन्यायी कारभाऱ्यानें शहाणपण केलें यावरून धन्यानें त्याला वाखाणिलें; कां कीं या जगाचे पुत्र आपल्या व्यवहारामध्यें प्रकाशाच्या पुत्रांपेक्षां [1] शहाणे असतात.

९ अणखी मी तुह्मास सांगतों, अन्यायाच्या मामोनाकडून तुह्मी आपल्यासाठीं मित्र जोडा [2]; यासाठीं कीं तुह्मी कुंठाल तेव्हां त्यांनीं तुह्मास सर्वकालच्या वस्त्यांमध्यें घ्यावें.

---

(१) यो. १२:३६; एफ. ५:८. (२) उप. ११:१; १ तीम. ६:१८,१९.

७,८. "प्रकाशाच्या पुत्रांपेक्षां." प्रकाशाचे पुत्र म्हणजे जे अंधाराचीं कामें सोडितात आणि विषयसुख नव्हे तर आत्मिक सुख पाहतात तें. "जगाचे पुत्र." म्हणजे धन द्रव्य वगैरे जगिक सुख मात्र पाहतात ते. तर जगाचे पुत्र देवभक्तांपेक्षां शाहणे आहेत हें कसें? तर आपला हेतु सिद्धीस नेतांनां, इष्ट गोष्ट साधतांनां जो आवेश दाखवितात, जे उपाय योजितात आणि श्रम व मेहनत करितात त्यांविषयीं ते शाहणे होतात. जगाचे पुत्र आपलें काम साधण्यास करितात तेवढी आस्था, आवेश, जोर, मेहनत, व नेट ख्रिस्ती लोकांनीं आपलें काम साधण्यास लाविलीं म्हणजे आपलें तारण ते साधून घेतील असें केवळ नव्हे, तर सर्वांनीं ईश्वराकडे वळावें आणि तारण घ्यावें असें ते लवकर करतील. धन्यानें त्याला वाखाणिलें यावरून समजूं नये कीं कारभाऱ्यानें केलें तें ठीक होतें. तें योग्य नव्हतें आणि ज्या धन्याचे अन्याय त्यानें केले त्यानें तें योग्य ह्मणून ह्मटलें असें समजायाचें नाहीं; केवळ आपलें स्वार्थ साधण्याची ही युक्ति योजण्यांत तो शहाणा आहे असें ह्मटलें. तर या दाखल्याचा अर्थ प्रकाशाचे पुत्र व्हावे यापेक्षां जगाचे पुत्र व्हावे हें बरें, असा नाहीं, तर जगाचे पुत्र नाशवंत पदार्थ साधण्यास उद्योगी होऊन नेट लावून व युक्ति योजून आवेशानें प्रयत्न करितात त्यापेक्षां प्रकाशाच्या पुत्रांनीं, होय सर्वांनीं, आपल्या जिवाल्याचें तारण व अविनाशी वतन साधून घेण्यास अधिक आवेश व नेट लावून प्रयत्न करावे.

९. "अन्यायाच्या मामोना कडून." मामोन हें एका मूर्तीचें नाम होतें. तिची पूजा धनलोभी करीत असत, यावरून मामोन ह्मणजे धन असा अर्थ पडला. मूळ अर्थीं मामोन म्हणजे धनद्रव्य असें भाषांतर केलें तर ठीक होईल. "अन्यायाच्या." म्हणजे खोटें, पोकळ, नाशवंत, फसविणारें. १ तीम. ६:१७; लूका. १२:३३; मात्थी. ६; १९;१९:२१. धन, द्रव्य ठकाऊ आहे, आज आहे उद्यां नाहीं. तर तें चांगल्या कामास लावून "आपल्यासाठीं मित्र जोडा." म्हणजे कारभाऱ्यानें आपल्या धन्याचें द्रव्य खर्चून आपल्यासाठीं मित्र करून घेनले असें कीं तो कुंठला तेव्हां ते त्याला आपल्या घरांत

१० जो थोडक्याविषयीं विश्वासू[1] तो बहुतांविषयींहि विश्वासू आहे,
आणि जो थोडक्याविषयीं अन्यायी तो बहुतांविषयींहि अन्यायी आहे.
११ यास्तव तुह्मी अन्यायाच्या मामोनाविषयीं विश्वासू न झालां तर
जें खरें तें तुह्माला कोण सोंपून देईल?
१२ आणि जें दुसऱ्याचें त्याविषयीं तुह्मी विश्वासू न झालां तर जें
तुमचें तें तुह्मास कोण देईल?
१३ एका चाकराला[2] दोन धन्यांची चाकरी करवत नाहीं, कारण
कीं तो एकाचा द्वेष करील व दुसऱ्यावर प्रीति करील, अथवा एकाच्या
चाकरीस जपेल व दुसऱ्याची उपेक्षा करील. तुमच्यानें देवाची आणि
मामोनाची सेवा करवत नाहीं.
१४ तेव्हां हें सर्व ऐकून जे परोशी[3] धनलोभी होते त्यांनीं त्याचा
उपहास केला.

---

(१) मात्थ. २५:२१,२३. (२) यहो. २४:१५; मात्थ. ६:२४. (३) मात्थ. २३:१४.

घ्यायास तयार झाले, तसे तुह्मी आपला पैका अशा रीतीनें खर्चा कीं मरण येईल तेव्हां देवलोकांत जे ते तुम्हास आनंदानें आपल्या जवळ घेतील. हें कसें होईल, तर गरीब, दुःखित, व लाचार जे आहेत त्यांस देऊन शुभवर्तमान सर्वांस कळवून आणि जेणेंकरून ईश्वराचें गौरव व माणसांचें कल्याण होईल तसले उपाय करून हें होईल. आकाशलोकांत जाण्यास द्रव्याकडून अडथळा होत असतो, याचें कारण हेंच कीं द्रव्य ज्यांपाशीं आहे ते फारकरून धनलोभी होतात, आणि धनलोभ हा सर्व वाइटांचें मूळ आहे. परंतु द्रव्याचा लोभ न बाळगून द्रव्य देवाच्या गौरवार्थी खर्चिलें म्हणजे तें बाधकारक असें नाहीं तर साह्यकारक होईल. तर ज्यांजपाशीं द्रव्य आहे त्यांनीं अशा रीतीनें खर्चावें कीं तेणेंकरून त्यांनीं सर्वकाळच्या वस्त्यांमध्यें म्हणजे सौख्यलोकांत जाण्यास अधिक सिद्ध व्हावें. २ करिंथ. ५:१.

१०, ११ "जो थोड्याविषयीं विश्वासू." इ० ही म्हण सर्वत्र सर्वदां खरी आहे. "जें खरें तें." म्हणजे सर्वकाळचें जीवन;अविनाशी वतन. मात्थी. ६:१९,२० ऐहिक द्रव्य जें हलकें व नाशवंत आहे त्याविषयीं जर आम्ही विश्वासू नाहीं तर ईश्वर आम्हास अविनाशी निर्मळ व न कोमणारें वतन कसें देईल?

१२ "दुसऱ्याचें." धन, द्रव्य, माल, अक्कल, जें काय आम्हाजवळ असेल तें सर्व ईश्वरानें आम्हास दिल्हें, परंतु आह्मी कारभारी असें समजून आह्मास दिलें, अद्यापि तें त्याचें आहे. तें क्षणिक, हलकें, व नाशवंत आहे, आणि वहिवाट करितांना जर आह्मी विश्वासू नाहीं तर आकाशलोकांतला अविनाशी व अमोल्य संग्रह जो एकदां दिल्हा म्हणजे आमचा स्वतांचा सर्वकाळ होईल तो ईश्वर आम्हास कसा देईल?

१३ मात्थी. ६:२४. यावरील टी. पाहा.

१४, १५ "त्याचा उपहास केला." ध-

१५ मग त्यानें त्यास ह्मटलें, तुह्मी आपणांस माणसांसमोर न्यायी ठरवून घेतां[1] खरें, परंतु देव तुमचीं अंतःकरणें जाणतो,[2] कां कीं माणसामध्यें जें उंच[3] तें देवाच्या दिसण्यांत अमंगळ.

१६ नेमशास्त्र[4] व भविष्यवादी योहान्नापर्यंत होते, तेव्हांपासून देवाच्या राज्याचें शुभवर्त्तमान सांगतात, आणि सर्व त्यांत बळानें जातात.

१७ नेमशास्त्राचा एक फांटा जाण्यापेक्षां आकाश व पृथ्वी टळून जाणें हें सोपें आहे.[5]

१८ कोणी[6] आपली बायको टाकून दुसरीशीं लग्न करितो तो व्यभिचार करितो. आणि नवऱ्यानें टाकलेल्या बायकोसीं जो कोणी लग्न करितो तो व्यभिचार करितो.

१९ कोणी एक धनवान माणूस होता, तो जांबळ्या रंगाचीं व फार बारीक वस्त्रें घालीत असे व प्रतिदिवसीं डौलानें खुशाली करीत असे.

---

(१) लूक. १०:२९. (२) गीत. ७:९; इर्म. १७:१०. (३) नी.१६:५, मल; ३:१५. (४) मात्थ. ११:१२,१३. (५) गीत. १०२:२६, यश. ४०:८;५१:६. (६) मात्थ. ५:३२; १ करिं. ७:१०,११.

नलोभी परोश्यांस वाटलें कीं आह्मी आपलें द्रव्य आपल्या मर्जीप्रमाणें खर्चायास मोकळे आहों, परंतु जरी असी बुद्धि दाखवून त्यांनीं खिस्ताचा धिक्कार केला तरी थोडक्या वेळानें देवानें त्यांचें सर्वस्व त्यांपासून काढून घेतलें. आपण न्यायी, थोर, पुण्यवान असें ते आपणास ह्मणवीत असत, परंतु खीस्तानें त्यांस समजविलें कीं तुमचा स्वमताभिमान ईश्वराला केवळ त्रासदायक व अमंगळ वाटतो. लुका. १८:११–१४; १ शमु. १६:७ पाहा.

१६ मात्थी. ११:१२–१४ पाहा.

१७ मात्थी. ५:१८ पाहा.

१८ मात्थी. ५:३२. हीं वाक्यें त्यांच्या आठवणीस आणून खीस्तानें त्या परोश्यांस दाखविलें कीं तुह्मी आपण न्यायी व पुण्यवान असें ह्मणवितां तरी वास्तविक पाहिलें असतां, तुह्मी मोशयानें दिलेलें नेमशास्त्र बरोबर पाळीत नाहीं: तुह्मी आपलेंच शास्त्र मोडून दोषी आहां.

१९ "कोणी एक धनवान." इ० ही खरोखर घडलेली गोष्ट खीस्तानें वर्णिली असें कितीएकांनीं मानिलें आहे; परंतु खरी किंवा दाखल्याची गोष्ट असेल तें असो, बोध एकच आहे. यासारिखी हजारों माणसांची गोष्ट झाली आहे. याचा अभिप्राय जें संभाषण झालें होतें त्यावरून सिद्ध होतो. धनलोभ वाईट आहे, द्रव्य हलकें, नाशवंत व भुलविणारें आहे, जे आपलें द्रव्य चांगल्या कामाला खर्चीत नाहींत त्यांच्यानें देवाच्या राज्यांत जाववणार नाहीं असें त्यानें शिकविलें होतें. हाच बोध त्यांच्या मनांत अधिक ठसवावा ह्मणून त्यानें ही गोष्ट काढली. परोश्यांनीं स्वपुण्यावर भरवसा ठेवून व स्वमताभिमानी असून त्याचा उपहास केला होता. ही गोष्ट वर्णून खिस्तानें त्यांस दा-

२० आणि लाजारस नामें कोणीएक दरिद्री होता, त्याला बहुत फोड असतां तो त्याच्या दरवाज्याजवळ पडला होता ;

२१ आणि त्या धनवानाच्या मेजावरून जो चूर पडे त्यावर आपलें पोट भरावें असी त्याची इच्छा होती, अणखी कुत्रींहि येऊन त्याचे फोड चाटीत असत.

२२ नंतर असें झालें कीं तो दरिद्री मेला, आणि दुतांनीं त्याला अब्राहामाच्या उरासीं [1] नेऊन ठेविलें. धनवानहि [2] मेला व त्याला पुरलें.

(१) मात्थ. ८:११. (२) नी. १४:३२.

खविलें कीं जो कोणी आपल्या द्रव्यावर व सुकृतावर भरवसा ठेवितो तो तारण पावणार नाहीं. सर्व धन द्रव्य व सगुण्य असतांहि तो त्यांसुद्धां नरकांत पडेल. "जांबळ्या रंगाचीं." या रंगाचीं वस्त्रें शोभिवंत व उंच किमतीचींहि होतीं, आणि फारकरून केवळ राजेलोक नेसत असत. मात्थी. २७:२८. "फार बारीक वस्त्रें." मिसरांनलीं नील नदीजवळच्या तागाचीं केलेलीं वस्त्रें फार मोलवान मोजीत असत. नीति. ७:१६; यहेज्क. २७:७; उत्प. ४१:४२; १ काल. १५:२७; निर्ग. २८:५. "प्रतिदिवसीं डौलानें खुशाली करीत असे." यावरून दिसतें कीं त्याला मोठी संपत्ति होती आणि परोश्याच्या मताप्रमाणें तो फार सुखी असा असावा. त्यानें ही संपत्ति अन्यायानें मिळविली होती अथवा कांहीं मोठा अपराध केला होता असें दाखविलें नाहीं, केवळ द्रव्यावर भरवसा ठेवून ख्यालीखुशाली करीत असे आणि देवाची भक्ति करीत नसे; तरी तो नरकांत पडला.

२०, २१. "लाजारस." या इब्री शब्दाचा अर्थ दरिद्री असा आहे ह्मणून हें नाम त्या दरिद्र्याला दिल्हें होतें. याला अति दुःखावस्था प्राप्त झाली होती. "त्याच्या दरवाज्याजवळ पडला." त्यावेळेस गरीबांस कांहीं आश्रयगृह बांधिलें नव्हतें; आणि जेथें कोठें ख्रिस्ती शास्त्र माहीत नाहीं तेथें रोग्याश्रय वगैरे दरिद्री रोगी, दुःखित यांचें दुःखनिवारण करण्याचे उपाय फारकरून माहीत नाहींत

२२ "दुतांनीं त्याला आब्राहामाच्या उरासीं नेऊन ठेविलें." देवभक्त मरतात तेव्हां दूत त्यांचे जीवात्मे देवलोकीं नेतात, हें यहुद्यांचें मत होतें. त्यांच्या मतास अनुसरून ख्रीस्त बोलला, तरी हें मत खरें आहे असें समजायाला चांगला आधार आहे. देवदूत सेवा करणारे आत्मे आहेत. इब्री. १:१४. आब्राहामाच्या उराशीं असणें म्हणजे त्याचा सलगीचा मित्र होणें असें होतें, आणि आब्राहामाचा मित्र व्हावें हा मोठा मान आहे असें यहुदी मोजीत असत. शिवाय आब्राहाम सौख्यलोकांत आहेच याविषयीं यहुदी पूर्ण खातरी धरीत असत. तर लाजारसहि सौख्यलोकांत असावा. यावरून ख्रीस्तानें त्यास दाखविलें कीं धनवान मनुष्य जो धार्मिक व भक्तिशील नाहीं तो आकाशलोकांत जाऊं शकणार नाहीं; तो नरकांत पडतो. इतक्यांत अगदीं गरीब दुःखित व लाचार देवभक्त याला पवित्र दूत आनंदानें सौख्यलोकांत नेतात.

२३ आणि मृतलोकांत[1] पीडा भोगीत असतां त्यानें आपले डोळे वर करून अब्राहाम व त्याच्या उरासीं लाजारस यास दुरून पाहिलें.

२४ मग तो हाक मारून बोलला, हे बापा अब्राहामा, मजवर दया कर, आणि लाजारसानें आपल्या बोटाचें अग्र पाण्यांत बुचकळून माझी जीभ थंड करावी[2] ह्मणून त्याला पाठीव, कां तर या जाळांत मी क्लेशित आहें.[3]

---

(१) प्रग. १४:१०,११. (२) जख. १४:१२. (३) यश. ६६:२४; मार्क. ९:४४.

---

२३. "मृतलोकांत." म्हणजे मेलेल्यांचे आत्मे जातात ती अंधाराची जागा, एथें त्या जागेविषयीं ख्रीस्तानें दाखविलें कीं, १. ती सौख्यलोकापासून दूर आहे. त्या धनवानानें आब्राहामाला "दुरून पाहिलें." २. ती पीडेची जागा. ३. ती पीडा भारी आहे. "जाळांत मी क्लेशित आहें." ओ. २४. ४. तेथून सुटका होत नाहीं. तर जे नरकांत पडतात ते अतिशय व सर्वकाळचें दुःख भोगतील. "डोळे वर करून आब्राहाम...... पाहिलें." चर्मचक्षूंनीं पाहिलें असें समजायाचें नाहीं, परंतु लाजारस आब्राहामाजवळ सौख्यलोकांत आहे हें त्यानें जाणिलें; आणि आपली व त्याची या जगांतली अवस्था आठवून तो अधिक पीडा पावला. म्यां त्यासारिखी देवाची भक्ति केली असती तर आतां त्याबरोबर सुखांत गेलों असतों, असें समजून तो केवढें भारी दुःख पावला असावा?

२४ "हे बापा, आब्राहामा." मेलेल्यांचे आत्मे एकमेकांस ओळखून एकमेकांसीं संभाषण करतील असें यहुद्यांस वाटलें. हें लक्षून ख्रीस्त बोलला. आब्राहाम आमचा बाप असें यहुदी अभिमान बाळगून मानीत असत. तेंच मत तो धनवान धरीत आला होता, आणि आतां त्याचें साह्य मागतो. देवाचा धावा तो करीत नाहीं. आणि आपल्यापासीं सौख्यलोकांत मला घे असी विनंती तो आब्राहामापासीं देखील करीत नाहीं. जे आत्मे नरकांत पडले आहेत त्यांस समजलें आहे कीं दंड प्राप्त झाला तो सर्वकाळचा आहे. सुटका कधीं होणार नाहीं. "बोटाचें अग्र." इ. एवढी दया केली ह्मणजे जरासें समाधान होईल ह्मणून त्याला वाटलें, यावरून त्याची पीडा अतिशय भारी होती असें दिसतें. "त्याला पाठीव." तो धनवान किती क्लेशित व लाचार झाला होता? या जगांत लाजारस दुःखित असतां त्यापासीं भीक मागत होता. आतां धनवान लाजारसाचें साह्य मागतो. तसेंच जे आतां गरीब, लाचार, दुःख अन्याय व जुलूम भोगणारे ते देवाचे खरे भक्त असले तर लवकर पार जीवनांत जाऊन सर्वकाळचें सुख भोगतील, आणि जे खुशाली करून देवाचे उपकार मानीत नाहींत व त्याची भक्ति करीत नाहींत ते लवकर नरकांत पडून सर्वकाळपर्यंत दुःख भोगतील. हल्लींची अवस्था किती क्षणिक! एथें आपण दरिद्री किंवा मातबर असलों तरी याविषयीं काय विशेष चिंता? परंतु आमची सर्वकाळची अवस्था सुखाची व्हावी ह्मणून आपण किती काळजी व प्रयत्न करावे? "या जाळांत" अग्नि हें अतिशय पिडेचें चिन्ह आहे ह्मणून दुष्ट जाळांत क्लेशित आहेत असें दर्शविलें आहे. खरोखर जाळ होईल असें समजायाचें अगत्य नाहीं; तरी

२५ अब्राहाम बोलला, मुला, हें आठीव कीं तूं आपल्या आयुष्यांत [१]
आपलें सुख भरून पावलास, आणि त्याप्रमाणें लाजारस दुःख पावला, प-
रंतु आतां हा समाधान पावला व तूं क्लेश भोगितोस.
२६ आणि या सर्वांवर आमच्या व तुमच्या मध्यें मोठा चर स्थापिला
आहे, यासाठीं कीं जे एथून तुह्माकडे पार जाण्यास पाहतात त्यांनीं जाऊं
नये, व तिकडून त्यांनीं आह्माकडे येऊं नये.[२]
२७ मग तो बोलला, तर बापा, मी तुला विनंती करितों कीं, त्याला
माझ्या बापाच्या घरीं पाठीव.
२८ कां तर मला पांच भाऊ आहेत, त्यांस त्यानें असी साक्ष द्यावी
कीं त्यानींहि या पीडेच्या जागेंत येऊं नये.

---

(१) ईयो. २१:१३; गीत. ७३:१२-१९; लूक. ६:२४. (२) यहेज्क. २८:२४.

या जगांत जाळाचें दुःख होईल त्यापेक्षां अतिशय दुःख नरकांत होईल असें समजलें पाहिजे.

२५ "मुला" धनवान हा यहुदी असून आब्राहामाला बाप ह्मणाला, हें लक्षून आब्राहाम त्याला, मुला, ह्मणतो; आणि आब्राहाम माझा बाप असतांहि मी एवढा दुष्ट झालों कीं नरकांत पडलों असा विचार करून अधिक दुःख प्राप्त व्हावयाचें होतें खरें. " हें आठीव." इ० हें बोलणें हृदयभेदक झालें असावें. या जगांतलें बोलणें चालणें व आचरण यांची आठवण करणें हें नरकांतल्या दुःसह दुःखांचें एक प्रबळ कारण होईल. "आपलें सुख भरून पावलास. " म्हणजे जें सुख पाहिजे ह्मणून त्याला वाटलें तें. तो ऐहिक सुख मात्र शोधीत होता, तें तो भरून पावला होता. त्यानें आत्मसुखाचा शोध कधीं केला नव्हता, अविनाशी वतन मिळवायास प्रयत्न केले नव्हते, तर तें अविनाशी वतन तो पावला नाहीं यावरून काय आश्चर्य? "लाजारस दुःख पावला." दारिद्र, रोग व संकटें इहलोकीं त्याला प्राप्त झालीं तरी तीं सर्व असतांहि तो देवाची भक्ति करीत व त्यावर भरवसा ठेवीत असे ह्मणून त्याला आतां सर्वकाळचें सुख मिळालें आहे. ही कसी उलटावस्था झाली! सगळें जग मिळवावें यापेक्षां जिवात्म्याचें तारण मिळवावें हें कितीं बरें?

२६ "मोठा चर स्थापिला आहे." जागें येणें होत नाहीं. एकदां नरकांत पडला ह्मणजे कधीं सुटणार नाहीं हें स्पष्ट करून दाखविलें आहे.

२७,२८ "त्यानें असी साक्ष द्यावी कीं," इ० माझी अवस्था कसी हें सांगावें असें कीं त्यांनीं मजसारिखें वागूंनये, परंतु पश्चात्ताप करून ख्रीस्तावर विश्वास ठेवावा आणि आपलें तारण साधून घ्यावें. त्यानें, मला भावांकडे जाऊं द्यावें, असें कां मागितलें नाहीं बरें? माझी सुटका होनच नाहीं असें त्याला समजलें असेल ह्मणून. तो जगांत होता तेव्हां जसा आपल्या तारणाविषयीं तसा आपल्या भावांच्या तारणाविषयीं तो अगदी निष्काळजी होता, परंतु नरकांत पडल्यावर

२९ अब्राहामानें त्याला ह्मटलें, त्यांच्या जवळ [1] मोशे व भविष्यवादी आहेत, त्यांचें त्यांनीं ऐकावें.

३० मग तो बोलला, हे बापा अब्राहामा, असें नको, तर कोणी मेलेल्यांमधून त्यांकडे गेला ह्मणजे ते पश्चात्ताप करितील.

३१ तेव्हां त्यानें त्याला ह्मटलें, जर ते मोश्याचें व भविष्यवाद्यांचें ऐकत नाहींत [2] तर मेलेल्यांमधूनहि जरी कोणी उठला तरी त्यांची खातरी होणार नाहीं. [3]

---

(१) यश. २४:१६; यो. ५:३९. (२) २ करिं. ४:३. (३) यो. १२:१०,११.

जीवात्म्याचें मोल केवढें, नरकाचें दुःख किती दुःसह व आकाश लोकांतलें सुख किती उत्कृष्ट याविषयीं त्याला समजूं लागलें, ह्मणून आपल्या भावांची काळजी तो करूं लागला. त्याला वाटलें कीं कोणी मेलेल्यांतून उठून त्यांकडे गेला तर ते ऐकून देवाकडे फिरतील.

२९ "मोशे." ह्मणजे जुन्या करारांतील मोश्याने लिहिलेलीं पांच पुस्तकें तीं. "भविष्यवादी." ह्मणजे बाकीचा जुना करार तो. "त्यांचें त्यांनीं ऐकावें." म्हणजे शास्त्र घेऊन वाचावें, व मनन करून समजून घ्यावें.

३० "असें नको." ते त्यांचें ऐकणार नाहींत. मोशे व भविष्यवादी पहिल्यापासून त्यांजवळ आहेत खरे, तरी, मी निष्काळजी राहून ऐकेना, तसे माझे भाऊहि ऐकत नाहींत. परंतु कोणी मेलेल्यांतून उठून त्यांकडे गेला तर ते अवश्य ऐकतील.

३१ "तरी त्यांची खातरी होणार नाहीं." नरकवास आहे व जे अपश्चात्तापी राहून मरण पावतात ते नरकांत पडून सर्वकाळचें दुःख भोगतील हें खरें असें मानणार नाहींत. वास्तविक पाहिलें असतां तसेंच आहे. ईश्वरप्रणीत शास्त्र खरें असें जे मानीत नाहींत ते कोणी मेलेल्यांतून उठला, तरी त्याचें ऐकणार नाहींत. या दाखल्यावरून सिद्ध होतें कीं,

१. माणसांचे जीवात्मे देहाबरोबर मरण पावत नाहींत.

२. जीवात्मे देहत्याग केल्यावर पुनरुत्थिती पर्यंत निद्रिस्त राहतील असे नाहींत, तर जागे व सचेतन असे राहतील.

३. मरतांच देवभक्त सुखांत व अभक्त दुःखांत जातात.

४. धन द्रव्य हें मरणाला दूर ठेवायाला समर्थ नाहीं. जसे गरीब व दुःखित तसे मानबर व सुंदर व उल्हासित थडग्यांत उतरतात. जसें दरिद्र्याच्या झोंपडींत तसेंच राजवाड्यांत शिरण्यास मरणाला सोपें पडतें.

५. धनवानाचा हेवा आपण करूं नये. ते खुशाली करून सुखी असे दिसतात, परंतु जर पश्चात्ताप करीत नाहींत व देवाचे खरे भक्त होऊन त्याची सेवा करण्यांत आपलें द्रव्य खर्चीत नाहींत तर हल्लीं त्यांचें सुख पोकळ आहे व पुढें सर्वकाळचें दुःख हा लवकर त्यांचा वांटा होईल.

६. या जगांत मिळण्याजोगी आहे यापेक्षां चांगली सुखप्राप्ति मिळवायास आपण झटावें. निर्मळ व न कोमजणारें व अविनाशी जें वतन त्यावर नजर ठेवून चालावें म्हणजे आशा बुडणार नाहीं.

७. नरकांत दुष्टांचें दुःख अतिशय

१७ अध्याय.—आणि त्यानें शिष्यांस ह्मटलें, अडखळें न व्हावें हें
घडत नाहीं, [1] परंतु ज्याकडून ते होतात त्याला हायहाय.
२ त्यानें या धाकठ्यांतील एकाला अडखळवावें यापेक्षां त्याच्या गळ्यांत
जात्याची तळी बांधून त्याला समुद्रांत टाकावें, हें त्याला बरें आहे.
३ आपणांस संभाळा; तुझ्या भावानें तुझा अन्याय केला तर त्याचा
निषेध कर, [2] आणि जर तो पश्चात्ताप करील तर त्याची क्षमा कर.
४ आणि त्यानें एका दिवसांत सात वेळा तुझा अन्याय केला, त्या
दिवसांत सात वेळा तुजकडे परत येऊन ह्मणाला, मी पश्चात्ताप करितों,
तर त्याची क्षमा कर. [3]
५ मग प्रेषित प्रभूला ह्मणाले, आमचा विश्वास वाढीव. [4]

---

(१) मात्थ. १८:६,७; मार्क. ९:४२. (२) ले. १९:१७. (३) मात्थ. ६:१२,१४; कल. ३:१३. (४) इब्रि. १२:२.

दुःसह होईल, असें कीं त्यांचें वर्णन कोणाच्यानें करवत नाहीं. ते जाळांत क्लेशित होतात, त्यांचा किडा मरत नाहीं; त्यांचा अग्नि विझत नाहीं, आणि हें अतिशय दुःख एक वर्ष अथवा आयुष्यभर मात्र होईल असें नाहीं तर तें कधीं अंतरणार नाहीं. तें दिवसानुदिवस, वर्षोवर्ष, युगानुयुग सर्वकालपर्यंत चालेल. तर पापी पश्चात्ताप करून ईश्वराकडे कां फिरत नाहींत? ईश्वर प्रसन्न आहे इतक्यांत ते आपलें तारण कां साधून घेत नाहींत?

८. मरणानंतर परलोकवास आहे, आणि तेवढ्या निश्चयानें नरकवासहि आहेच आहे.

९. त्यांत एकदां पडला म्हणजे त्याला सर्वकाळ राहावें लागेल, कधींहि सुटणार नाहीं.

१०. नरकांत दुःख कांहीं सोसल्यावर सुटका होईल असें जे मनांत आणून पाप करीत जातात त्यांची केवढी भ्रांति व मूर्खपणा आहे?

११. आपण मरून देवाकडे जाण्यास व त्यासमोर हिशोब देण्यास तयारी करावी असा पुरता बोध देवानें केला आहे. त्यानें शास्त्र दिल्हें आहे, भविष्यवादी व उपदेशक पाठविले, होय आपला प्रिय पुत्र पाठविला; पवित्र आत्म्याकडून व ईश्वरी सूत्राकडून तो पाप्यांस प्रेरितो; एका अंगीं तो सर्वकाळचें सुख, व दुसऱ्या अंगीं नरकाचें दुःख दाखवितो. तर एवढ्यानें जर पापी पश्चात्ताप करून ईश्वराकडे फिरत नाहींत तर मेलेल्यांतून कोणी उठला तरी त्यांचें ते ऐकणार नाहींत. ते धनवानासारिखे नरकांत पडतील व सर्वकाळचें दुःख भोगतील.

अध्याय १७.

१, २ मात्थी. १८:६,७ यांचें व्याख्यान पाहा.

३, ४ मात्थी. १८:१५, २१,२२ यावर पाहा.

५ "आमचा विश्वास वाढीव." ख्रीस्तानें सांगितलें त्याप्रमाणें क्षमा करावी हें इतकें अवघड वाटलें, कीं त्यांनीं ही प्रार्थना केली. क्षमा करणें हें अतिशय अवघड कर्त्तव्य आहे. अकस बाळगावा, सूड उगवावा, हा

६ तेव्हां प्रभु बोलला, तुह्मास मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असला [1] तर या उंबराला, तूं उपटून समुद्रांत लाविलें जा असें तुह्मी सांगितलें असतां तो तुमचें मानील.

७ आणि तुह्मामधील असा कोण आहे कीं, आपला चाकर नांगरून किंवा चारून शेतांतून आल्यावर तो त्याला ह्मणेल, आतांच येऊन जेवायाला बैस.

८ उलटें, मला जेवण्यासाठीं कांहीं तयार कर, आणि मी खातों व पितों तोंपर्यंत कंबर बांधून माझी चाकरी कर, मग तूं खा व पी, असें त्याला ह्मणेल कीं नाहीं?

९ सांगितलेलीं कामें त्या चाकरानें केलीं ह्मणून तो त्याचा उपकार मानितो काय? असें मला वाटत नाहीं.

१० तसें तुह्मास जीं कामें सांगितलीं तीं सर्व केल्यावर तुह्मीहि ह्मणा, आह्मी निरूपयोगी चाकर आहों, [2] कारण कीं जें आह्माला करायाचें होतें तेंच केलें.

---

(१) मात्थ. १७:२०; २१:२१; मार्क. ९:२३; ११:२३. (२) ईयो. २२:२; ३६:७. गीत. १६:२,३; यश. ६४:६; रोम. ११:३५; १ करिं. ९:१६,१७.

मनुष्याचा जन्मस्वभाव आहे. परंतु जसी आह्मी देवापासीं क्षमा पावण्याची आशा बाळगितों तसी आम्हीं आपले अन्याय करणाऱ्यांची क्षमा केली पाहिजे असें ख्रीस्तानें शिकविलें.

६ मात्थी. १७:२० पाहा. या दोन्ही गोष्टींवरून दाखविलें आहे कीं विश्वास पुरा असला तर सर्वांहून मोठीं विघ्नें व अडचणी दूर केलीं जातील.

७ "तुम्हामधील असा कोण आहे कीं" इ० शिष्यांचा विश्वास कमी होता. ख्रीस्तानें आपलें राज्य अधिक प्रसिद्धपणें स्थापावें असी त्यांची फार इच्छा होती. ते वरचेवर कांहीं असोशीकपणा व उतावळी दाखवीत असत. या दाखल्यावरून ख्रीस्त त्यांस शिकवितो कीं जर तुम्ही माझे शिष्य आहां तर माझें ऐकलें पाहिजे. चाकरांनीं आपल्या धन्याची वाट पाहावी, त्याची भीड राखावी, त्याची सोई करावी. कोणी धनी आपल्या चाकरांची सेवा करितो असें नाहीं. त्यांनीं त्याची सेवा करावी, त्याची मर्जी व मर्यादा राखावी. तसीच तुह्मी चांगली सेवा करीत जा. चाकरीचें वेतन आतां पाहूं नका, परंतु धन्याची सोई पाहा, आणि परिणाम त्याच्या हातीं सोंपून द्या.

८, ९ लुका. १२:३७ पाहा.

१० "आम्ही निरूपयोगी चाकर." देवावर कांहीं उपकार केले नाहींत, कांहीं पुण्य केलें नाहीं, आम्ही देवाला हितकारक असें नाहीं. ईयोब. २२:२. जें जें चांगलें आम्हीं करितों तें सर्व तो कृपेनें आमच्याठायीं करवितो. जें जें चांगलें करितों तें

११ आणि असें झालें कीं तो यरूशलेमाकडे चालत असतां शोमरोन [१] व गालील यांच्या मधून गेला.

१२ आणि तो एका गांवांत जात असतां दाहा कोडी माणसें त्याला भेटून दूर [२] उभीं राहिलीं;

१३ आणि तीं मोठ्यानें ओरडत बोललीं, हे स्वामी येशू, आह्मावर दया कर.

१४ मग त्यानें पाहून त्यांस ह्मटलें, तुह्मी जाऊन आपणास याजकांला दाखवा. [३] आणि असें झालें कीं ते जात असतां [४] शुद्ध झाले.

१५ आणि त्यांतील एकानें आपण बरा झालों असें पाहून माघारें फिरून मोठ्यानें देवाचें गौरव केलें. [५]

१६ आणि त्याच्या पायांजवळ पालथें पडून त्याचा उपकार मानिला; तो तर [६] शोमरोनी होता.

---

(१) लूक. ९:५१,५२; यो. ४:४. (२) ले. १३:४६. (३) ले. १३:२;१४:२; मात्थ. ८:४; लूक. ५:१४. (४) २ राज. ५:१४; यश. ६५:२४. (५) गीत. ३०:१,२. (६) यो. ४:३९-४२.

सर्व करणें भाग होतें. जें आह्मी करितों त्या सर्वांमध्यें बहुत उणें आहे. योग्य आहे तेवढ्या नम्रतेनें, आनंदानें व विश्वासूपणानें आह्मी त्याची सेवा करीत नाहीं. ख्रीस्तानें कित्ता दाखविला त्याला आम्ही बरोबर अनुसरत नाहीं, आणि तारण जर पावतों तर यास ईश्वर आमच्या अपराधांविषयीं क्षमाशील आहे आणि आमचीं पापें व अधर्म आठवीत नाहीं हेंच कारण होईल. इब्री. ८:१२.

११ "शोमरोन व गालील." इ० गालीलापासून यरूशालेमास जातांना शोमरोन मध्यें असतां त्यांतून जावें लागलें.

१२-१४ "दाहा कोडी माणसें." मात्थी ८: १ यावर पाहा. कोड्यांस गांवांत येऊं देत नसत. ले. १३:४६; गण. ५:२३. तीं अशुद्ध होतीं म्हणून दूर उभीं राहिलीं. "आपणास याजकाला दाखवा." मात्थी. ८: ४ पाहा. ख्रीस्तानें त्यांस एकाएकीं बरें केलें नाहीं. जाऊन आपणास याजकाला दाखवावें असें त्यानें म्हटलें खरें, आणि यावरून तुम्ही शुद्ध व्हाल म्हणून त्यांस कांहीं प्रकारें समजविलें; परंतु त्यांस विश्वास धरावा लागला, आणि विश्वास धरिला नसता तर याजकाकडे कशीं गेलीं असतीं ? तसेच पापी पापकोडानें अशुद्ध झाले असतां त्यांनीं विश्वास धरून येशूकडे शरण जावें. आदीं शुद्ध केलें जावें याची वाट पाहूं नये. विश्वास धरून येऊं लागले म्हणजे शुद्ध होतील.

१५,१६ "त्यांतील एकानें." हा कृतज्ञ होता. ज्यानें त्याला शुद्ध केलें होतें त्याचे आभार आदींच मानिले पाहिजेत असें त्याच्या मनांत भरलें. मग तो याजकाकडे गेला असेल. तसेच जे पापी तारण पावतात

१७ तेव्हां येशूनें उत्तर दिल्हें कीं, दाहा जण शुद्ध झाले नाहींत काय? तर ते नऊ कोठें?

१८ या परक्यावांचून देवाचें गौरव करायास परतलेले असे कोणी सांपडले नाहींत.[1]

१९ मग त्यानें त्याला ह्मटलें, उठून जा, तुझ्या विश्वासानें [2] तुला तारिलें आहे.

२० आणि देवाचें राज्य केव्हां येईल असें परोश्यांनी त्याला विचारिलें, तेव्हां त्यानें त्यांस उत्तर दिल्हें कीं, देवाचें राज्य बाह्यात्कारीं येत नाहीं.

२१ आणि एथें पाहा, किंवा तेथें पाहा असें बोलणार नाहींत, कारण कीं पाहा, देवाचें राज्य [3] तुमच्या आंत आहे.

(१) गीत. १०६:१३. (२) मात्थ. ९:२२. (३) रोम. १४:१७.

त्यांनीं आधींच ख्रीस्ताचे उपकार मानावे, मग इतर लोकांस सांगून त्यांचेंहि मन वळविण्यास झटावें. "तो तर शोमरोनी होता." मात्थी. १०:५ यावर पाहा. आपण चांगले, आणि शोमरोनी वाईट, असें यहुद्यांचें मत होतें. या उदाहरणावरून त्यांस दिसून आलें कीं शोमरोनी यहुद्यांपेक्षां कृतज्ञ व चांगला आहे.

१७,१८ "ते नऊ कोठें आहेत." ख्रीस्तानें त्यांस याजकाकडे जायास सांगितलें होतें आणि ते गेले असतील. परंतु हा प्रश्न करून त्यानें स्पष्ट दाखविलें कीं कृतज्ञ व्हावें व उपकार मानावे हा सर्वांचा पहिला धर्म होय. तथापि याविषयीं निष्काळजी असे किती आहेत? जे ख्रीस्ताकडून क्षमा व तारण पावले आहेत त्यांपैकीं जे ख्रीस्ताचे आभार बरोबर मानीत नाहींत तें त्याचें गौरव पाहत नाहींत असे बहुत आहेत.

१९ "तुझ्या विश्वासानें तुला तारिलें आहे." असें बोलून ख्रीस्तानें त्याचा पापरोग दूर केला, आणि त्याला आपला खरा भक्त व सौख्यलोकाचा वतनदार असें केलें असेल. जे पापाची क्षमा पावून ख्रिस्ती मंडळीस मिळतात त्यांनीं याप्रमाणें कृतज्ञ होऊन देवाची स्तुति करावी व त्याच्या सेवेंत तत्पर असावें.

२०. "देवाचें राज्य." मात्थी. ३:२ यावर पाहा. मशीहा येईल तेव्हां कांहीं विशेष रीतीनें देवाचें राज्य पृथ्वीवर स्थापिलें जाईल असें सर्व यहुद्यांस वाटलें. त्यांनीं ख्रीस्ताला कांहीं तुच्छ मानून व थट्टेनें विचारिलें असेल. "बाह्यात्कारीं येत नाहीं." ख्रीस्तानें त्यांस समजाविलें कीं तुम्हांस वाटतें त्याप्रमाणें तें डौलानें व समारंभानें येईल असें नाहीं. तें जवळ आहे खरें, परंतु त्याविषयींचें तुमचें मत योग्य नाहीं. देवाचें राज्य माणसांच्या अंतःकरणांत येतें, आणि आलें ह्मणजे डामडौल असें नव्हे, तर प्रीति, शांति, आनंद, नम्रता वगैरे सद्गुण हीं फळें दिसून येतील. गल. ५:२२,२३.

२१ "एथें पाहा, किंवा तेथें पाहा." कोणी राजा आला ह्मणजे सर्व लोक असें बोलतात व समारंभ पाहायाला इकडे तिकडे धांवतात. खोटे ख्रीस्त आले तेव्हांहि तसें होत असे. प्रेषि. ५:३६, ३७ पाहा. ख्री-

२२ अणखी त्यानें शिष्यांस ह्मटलें, असे दिवस [1] येतील कीं, त्यांत मनुष्याच्या पुत्राचा एक दिवस पाहण्याची इच्छा कराल ; परंतु पाहणार नाहीं.

२३ आणि [2] एथें पाहा, किंवा तेथें पाहा, असें तुह्मास ह्मणतील, तरी निघूं नका, व त्यांच्या मागें जाऊं नका.

२४ कारण कीं जसी वीज आकाशाखालीं एका बाजूस चमकून आकाशाखालीं दुसऱ्या बाजूपर्यंत प्रकाशती, तसा मनुष्याचा पुत्रहि आपल्या दिवसांत होईल.

२५ परंतु [3] पहिल्यानें त्यानें फार सोसावें व या पिढीकडून अव्हेर पावावा याचें अगत्य आहे.

२६ आणि नोहाच्या दिवसांमध्यें झालें [4] तसें मनुष्याच्या पुत्राच्या दिवसांतहि होईल.

२७ नोहा तारवांत गेला त्या दिवसापर्यंत लोक खात पीत होते, लग्न करून घेत देत होते, आणि जलप्रलय होऊन सर्वांचा नाश झाला.

२८ आणि लोटाच्या दिवसांतहि झालें तसेंच होईल, ते खात पीत, विकत घेत देत होते, ते लावणी करीत होते, घरें बांधीत होते ;

२९ परंतु लोट सदोमांतून [5] निघाला त्याच दिवशीं आकाशांतून अग्नि व गंधक यांची वृष्टि होऊन सर्वांचा नाश झाला.

---

(१) मात्थ. १९:१५. (२) मात्थ. २४:२३; मार्क. १३:२१; लूक. २१:८. (३) मार्क ८:३१; लूक. ९:२२. (४) उत्प. ७:११,२३. (५) उत्प. १९:२३,२४.

स्तानें त्यांस शिकविलें कीं देवाचें राज्य अशा प्रकारें यायाचें नव्हे. तें अंतःकरणांत येऊन त्याच्या योगानें सर्व भावना, वासना व मनोवृत्ति शुद्ध होऊन देवाच्या इच्छेस मान्य असें व्हायाचें आहे.

२२ "असे दिवस येतील." संकटाचे दिवस येणार आहेत. त्या वेळेस शत्रु तुह्मावर स्वारी करतील आणि एवढे हाल व विपत्ति प्राप्त होतील कीं मशीहानें येऊन आह्मास शत्रूंच्या हातांतून सोडवावें असी फार इच्छा होईल, आणि खोटे ख्रीस्त उठतील, परंतु त्यांवर भरवसा ठेवून कांहीं उपाय होत नाहीं आणि तुमची उत्कंठा होईल त्याप्रमाणें कोणी सोडविणारा येणार नाहीं.

२३,२४ "असें तुम्हास म्हणतील." योसेफस म्हणतो कीं बहुत खोटे ख्रीस्त त्या वेळेस उठले आणि हजारों लोक त्याच्या नादीं लागून फसले. मात्थी. २४.२३-२७ यावरील टीका पाहा.

२५ मार्क. ८:३१ याची टीका पाहा.

२६,२७ मात्थी. २४:३७-३९ यांची टीका पाहा.

२८-३० याचें वर्णन उत्प. १९:२३-२५ एथें पाहा. त्या लोकांच्या पापामुळें देवानें

३० मनुष्याचा पुत्र प्रगट होईल[1] त्या दिवसीं त्याप्रमाणें होईल.
३१ त्या दिवसीं जो धाब्यावर असेल त्याचें खटलें घरांत असल्यास
त्यानें तें नेण्याकरितां खालीं येऊं नये; आणि जो शेतांत असेल त्यानें
तसेंच मागें फिरूं नये.
३२ लोटाच्या बायकोची अठवण करा.[2]
३३ जो कोणी[3] आपला जीव राखायास पाहील तो त्याला मुकेल,
आणि जो कोणी त्याला मुकेल तो त्याला वांचवील.
३४ मी तुह्मास सांगतों, त्या रात्रीं एका बाजेवर दोघे होतील,[4] एक
घेतला जाईल व दुसरा ठेविला जाईल.
३५ दोघी एकत्र दळीत बसतील, एक घेतली जाईल व दुसरी ठेवि-
ली जाईल.
३६ शेतांत दोघे होतील, एक घेतला जाईल व दुसरा ठेविला जाईल.
३७ मग त्यांनीं त्याला उत्तर दिल्हें कीं, हे प्रभू, कोठें! तेव्हां त्यानें
त्यांस ह्मटलें, जेथें प्रेत आहे[5] तेथें गीध जमतील.

---

(१) २. थेस. १:७. (२) उत्प. १९:२६. (३) मात्थ. १६:२५; मार्क. ८:३५; लूक. ९:२४; यो. १२:२५. (४) मात्थ. २४:४०,४१. (५) ईयो. ३९:३०; मात्थ. २४:२८.

त्यांचा नाश केला, आणि सर्वांस बोध व्हावा ह्मणून त्यांची गोष्ट उदाहरण असी लिहून ठेविली आहे. यहु. १:७; यशा.१-१०; इर्म. ४: ४०. सदोम व गमोरा, आद्मा व जबोयीम हीं चार नगरें मैदानावर वसलीं होतीं, त्यांच्या ठिकाणीं मृतसमुद्र या नांवाचें सरोवर आलें. त्या सभोंवतील भूमि गंधक नखतेल व शिलाजित यांकडून भरली आहे. अनु. २९:२३. त्या "प्रमाणें" त्या दुष्ट लोकांचा नाश अकस्मात् झाला. तसाच, यहुदी लोकांस वाटत नाहीं तेव्हां एकाएकीं त्यांचा नाश होईल असें ख्रीस्ताचें ह्मणणें होतें.

३१. मात्थी. २४:१७,१८ यांवर पाहा.

३२. लोटाच्या बायकोची आठवण करा. उत्प. १९:२६, तिनें उशीर केला व माघारें पाहिलें ह्मणून ती देवाच्या क्रोधाचा स्मरणस्तंभ असी झाली. ख्रीस्तानें शिष्यांस सांगितलें कीं विपत्ति येऊं लागली ह्मणजे उशीर करूं नका, एकाएकीं डोंगराकडे पळा. मात्थी. २४ १६. पश्चात्ताप करून ख्रीस्तावर विश्वास लवकर ठेवणें व देवासीं एकाएकीं समेटानें मिळणें याविषयीं हा बोध किती विशेषेंकरून लागतो? कोणी उशीर करूं नये.

३३ मात्थी. १०:३९ याची टीका पाहा.

३४–३६ मात्थी २४:४०, ४१. याची टीका पाहा.

३७ मात्थी. २४:२८ याची टीका पाहा. "हे प्रभू, कोठें?" हीं संकटें कोणत्या ठिकाणीं लागतील? ख्रीस्तानें सांगितलें कीं जेथें भक्ष आहे तेथें गीध जमतात. त्याप्रमाणें भांडखोर व दुष्ट असे ज्या ठिकाणीं बहुत

१८ **अध्याय.**—अणखी सर्वदा[1] प्रार्थना करावी व थकूं नये यावि-
षयीं त्यानें त्यांस असा दाखला सांगितला कीं,
२ कोणी एका नगरांत कोणी न्यायाधीश होता, तो देवाचें भय
धरीत नसे व माणसाची भीड राखीत नसे.
३ आणि त्याच नगरांत कोणीएक विधवा होती, ती त्याकडे येऊन
बोलली, माझ्या वाद्याविषयीं माझा न्याय कर.
४ तेव्हां कांहीं वेळपर्यंत तो करीना. परंतु शेवटीं त्यानें आपल्या मनांत
ह्मटलें, मी देवाचें भय धरीत नाहीं व माणसाची भीड राखीत नाहीं.
५ तरी ही विधवा मला श्रम देती, यास्तव मी तिचा न्याय करीन;
नाहीं तर ती नेहमी येऊन मला त्रास देईल.
६ तेव्हां प्रभूनें ह्मटलें, अन्यायी न्यायाधीश काय ह्मणतो हें ऐका.
७ तर देवाचे जे निवडलेले रात्रंदिवस त्याला हाक मारितात त्याविषयीं
तो सहन केला असतांहि त्यांचा न्याय करणार नाहीं काय![2]

---

(१) गीत. ६५:२;१०२:१७; लूक. ११:८;२१:३६; रोम. १२:१२; एफ. ६:१८; फिलि. ४:८.
(२) प्रग. ६:१०.

आहेत त्या ठिकाणीं सैन्यें जमतील. असें बोलून त्यानें त्यांचें लक्ष यरूशालेमाकडे ओढून लाविलें, आणि तेथें विशेषेंकरून हीं भारी संकटें लवकर पडलीं.

अध्याय १८.

१ "सर्वदा प्रार्थना करावी." सर्व प्रसंगीं, सुखांत व दुःखांत, नित्य देवाची प्रार्थना करण्याची बुद्धि व सवयी बाळगावी आणि नेमलेल्या वेळीं रोज रोज प्रार्थना करावी. "थकूं नये." जर उत्तर मिळत नाहींसें वाटतें तरी प्रार्थना करणें सोडूं नये.

२, ३ "न्यायाधीश." जो न्याय करायास नेमला आहे त्यानें देवाचें भय धरावें आणि माणसाचेंहि कल्याण पाहावें. जो कोणी देवाचें भय धरीत नाहीं तो माणसाची भीड अथवा काळजी राखणार नाहीं. न्यायाधीश कसा असावा याविषयीं अनु. १:१६, १७ पहा. "कोणी एक विधवा होती." जिनें अर्जी केली ती विधवा होती, यावरून त्याला ऐकणें व इनसाफ बरोबर करणें अधिक जरूर पडलें. इर्म. २२:३.

४ "तो करीना." वाद्याच्या तरफेनें कांहीं लांच खाऊन ठरवावें असें त्याच्यामनांत होतें, अथवा कसा काय त्याचा हेतु हें दाखविलें नाहीं, परंतु कांहीं तरी कारणावरून उशीर करून तो न्याय करीना. तथापि ती विधवा न थकतां आग्रह करीत गेली.

५ "नेहमी येऊन...मला त्रास देईल." तिचा न्याय करावा हें योग्य होतें म्हणून त्यानें केला, असें नाहीं, तर आपणाला त्रास न व्हावा म्हणून केला. जें केलें तें योग्य होतें, परंतु करण्याचा हेतु वाईट होता.

६, ७ "हें ऐका." लक्ष लावून बोध घ्या. "जे निवडलेले."ह्मणजे खरे ख्रिस्ती. देवानें

८ मी तुह्मास सांगतों कीं, तो त्यांचा न्याय लवकर करील[1] परंतु मनुष्याचा पुत्र येईल तेव्हां पृथ्वीवर त्याला विश्वास सांपडेल काय?[2]

९ अणखी आपण न्यायी आहों असा ज्या कित्येकांनीं आपणाविषयीं विश्वास[3] धरून दुसऱ्यास धिःक्कारिलें त्यांस त्यानें हा दाखला सांगितला कीं,

---

(१) गीत. ४६:१; इब्रि. १०:३७; २ पेत्र. ३:८,९. (२) मात्थ. २४:१२. (३) लूक. १०:२९.

त्यांस निवडिलें ह्मणून ते त्याचे लोक झाले. त्यांस निवडून, क्षमा करून व सर्वकाळचें जीवन देऊन ईश्वर त्यांवर अत्यंत प्रीति दाखवितो. १ थेस. १:४; कल. ३:१२; १ पेत्र. १:२; एफ. १:४. "रात्रंदिवस हाक मारितात." देवानें निवडलेल्यांचें एक गुणलक्षण एथें सुचविलें आहे. ते अखंड प्रार्थना करितात. प्रार्थना करणें व प्रार्थना करण्याची गोडी करून घेणें हें खरा ख्रिस्ती झाल्याचें चांगलें प्रमाण आहे. "तो सहन केला असतांहि." जरी तो उशीर करून त्यांचा विश्वास प्रीति वगैरे सद्गुणांची परीक्षा पाहतो, तरी तो "त्यांचा न्याय करणार नाहीं काय?" गरीब विधवेच्या आग्रहामुळें अन्यायी न्यायाधीश तिचें ऐकतो तर जो न्यायी व कृपाळू देव तो आपल्या प्रिय व निवडलेल्या लोकांचें ऐकणार नाहीं काय?

८ "तो त्यांचा न्याय लवकर करील." जे मोठे हाल लवकर प्राप्त व्हावयाचे होते ते लक्षून ख्रीस्तानें ही गोष्ट सांगितली असेल, तरी सर्वदा व सर्वप्रकारच्या संकटांत ख्रिस्ती लोकांनीं हा दाखला आठवून देवावर भरवसा ठेवून त्याची प्रार्थना करीत जावें. "परंतु मनुष्याचा पुत्र येईल." इ० जरी ईश्वर त्यांचा न्याय करील तरी त्यांनीं विश्वासू होऊन प्रार्थनेंत टिकावें. भय हेंच आहे कीं देवाचे लोक पुरता विश्वास धरणार नाहींत. ईश्वर त्यांचें ऐकणार नाहीं अथवा न्याय करणार नाहीं याचें कांहींच भय नाहीं. परंतु संकटें प्राप्त होतील तेव्हां मंडळींतले जे त्यांतील बहुतेक निराश होऊन हटतील, देवाची सेवा व प्रार्थना करण्यांत टिकणार नाहींत हेंच भय आहे. आपलें येणें, ह्मणजे यरूशालेमाचा नाश करायाला येणें. असें विशेषेंकरून समजायाचें ह्मणून दिसतें. परंतु हरएक मनुष्याच्या आयुष्यांत आणि मरते वेळेस जीं संकटें प्राप्त होतात त्या सर्वांविषयीं ही गोष्ट लागती. जेव्हां आशा भंग होती, मित्र मरतात, संपत्ति उडून जाती, शत्रू आमचे अन्याय करितात व आमच्या पाठीस लागतात तेव्हां आह्मी सर्वदा ईश्वरावर भरवसा ठेवीत जातों काय? थकत नाहीं पण प्रार्थना विश्वासानें करीत जातों काय?

९ "आपण न्यायी आहों." इ० यावरून परोश्यांचा स्वभाव व गुणलक्षणें बरोबर दर्शविलीं आहेत. नेमशास्त्रांत सांगितलेले विधि व कृत्यें जपून पाळल्यानें आपण पुण्यवान व श्रेष्ठ असें ते मानीत असत, व इतर लोकांस धिक्कारीत असत. यशा. ६५:५. उलट्या प्रकारें देवाचे खरे भक्त नम्र होतात. आपण गरीब, पापी, लाचार पुण्याविरहित असें मोजून ते ख्रीस्तावर भरवसा ठेवून त्यानें केलेलें पुण्य आपलें असें करून घ्यायास पाहतात. ते कोणी एकाला धिक्कारीत नाहींत; सर्वांवर प्रीति करितात, परंतु तेहि

१० दोन माणसें प्रार्थना करायास देवळांत गेलीं, त्यांतील एक परो-
शी व एक जकातदार.
११ परोश्यानें उभें राहून आपल्या मनांत असी प्रार्थना केली, हे
देवा, दुसरीं माणसें अपहारी, अन्यायी, व्यभिचारी यांसारिखा, [1] किंवा
या जकातदारासारिखाहि मी नव्हें, यास्तव मी तुझा उपकार मानितों.
१२ दर आठवड्यांत मी दोनदां उपास करितों, जें कांहीं मला मि-
ळतें त्या अवघ्यांचा दाहावा भाग देतों.

---

(१) यश. ६५:५ : प्रग. ३:१७.

भ्रष्ट पापी आहेत असें जाणून ते त्यांस तारायास प्रयत्न करितात.

१० "देवळांत." ज्या अंगणांत प्रार्थना करीत असत तेथें. मात्थी. २१:१२. यावर टीका पाहा. "परोशी." मात्थी. ३:७ एथलीं टीका पाहा. "जकातदार." मात्थी. ५. ४६ याचें व्याख्यान पाहा.

११ "हे देवा......तुझा उपकार मानितों." यांत धार्मिकपणाचें सोंग आहे. जर देवानें आह्मास पाप करण्यापासून राखिलें आहे तर याबद्दल एकांनीं त्याचा उपकार मानावा हें अयोग्य असें नाहीं, तर योग्य आहे. परंतु लोकांनीं करूं नये आणि असा उपकार मानितांना आपण अद्यापि पापी आहों आणि आह्मांस पापाची क्षमा पाहिजे हें विसरूं नये.

१२ "दर आठवड्यांत मी दोनदां उपास करितों." परोश्याच्या धार्मिकपणांत दोन गोष्टी आल्या. एक हीच कीं दुसऱ्यांचे अन्याय केले नाहींत. दुसरी ही होती कीं बाह्यात्कारी विधि जपून पाळीत असे. हींतली पहिली रकम उपास करणें. दर सप्तकांतल्या दुसऱ्या व पांचव्या दिवशीं उपास करावा ही परोश्यांची चाल होत असे, आणि हें नेमशास्त्रांत सांगितलेल्या शिवाय जास्त असें होतें, ह्मणून कांहीं पुण्य मिळतें असें ते मोजीत असत. "दाहावा भाग देतों" ही दुसरी रकम आहे. इस्राएल लोकांस आपल्या मालांचे दाहावे भाग लेव्यांच्या पोषणार्थ द्यावे लागले. गण. १८:२१. परोशी फार बारीक पाहून अवघ्यांचा दाहावा हिस्सा देत असत. लूक. ११:४२. आणि असें करून आपण विशेष पुण्यवान असें मोजीत असत. तर परोश्यांचें धार्मिकपण ह्मणजे स्वपुण्य असें होतें. त्याची चूक हीच होती कीं त्यानें आपलीं पापें पदरांत घेतलीं नाहींत व देवापाशीं क्षमा मागितली नाहीं. स्वपुण्यावर भरवसा ठेवून त्याची भक्ति देवाला पसंत झाली नाहीं. या गोष्टीवरून सर्वांस समजावें कीं, १ ज्या माणसाचें विश्वासप्रकरण जनरूढीप्रमाणें अथवा बिनचूक आहे तो सर्वांहून धार्मिक आहे असा नाहीं. २ जे बाह्य विधि संध्या फार जपून पाळतात ते ईश्वराच्या मोजण्यांत वारंवार उणे आहेत. ३ जे अशा बाह्य गोष्टी करण्याविषयीं फार जपतात त्यांस वरचेवर खरें धार्मिकपण अगदी समजत नाहीं. ४ आपण पुण्यवान असी दाखवून सुकृत्यांविषयीं वल्गना करावी हें ईश्वराला ओंगळ व त्रासदायक आहे. जो कोणी ईश्वराकडे येतो त्यानें पापें पदरांत घेऊन यावें.

१३ परंतु जकातदार, दूर उभा राहून आकाशाकडे डोळे देखील वर लावायास धजत नसतां आपल्या उरावर मारून [1] बोलला हे देवा, मज पाप्यावर दया कर.

१४ मी तुह्मास सांगतों, हा दुसऱ्यापेक्षां न्यायी ठरून आपल्या घरीं गेला. कारण कीं जो कोणी आपणाला उंच करील [2] तो नीच होईल, आणि जो आपणाला नीच करील तो उंच होईल.

१५ नंतर त्याजकडे त्यांनीं बाळकेंहि त्यानें त्यांस शिवावें ह्मणून आणिलीं; [3] परंतु शिष्यांनीं पाहून त्यांस धमकाविलें.

१६ तेव्हां येशूनें त्यांस बोलावून ह्मटलें, बाळकांस मजकडे येऊं द्या, त्यांस मना करूं नका; कारण कीं देवाचें राज्य असल्यांचें आहे.

१७ मी तुह्मास खचीत सांगतों, जो कोणी देवाचें राज्य बाळकासारिखें [4] घेणार नाहीं तो त्यांत जाणारच नाहीं.

१८ आणि कोणीएका अधिकाऱ्यानें [5] त्याला विचारिलें कीं, हे उत्तम गुरू, मी काय केल्यानें सर्वकालचें जीवन पावेन?

१९ तेव्हां येशू त्याला ह्मणाला, मला उत्तम कां ह्मणतोस? एक जो देव त्यावांचून कोणी उत्तम नाहीं.

---

(१) इर्म. ३१:१९. (२) ईयो. २२:२९; मात्थ. २३:१२. (३) मात्थ. १९:१३; मार्क. १०:१३. (४) गीत. १३१:२; मार्क. १०:१५; १ पेत्र. २:२. (५) मात्थ. १९:१६; मार्क. १०:१७.

---

१३ "दूर उभा राहून." असल्या पवित्र स्थानाजवळ येण्यास मी योग्य नाहीं असें मनांत आणून व आपल्या पापामुळें लाज व खेद वाटून तो आकाशाकडे पाहीना. "उरावर मारून." ही सर्व लोकांमध्यें खेद व शोक करण्याची खूण आहे. "मजपाप्यावर दया कर." ही परोश्याच्या प्रार्थनेपासून किती वेगळी. आपलें पुण्य किंवा सुकृत यांचें नांव देखील तो घेत नाहीं. मी पापी आहें असी खातरी धरून तो कबूल होतो. ही प्रार्थना देवाला पसंत झाली. जो पापी असून कबूल करीत नाहीं तो दुष्ट व ढोंगी होतो. पाप करण्यांत अपमान होतो कबूल करण्यांत कांहीं अपमान नाहीं.

१४ "हा दुसऱ्यापेक्षां न्यायी." ईश्वर अंतःकरणाकडे पाहतो आणि त्यानें पाहिलें कीं हा जकातदार आपल्या पापामुळें वास्तविक खेद करितो; परंतु परोशी आपलीं पापें समजत नाहीं; ह्मणून त्यानें एकाची क्षमा केली व दुसऱ्याची केली नाहीं.

"जो कोणी." लू. १४:११ यावर पाहा.

१५–३० मात्थ. १९:१३–३० यांवर टीका पाहा.

२० आज्ञा[१] तुला कळल्या आहेत, व्यभिचार करूं नको, हत्या करूं नको, चोरी करूं नको, खोटी साक्ष देऊं नको, आपल्या आईबापांचा सन्मान कर.

२१ मग तो बोलला, मी आपल्या लहानपणापासून या अवघ्या पाळीत आलों आहें.

२२ तेव्हां येशूनें हें ऐकून त्याला ह्मटलें, अझून तुला एक उणें आहे, आपलें सर्व विकून दरिद्र्यांस वांटून दे, ह्मणजे तुला आकाशांत [२] संपत्ति मिळेल; चल, माझ्या मागें ये.

२३ परंतु तो हें ऐकून फार खिन्न झाला, कारण कीं तो फार धनवान होता.

२४ तेव्हां तो खिन्न झाला हें पाहून येशू बोलला, धनवानांस देवाच्या राज्यांत जायाला किती कठीण आहे ! [३]

२५ कारण कीं धनवानाला देवाच्या राज्यांत जाणें यापेक्षां उंटाला सुईच्या नाकांतून जाणें सोपें आहे.

२६ तेव्हां ऐकणाऱ्यांनीं ह्मटलें कीं, तर तारण कोण पावेल ?

२७ मग तो बोलला, ज्या गोष्टी माणसांच्यानें होत नाहींत [४] त्या देवाच्यानें होतात.

२८ तेव्हां पेत्रस बोलला, पाहा, आह्मी सर्व सोडून तुझ्या मागें चाललों आहों.

२९ मग त्यानें त्यांस ह्मटलें, मी तुह्मास खचीत सांगतों कीं, जो घर [५] किंवा आईबापें किंवा भाऊ किंवा बायको किंवा लेंकरें देवाच्या राज्याकरितां सोडील,

३० आणि या काळीं बहुपट व पुढल्या काळीं [६] सर्वकालाचें जीवन पावणार नाहीं असा कोणीच नाहीं.

३१ तेव्हां त्यानें बारा जणास जवळ घेऊन त्यांस ह्मटलें, पाहा, आपण यरूशलेमास जातों, आणि मनुष्याच्या पुत्राविषयीं ज्या गोष्टी भविष्यवाद्यांनीं लिहिल्या [७] त्या सर्व पूर्ण होतील.

---

(१) निर्ग. २०:१२-१६; अनु. ५:१६-२०; रोम. १३:९. (२) मात्थ. ६:१९,२०, १ तीम. ६:१९. (३) नी. ११:२८; १ तीम. ६:९. (४) इर्म. ३२:१७; जख. ८:६; लूक. १:३७. (५) अनु. ३३:९. (६) प्रग. २:१०. (७) गीत. २२; यश. ५३.

३१-३३ मात्थ. २०:१७-१९ यावर टीका पाहा. मनुष्याच्या पुत्राविषयीं ह्मणजे मशीहा-

३२ कारण कीं त्याला विदेश्यांच्या स्वाधीन करितील,[1] आणि ते त्याची थट्टा व हेळणा करितील व त्यावर थुंकतील.

३३ आणि त्याला फटके देऊन जिवें मारितील, मग तिसऱ्या दिवसीं तो पुन्हा उठेल.

३४ परंतु त्यांतील कांहींच त्यांस समजलें नाहीं,[2] आणि ही गोष्ट त्यांपासून गुप्त राहिली, आणि ज्या गोष्टी सांगितल्या त्या त्यांनीं जाणल्या नाहींत.

३५ आणि असें झालें[3] कीं तो यरीहोजवळ आल्यावर कोणी अंधळा वाटेवर भीक मागत बसला होता.

३६ तेव्हां समुदाय जवळून जात आहे हें ऐकून त्यानें पुसलें कीं, तें काय आहे?

३७ तेव्हां त्यांनीं त्याला सांगितलें कीं, येशू नाजारेथकर जवळून जात आहे.

३८ तेव्हां तो ओरडत बोलला, हे येशू दावीदाच्या पुत्रा, मजवर दया कर.[4]

३९ तेव्हां त्यानें उगेंच राहावें ह्मणून पुढें चालणाऱ्यांनीं त्याला धमकाविलें, परंतु तो अधिकच ओरडला[5] कीं, हे दावीदाच्या पुत्रा, मजवर दया कर.

४० तेव्हां येशूनें उभें राहून आपल्याकडे त्याला आणावें ह्मणून आज्ञा केली.

---

(१) मात्थ. २७:२; लूक. २३:१; यो. १८:२८; प्रेषि. ३:१३. (२) मार्क. ९:३२; यो. १२:१६. (३) मात्थ. २०:३०-३२; मार्क. १०:४५. (४) गीत. ६२:१२. (५) गीत. १४१:१.

विषयीं. दान. ९:२५–२७; यश. ५३. ह्या गोष्टी ख्रीस्ताविषयीं पूर्ण झाल्या.

३४ "परंतु......त्यांस समजलें नाहीं." ख्रीस्तानें एवढें स्पष्ट सांगितलें असतांहि ते बुद्धिमंद व गैरखुशी असून समजतना. मशीहा येईल तेव्हां राजगादीवर बसून तो विजयी होईल व सर्व शत्रूंस मारील तर तो आपल्या शत्रूंच्या हातीं पडून जिवास मुकेल कसा? असें त्यांस वाटलें. आतां ही गोष्ट आह्मास समजण्यास सवघड आहे. तसेंच आह्मास गूढ वाटतात अशा बहुत गोष्टी समजायाला पुढें अगदीं सोपें पडेल ह्मणून संभाव्य आहे. मात्थ. १६:२१; १७:२३.

३५–४३ मात्थ. २०:२९–३४ यांची टीका पाहा.

४१ मग तो जवळ आल्यावर त्यानें त्याला विचारिलें कीं म्यां तुज-
साठीं काय करावें ह्मणून मागतोस? तेव्हां तो बोलला, हे प्रभू, मला दिसावें.

४२ तेव्हां येशू त्याला ह्मणाला, तुला दिसो, तुझ्या विश्वासानें [1] तु-
ला तारिलें आहे.

४३ तेव्हांच त्याला दिसूं लागलें, [2] मग तो देवाचें गौरव करीत [3]
त्याच्या मागें चालला; आणि सर्व लोकांनीं पाहून देवाची स्तुति केली.

१९ अध्याय.—आणि तो यरीहोंत येऊन त्यामधून [4] जात होता.

२ तेव्हां पाहा, जाक्खी नामें कोणी माणूस तेथें होता, तो जकात-
दारांमध्यें मुख्य, व धनवानहि होता.

३ मग त्यानें येशू कसा कोण आहे हें पाहायास यत्न केला, परंतु
दाटीमुळें त्याचें चालेना कां कीं तो ठेंगणा होता.

४ तेव्हां तो त्याला पाहायासाठीं पुढें धावून उंबरावर चढला, कां तर
तो त्या वाटेनें जाणार होता.

५ आणि त्या ठिकाणीं आला तेव्हां येशूनें दृष्टि वर करून त्याला पा-
हिलें [5] व त्याला ह्मटलें, जाक्खी, लवकर उतर, कां कीं आज तुझ्या
घरीं [6] मला राहायाचें आहे.

---

(१) लूक. १७:१९. (२) गीत. ३०:२. (३) लूक. ५:२६; प्रेषि. ४:२१,११:१८; गल. १:२४. (४) यहो. ६:२६; १ राज. १६:३४. (५) गीत. १३९:१-३. (६) यो. १४:२३; प्रग. ३:२०.

अध्याय १९.

१–३ "जाक्खी" हें नांव इब्री असून तो यहुदी होता असें कळतें. तर जकातदार हे सर्व परदेशी असे नव्हते. "मुख्य व धनवानहि होता." यहुदी सर्व जकातदारास नीच व तुच्छ मानीत असत, तरी त्यांतील कितीएक मानबर असे होते. हा जाक्खी धनवान असून इतरांवर कांहीं देखरेख व अधिकार करीत असे. "येशू......पाहायास यत्न केला." ख्रीस्ताची कीर्ति ऐकण्यांत आली होतीसें दिसतें. त्याला पाहायास त्यानें इच्छिलें, आणि यावरून देवाचा खरा भक्त होऊन तो तारण पावला.

४,५ "तुझ्या घरीं मला राहायाचें आहेत." एवढा मान मिळेल असें जाक्खीला वाटलें नव्हतें. या गोष्टीवरून समजावें कीं ख्रीस्त कसा आहे व त्याकडून तारण कसें होईल याविषयीं समजावयास इच्छितात त्यांस तो सांपडेल व आशीर्वाद देईल. धनवानाच्या घरांत जर नम्र अंतःकरण असेल तर तो त्याला धिक्कारीत नाहीं. जसें दरिद्र्यांस तसें धनवानांसहि तारण पाहिजे आणि जर ते ख्रीस्ताकडे येऊन व पश्चात्ताप करून त्याजवर विश्वास ठेवितील तर ते तारण पावतील.

६ मग त्यानें लवकर उतरून आनंदानें त्याचा अंगीकार केला.
७ तेव्हां सर्व पाहून कुरकूर करूं लागलीं कीं [1] पापी माणसाच्या
घरीं तो उतरायास गेला आहे.

८ तेव्हां जाक्खी उभा राहून प्रभूला ह्मणाला, हे प्रभू, पाहा, मी
आपलें अर्धें द्रव्य दरिद्र्यांस देतों, [2] आणि जर कुभांडानें [3] कोणाचे
कांहीं घेतलें असेल तर चौपट [4] परत देतों.

९ तेव्हां येशूनें त्याला ह्मटलें, आज या घराला तारण मिळालें, कां
तर हाहि अब्राहामाचा [5] पुत्र आहे.

---

(1) मात्थ. ९:११; लूक. ५:३०. (2) गीत. ४१:१. (3) निर्ग. २०:१६; लूक. ३:१४.
(4) निर्ग. २२:१; २ शमु. १२:६. (5) लूक. १३:१६.

६,८ "पापी माणसाच्या घरीं." सर्व जकातदार पापी, असें ते मोजीत असत, आणि हा जाक्खी त्यांमध्यें मुख्य असतां विशेष पातकी आहे, असें त्यांस वाटलें. परंतु ख्रीस्त पाप्यांस तारायास आला आणि जाक्खीनें देखील पश्चात्ताप करून देवाचा खरा भक्त व्हावा ह्मणून साध्य आहे हें त्यांनीं मनांत आणिलें नाहीं. "आपलें अर्धें द्रव्य द्ररिद्र्यांस देतों." हा तसें करीत आला होता असें दिसत नाहीं; केवळ त्याच वेळेस ख्रीस्ताचा उपदेश ऐकून तो त्याच्या मनांत ठसला, व त्याची खातरी झाली कीं मी पापी आहें, देवाच्या आज्ञा मोडल्या व लोकांचे अन्याय केले ह्मणून एकाएकीं पश्चात्ताप करून त्यानें हा निश्चय केला असें दिसतें. त्यानें स्वगुण्य दाखवावें ह्मणून, असें नव्हे, तर मनांतला खरा पश्चात्ताप दाखवावा ह्मणून ख्रीस्ताला हें ह्मटलें. रोम. १०:११. "जर कुभांडानें." इ० एथल्या मूळ शब्दाचा अर्थ लूक. ३:१४ यांत आळ घालणें असा आहे. असा आळ घालून योग्यपेक्षां पुष्कळ जकात उगवावी ही बहुत जकानदारांची वहिवाट होती. ज्यां कांहीं जुलूम केला आहे असी साक्ष जाक्खीचें मन देऊं लागलें असेल आणि याकरितां त्यानें चौपट परत देण्याचा निश्चय केला. हें करायास तो आपखुशीनें सिद्ध झाला यावरून चांगलें प्रमाण पटतें कीं त्याच्या पश्चात्ताप खरा होता. कोणी मेंढरें चोरलीं आणि याविषयीं कोर्टांत प्रमाण पटलें तर चौपट भरून द्यावें असें नेमशास्त्रांत आहे. निर्ग. २२:१. जर चोर आपखुशीनें कबूल झाला तर त्यानें त्याचें योग्य मोल भरून द्यावें आणि त्याशिवाय त्याचा पंचमांश द्यावा. गण. ५:६, ७.

९ "या घराला तारण मिळालें." या घराला ह्मणजे या कुटुंबाला. जेव्हां कोणी ख्रीस्ताला अंगीकारून क्षमा पावतो तेव्हां त्याचें तारण सुरू होतें. जेव्हां त्याचें अंतःकरण अगदीं शुद्ध होऊन तो सौख्यलोकांत पोहंचतो तेव्हां त्याचें तारण पूर्ण होतें.

"आब्राहामाचा पुत्र आहे." हा अद्यापि जरी यहुदी तरी पापी व अविश्वासी होता. आतां पश्चात्ताप करून व ख्रीस्त ज्याचा दिवस पाहून आब्राहाम आनंद पावला.

१० कारण कीं जें हरपलेलें [1] तें शोधायास व तारायास मनुष्याचा पुत्र आला आहे.

११ या गोष्टी ते ऐकत होते तेव्हां तो यरूशलेमाजवळ होता, आणि देवाचें राज्य लवकर प्रगट होणार आहे [2] असें त्यांस वाटलें, ह्मणून त्यानें आणखी दाखला सांगितला.

१२ तेव्हां तो बोलला, कोणी कुलीन [3] माणूस आपल्याला राज्य मिळवून माघारें यावें ह्मणून दूर देशांत गेला.

---

(१) मात्थ. १८:११; यहेज्क. ३४:१६; रोम. ५:६. (२) प्रेषि. १:६. (३) मात्थ. २५:१४; मार्क. १३:३४.

(यो. ८:५६) त्याला अंगीकारून हा आब्राहामाचा पुत्र असा खरोखर झाला आहे. आब्राहाम यहुदी लोकांचा वडील असा केवळ नव्हे, तर सर्व विश्वासणाऱ्यांचा बाप आहे. रोम. ४:११. जाक्खी जन्मानें. आणि आतां विश्वासानें त्याचा पुत्र असा होता.

१० मात्थी. १८:११ यावर पाहा.

११ "देवाचें राज्य लवकर प्रगट होणार." इ०, जे ख्रीस्ताच्या मागें चालले त्यांस अद्यापि वाटलें कीं तो राज्यगादीवर बसून यहुद्यांचा ऐहिक राजा होईल, आणि बहुतेकांस वाटलें कीं आतां यरूशालेमाजवळ पोहंचला म्हणजे गादीवर बसून लवकर राज्य सुरू करील. हें मत खरें नाहीं, असें दाखविण्याकरितां ख्रीस्तानें हा दाखला सांगितला. हा दाखला बहुत प्रकारें मात्थ. २५:१४–२८ एथल्या दाखल्यासारिखा आहे, तरी तोच असा नाहीं. तो दाखला ख्रीस्तानें यरूशालेमांत पोहंचल्यावर सांगितला; हा त्यानें पोहंचल्या पूर्वी सांगितला. तो जाईत झाडांच्या डोंगरावर हा जाक्खीच्या घरीं सांगितला. वेळ, बुद्धि, शक्ति, संपत्ति वगैरे चांगल्या कामांस लावण्याचें अगत्य दाखवावें म्हणून येशूनें तो दाखला सांगितला; त्यांच्या मशीहाच्या राज्याविषयींचीं खोटीं मतें सुधारण्यास त्यानें हा दाखला सांगितला.

१२ "कोणी कुलीन माणूस......... दूर देशांत गेला." ज्या गोष्टी त्या वेळेस यहुदांत घडत होत्या त्यांस लक्षून येशूनें हा दाखला योजला असें दिसतें. ख्रीस्त आल्यापूर्वीं सुमारें ६० वर्षांनीं पांपी ह्मणून एक रोमी सेनापति यानें यहुदा जिंकून रोमी बादशाहांच्या अमलांत आणिला होता. यहुदी मागसांनीं अमल चालविले परंतु रोमी सरकाराच्या हाताखालीं चालविले. महान हेरोद यानें रोम एथें जाऊन आपलें राज्य आंतोनी यापासून मागून घेतलें होतें, आणि जेव्हां त्यानें आपल्या राज्याचा एक भाग आपल्या आर्केलावस पुत्राला दिल्हा तेव्हां तो प्रांत आपल्याकडे मिळावा ह्मणून आर्केलावसानें रोमी बादशाहाकडे जाऊन मागून घेतला. महान हेरोदाचा नातू धाकटा आग्रिपाहि तिबेरयस नामक बादशाहाकडे जाऊन आपलें राज्य करून घेतलें. असल्या बहुत गोष्टी घडल्यावरून हा दाखला त्या लोकांस समजण्यास सुलभ पडला असेल. कुलीन माणूस यावरून ख्रीस्त दर्शविला आहे. दूर देशांत जाण्यावरून असें दाखविलें आहे कीं ख्रीस्त या जगांत आपलें राज्य

१३ आणि त्यानें आपल्या दाहा चाकरांस बोलावून त्यांस दाहा मोहरा* दिल्ह्या, व त्यांस ह्मटलें, मी येई तोंपर्यंत व्यापार करा.

१४ परंतु त्याच्या देशांतील लोक(१) त्याचा द्वेष करीत होते, ह्मणून त्यांनीं त्याच्या मागें वकिलांस पाठवून सांगितलें, हा आह्मावर राज्य करायाला नको.

१५ मग असें झालें कीं तो राज्य मिळवून माघारा आल्यावर ज्या चाकरांस पैका दिल्हा होता त्यांतील कोणी काय मिळविलें हें समजावें ह्मणून त्यानें त्यांस आपल्याकडे बोलवायास सांगितलें.

(१) यो. १:११; १५:१८.

पूर्णपणें स्थापण्यापूर्वीं बापाकडे सौख्यलोकांत जाईल.

१३ "दाहा चाकरांस." ह्मणजे आपले सेवक जे त्यांस. दाहा म्हणजे फलाणे, जितके असतील तितके. याप्रमाणें दाहा मोहरा ह्मणजे अनेक मोहरा. मोहरा या शब्दावरून अक्कल, शक्ति वगैरे. देवानें एकाला कमी एकाला ज्यास्त असें दिल्हें आहे. परंतु एकएकाला आपली बुद्धि व शक्ति चांगल्या कामास लावून देवाचें गौरव पाहायाचें आहे. त्या चाकरांस व्यापार करून आपली संपत्ति वाढवायाची होती. त्याप्रमाणें देवभक्तांनीं मरण येई तोंपर्यंत तन मन धन सर्वस्व देवाच्या सेवेंत घालावें. १ करिं. १२:७; एफ. ४:७.

१४ "त्याच्या देशांतील लोक." ज्यांवर राज्य करावें ह्मणून त्याची इच्छा होती ते. "द्वेष करीत होते." राज्य करून घ्यायास पाहतो तो वाईट जुलमी दुष्ट असेल तर प्रजेस त्याचा द्वेष करण्याचें कारण होतें. परंतु राजा चांगला व न्यायी असतां दुष्ट प्रजा कधीं कधीं विनाकारण त्याचा द्वेष करितात; आणि याप्रमाणें विशेषेंकरून यहुदी ख्रीस्ताचा द्वेष अगदीं विनाकारण करीत असत. "त्याच्या मागें वकिलांस पाठवून." इ० महान हेरोदानें मरते वेळेस आपल्या आर्केलावस नामक पुत्राला राज्य दिल्हें तेव्हां आर्केलावसाला रोमाकडे जाऊन बादशाहाजवळ तें कायम मागून घ्यावें लागलें. आणि त्याचे गुण व स्वभाव जाणून (मात्थ. २:२२) यहुद्यांनीं त्याच्या मागून पन्नास वकिलांस पाठवून औगुस्तस बादशाहापासीं अर्जी केली कीं अर्केलावसाला राज्य कायम करून देऊं नका. तरी बादशाहानें त्यांचें न ऐकतां अर्केलावसाला राज्य कायम करून दिल्हें. असी गोष्ट नुक्तीच यहुद्यांमध्यें घडली असतां हा दाखला अधिक उघड व समजण्यासारिखा होता. चांगल्या राजानें आह्मावर राज्य न करावें असी इच्छा दुष्ट लोक दाखवितात, त्याप्रमाणेंच तुम्ही यहुदी, मी जो तुमचा खरा मशीहा त्या माझा द्वेष करून मला धिःकारितां (यो. १. ११) हा ख्रीस्ताच्या बोलण्याचा अभिप्राय होता. तसेच सर्व पापी, ख्रीस्तानें त्यांवर राज्य करावें, असें इच्छीत नाहींत. ते त्याला धिःकारितात व स्वेच्छेनें चालून नाश पावतात.

१५ मात्थ. २५:१९ पाहा.

* मूळ शब्द मैना यांचें मोल ३ पौंद २ औंस ५ पेन्स असें होतें.

१६ मग पहिला येऊन बोलला, महाराज, तुझ्या एका मोहरेवर दाहा मोहरा मिळविल्या आहेत.

१७ तेव्हां त्यानें त्याला ह्मटलें, बरें उत्तम चाकरा, तूं फार थोडक्याविषयीं विश्वासू[१] झालास, यास्तव दाहा नगरांचा अधिकारी हो.

१८ नंतर दुसरा येऊन बोलला, महाराज, तुझ्या एका मोहरेवर पांच मोहरा मिळविल्या आहेत.

१९ तेव्हां त्यालाहि त्यानें ह्मटलें, तूंहि पांच नगरांचा अधिकारी हो.

२० मग आणखी एक येऊन बोलला, महाराज, पाहा हीं तुझी मोहर, म्यां रुमालांत बांधून ठेविली आहे.

२१ कां तर मी तुला भ्यालों. कारण कीं तूं कठोर माणूस आहेस, जें त्वां ठेविलें नाहीं तें घेऊन जातोस व जें त्वां पेरिलें नाहीं तें कापितोस.

२२ तेव्हां त्यानें त्याला ह्मटलें, अरे वाईट चाकरा, मी तुझ्याच तोंडानें[२] तुझा न्याय ठरवितों. मी कठोर माणूस आहें, जें म्यां ठेविलें नाहीं तें घेऊन जातों व जें म्या पेरिलें नाहीं तें कापितों, हें तुला ठाऊक होतें.

२३ तर माझा पैका सावकाराजवळ कां ठेविला नाहींस?[३] ह्मणजे म्यां येऊन तो व्याजासुद्धां उगविला असता.

---

[१] लूक. १६:१०. [२] २ शमु. १:१६; ईयो. १५:६; मात्थ. १२:३७; २२:१२; रोम. ३:१२.
[३] रोम. २:४,५.

१६–१९ मात्थ. २५:२०,२१. "दाहा नगराचा अधिकारी हो." हें आकाशलोकांत अक्षरशः पूर्ण होईल असें समजायाचें नाहीं. तथापि आपण ज्या परिमाणानें आपली बुद्धि व शक्ति खर्चून देवाची सेवा करितों त्याप्रमाणें सौख्यलोकांत फळ प्राप्त होईल असें समजायाचें आहे.

२० "रुमालांत बांधून ठेविली आहे." उडविली नाहीं पण फार जपून ठेविली. तसीच बहुत लोक आपली बुद्धि, शक्ति, संपत्ति यांविषयीं करितात. ते त्यांस आपल्या जवळ राखितात व त्यांविषयीं अभिमानी होतात, परंतु देवाची सेवा करण्यास ते त्यांचा उपयोग कधीं करीत नाहींत.

२१,२२ "मात्थ. २५:२४,२५ पाहा. हा आपल्यावरून दोष निवारण करावा म्हणून आपल्या धन्यावर दोष ठेवितो. "तुझ्याच तोंडाने" इ० मी कठोर आहें असें त्वा जाणिलें तर आळस करण्याचें तुला अगदीं निमित्त नाहीं. ईश्वर कठोर आहे असें समजायाचें नाहीं खरें, तरी तो न्यायी आहे आणि सर्वांचा न्याय बरोबर करील; असें समजून सर्वांनीं हिशोब देण्यास सिद्ध असावें. त्या काळीं निमित्त चालणार नाहीं असें सर्वांस अगाऊ कळलें आहे.

२३-२५ "त्याजवळ दाहा मोहरा आहेत."

२४ तेव्हां जवळ उभे राहणाऱ्यांस त्यानें सांगितलें कीं ती मोहर या-
पासून घ्या व ज्याजवळ दाहा मोहरा आहेत त्याला द्या.
२५ मग ते त्याला ह्मणाले, महाराज, त्याजवळ दाहा मोहरा आहेत.
२६ तर मी तुह्मास सांगतों कीं, ज्या कोणाजवळ [1] आहे त्याला
देतील, आणि ज्याजवळ नाहीं त्याचें जें आहे ते देखील त्यापासून घेतील.
२७ आणखी म्या त्यावर राज्य करावें, असी ज्यांची इच्छा नव्हती
त्या माझ्या शत्रूंस [2] एथें आणा, व माझ्या समोर मारून टाका.
२८ आणि तो या गोष्टी सांगून यरूशलेमाकडे जातांना पुढें चालला.
२९ नंतर असें झालें [3] कीं जाइत झाडांच्या ह्मटलेल्या डोंगरापाशीं
बेथफागे व बेथानी एथवर येऊन त्यानें आपल्या शिष्यांतून दोघांस पाठ-
वितांना सांगितलें कीं,
३० तुह्मी समोरच्या गांवांत जा, त्यांत जातांच ज्यावर कोणी माणूस
कधींहि बसला नाहीं असें बांधलेलें शिंगरूं तुह्मास अढळेल; तें सोडून
आणा.
३१ आणि कां सोडितां असें कोणी तुह्मास विचारिलें, तर त्याला
सांगा कीं, प्रभूला याची गरज आहे. [4]
३२ तेव्हां जे पाठविलेले ते गेले आणि त्यांस सांगितल्याप्रमाणें अढळलें.
३३ आणि तें शिंगरूं सोडीत असतां त्याचे धनी त्यांस ह्मणाले, शिं-
गरूं कां सोडितां?
३४ तेव्हां ते बोलले, प्रभूला याची गरज आहे.

---

(1) मात्थ. १३:१२; २५:२९; मार्क. ४:२५; लूक. ८:१८. (2) गीत. २:४,५,९; २१:८,९; यश. ६६:६,१४; नहे. १:२,८; इब्रि. १०:१३. (3) मात्थ. २१:१; मार्क. ११:१. (4) गीत ५०:१०.

त्यांस आश्चर्य वाटलें कीं धन्यानें आळशाचा एकच मोहर काढून ज्यानें उद्योगी होऊन दाहा मोहरा मिळविल्या होत्या त्याला द्यावी.

२६, २७ "ज्या कोणाजवळ आहे." इ० कुलीन माणूस स्पष्ट करून दाखवितो कीं माझ्या चाकरांस फळ देण्याचा हाच नेम आहे. विश्वासूपणानें उद्योग चालवून माझ्या सेवेंत उपयोगी असलें पाहिजे, नाहींतर फळ मिळणार नाहीं. "माझ्या शत्रूंस एथें आणा." इ० यांस मारून टाकल्यानें ख्रीस्तानें दर्शविलें कीं तुम्ही यहुदी आपला मशीहा धिक्कारण्यावरून याप्रमाणें नाश पावाल; आणि वास्तविक पाहिलें जे ख्रीस्ताला अंगीकारीत नाहींत ते सर्व सर्वकाळचा नाश पावतील. मात्थ. २५. याचा रूपयांचा दाखला पाहा.

२८–३९ मात्थ. २१:१—१६ यांवर टीका पाहा.

३५ मग त्यांनीं तें येशूकडे आणिलें. नंतर आपलीं वस्त्रें शिंगरावर [1] घालून येशूला बसविलें. [2]

३६ मग तो चालत असतां त्यांनीं आपलीं वस्त्रें वाटेवर पसरलीं.

३७ आणि तो इतक्यांत जाइत झाडांच्या डोंगराच्या उतरणीजवळ आल्यावर शिष्यांचा सर्व समुदाय आनंद करून, जे चमत्कार त्यांनीं पाहिले होते त्या सर्वांवरून मोठयानें देवाची स्तुति करूं लागला कीं,

३८ प्रभूच्या नांवानें येणारा राजा [3] धन्यवादित असो; आकाशांत शांति [4] आणि परम उंचांमध्यें गौरव.

३९. तेव्हां समुदायांतील कित्येक परोश्यांनीं त्याला ह्मटलें, हे गुरू, तूं आपल्या शिष्यांस धमकाव.

४० तेव्हां त्यानें त्यांस उत्तर दिल्हें कीं, मी तुह्मास सांगतों, जर हे उगेच राहतील तर धोंडे [5] ओरडतील.

४१ मग तो जवळ आल्यावर नगर पाहून त्याविषयीं [6] रडून बोलला कीं,

४२ त्वां या आपल्या दिवसांत [7] देखील आपल्या शांतीच्या गोष्टी जाणल्या असत्या, तर किती बरें होतें! परंतु आतां त्या तुझ्या दृष्टीपासून लपविल्या आहेत.

४३ कारण कीं असे दिवस तुजवर येतील कीं, तुझे शत्रु तुझ्या भोंवता मोरचा [8] लावून तुला वेढितील, आणि तुला चहूंकडून कोंडितील;

---

(१) २ राज. ९:१३. (२) यो. १२:१४. (३) गीत ११८:२६; लूक. १३:३५. (४) लूक. २:१४; रोम. ५:१; एफ. २:१४. (५) हब. २:११; मात्थ.३:९. (६) गीत. ११९:१३६; इर्म. ९:१;१३:१७;१४:१७; यो. ११:३५. (७) गीत. ९५:७,८; इब्रि. ३:७,१३,१५. (८) यश. २९:२,३; इर्म. ६:५,६.

---

४० "तर धोंडे ओरडतील." हें ह्मणीच्या अर्थी ह्मटलें होतें व अक्षरशः समजलें पाहिजे असें नाहीं. अर्थ हाच कीं मी खरा मशीहा आलों असतां मोठा उल्हास करण्याची वेळ आहे. त्यांस धमकावावें हें योग्य नाहीं. लोकांनीं आनंद करावा व दाखवावा हें ठीक आहे.

४१–४४ "रडून बोलला." मात्थ. २३:

३७–३९ पाहा. तो जाईत डोंगरावरून यरूशालेमाकडे चालला. त्या डोंगरापासून शहर फार सुंदर दिसतें. तें त्याच्या दृष्टीस पडलें तेव्हां हें किती सुंदर तरी किती दुष्टहि आहे असें त्याच्या अंतःकरणांत भरलें असेल. देवानें केवढे उपकार त्या लोकांवर केले होते, तरी त्यांनीं भविष्यवाद्यांस कसें वधिलें व केवढीं अघोर पापें केलीं यांची आठ-

४४ आणि तुला व तुझ्यांतील तुझ्या लेंकरांस भुईबरोबर [१] करितील, आणि तुझ्या मध्यें धोंड्यावर धोंडा राहूं देणार नाहींत, [२] कारण कीं त्वां आपली भेट [३] होण्याचा समय जाणला नाहीं.

४५ नंतर तो देवळांत जाऊन [४] त्यांत जे विकत देणारे व विकत घेणारे होते त्यांस बाहेर घालवूं लागला;

४६ आणि त्यांस बोलला, माझें घर प्रार्थनेचें घर आहे, असें लिहिलें आहे [५] परंतु तुह्मीं तें लुटाऱ्यांची [६] गुहा असें केलें आहे.

४७ आणि तो देवळांत [७] प्रतिदिवसीं उपदेश करीत असे; तेव्हां

(१) १ राज. ९:७,८; मी. ३:१२; मात्थ. २३:३७,३८; लूक. १३:३४,३५. (२) मात्थ. २४:२; मार्क. १३:२. (३) विल. १:८; १ पेत्र. २:१२. (४) मात्थ. २१:१२,१३; मार्क. ११:१५-१७; यो. २:१५,१७. (५) यश. ५६:७. (६) इर्म. ७:११. (७) यो. १८:२०.

वण करून; आणि आतां ते मला वधस्तंभीं देऊन इतकें अघोर पातक करणार आहेत कीं देवाचा क्रोध पडून त्यांचा अगदीं विनाश लवकर होईल, असें पाहून जियोनाचा विजयी राजा व प्रभू रडला! हजारों लोक होसान्ना असें ओरडत असतांहि, यांवर भयंकर संकटें येतात तीं मनांत आणून तो रडला. त्यानें पाहिलें कीं यांनीं विचार करून पश्चात्ताप केला असतां व पापें सोडिलीं असतीं तर तारण पावले असते, पण आतां उशीर झाला आहे. त्यांच्या दुष्टाईचा प्याला भरून गेला आहे, व देवाची त्यांवरील कृपा सरली आहे. त्यांचा धनद्रव्य, गर्व, शोभा यांसुद्धां नाश असला पाहिजे. "असे दिवस तुजवर येतील." इ० तितस नामक रोमी सेनापती सैन्य घेऊन सन ७० इसवी यरूशालेमावर स्वारी करून आला, ह्मणजे ख्रीस्त हे शब्द बोलल्यावर सुमारें तीस वर्षांनीं ते पूर्ण झाले. "मोरचा लावून तुला वेढितील." योसेफस ह्मणतो कीं लोक कोंडून ठेविले तर उपासीं मरण्यानें त्यांस लवकर आमच्या ताब्यांत यावें लागेल, असें मनांत आणून तितसानें शिपायांस लावून अतिशय कष्टानें दाहा दिवसांत हा मोरचा बांधिला. हा (पांच मैल) अडीच कोस अगदीं शहरा सभोंवता होता, व तेरा मोठे बुरूज देऊन बळकट केला होता. त्या लोकांस कोंडून ठेवावें हा त्याचा उद्देश होता. तर ख्रीस्तानें एथें सांगितलें त्यापेक्षां भविष्यलेख अधिक पूर्ण कधीं झाला काय? "भुईबरोबर करितील." हें अक्षरशः पूर्ण झालें. देवळाचे पाये देखील नांगरावे असें तितसानें केलें. मात्थी. २४ यावर सविस्तर पाहा. त्या लोकांनीं आपल्या शांतीच्या गोष्टी जाणिल्या नाहींत ह्मणून हें सर्व झालें. त्यांनीं भविष्यवाद्यांस वधिलें होतें आणि आतां खऱ्या तारणाऱ्याला नाकारून वधस्तंभीं दिल्हें ह्मणून त्यांनीं असा भयंकर नाश पावावा हें योग्य होतें.

४५, ४६ मात्थी. २१:१२, १३ यावर टीका पाहा.

४७ "देवळांत प्रति दिवसीं." ह्मणजे अगोदर पांच साहा दिवसांपासून तो वधस्तंभीं दिल्हा गेला तोंवर उपदेश करीत गेला.

मुख्य याजक व शास्त्री व लोकांतील मोठमोठे हे त्याचा घात करायास पाहत होते;

४८ परंतु आपण काय करावें हें त्यांस सुचलें नाहीं; कारण कीं सर्व लोक फार लक्ष देऊन त्याचें ऐकत होते.

२० अध्याय.—आणि असें झालें कीं [1] त्या दिवसांतील एका दिव-
सीं तो देवळांत लोकांस उपदेश करीत व शुभवर्त्तमान गाजवीत असतां
मुख्य याजक व शास्त्री हे वडिलांसुद्धां जवळ येऊन त्याला ह्मणाले,

२ तूं कोणत्या अधिकारानें [2] हें करितोस, अथवा ज्यानें तुला हा
अधिकार दिल्हा तो कोण आहे? हें आह्मास सांग.

३ तेव्हां त्यानें त्यांस उत्तर दिल्हें कीं, मींहि तुह्मास एक गोष्ट पुसतों,
ती मला सांगा.

४ योहान्नाचा बाप्तिस्मा आकाशापासून किंवा माणसापासून झाला?

---

(१) मात्थ. २१:२३; मार्क. ११:२७. (२) प्रेषि. ४:७,१०; ७:२७.

---

४८ "हें त्यांस सुचलें नाहीं." सर्व साधारण लोक एवढें लक्ष लावून ऐकत असत कीं त्या याजकांस व शास्त्र्यांस भय वाटलें. ख्रीस्त यरूशालेमाकडे पाहून रडला यावरून समजावें कीं, (१) त्या लोकांचीं पापें व भयावस्था पाहून आणि तें ईश्वराची मोठी दया अव्हेरितात हें पाहून तो रडला. (२) रडण्याचें कारण होतें. त्या लोकांस इहलोकीं नाश पावण्याचें भय होतें असें केवळ नाहीं, तर परलोकीं सर्वकाळपर्यंत जिवात्म्याचा नाश पावायाचा आहे हें ख्रीस्ताला ठाऊक होतें ह्मणून तो रडला. (३) पापी लोकांस आतांहि तसीच भयावस्था आहे. ते आतांहि ख्रीस्ताला धिक्कारितात आणि त्याच पापाबद्दल तोच दंड होईल. (४) पाप्यांची अवस्था पाहून ख्रीस्त रडला तर आह्मींहि रडावें. त्यानें त्यांची अघोर अवस्था बरोबर जाणिली, आणि जाणून काळजी व दुःख दाखविलें आणि जीव देखील देऊन त्यानें त्यांसाठीं तारणोपाय सिद्ध केला. तर आह्मींहि आसच्या सोबत पाप्यांविषयीं किती काळजी बाळगावी व त्यांचें तारण साधण्यास किती श्रम घ्यावे!

१ जो प्रभु आपला
सद्गुरू दयावान्,
तो पाप्यांसाठीं रडला,
आह्मींहि रडूं, जाण.
२ देवाचा पुत्र थोर,
तो अश्रु गाळितो,
हे जिवा, पाहा, खेद घोर,
तुजसाठीं करितो.
३ आह्मीं रडावें फार
स्वपापाकारितां,
आकाशीं नाहीं रडणार
निष्पापी सर्वथा.

अध्याय २०.

१–९ याचें व्याख्यान मात्थ. २१:२३–२७ एथें पाहा.

५ तेव्हां ते आपल्यामध्यें विचार करूं लागले कीं, आकाशापासून ह्मणूं तर तो ह्मणेल कीं, असें असतां तुह्मी त्याजवर विश्वास कां ठेविला नाहीं ?

६ आणि माणसांपासून ह्मणूं, तर सर्व लोक आह्मास धोंडमार करितील, कां कीं [१] योहान्न भविष्यवादी होता असी त्यांची खातरी आहे.

७ तेव्हां त्यांनीं उत्तर दिल्हें कीं, तो कोठून हें आह्मास ठाऊक नाहीं.

८ मग येशूनें त्यांस ह्मटलें, मीहि कोणत्या अधिकारानें हें करितों हें तुह्मास सांगत नाहीं.

९ मग तो लोकांस हा दाखला देऊन सांगूं लागला कीं, कोणीएका माणसानें [२] द्राक्षमळा लाविला, [३] नंतर तो माळ्यांस सोंपून आपण बहुतकाळ प्रवासास गेला.

१० मग हंगामांत आपणाला माळ्यांनीं द्राक्षमळ्याचीं कांहीं फळें [४] द्यावीं ह्मणून त्यानें त्यांजकडे चाकर पाठविला, परंतु माळ्यांनीं त्याला ठोकून रिकामें लावून दिल्हें.

११ आणखी त्यानें दुसरा चाकर पाठविला, आणि त्यालाहि त्यांनीं ठोकून व अपमानून रिकामें लावून दिल्हें.

१२ अणखी त्यानें तिसऱ्याला पाठविलें, त्यालाहि त्यांनीं घायाळ करून बाहेर टाकिलें.

१३ नंतर द्राक्षमळ्याचा धनी ह्मणाला, मी काय करूं? मी आपल्या प्रिय पुत्राला पाठवीन, बहुतकरून ते त्याला पाहून भींड धरतील.

१४ परंतु माळी त्याला पाहून आपापल्यामध्यें विचार करून ह्मणाले, [५] हा वतनदार आहे; चला, आपण याला जिवें मारूं [६] ह्मणजे वतन आपलेंच होईल.

१५ नंतर त्यांनीं त्याला द्राक्षमळ्याच्या बाहेर काढून जिवें मारिलें. तर द्राक्षमळ्याचा धनी त्यांस काय करील?

---

(१) मात्थ. १४:५.　(२) मात्थ. २१:३३, मार्क. १२:१.　(३) शल. गीत ८:११,१२; यशा. ५:१-७.　(४) यो. १५:१६; रोम. ७:४.　(५) गीत. २:८; रोम. ८:१७; इब्रि. १:२.　(६) मात्थ. २७:२१-२५; प्रेषि. २:२३;३:१५.

१०-१९ याचें व्याख्यान मात्थ. २१: ३३-४५ एथें पाहा.

१६ तो येऊन त्या माळ्यांचा नाश करील व द्राक्षमळा दुसऱ्यांस देईल.
[१] तेव्हां ते ऐकून बोलले, असें न घडो.

१७ त्यानें मग त्यांकडे पाहून ह्मटलें, तर जो धोंडा [२] बांधणाऱ्यांनीं
अव्हेरिला तोच कोंपऱ्याचा मुख्य धोंडा झाला आहे, असें जें लिहिलें तें
काय आहे?

१८ जो कोणी त्या धोंड्यावर पडेल त्याचा चुराडा होईल, परंतु ज्या
कोणावर [३] तो पडेल त्याचा भुगा होईल.

१९ तेव्हां मुख्य याजक व शास्त्री समजले कीं, हा दाखला त्यानें
आह्माविषयीं दिल्हा आहे, यास्तव त्यांनीं त्याच घटकेस आपले हात त्यावर
टाकायास पाहिले, परंतु लोकांस भ्याले.

२० तेव्हां त्यांनीं टपत राहून, आपण न्यायी आहों असें सोंग धरणारे
हेर पाठविले, यासाठीं कीं आपण त्याला बोलण्यांत धरून [४] त्याला
सुभेदाराच्या सत्तेंत व अधिकारांत गुंतवून द्यावें.

२१ तेव्हां त्यांनीं त्याला विचारिलें कीं, हे गुरू, आह्मास कळलें कीं
तुझें बोलणें व उपदेश नीट आहे, आणि तूं पक्षपात धरीत नाहींस, तर
देवाचा मार्ग खरेपणानें शिकवितोस.

२२ कैसराला पट्टी देणें हें आह्मास योग्य आहे किंवा नाहीं?

२३ तेव्हां तो त्यांचें कपट जाणून त्यांस बोलला, माझी परीक्षा कां
पाहतां? पावली [५] मला दाखवा.

२४ इजवर मुखवटा व पत्ता कोणाचा आहे? मग त्यांनीं उत्तर दिल्हें
कीं, कैसराचा.

२५ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, तर कैसराचें कैसराला, [६] व देवाचें
देवाला भरून द्या.

२६ तेव्हां त्यांच्यानें लोकांच्या समोर त्याच्या बोलण्यांत त्याला धरवे-
ना. आणि त्याच्या उत्तरावरून आश्चर्य करून ते उगेच राहिले. [७]

---

(१) नहे. ९:२६,२७. (२) गीत ११८:२२. (३) दान. २:३४,३५. (४) मात्थ. २२:१५; मार्क. १२:१३. (५) मात्थ. १८:२८. (६) रोम. १३:७. (७) ती. १:१०,११.

२०–३८ याचें व्याख्यान मात्थ. २२: १५–३३ व मार्क. १२: १३–२७ पाहा.

२७ मग पुन्हा उठणें नाहीं असें ह्मणणारे सदोकी [1] यांतून कि-
त्येकांनीं येऊन त्याला विचारिलें कीं,

२८ हे गुरू, मोश्यानें [2] आह्मासाठीं असें लिहिलें कीं, कोणीएकाचा
भाऊ बायको असतां लेंकरावांचून मेला तर त्याच्या भावानें ती बायको
घेऊन आपल्या भावासाठीं संतति उत्पन्न करावी.

२९ तर सात भाऊ होते; आणि पहिला बायको करून लेंकरूं नसतां
मेला.

३० मग दुसऱ्यानें ती बायको केली व तो लेंकरूं नसतां मेला.

३१ तिसऱ्यानें ती केली, व तसेंच त्या सातांनींहि, परंतु लेंकरें नसतां
ते मेले.

३२ आणि सर्वांच्या मागून बायकोहि मेली.

३३ तर पुन्हा उठण्याच्या वेळेस ती त्यांतील कोणाची बायको होईल?
कारण कीं ती त्या सातांची बायको झाली होती.

३४ तेव्हां येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं, या कालाचीं लेंकरें लग्न क-
रून घेतात व लग्न करून देतात.

३५ परंतु तो काल व मेलेल्यामधून पुन्हा उठणें हें पावायास जे योग्य
[3] ठरतील ते लग्न करून घेत नाहींत व लग्न करून देतहि नाहींत.

३६ कारण कीं ते पुढें मरण्याजोगेहि नाहींत, [4] कां तर ते दुतांसारिखे
असतात, आणि पुन्हा उठण्याचे पुत्र आहेत ह्मणून देवाचे पुत्र आहेत. [5]

३७ आणि मोश्यानेंहि झुडपाच्या प्रकरणांत प्रभूला अब्राहामाचा देव
व इझाकाचा देव व याकोबाचा देव असें ह्मटलें, यावरून मेलेले उठतात
हें दाखविलें. [6]

३८ तो मेलेल्यांचा देव नव्हे, तर जीवंतांचा आहे, कारण कीं त्या-
साठीं ते सर्व [7] जगतात.

३९ तेव्हां शास्त्रांतील कित्येकांनीं उत्तर दिल्हें कीं, हे गुरू बरें बोललास.

---

(१) मात्थ. २२:२३; मार्क. १२:१८; प्रेषि. २३:६,८.   (२) अनु. २५:५-८.   (३) लूक. २१:३६; प्रग. ३:४.   (४) प्रग. २१:४.   (५) १ करिं. १५:४९,५२; १ यो. ३:२; रोम. ८:१७.   (६) निर्ग. ६:३.   (७) रोम. १४:८,९.

---

३९ याचें व्याख्यान मात्थ. मार्क. १२: ३२ पाहा.

४० तेव्हांपासून ते त्याला कांहीं प्रश्न करायास धजले नाहींत.

४१ मग त्यानें त्यांस ह्मटलें [1] ख्रीस्त दावीदाचा पुत्र आहे असें कसें ह्मणतात?

४२ कां तर दावीद स्वतां गीतांच्या पुस्तकांत [2] ह्मगतो;

४३ प्रभूनें माझ्या प्रभूला सांगीतलें कीं, मी तुझ्या शत्रूंस तुझ्या पायाचें आसन करीन तोंपर्यंत माझ्या उजवीकडे बैस.

४४ दावीद त्याला प्रभू असें ह्मगतो, तर मग तो त्याचा पुत्र कसा होईल?

४५ तेव्हां सर्व लोक ऐकत असतां [3] त्यानें आपल्या शिष्यांस ह्मटलें,

४६ शास्त्र्यांविषयीं जपा, [4] ते झगे घालून फिरायास इच्छितात व चवाठ्यामध्यें मुजरे [5] व सभास्थानांमध्यें मुख्य आसनें व जेवणांमध्यें मुख्य बैठकी हीं त्यांस आवडतात.

४७ ते विधवांचीं घरें [6] खाऊन टाकितात, आणि ढोंगानें [7] लांब लांब प्रार्थना करितात, ते अधिक दंड [8] पावतील.

२१ अध्याय.—मग त्यानें दृष्टि वर करून धनवानांस आपलीं दानें भांडारांत टाकितां पाहिलें.[9]

२ आणि त्यानें एका दरिद्री विधवेलाहि दोन टोल्या तेथें टाकितां पाहिलें.

३ मग तो बोलला, मी तुह्मास खचीत सांगतों कीं, या दरिद्री विधवेनें सर्वांपेक्षां अधिक [10] टाकिलें आहे.

४ कारण कीं त्या सर्वांनीं आपल्या भरपुरांतून देवाच्या दानांत टाकिलें, परंतु हिनें आपल्या कमतींतून आपली जी उपजीविका होती ती सर्व टाकिली.

---

(१) मात्थ. २२:४२; मार्क· १२:३५. (२) गीत· ११०:१; प्रेषि. २:३४. (३) १ तीम· ५:२०. (४) मार्क· १२:३८. (५) लूक· ११:४३. (६) यश· १०:२; मात्थ· २३:१४; २ तीम· ३:६. (७) १ थेस्स· २:५. (८) लूक· १०:१२,१४; याक· ३:१. (९) मार्क· १२:४१, ४२. (१०) २ करिं· ८:१२.

४०–४४ याचें व्याख्यान मात्थ· २२: ४१–४६ पाहा.

४५–४७ याचें व्याख्यान २३: १–१२, १४ पाहा.

अध्याय २१.

१–४ मार्क· १२: ४१–४४ यांवर टीका पाहा.

५ आणि देऊळ उत्तम धोंड्यांनीं व दानांनीं सुंदर केलें आहे, [१] असें
कित्येक बोलत असतां त्यानें ह्मटलें,
६ जें तुह्मी पाहतां त्यांतून जो पाडून टाकला जाणार नाहीं असा दग-
डावर एक दगड एथें राहूं दिल्हा जाणार नाहीं, [२] असे दिवस येतील.
७ नंतर त्यांनीं त्याला विचारिलें कीं, हे गुरू, या गोष्टी तर केव्हां
होतील, आणि ज्या कालीं या गोष्टी पूर्ण होणार आहेत तेव्हां काय चिन्ह
होईल?
८ तेव्हां तो बोलला, फसूं नये ह्मणून जपा, [३] कारण कीं माझ्या
नांवानें बहुत येऊन मीच तो आहें, आणि, तो काल जवळ आला आहे,
[४] असें ह्मणतील, ह्मणून तुह्मी त्यांच्या मागें जाऊं नका.
९ आणि तुह्मी लढायांविषयीं व दंग्यांविषयीं ऐकाल तेव्हां घाबरूं
नका, [५] कारण कीं तीं अगोदर अवश्य व्हायाचीं आहेत परंतु तितक्यांत
शेवट होणार नाहीं.
१० नंतर त्यानें त्यांस ह्मटलें [६] राष्ट्र राष्ट्रावर व राज्य राज्यावर उठेल;
११ आणि जागोजागीं मोठे भूमिकंप व दुकाळ व मऱ्या होतील
अणखी भयंकर उत्पात व आकाशांतील मोठीं चिन्हें होतील.
१२ परंतु या सर्व गोष्टींच्या अगोदर माझ्या नामाकरितां ते आपले
हात तुह्मावर टाकितील, आणि पाठीस लागून तुह्मास सभास्थानांमध्यें व
बंदिशाळेमध्यें [७] टाकून राजे व अधिकारी यांच्या समोर नेतील.
१३ तथापि हें तुह्मास साक्षीसाठीं [८] होईल.

---

(१) मात्थ. २४:१; मार्क. १३:१. (२) लूक. १९:४४. (३) २ थेस्स. २:३,९,१०; १ यो. ४:१; २ यो. ७. (४) प्रग. १:३. (५) नी. ३:२५,२६. (६) हग्ग. २:२२. (७) प्रेषि. ४:३; ५:१८; १२:४; १६:२४; प्रग. २:१०; प्रेषि. २५:२३. (८) फिल. १:२८; २ थेस्स. १:५.

---

३ "किमर्नींतून." ह्मणजे दरिद्रांतून.

५ "उत्तम धोंड्यांनीं" मार्क. १३:१ यावर पाहा.

"दानांनीं" यांमध्यें देवळाचे खांब सुशोभित करण्यासाठीं महान हेरोदानें केलेली सोन्याची वेल होती. योसिफसकृत प्रा. १५:८.

६ मात्थी. २४:२ यावर पाहा.

७–२६ यांचें व्याख्यान मात्थ. २४:२ एथें पाहा.

११ मात्थी. २४:७ यावर पाहा.

१२, १३ यांविषयीं मार्क १३: ९,१० एथें पाहा.

१४ यास्तव तुह्मी आपल्या ध्यानांत ठेवा कीं उत्तर देण्याविषयीं पूर्वीं
काळजी करूं नये;(१)
१५ कां कीं मी तुह्मास असी वाचा व ज्ञान देईन कीं, त्याला तुमच्या
सर्व विरोध्यांच्यानें प्रत्युत्तर देववणार किंवा अडवणार नाहीं.(२)
१६ आणि आईबापें व भाऊ व नातलग व मित्र हे देखील तुह्मास
पराधीन करितील (३) आणि तुमच्यांतील कित्येकांस जिवें मारवितील.(४)
१७ आणि माझ्या नामामुळें तुमचा द्वेष सर्व करितील. (५)
१८ परंतु तुमच्या डोक्याचा एक केंसहि (६) नाहींसा होणार नाहीं.
१९ तुह्मी धैर्य (७) धरून आपले आत्मे राखा.
२० यरूशलेम सैन्यांनीं वेढलेलें तुह्मी पाहाल तेव्हां त्याची ओसाडी
जवळ आली आहे असें समजा.
२१ तेव्हां जे यहूदांत असतील त्यांनीं डोंगरावर पळून जावें, व जे
त्याच्या मध्यें असतील त्यांनीं बाहेर जावें, व जे शिवारांत असतील त्यांनीं
त्यांत जाऊं नये.
२२ कां सर्व लिहिलेल्या गोष्टी (८) पूर्ण होण्यासाठीं हे सूड घेण्याचे
दिवस आहेत.

---

(१) मात्थ. १०:१९; लूक. १२:११. (२) प्रेषि. ६:१०. (३) मी. ७:५,६.
(४) प्रेषि. ७:५९; १२:२; २६:१०; प्रग. २:१३; ६:९; १२:११. (५) यो. १७:१४.
(६) मात्थ. १०:३०. (७) रोम. ५:३; इब्रि. १०:३६; याक. १:४. (८) अनु. २८:२५,४८; दान. ९:२६,२७; जख. ११:६;१४:१,२.

---

१४ "आपल्या ध्यानांत ठेवा." ईश्वर साह्य करील तर त्यावर भरवसा नित्य ठेवावा असी पक्की आठवण करा. मार्क. १३:११ यावर पाहा.

१८ "डोक्याचा एक केंसहि" इ० ह्या ह्मणीचा अर्थ हाच कीं तुमचें रक्षण होईल. यरूशालेमाचा नाश झाला त्यावेळेस सर्व ख्रिस्ती पळून सुरक्षित राहिले, यावरून हें वचन चमत्कारिक रीतीनें पूर्ण झालें. मात्थ. २४:१८ यावर पाहा.

१९ "धैर्य धरून," अथवा धीरतेनें टिकून. "राखा," याबद्दल राखाल ह्मणून कोणी सांगतात. या वाक्याचा अर्थ मात्थ. २४:१३ यासारिखा आहे.

२२ "सर्व लिहिलेल्या गोष्टी पूर्ण होण्यासाठीं" इ० या दुष्ट शहरावर संकटें येतील असें फारकरून सर्व भविष्यवाद्यांनीं सांगितलें होतें. एकदां देवानें त्याचा नाश करून यहुद्यांस बाबेलांत नेलें होतें. परंतु त्या दासपणांतून सुटून परत यहुद्यांत येऊन यरूशालेम फिरून बांधल्यावर ते पुनः अपराध करून दुष्ट झाले. आणि तुमचा नाश फिरून करीन असें त्यास धमकावून ह्मटलें होतें. विशेषेंकरून दानीएलानें

२३ आणि त्या दिवसांमध्यें ज्या गरोदर व ज्या थान देणाऱ्या त्यांस हायहाय, [1] कारण कीं भूमीवर मोठें संकट व या लोकांवर क्रोध होईल.
२४ आणि ते तरवारीच्या धारेनें पडतील, व त्यांस पाडाव करून सर्व राष्ट्रांमध्यें नेतील, आणि विदेश्यांचे काल [2] पूर्ण होतील तोंपर्यंत विदेशी लोक यरूशलेम तुडवितील. [3]
२५ तेव्हां सूर्य व चंद्र व तारे यांमध्यें चिन्हें होतील आणि समुद्र व लाटा यांची गर्जना होत असतां,

---

(१) विल. ४:१०. (२) रोम. ११:२५. (३) दान. १२:७; प्रग. ११:२.

९:२६,२७ एथें हाच नाश स्पष्ट करून दर्शविला.

२४ "ते तरवारीच्या धारेनें पडतील" इ० रोमी सैन्यानें यरूशालेमास वेढा घालून कोंडून ठेविलें त्यावेळेस सुमारें ११,००,००० माणसें नाश पावलीं. "व त्यांस पाडाव करून....नेतील." ९०,००० माणसांस पाडाव करून नेलें. "विदेश्यांचे काळ पूर्ण होतील" इ० या वाक्याविषयीं वेगवेगळीं मतें दाखविण्यांत आलीं आहेत. बरेच विदेशी ख्रीस्ताला अंगीकारतील तोंवर रोमी लोक यरूशालेम आपल्या ताब्यांत ठेवितील, मग तें फिरून बांधतील, हाच अर्थ असें कोणी ह्मणतात. एड्रियन बादशाहानें तें वास्तविक फिरून बांधलें हें त्या अर्थाविषयीं प्रमाण आहे असें ते ह्मणतात. दुसरे कितीएक ह्मणतात कीं विदेश्याचे काळ ह्मणजे जगाची समाप्ति. तर सगळे विदेशी ख्रिस्ती होतील तोंवर, ह्मणजे सर्वकाळ, यरूशालेम ओसाड राहायाचें असें त्यांस वाटतें. दुसऱ्यांचें हें मत आहे कीं शुभवर्त्तमान अवघ्या पृथ्वीवर प्रसिद्ध होईल, तेव्हां विदेश्यांचे काळ पूर्ण होतील, ह्मणजे, सर्व विदेशी ख्रिस्ती होतील, आणि ख्रीस्त फिरून येऊन सहस्र वर्षें राज्य समक्ष करील, आणि त्यावेळेस यहुदी परत येऊन यरूशालेम पुन्हा बांधतील. "विदेशी लोक यरूशालेम तुडवितील." त्यांच्या ताब्यांत राखतील. प्राचीनकाळीं जिंकलेल्यांच्या मानेवर तुडवावें असी विजयी यांची चाल होती. यहो. १०:२४;२ शमु. २२:४१; यहज्के. २१:२९. यरूशालेमाची दशा फार कठीण झाली आहे. तें फारवेळ रोमी सरकारच्या स्वाधीन राहिलें, मग सारसेनाच्या अमलांत आलें, आणि सांप्रतकाळीं तुर्क लोक त्यावर राज्य चालवून बहुत जुलूम करितात. या वाक्यावरून ख्रीस्तानें दाखविलें कीं, (१) यरूशालेमाचा अगदीं विनाश होणार आहे. (२) विदेशी हा नाश करतील. (३) यहुद्यांनीं भयंकर अपराध केले, याबद्दल त्यांस शासन करायाला ईश्वराला बरें वाटेल, तोंवर तें शहर विदेश्यांच्या अमलांत राहील. तर ख्रीस्ताचें हें ह्मणणें अगदी पूर्ण झालें आहे. तें आजपर्यंत विदेश्यांच्या स्वाधीन आहे. तें कोठपर्यंत असें राहील हें ख्रीस्तानें कळविलें नाहीं. यहुदी परत येऊन व आपल्या ताब्यांत घेऊन फिरून बांधितील, हेंहि स्पष्ट सांगितलें नाहीं. तरी तेथले लोक व अवघ्या पृथ्वींतले लोक शुभवर्त्तमान समजून ख्रीस्ताला अंगीकारतील व देवाचे खरे भक्त होतील, हें आश्वास टाकू आहे.

२५, २६ मात्थ. २४:२९ यावर पाहा.

२६ भयानें व जगावर येणाऱ्या गोष्टींची वाट पाहण्यानें माणसें प्राण
सोडीत असतां पृथ्वीवर राष्ट्रांस संकट [१] व पेंच होईल; कां तर आका-
शांतील सैन्यें [२] डळमळतील.

२७ आणि त्या कालीं मनुष्याच्या पुत्राला सामर्थ्यानें व मोठ्या गौरवा-
नें ढगांत [३] येतांनां पाहतील.

२८ आणि या गोष्टी होऊं लागतील तेव्हां नीट उभे राहा, आणि
आपलीं डोकीं वर करा, कारण कीं तुमची खंडणी [४] जवळ आली आहे.

२९ तेव्हां त्यानें त्यांस दाखला सांगितला कीं, [५] अंजीर व सर्व झाडें
पाहा;

३० तीं फुटूं लागतात तेव्हां तुह्मी पाहून आतां उन्हाळा जवळ आला
आहे, असें आपोआप समजतां.

३१ तसेंच या गोष्टी होतांनां पाहाल तेव्हां देवाचें राज्य जवळ आलें
आहे असें समजा.

३२ मी तुह्मास खचीत सांगतों कीं, या सर्व गोष्टी पूर्ण होतील तों-
पर्यंत ही पिढी टळून जाणार नाहीं.

३३ आकाश व पृथ्वी टळून जातील, [६] परंतु माझीं वचनें टळून
जाणारच नाहींत.

३४ आणि गुंगी व मद्यपान [७] व संसाराच्या चिंता यांकडून तुमचीं
अंतःकरणें कधीं जड होऊं नयेत व तो दिवस अकस्मात तुह्मावर येऊं
नये, [८] ह्मणून आपणांस संभाळा.

---

(१) दान. १२:१. (२) पेत्र. ३:१०-१२. (३) प्रग. १:७;१४:१४. (४) रोम. ८:२३.
(५) मात्थ. २४:३२; मार्क. १३:२८. (६) यश. ४०:८;५१:६. (७) यश. २८:१-३;
१ करिं. ६:१०. (८) रोम. १३:१२,१३ १ थेस. ५:६-८; १ पेत्र. ४:७.

मोठीं संकटें समुद्रांतील लाटांसारखीं देशा-
वर लोटून सर्वांस व्यापतील. जीं संकटें
या जगांत लोकांवर येतात तीं पाहून जर
माणसें भयानें प्राण सोडतात तर न्यायकाळीं
ख्रीस्त दुष्टांस सांगेल कीं सर्वकाळच्या यात-
नांत मजपासून दूर जा, तेव्हां त्यांचीं अंतः-
करणें कशीं टिकतील?

२७ मात्थी. २४:३० यावर पाहा.

२८ "तुमची खंडणी जवळ आली."
मात्थ. २४:३३ यावर पाहा. ह्मणजे त्या
गोष्टी सुरू होतील तेव्हांपासून देवाचें राज्य
चांगलें चालेल, व ख्रिस्ती मंडळी वाढेल.

२९-३३ मात्थ. २४:३२-३५ यांवर पाहा.

३४ "गुंगी." या मूळ शब्दाचा अर्थ
अतिशय खाणेंपिणें असा आहे. पदार्थ जरी
उचित तरी कोणी अतिशय खाऊन पिऊन

३५ कारण सर्व भूमीच्या पाठीवर सर्व राहणाऱ्यांवर [१] तो पाशासारिखा येईल.

३६ यास्तव या सर्व होणाऱ्या गोष्टी चुकवायास व मनुष्याच्या पुत्रासमोर [२] उभें राहायास [३] तुह्मी योग्य ठरावें [४] ह्मणून सर्व प्रसंगीं प्रार्थना करीत असतां जागे राहा. [५]

३७ तेव्हां दिवसां तो देवळांत उपदेश करीत असे आणि रात्रीं बाहेर जाऊन जाइत नामें डोंगरावर [६] राहत असे;

३८ आणि मोठ्या सकाळीं त्याचें ऐकायास सर्व लोक त्याकडे देवळांत येत असत.

---

(१) १ थेस्स. ५:२; २ पेत्र. ३:१०; प्रग; १६:१५. (२) यहु. २४. (३) गीत. १:५. (४) लूक. २०:३५. (५) मात्थ. २५:१३. (६) यो. ८:१,२.

जड होतो. "मद्यपान." दारू वगैरे कडक मद्यार्कं आतां बहुत पितात. तो प्राचीनकाळीं माहीत नव्हता. तरी द्राक्षारस पिऊन मस्त होत असत, आणि ही चाल सर्व युगांत विशेष भ्रष्टकारक व नाशकारक होती. जे खिस्ती आहेत त्यांनीं हमेशा सावध असावें. संसारांत गुंतलें जाऊन व जनरूढीप्रमाणें चालून मेजवानी व मद्यपान करून दैहिक सुख भोगावें, हें त्यांस शोभत नाहीं; आणि असें केलें तर ते जड होऊन मरण पावण्यास व देवाजवळ जाऊन आत्मिक व सर्वकाळचें सुख भोगण्यास सिद्ध होणार नाहींत. आमचें आयुष्य क्षणिक आहे, सर्वकाळच्या घरीं लवकर जायाचें आहे, असें मनांत आणून खिस्ती लोकांनीं जागें राहून प्रार्थना करीत जावें व पवित्र आचरण दाखवावें.

३५ "पाशासारिखा येईल." नोहाच्या दिवसांत जलप्रलय आला, त्याप्रमाणें हा दिवस अकस्मात् येईल, असें मात्थी व मार्कस यांत वर्णिलें आहे. एथें पाशाची उपमा दिल्ही आहे. अर्थ एकच आहे, ह्मणजे पांखरांस वाटत नाहीं तेव्हां तीं अकस्मात् पाशांत पडतात, तसेंच लोकांस वाटत नाहीं तेव्हां एकाएकीं सदर्हू संकटें येतील. गीत. ६९:२२; रोम. ११:९; गीत. १२४:७; यश. २४:१७.

३६ "मनुष्याच्या पुत्रासमोर उभें राहायास." कोणीएकाचें मरण व न्याय ठरणें यांमध्यें जें अंतर तें फारकरून लक्षांत आणिलें नाहीं आणि आणण्याजोगें नाहीं; ह्मणून यहुद्यांचा नाश करायास ख्रीस्त आला ह्मणजे त्यांचा न्याय करायास आला, असें ह्मणायाला हरकत नाहीं. जे लोक एवढे दुष्ट होते कीं देवानें त्यांचा नाश अशा भयंकर रीतीनें केला त्यांस त्यानें सौख्यलोकांत आपल्या जवळ घेतलें असेल काय? हें अगदीं संभाव्य होत नाहीं. त्यांचा नाश करून ख्रीस्तानें अर्थात् त्यांचा न्याय केला व सर्वकाळची अवस्था ठरविली. आणि जे त्याचे खरे शिष्य असल्यावरून तीं संकटें चुकविण्यास योग्य होते, त्यांचा बचाव करून ख्रीस्तानें अर्थात् त्यांचाहि न्याय केला व त्यांचीहि सर्वकाळची स्थिति ठरविली.

३७, ३८ ख्रीस्त कसा उद्योगी व कामांत तत्पर असे याविषयीं एथें उदाहरण आहे,

२२ अध्याय.— नंतर [१] वल्हांडण नामें बेखमीर भाकरींचा सण जवळ आला.

२ आणि [२] मुख्य याजक व शास्त्री हे त्याचा घात कसा करावा ह्मणून उपाय पाहत होते, कारण कीं ते लोकांस भ्याले.

३ नंतर इस्कारयोतें या आडनांवाचा यहूदा बारांतील एक यांत [३] सैतान गेला.

४ मग त्यानें जाऊन मुख्य याजक व सरदार यांच्या स्वाधीन त्याला कसें करावें याविषयीं त्यांसीं बोलणें लाविलें.

५ तेव्हां त्यांस आनंद झाला, व त्यांनीं त्याला पैका द्यावा ह्मणून करार केला. [४]

६ तें त्यानें पत्करिलें, आणि समुदाय नाहीं असी त्याला त्यांच्या स्वाधीन करण्याची संधी तो पाहूं लागला.

७ नंतर ज्या बेखमीर भाकरींच्या सणाच्या दिवसांत वल्हांडणाचा यज्ञपशू मारायाचा, [५] तो दिवस आला.

८ तेव्हां त्यानें पेत्रस व योहान्न यांस पाठवितांनां सांगितलें कीं, आपण वल्हांडण सणाचें भोजन करावें, ह्मणून तुह्मी जाऊन आह्मासाठीं तयार करा.

---

[१] माल्थ. २६:२; मार्क. १४:१. [२] गीत. २:२; प्रेषि. ४:२७. [३] माल्थ. २६:१४; मार्क. १४:१०, यो. १३:२,२७. [४] जख. ११:१२. [५] निर्ग. १२.

आणि देवाची भक्ति करून दिवसाचा आरंभ करावा असाहि किता आहे.

अध्याय २२.

१, २ माल्थ. २६:१,२ यांवर पाहा.

३ "इस्कारयोतें......यांत सैतान गेला." "सैतान म्हणजे वैरी अथवा दोषारोप करणारा." हें नांव शास्त्रांत दुष्ट आत्म्याच्या अधिपतीला दिल्हें आहे. प्रग. १२:१०; इयो. १:६–९. सैतान त्यांत गेला ह्मणजे त्याचा धनलोभ चेतवून त्यानें हें अघोर पाप करावें ह्मणून प्रेरिलें. यहुदा बारा प्रेषितांतला असून ख्रीस्ताजवळ सुमारें तीन वर्षांपासून राहात व सुबोध ऐकत आला होता, यावरून त्याचा अपराध व दोष फार भारी होता.

४–६ माल्थ. २६:१४–१६; मार्क. १४:१०,११ यांवर टीका पाहा.

"समुदाय नाहीं" इ० सर्व साधारण लोक ख्रीस्ताचें ऐकून हा वास्तविक मशीहा आहे असें मानीत होते, ह्मणून एकीकडे लोकांस न कळतां त्याला धरावें असी संधी ते पाहत बसले.

७–१३ याचें व्याख्यान माल्थ. २६:१७–१९; मार्क. १४:१२–१६ एथें पाहा.

९ तेव्हां ते त्याला ह्मणाले, आह्मी कोठें तयार करावें म्हणून तुझी आज्ञा आहे?

१० मग त्यानें त्यांस सांगितलें, पाहा, तुम्ही नगरांत जात असतां पाण्याची घागर घेऊन जाणारा माणूस तुम्हास भेटेल, तो ज्या घरांत जाईल त्यांत त्याच्या मागें जा.

११ आणि त्या घराच्या धन्याला असें सांगा कीं, गुरु तुला ह्मणतो, म्या आपल्या शिष्यांसुद्धां वल्हांडण सणाचें भोजन करावें असी उतरायाची जागा कोठें आहे?

१२ मग तो तुह्मास सामान लावलेली मोठी माडी दाखवील, तेथें तयार करा.

१३ तेव्हां ते गेले, आणि त्यांस त्यानें सांगितल्याप्रमाणें अढळलें आणि त्यांनीं वल्हांडण सणाची तयारी केली.

१४ नंतर समय झाल्यावर [१] तो व त्याच्या संगतीं बारा प्रेषित जेवायास बसले.

१५ तेव्हां तो त्यांस ह्मणाला, म्यां सोसल्यापूर्वीं हें वल्हांडणाचें भोजन तुह्माबरोबर करायास मी फार उत्कंठेनें इच्छीत होतों;

१६ कां तर मी तुह्मास सांगतों कीं, देवाच्या राज्यांत हा सण पूर्ण होईल तोंपर्यंत [२] मी फिरून याचें भोजन करणार नाहीं.

१७ मग त्यानें प्याला घेतला, आणि आशीर्वाद मागून तो बोलला, हा घ्या, आणि आपणांमध्यें वांटून द्या;

---

(१) मात्थ. २६:२०; मार्क. १४:१७. (२) लूक. १४:१५; १ करिं. ५:७,८; प्रग. १९:९.

---

१४ "समय झाल्यावर." अर्पिलेला कोंकरा खाण्याचा समय हा संध्याकाळीं होता. मात्थी. २७:२० पाहा.

१५ "फार उत्कंठेनें इच्छीत होतों." याचें कारण काय? तर (१) तो त्यांस लवकर सोडणार होता आणि त्याबरोबर हा यहुदी मोठा सण अणखी एका वेळेस पाळावा असी इच्छा सहज मनांत यावी. येशू जसा देव तसा मनुष्यहि होता, आणि ईश्वरी भक्ति व भक्तांसीं सहवास हीं हलकीं असें तो कधीं मानीत नसे. (२) जीं दुःखें तो सोसणार होता त्यासाठीं शिष्यांचीं मनें सिद्ध करायास इच्छिलें असेल. (३) प्रभुभोजन स्थापावें, असें कीं सर्वकाळ जगाच्या समाप्तीपर्यंत त्याची आठवण करण्यास एक पवित्र संस्कार मंडळींत चालू व्हावा. हा संस्कार ख्रिस्ती लोकांस फार हितकारक होईल, असें जाणून त्यानें स्थापिला आणि असें करून तो त्यांवर शेवटापर्यंत प्रीति करीत गेला.

१६ मात्थ. २६:२९ यावर पाहा.

१७ "मग त्यानें प्याला घेतला." हा प्याला प्रभुभोजनांतला नव्हता तर वल्हांडण

१८ कारण मी तुह्मास सांगतों कीं, देवाचें राज्य येईल तोंपर्यंत द्राक्षवेलाचा उपज मी पिणारच नाहीं.

१९ मग त्यानें भाकर घेतली[1] व आशीर्वाद मागून ती मोडिली, आणि त्यांस देऊन ह्मटलें, हें तुह्मासाठीं दिल्हेलें माझें शरीर आहे, माझ्या आठवणीसाठीं हें करा.

२० आणि जेवल्यानंतर त्यानें त्याप्रमाणेंच प्यालाहि घेऊन ह्मटलें, हा प्याला तुह्मासाठीं ओतलेलें जें माझें रक्त त्याकडून जो नवा करार तोच आहे.

२१ अणखी पाहा, मला पराधीन करणारा याचा हात[2] मजबरोबर मेजावर आहे.

२२ मनुष्याचा पुत्र नेमल्याप्रमाणें जातो खरा, परंतु[3] जो त्याला पराधीन करितो त्या माणसाला हायहाय!

२३ तेव्हां ते आपापल्यांमध्यें विचार करूं लागले कीं, आपल्यांतला जो हें करणार आहे तो कोण असावा?

२४ अणखी आपल्यांमध्यें मोठा कोण आहे, याविषयीं त्यांमध्यें विवाद[4] झाला.

---

(१) १ करिं. १०:१६;११:२४. (२) गीत. ४१:९; यो. १३:२६. (३) लूक. २४:४६; प्रेषि. २:२३;४:२८; १ करिं. १५:३. (४) मार्क. ९:३४; लूक. ९,४६.

सणांतला होता. २० व्या ओवींतला प्याला प्रभुभोजनांतला होता. वल्हांडण सण बरोबर पाळल्यावर ख्रीस्तानें त्याच्या बदलीं प्रभुभोजन हा संस्कार सदोदीत व सर्वकाळ ख्रिस्ती मंडळींत राहावा म्हणून स्थापिला.

१८ मात्थ. २६:२९ यावर पाहा.

१९, २० मात्थ. २६–२८ यांवर पाहा.

२१–२३ मात्थ. २६:२१-२५ यांवर पाहा.

२४ "आपल्यांमध्यें मोठा कोण आहे?" असला विवाद अगोदर झाला होता. मात्थ. १८:१;२०.२०–२८. मशीहा येईल तेव्हां तो राजगादीवर बसून ऐहिक राज्य चालवील असें यहुद्यांस वाटलें, आणि हें मत बाळगून शिष्यांनीं मनांत आणिलें कीं आम्हांस तो आपला कारभारी व प्रधान करील. ख्रीस्तानें वरचेवर त्यांस समजाविलें कीं माझें राज्य या जगाचें नव्हे, तरी तेंच मत ते धरीत गेले, आणि ईर्षा व स्पर्धा करून एकएक इतरांपेक्षां मोठा व्हावयास पाहूं लागला. हें मोठें आश्चर्य आहे, खरें, तथापि आजपर्यंत बहुत ख्रिस्ती तसाच स्वभाव दाखवितात, आणि ऐहिक मान, आब्रु, जागा व पदवी पाहतात.

२५ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, विदेश्यांचे राजे[1] त्यांवर धनीपण क-
रितात, आणि जे त्यांवर सत्ता करितात त्यांस परोपकारी ह्मणतात.
२६ परंतु[2] तुह्मी त्याप्रमाणें नसावें, तर तुह्मामध्यें जो मोठा तो
कनिष्ठासारिखा व जो अधिकारी तो चाकरासारिखा होवो.
२७ कारण कीं मोठा कोण? जेवायास बसणारा किंवा चाकरी कर-
णारा? जेवायास बसणारा कीं नाहीं? परंतु मी चाकरी करणाऱ्यासारिखा
[3] तुह्मामध्यें आहें.
२८ आणि माझ्या परीक्षांमध्यें माझ्या संगतीं टिकून राहिलेले तुह्मी
आहां.[4]
२९ आणि जसें माझ्या बापानें मला राज्य नेमून दिल्हें तसें मीहि
तुह्मास[5] नेमून देतों;

---

(१) मात्थ. २०:२५; मार्क. १०:४२. (२) १ पेत्र. ५:३; ३ यो. ९:१०. (३) यो. १३:१३,१४; फिल. २:७. (४) इब्रि. ४:१५. (५) मात्थ. २५:३४; लूक. १२:३२; १ करिं. ९:२५; १ पेत्र. ५:४.

---

२५ "विदेश्यांचे राजे." म्हणजे राष्ट्रांचे अथवा जगांतले राजे राज्य करितात. ही जनरूढी ख्रीस्तानें निषेधिली असें नाहीं, केवळ आपलें राज्य वेगळें आहे, या जगाचें नाहीं, असें त्यानें दाखविलें. "त्यांस परोपकारी म्हणतात." योसेफस व फैलो यांनीं आपल्या ग्रंथांत रोमी बादशाहांस परोपकारी असें वरचेवर म्हटलें आहे. फारकरून अर्जवानें बोलून राजांस असें म्हणतात. तथापि कोणी वास्तविक परोपकारी असून आपल्या प्रजेचें हित पाहतात.

२६, २७ "परंतु तुह्मी त्याप्रमाणें नसावें." आपलें राज्य कसलें आहे हें ख्रीस्त फिरून त्यांस सांगून दाखवितो. त्यांनीं मोठे किताब, उंच पदव्या व जागा व अधिकार पाहूं नये असें तो त्यांस समजावितो. त्याच्या राज्यांत श्रेष्ठ व्हावें असी ज्याची इच्छा असेल त्यानें विशेष नम्र असून सेवा करावी. याविषयीं त्यांच्या मनांत बोध ठसवावा म्हणून त्यानें उदाहरण दाखविलें, म्हणजे रुमाल घेऊन चाकराप्रमाणें त्यानें त्यांचे पाय धुतले. यो. १३:४–१७. असें करून त्यानें गर्व, हेवा, अहंपण, स्वार्थबुद्धि वगैरे दुर्गुण निषेधिले आणि स्पष्ट दाखविलें कीं देवाच्या राज्यांत जो सर्वांहून नम्र, पवित्र आणि उपयोगी होतो तो सर्वांमध्यें श्रेष्ठ आहे.

२८,२९ "तसें मीहि तुह्मास नेमून देतों." ख्रीस्त त्यांस समजावितो कीं तुह्मी माझ्या परीक्षेंत व संकटांत टिकून राहिलां, शेवटीं राज्य मिळेल असी आशा धरीत आलां, तर भिऊं नका, ही आशा बुडायाची नाहीं. तुम्हास राज्य मिळेल, परंतु देवबापानें मला दिल्हें तसें राज्य तुम्हास मिळेल. तें या जगाचें नाशवंत राज्य होईल असें नाहीं, तर यापेक्षां वैभवाचें व सर्वकाळचें राज्य सौख्यलोकांत मिळेल, तर दारिद्र, निंदा व संकट, पाउलाग यांकडून अभ्यास पावून व सिद्ध होऊन त्या राज्यांत गेलो तरी काय चिंता? आकाश लोकांतलें

३० ह्मणजे तुह्मी माझ्या राज्यामध्यें माझ्या मेजावरून खाल व प्याल,[1]
आणि आसनांवर बसून इस्राएलाच्या बारा वंशांचा न्याय ठरवाल.[2]
३१ अणखी प्रभु बोलला, शिमोना, शिमोना, पाहा, सैतानानें तुह्मास
गव्हांसारिखें चाळायास इच्छिलें आहे.[3]
३२ परंतु तुझा विश्वास कुंठूं नये ह्मणून तुझ्यासाठीं म्यां प्रार्थना केली
आहे,[4] आणि तूं फिरसील तेव्हां आपल्या भावांस स्थिर कर.[5]
३३ मग तो त्याला ह्मणाला, हे प्रभू, मी तुझ्या संगतीं बंदिशाळेंत व
मरायालाहि जायास तयार आहें.
३४ तेव्हां तो बोलला, पेत्रसा, मी तुला सांगतों, आज कोंबडा ओरडल्या-
अगोदर मी त्याला ओळखत नाहीं, असें तूं तीन वेळां मला नाकारसील.

---

(१) प्रग. १९:९. (२) मात्थ. १९:२८; १ करिं. ६:२; प्रग. ३:२१. (३) १ पेत्र. ५:८; आम. ९:९.
(४) यो. १७:९,१५; इब्रि. ७:२५; १ यो. २:१. (५) गीत. ५१:१३; यो. २१:१५-१७.

सुख केवळ अधिक गोड व तें अविनाशी राज्य अधिक मोलाचें असें होईल. हें राज्य देण्यास ख्रीस्तानें एथें पक्कें वचन दिल्हें आहे.

३० मात्थी. १९: २८ यावर पाहा.

३१ "शिमोना." म्हणजे पेत्रसा. ख्रीस्तानें पुढें पाहून पेत्रस मला नाकारील असें जाणून त्याला प्रबोधित केलें. "गव्हासारिखें चाळायास," गहू चाळणें म्हणजे पारखून पाहणें. सैतान तुला परीक्षेंत घालून पारखून पाहायास इच्छितो. याप्रमाणें त्यानें इयोबाला परीक्षेंत घातलें. इयो. १: ७,१२.

३२ "परंतु तुझा विश्वास कुंठूं नये" इ० अगदीं कुंठूं नये. पेत्रसाचें धैर्य खचलें, आणि खचेल असें ख्रीस्तानें जाणलें. परंतु त्यानें विश्वास टाकून नाश न पावावा याकरितां ख्रीस्तानें प्रार्थना केली, आणि ती प्रार्थना ऐकण्यांत आली. यो. ११:४२. पेत्रस जरी पडला तरी फिरून उठला. "आणि तूं फिरसील." मनुष्य एकदांच नवा जन्म पावतो. त्यानंतर पापांत पडला तर पश्चात्ताप करून फिरलें पाहिजे आणि जर वास्तविक परतून जन्मला होता तर फिरेलच फिरेल. "तेव्हां आपल्या भावांस स्थिर कर." त्यांस प्रबोधित कर, व पश्चात्तापी झाले म्हणजे त्यांस समाधान व आश्वासन दे. यावरून बोध. (१) कोणी ख्रिस्ती पापांत पडला तर आपण किती अशक्त, व देवाचें साह्य सतत पाहिजे, असें पाहून त्यानें अधिक नम्र व सावध असावें. (२) ज्यांचा असला अनुभव झाला आहे, त्यांनीं त्यावरून आपल्या भावांस अधिक चांगला बोध देत जावें. ही आज्ञा पेत्रस आयुष्यभर मानीत गेला. हें त्यानें लिहिलेल्या दोन पत्रांवरून व सगळ्या उपदेशावरून व मरणाकडूनहि दिसून येतें. त्याचे शत्रु त्याला शेवटीं धरून धर्मामुळें मारणार होते तेव्हां त्यानें प्रभूला कसें नाकारिलें होतें, याची आठवण करून त्यानें विनंती केली कीं माझा प्रिय प्रभु वधस्तंभीं दिल्हा गेला तसा जाण्यास मी योग्य नाहीं, तर मला उलटून पाय वरतीं व डोकें खालतीं करून वधस्तंभीं मारा; आणि त्याचें ऐकून त्यांनीं असें केलें.

३३,३४ मात्थ. २६: ३३–३५ यांवर पाहा.

३५ आणखी त्यानें त्यांस ह्मटलें, म्यां तुह्मास पिशवी व झोळणा व वाहणा यांवांचून पाठविलें [१] तेव्हां तुह्मास कांहीं उणें पडलें काय? ते ह्मणाले, कांहीं नाहीं.

३६ त्यावर त्यानें त्यांस ह्मटलें, आतां तर ज्याला पिशवी आहे त्यानें ती घ्यावी, व त्याप्रमाणें झोळणाहि; आणि ज्याला तरवार नाहीं त्यानें आपलें वस्त्र विकून विकत घ्यावी.

३७ कारण मी तुह्मास सांगतों कीं, दुष्टांमध्यें तो मोजलेला होता, असें जें लिहिलें [२] तें अझून माझ्या ठायीं पूर्ण व्हायाचें आहे, कां तर मजविषयींच्या गोष्टींचा शेवट आला आहे.

३८ तेव्हां ते बोलले, हे प्रभू, पाहा, एथें दोन तरवारी आहेत. मग तो त्यांस ह्मणाला, पुरें आहे.

---

[१] लूक. ९:३. [२] यश. ५३:१२.

---

३५ "कांहीं उणें पडलें काय?" मात्थ. १०;९,१०. मागल्या अनुभवावरून त्यांनीं अधिक भरवसा देवावर ठेवून स्थिर बुद्धि दाखवावी म्हणून ख्रीस्तानें ही गोष्ट त्यांच्या आठवणीस आणिली.

३६ "आतां तर ज्याला पिशवी आहे." इ० आतांपासून फेरफार आहे. स्वदेश सोडून अवघ्या जगांत जाऊन उपदेश करायाचा आहे. बहुत अडचणी, दुःखें, संकटें लागतील. तर आतांपासून तयारी करून जावें. खर्च पुरवावा व शस्त्रेंहि वापरावीं. चालत्या अडचणीविषयीं ख्रीस्तानें हा बोध केला असें नव्हे, तर पुढें आपण जीव दिल्यावर शिष्यांनीं कसें चालावें व आपलें काम कसें करावें, याविषयीं केला. आणि यावरून सिद्ध होतें कीं (१) आपली गरज पुरविण्यास अगोदर कांहीं तयारी करावी हें योग्य आहे. आणि जसें इतरांस तसें उपाध्यांसहि योग्य आहे. (२) आपल्या जिवाचें रक्षण करायास झटावें. हेंहि उचित आहे. दुसऱ्यावर हल्ला करणें योग्य आहे असें म्हणत नाहीं, परंतु दुसऱ्यानें हल्ला केला तर होईल तितकें करून आपल्या जिवाचें रक्षण करावें हें योग्य आहे.

३७ "दुष्टांमध्यें तो मोजलेला होता." यश. ५३: १२. दुष्ट असा नव्हे पण दुष्टासारिखा मोजला होता. तो निरपराधी, पवित्र, निर्दोष व निष्कलंक होता. इब्री. ७:२६. तरी आमच्या पापांचा भार त्यावर ठेविला होता. "शेवट आला आहे." याच अर्थानें "पूर्ण झालें आहे." यो. १९:३०. असें बोलून येशूनें प्राण सोडिला.

३८ "दोन तरवारी आहेत." गालील लोक व एस्सनीहि हत्यारें वापरून जात असत. याचें कारण हेंच कीं बहुत लुटारू व रानपशू असल्यामुळें आपलें संरक्षण करण्यास हें अगत्य वाटलें. त्या चालीप्रमाणें शिष्यहि कांहीं हत्यारें वापरीत असत, असें दिसतें. तथापि ह्या वेळेस दोनच तरवारी मात्र त्यांजवळ होत्या. "पुरें आहे." त्या दोन तरवारी पुऱ्या आहेत असें म्हटलें नाहीं, तर पुरें आहे. यावरून असें दिसतें कीं

३९ मग [1] तो निघून रीतीप्रमाणें जाइत झाडांच्या डोंगरास गेला
व त्याचे शिष्यहि त्याच्या मागें गेले.

४० तेव्हां त्या ठिकाणीं आल्यावर त्यानें त्यांस ह्मटलें, तुह्मीं परीक्षेंत
येऊं नये ह्मणून प्रार्थना करा.

४१ मग तो त्याजपासून सुमारें धोंड्याच्या टप्या इतका दूर गेला,
व गुडघे टेंकून त्यानें प्रार्थना केली कीं,

४२ हे बापा, हा प्याला मजपासून दूर करायास तुझी इच्छा असली
तर बरें, तरी माझी इच्छा आहे तसें नको, तर तुझ्या इच्छेप्रमाणें होवो.

४३ तेव्हां आकाशांतील दूत [2] त्याच्या दृष्टीस पडला, तो त्याला
बळाविता झाला.

४४ तेव्हां फार कष्टी होऊन [3] त्यानें मोठ्या निष्ठेनें प्रार्थना केली,
आणि त्याचा घाम रक्ताच्या थेंबासारिखा भूमीवर पडूं लागला.

४५ मग प्रार्थना झाल्यावर तो उठून आपल्या शिष्यांकडे आला,
तेव्हां ते खेदामुळें झोंपीं गेले असें त्यानें पाहिलें.

---

(१) मात्थ. २०:३६; मार्क. १४:३२; यो. १८:१. (२) मात्थ. ४:११. (३) विल. १:१२; यो. १२:२७; इब्रि. ५:७.

आतांपासून त्यांनीं आयुष्यभर कसें चालावें याविषयीं जो बोध म्या केला आहे तो गैर समजून हल्लींच्या प्रसंगीं लावितात असें पाहून त्याला दुःख वाटलें, परंतु अणखी बोलायाला फुरसत नसतां त्यानें म्हटलें, "पुरें आहे." म्हणजे पुरें म्हटलें आहे; माझ्या बोलण्याचा अभिप्राय पुढें समजाल.

३९–४६ मात्थी. २६:३०–४६; मार्क. १४:२६–४२ यांवर पाहा.

४३ "त्याला बळाविता झाला." त्याची मानवी प्रकृति सशक्त करिता झाला. या वाक्यावरून ख्रीस्त देव नाहीं, मनुष्य मात्र होता, असें कितीएकांस वाटतें. ते म्हणतात कीं तो देव असला तर त्याला बळवावें म्हणून दुताची काय गरज होती? देवानें दुतावांचून त्याला सामर्थ्य कां पुरविलें नाहीं बरें? तर तो मनुष्य मात्र होता असें कल्पिलें म्हणजे काय अंतर? तो पवित्र व देवाला प्रिय होता, त्याविषयीं ईश्वर सर्वदा संतुष्ट होता. तर देवानें आपण समक्ष असून त्याला सामर्थ्य कां पुरविलें नाहीं बरें? असा विचार करून उघड होतें कीं तो देव होता किंवा फक्त मनुष्य होता, हें या वाक्यावरून कांहीं ठरत नाहीं. ज्यांस मदत पाहिजे त्यांस ईश्वर कांहीं तरी उपायांनीं व विशेषेंकरून दिव्य दुतांच्या योगानें करीत असतो. आणि त्या भारी दुःखाच्या वेळेस ईश्वरानें दूत पाठवून ख्रीस्ताच्या मनुष्यपणाला बळदावें, हें विशेष योग्य होतें.

४४, ४५ मात्थी. २६:४२-४४ यांवर पाहा.

४६ आणि तो त्यांस ह्मणाला, झोंप कां घेतां? तुह्मीं परीक्षेंत येऊं नये ह्मणून उठून प्रार्थना करा. [1]

४७ असें तो बोलत आहे इतक्यांत पाहा, [2] समुदाय आला व यहूदा ह्मटलेला बारा जणांतील एक त्याच्या पुढें चालत होता, तो येशूचें चुंबन घ्यायास त्याजवळ आला.

४८ तेव्हां येशू त्याला बोलला, यहूदा, चुंबनानें मनुष्याच्या पुत्राला पराधीन करितोस काय?

४९ मग त्याकडले लोक काय होणार हें जाणून त्याला ह्मणाले, हे प्रभू, आह्मी तरवारीनें मारूं काय?

५० तेव्हां त्यांतील कोणीएकानें प्रमुख याजकाच्या चाकराला मारून त्याचा उजवा कान कापून टाकिला.

५१ तेव्हां येशूनें उत्तर दिल्हें कीं, एवढेंच होऊं द्या. मग त्यानें त्याच्या कानाला हात लावून त्याला बरें केलें.

५२ तेव्हां जे मुख्य याजक व देवळाचे सरदार व वडील येशूवर आले त्यांस तो बोलला, जसें लुटाऱ्यावर जातां तसें तुह्मी तरवार व सोटे घेऊन बाहेर आलां काय?

---

(१) लूक. २२:४०. (२) मात्थ. २६:४७; मार्क. १४:४३; यो. १८:३.

४७-५३ मात्थी. २६:४८-५६ यांवर पाहा.

४८ "चुंबनानें." इ० चुंबन ही ममतेची व मैत्रीची खूण आहे. धूर्त व दुष्ट यहुद्याला वाटलें कीं ही खूण उत्तम आहे, कारण त्याचें चुंबन घेतलें म्हणजे शिपायास तो कोण आहे हें समजेल, तरी माझा हेतु येशूला व सोबती शिष्यांस कळणार नाहीं. तो कसा फसला! तेव्हांच ख्रीस्तानें त्याचा दुष्ट हेतु पाहिला व त्याचा फार कडक निषेध केला. "यहुदा, चुंबनानें मनुष्याच्या पुत्राला पराधीन करितोस काय?" हा प्रश्न यहुदाच्या अंतःकरणांत तरवारीसारिखा विंधून भोसकला असावा. प्रत्येक शब्द जोरवान आहे. यहुदा, तूं जो माझा मित्र व शिष्य आहेस तो तूं मैत्रीचा धर्म मोडून घात करण्यास शत्रूंच्या स्वाधीन करितोस काय? मनुष्याचा पुत्र जो खरा मशीहा राष्ट्रांची आशा, जगाचा एकच तारणारा, त्याला तूं मरणास देतोस काय? आणि आपला दुष्ट हेतु झांकण्यास मैत्रीची खूण दाखवीत जातोस काय? विश्वासघात करून आपल्या अघोर अपराधावर माझें चुंबन घेऊन कपट करितोस काय? या प्रश्नाचा हरएक शब्द यहुदाच्या अंतर्यामीं विंधला असावा. न्यायकाळीं दुष्टांची जी झडती होईल तिजसारिखा ख्रीस्ताच्या या बोलण्यापेक्षां फार करून दुसरा कोणताहि निषेध या जगांत कधीं झाला नसेल.

५३ मी प्रतिदिवसीं तुमच्या बरोबर देवळांत होतों तेव्हां तुह्मीं मजवर हात टाकिले नाहींत; परंतु ही तुमची घटका [1] व अंधाराचा शक आहे.

५४ मग त्यांनीं त्याला धरून नेलें, व त्याला प्रमुख याजकाच्या घरीं आणिलें आणि पेत्रस दुरून मागें चालला.

५५ तेव्हां वाड्याच्या मध्यभागीं विस्तव पेटवून ते संगतीं बसले आणि पेत्रस त्यांच्या मध्यें बसला.

५६ आणि कोणीएक दासीनें [2] तो विस्तवाजवळ बसलेला पाहून त्याला न्याहाळून ह्मटलें, हाहि त्याच्या बरोबर होता.

५७ परंतु तो त्याला नाकारून बोलला, बाई, मी त्याला ओळखत नाहीं.

५८ मग कांहीं वेळानें [3] दुसरा एक त्याला पाहून बोलला, तूंहि त्यांतला आहेस. पेत्रस बोलला, माणसा, मी नव्हें.

५९ सुमारें एक तास झाल्यावर दुसरा कोणी [4] बजावून बोलला, निश्चयें हाहि त्याच्या बरोबर होता, कां कीं हा गालीली आहे.

६० तेव्हां पेत्रस बोलला, माणसा, तूं बोलतोस तें मला ठाऊक नाहीं. असें तो बोलत आहे इतक्यांतच कोंबडा ओरडला.

६१ मग प्रभूनें मुरडून पेत्रसाकडे दृष्टि लाविली, तेव्हां प्रभूनें जी गोष्ट त्याला सांगितली होती कीं, कोंबडा ओरडल्या अगोदर तूं तीन वेळां मला नाकारसील ती पेत्रसाला आठवली. [5]

६२ मग पेत्रस बाहेर जाऊन [6] फार दुःखी होऊन रडला.

६३ तेव्हां ज्या माणसांच्या [7] स्वाधीन येशू होता त्यांनीं फटके मारून त्याची थट्टा केली.

६४ आणि त्याचे डोळे बांधून त्याच्या तोंडावर मारिलें व त्याला विचारिलें कीं तुला कोणी मारिलें हें तूं भविष्यवादी असल्यास सांग.

---

(१) ईयो. २०:५; यो. १२:२७. (२) मात्थ. २६:६९; मार्क. १४:६,१७; यो. १८:१७. (३) मात्थ. २६:७१; मार्क. १४:६९; यो. १८:२५. (४) मात्थ. २६:७३; मार्क. १४:७०; यो. १८:२६. (५) मात्थ. २६:७३; मार्क. १४:७२; लूक. २२:३४. (६) गीत. १३०:१-४; १४३:१-४; इर्म. ३१:१८; यहेज्क. ७:१६; १ करिं. १०:१२; २ करिं. ७:१०,११. (७) मात्थ. २६:६७,६८; मार्क. १४:६५.

५४-६२ मात्थी. २६:५७-७५ यांवर पाहा.

६३-७१ मात्थी. २६:५७-६८ यांवर पाहा.

६५ आणि निंदा करून ते त्याच्या विरुद्ध बहुत दुसऱ्या गोष्टी बोलले.
६६ आणि दिवस उगवल्यावर [1] लोकांचे वडील व मुख्य याजक व शास्त्री मिळाले, आणि ते त्याला आपल्या न्यायसभेंत नेऊन बोलले,
६७ तूं ख्रीस्त आहेस काय? [2] आह्मास सांग. त्यानें त्यांस ह्मटलें, म्यां तुम्हास सांगितलें तरी तुह्मी विश्वास धरणारच नाहीं;
६८ आणि म्यां विचारिलें तरी तुह्मी मला उत्तर देणार नाहीं व सोडणारहि नाहीं.
६९ यापुढें मनुष्याचा पुत्र देवाच्या पराक्रमाच्या उजवीकडे [3] बसेल.
७० तेव्हां ते सर्व बोलले, तर तूं देवाचा पुत्र आहेस काय? तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, तुह्मी म्हणतां तो मी आहें.
७१ नंतर ते बोलले, आम्हास अणखी साक्षीची गरज काय? कां कीं आह्मीं स्वतां याच्या तोंडचें ऐकिलें आहे.

२३ अध्याय.— नंतर त्यांच्या सर्व मंडळीनें [4] उठून त्याला पिलातसाकडे नेलें.
२ मग ते त्याजवर दोष ठेवूं लागले [5] कीं, हा प्रजेला फितवितो [6] आणि मी ख्रीस्त राजा [7] आहें असें ह्मणून कैसराला पट्टी देणें [8] मना करितो, असा आम्हास अढळला.

---

(१) मात्थ. २७:१; प्रेषि. ४:२६-२८. (२) मात्थ. २६:६३; मार्क. १४:६१.
(३) इब्रि. १:३; ८:१; प्रग. ३:२१. (४) मात्थ. २७:२,११; मार्क. १५:१; यो. १८:२८.
(५) जख. ११:८. (६) लूक. २३:५. (७) यो. १८:३६;१९:१२.
(८) मात्थ. १७:२७; २२:२१; मार्क. १२:१७.

अध्याय २३.

१ मात्थी. २७:१,२ यांवर पाहा.

२ "प्रजेला फितवितो." हा दोषारोप अगदी खोटा होता तरी रोमी सरकाराला खरा वाटेल असी आशा त्यांनीं धरिली, कारण (१) गालीली लोक वारंवार बंडाळी उठवीत असत, असें योसेफस म्हणतो, आणि (२) बहुत समुदाय येशूच्या मागें जात असत, यावरून हा बंडखोर आहे असें दाखविण्यांत येईल ह्मणून त्यांस वाटलें. "मी ख्रीस्त राजा आहें." ते धूर्त्ततेनें हा दोषारोप योजतात. मी राजा आहें असें ख्रीस्तानें दाखविलें होतें खरें, आणि आपलें राज्य या जगाचें नव्हे असेंहि ह्मटलें होतें. परंतु ही रकम ते सरकारच्या लक्षांत आणीत नाहींत. कैसाराला पट्टी देणें ख्रीस्तानें मना केलें नव्हतें. हाहि आरोप खोटा होता. तथापि आपणाला राजा ह्मणविण्यावरून तो अर्थात् कैसराचा वैरी आहे असें दाखवायास ते पाहत गेले, आणि पिलातसाला हें खरें वाटेल

३ तेव्हां पिलातसानें त्याला विचारिलें कीं, तूं यहूद्यांचा राजा आहेस काय? मग त्यानें त्याला उत्तर दिल्हें कीं, [१] तूं म्हणतोस तसेंच.

४ नंतर पिलातसानें मुख्य याजकास व समुदायांस म्हटलें, मला या माणसाकडे [२] कांहीं दोष सांपडत नाहीं.

५ मग ते आग्रह धरून [३] बोलले कीं, तो गालीलापासून आरंभ करून एथपर्यंत अवघ्या यहूदांत उपदेश करीत लोकांस चिथावितो.

६ तेव्हां पिलातसानें गालीलाचें नाम ऐकून विचारिलें कीं, तो माणूस गालीली आहे काय?

७ मग तो हेरोदाच्या[४] अधिकारांतला आहे असें जाणून त्यानें त्याला हेरोदाकडे पाठविलें, तो तर त्या दिवसांमध्यें यरूशलेमांत होता.

८ मग हेरोद येशूला पाहून फार संतोष पावला, कारण कीं त्याविषयींच्या बहुत गोष्टी ऐकिल्यावरून तो त्याला पाहायास फार वेळ इच्छीत होता[५] आणि त्याकडून कांहीं चमत्कार होईल तो पाहावा, असी त्याला आशा होती.[६]

९ तेव्हां त्यानें त्याला बहुत गोष्टींविषयीं विचारिलें, परंतु त्यानें त्याला कांहींच[७] उत्तर दिल्हें नाहीं.

---

(१) तीम. ६:१३. (२) यो. १८:३८; १९:४; इब्रि. ७:२६; १ पेत्र. २:२२. (३) गीत. ५७:४.
(४) लूक. ३:१. (५) लूक. ९:९; मात्थ. १४:१; मार्क. ६:१४. (६) २ राज. ५:११.
(७) गीत. ३८:१३,१४; ३९: १,९; यश. ५३:७.

असी आशा धरीत गेले. "कैसराला." मिसर लोक आपल्या राजांस फारो ह्मणत, तसे रोमी आपल्या राजांस कैसर ह्मणत असत. "पट्टी" ह्मणजे कर अथवा वसूल.

३ मात्थ. २७:११ यावर पाहा.

४ "मला या माणसाकडे कांहीं दोष सांपडत नाहीं" पिलातसानें ख्रीस्ताला कचेरींत नेऊन त्याची बारीक चौकसी केल्यावर हें सांगितलें. या चौकसीवरून पिलातसाची खातरी झाली होती कीं ख्रीस्ताचें राज्य या जगाचें नाहीं. म्हणून तो कैसराविरूद्ध कांहीं करीत नाहीं. यो. १८:३३–३८ पाहा.

५–७ "ते आग्रह धरून बोलले." सरकारानें चौकसी करून हा ख्रीस्त निर्दोष आहे असें ठरविलें होतें, तरी ते दुष्ट याजक व शास्त्री मान्य होईनात. ते अधिक आग्रहानें दोष ठेवीत गेले. हा गालीली आहे असें समजून हेरोद जो गालीलाचा राजा त्याच्या प्रजेंतला हा आहे असें पिलातसानें मानिलें, ह्मणून त्याला हेरोदाकडे पाठविलें. हा महान हेरोदाचा आंतिपास नामक पुत्र ज्यानें योहान्न बाप्तिस्मा करणारा जिवें मारिला, तोच होता.

८–१० "फार वेळ इच्छीत होता."

१० तेव्हां मुख्य याजक व शास्त्री यांनीं उभे राहून आवेशानें त्याज-
वर दोष ठेविले.
११ आणि हेरोदानें आपल्या शिपायांसुद्धां त्याचा धिक्कार [1] व थट्टा
करून तेजस्वी वस्त्रें [2] लेववून माघारें पिलातसाकडे त्याला पाठविलें.
१२ त्याच दिवसीं पिलातस व हेरोद हे परस्पर मित्र झाले, [3] कां
तर पूर्वी त्यांचें परस्पर वैर होतें.
१३ मग पिलातसानें मुख्य याजकांस व अधिकाऱ्यांस व लोकांस
एकत्र बोलावून त्यांस म्हटलें,
१४ तुम्हीं हा माणूस लोकांस फितविणारा म्हणून मजकडे आणिला,
आणि पाहा, म्यां तुमच्या देखतां चौकसी केली असतां [4] ज्या गोष्टीचा
आरोप तुम्ही याजवर आणितां त्याविषयीं या माणसाकडे कांहीं दोष मला
सांपडला नाहीं.
१५ आणि हेरोदालाहि नाहीं; कां कीं त्याकडे म्यां तुम्हास पाठविलें,
आणि पाहा, यानें मरणदंडास योग्य कांहीं केलें नाहीं;

---

(१) यश. ४९:७;५३:३. (२) यो. १९:५. (३) प्रेषि. ४:२७. (४) लूक. २३:४.

ख्रीस्ताची कीर्त्ति पसरली होती म्हणून त्याला व त्याचे चमत्कार पाहावे असी इच्छा या दुष्ट राजानें धरिली. याची मनोभावना पाहून मुख्य याजक व शास्त्री ख्रीस्तावर दोष ठेवितांना अधिक आवेश दाखवूं लागले.

११ "तेजस्वी वस्त्रें." रोमी राजे किरमिजी वस्त्रें नेसत असत, ह्मणून पिलातसानें येशूला असला झगा घातला. यहुदी राजे पांढरी वस्त्रें नेसत असत, आणि हीं वस्त्रें रूपें वगैरे चकचकीत सामान त्यांत विणून त्यांस फार तेजस्वी करीत असत. योसेफस ह्मणतो कीं, आग्रिपानें नेसलीं तीं वस्त्रें एवढीं तेजस्वी होतीं कीं सूर्य प्रकाशला तेव्हां डोळे दिपावले व लोकांच्यानें त्याकडे पाहवेना. या दोघा राजांनीं आपापल्या चालीप्रमाणें त्याला निंदा व थट्टा करून राजकीय पोषाक घातला, परंतु हें अगदी गैर व कायद्याविरूद्ध होतें. त्याकडे किंचित् दोष सांपडला नसतां त्याचा असा अपमान करून त्यांनीं स्वतः अपराध केला.

१२ "हे परस्पर मित्र झाले." त्यांचें परस्पर वैर होतें, हें पिलातसानें गालिल्यांचा घात केल्यावरून (लूक. १३:१.) झालें असें बहुतेकांस वाटतें.

१३–१५ "यानें मरणदंडास योग्य कांहीं केलें नाहीं." ख्रीस्त निर्दोष होता याविषयींची ही साक्ष मनांत ठसण्यासारखी आहे. पिलातस आणि हेरोद या दोघांनीं चौकसी केली, आणि दोघे त्याला प्रतिकूळ होते असें दिसतें. असें असताहि दोघांची हीच साक्ष कीं त्याकडे अपराध अगदी सांपडत नाहीं. त्यासमोर मुख्य याजक व शास्त्री यांनीं ख्रीस्तावर आवेशानें दोष ठेविला होता आणि साध्य होईल तितका पुरावा

१६ यास्तव मी त्याला शिक्षा [१] करून सोडीन.
१७ अणखी त्याला त्या सणांत त्यांकरितां एकाला सोडावें लागत असे.
१८ तेव्हां सर्व एकदांच ओरडत बोलले, याला काढून टाक, आ-
ह्मासाठीं बारब्बाला सोड.
१९ तो बारब्बा तर नगरांत झालेला कांहीं दंगा व खून [२] यामुळें
बंदिशाळेंत घातला होता.
२० यास्तव पिलातस येशूला सोडण्याची इच्छा धरून फिरून त्यासीं
बोलूं लागला.
२१ परंतु ते ओरडत बोलले याला खांबीं दे.
२२ मग तो तिसऱ्यानें त्यांस बोलला, कां! त्यानें काय वाईट केलें आ-
हे! त्याकडे मरणास योग्य कांहीं दोष मला सांपडला नाहीं, यास्तव मी
त्याला शिक्षा करून सोडीन.
२३ परंतु ते फार आग्रह करून [३] त्याला खांबीं द्यावें ह्मणून मोठ्यानें
मागत होते; आणि त्यांचें व मुख्य याजकांचें बोलणें प्रबळ झालें.
२४ तेव्हां त्यांच्या मागण्याप्रमाणें [४] व्हावें ह्मणून पिलातसानें ठरविलें.
२५ आणि दंगा व खून यामुळें बंदिशाळेंत घातलेला जो त्यांनीं मा-
गितला होता त्याला त्यानें त्यांकरितां सोडिलें [५] व येशूला त्यांच्या इच्छे-
वर सोपून दिल्हें.

---

(१) यश. ५३:५. (२) प्रेषि. ३:१४. (३) गीत. २२:१२; लूक. २३:५. (४) निर्ग. २३:२. (५) प्रेषि. ३:१४.

त्यांनीं पुरविला तरी कांहींच अपराध ख्रीस्ताकडे सांपडला नाहीं.

१६ "त्याला शिक्षा करून सोडीन." ख्रीस्त निर्दोष असतां त्याला मरणदंड ठरवायाला जसा योग्य नव्हता, तसेंच त्याला शिक्षा करावी हेंहि योग्य नव्हतें. पिलातसाला फारकरून वाटलें असेल कीं त्याचा अपमान व शिक्षा केली ह्मणजे त्याचे दोषारोप करणारे तृप्त होतील आणि त्याला सोडायाला संधी मिळेल. परंतु याजक व शास्त्री हट्टबुद्धि धरून त्याचा जीव मागत गेले आणि त्यांस खुश करावें म्हणून पिलातसानें हा निर्दोष आहे असी खातरी असतांहि त्याला मरण सोसण्यास त्या दुष्ट लोकांच्या हातीं अन्यायानें दिल्हें. असें करून पिलातसानें आपल्या मनसाक्षेविरुद्ध अघोर अपराध केला.

१७ मात्थ. २७: १५ पाहा.
१८-२३ ,, २७: २०-२३ पाहा.
२३-२५ ,, २७: २६ पाहा.

२६ आणि ते त्याला नेत होते (१) तेव्हां कोणीएक शिमोन कुरेनेकर
रानांतून येत असतां त्यांनीं त्याला धरून त्यानें येशूच्या मागें खांब वाहावा
ह्मणून त्याजवर तो दिल्हा.
२७ आणि लोकांचा व बायकांचा मोठा समुदाय ह्याच्या मागें चा-
लला, त्यासाठीं त्या बडवून घेऊन शोक करीत होत्या.
२८ तेव्हां येशू त्यांकडे मुरडून बोलला, अहो यरूशलेमांतील कन्याहो,
मजसाठीं रडूं नका, तर आपणांसाठीं व आपल्या लेकरांसाठीं रडा.
२९ कां तर पाहा, असे दिवस (२) येत आहेत कीं त्यांत बोलतील, ज्या
वांझा व जीं पोटें प्रसवलीं नाहींत व ज्या थानांनीं पाजिलें नाहीं तीं धन्य.
३० तेव्हां ते डोंगरांस (३) ह्मणूं लागतील, आह्मावर पडा, व टेंक-
ड्यांस ह्मणतील, आह्मास झांका.
३१ कां कीं ओल्या झाडाला (४) असें करितात तर वाळलेल्यास
काय होईल?

(१) मात्थ. २७:३२; मार्क. १५:२१; यो. १९:१७. (२) मात्थ. २४:१९; लूक. २१:२३.
(३) यश. २:१९; हो. १०:८; प्रग. ६:१६; ९:६. (४) मीं. ११:३१; इर्म. २५:२९
यहेज्क. २०,४७; २१:४; १ पेत्र. ४:१७.

२६ मात्थ. २७: ३२ पाहा.

२७,२८ "आपणांसाठीं.........रडा." जीं संकटें व विपत्ति त्या लोकांस व यरूशालेमास प्राप्त व्हावयाचीं होतीं तीं लक्षून ख्रीस्तानें हें म्हटलें.

२९,३० "ते डोंगरांस म्हणूं लागतील." इ० एवढीं भारी दुःखें व हाल होतील ह्मणून ते असें ओरडून ह्मणतील. न्यायकाळीं-हि दुष्ट लोक तसें करतील म्हणून दर्शविलें आहे. प्रग. ६:१६,१७.

३१ "कांकीं ओल्या झाडाला असें करितात" इ० ही म्हण हलकें दुःख व भारी संकट यांचा भेद दर्शविण्यास वापरीत असत. या ठिकाणीं याचा अर्थ येणेंप्रमाणें समजावा कीं, आतां या स्वस्थतेच्या वेळेस मी निरपराधी आहे म्हणून ते कबूल होतात त्या मला जर असें करितात तर पुढें लढाईत गुंततील आणि तुमच्या शहराचा व राष्ट्राचा मोड करायास येतील तेव्हां किती भयंकर हाल व विपत्ति प्राप्त होतील? आतां झाड ओलें असतां लवकर पेटत नाहीं; त्या वेळेस वाळलेल्या झाडास आग लावण्यासारिखें होईल, म्हणजे लवकर पेटवून मोठी व भयंकर ज्वाळा होईल. तथापि यरूशालेमचा येणारा नाश लक्षून जरी ख्रीस्तानें हें म्हटलें तरी पुढें पाहून अपश्चात्तापी व अभक्त यांस जीं संकटें शेवटीं प्राप्त होणार तींहि लक्षून हें म्हटलें असेल, आणि या अर्थीं धारिली तर ही उपमा विशेष योग्य व जोराची असी आहे. या जगांत सर्वांहून कठीण जीं संकटें प्राप्त होतात तीं सर्वकाळचें दुःख व नाश यांच्या पुढें किती हलकीं आहेत! तर हा भेद दर्शविण्यास ही म्हण विशेष योग्य आहे.

३२ तेव्हां त्याच्या बरोबर मारण्यासाठीं दुसरे दोन अपराधीहि नेले.[1]

३३ मग ते कंवटी ह्मटलेल्या जागेंत आले, तेव्हां त्यांनीं तेथें त्याला व त्या अपराध्यांस, एकाला उजवीकडे व एकाला डावीकडे, असें खांबीं दिल्हें.

३४ येशू बोलला, हे बापा, [2] त्यांची क्षमा कर, कारण कीं ते काय करितात हें त्यांस समजत नाहीं. नंतर त्यांनीं चिह्या टाकून त्याचीं वस्त्रें वांटून घेतलीं.

३५ आणि लोक पाहत उभे राहिले, व त्यांसुद्धां अधिकारी उपहास [3] करीत बोलले, त्यानें दुसऱ्यांस तारिलें, तो देवाचा निवडलेला ख्रीस्त असला तर त्यानें आपणाला तारावें.

३६ आणि शिपायांनींहि जवळ येऊन त्याला आंब देऊन त्याची थट्टा केली कीं,

---

(१) यश. ५३:१२. (२) मात्थ. ५:४४; प्रेषि. ७:६०; १ करिं. ४:१२. (३) गीत. २२:७.

३२,३३ मात्थ. २७:३५,३८ पाहा.

३४ "हे बापा, त्यांची क्षमा कर." "त्यानें अपराध्यांसाठीं मध्यस्थपणा केला." हा भविष्यलेख (यशा. ५३:१२) ही प्रार्थना करून ख्रीस्तानें पूर्ण केला. जे त्याचा जीव घेत होते त्यांसाठीं त्यानें ही प्रार्थना केली. ते लोक काय करीत होते हें त्यांस समजलें नाहीं, खरें; आह्मी वधस्तंभीं देतों. हा वास्तविक खरा मशीहा व देव आहे असें त्यांस वाटलें नाहीं, खरें; तथापि हा निर्दोषी आहे हें त्यांस ठाऊक होतें, आणि ख्रीस्तानें पुरतें प्रमाण पटविलें होतें कीं मी खरा मशीहा आहें, म्हणून त्यांचा अपराध मोठा होता आणि यामुळें त्यांस व त्यांच्या संतानांस व देशास कठीण शासन प्राप्त झालें. ख्रीस्तानें ही प्रार्थना केली यावरून सिद्ध होतें कीं (१) आपल्या शत्रूसाठीं प्रार्थना करणें भाग आहे. (२) त्यांसाठीं मागणें तें हेंच कीं त्यांची क्षमा व्हावी व त्यांस सुबुद्धि मिळावी. (३) जे ख्रिस्ती नाहींत ते अकस बाळगितात व सूड उगवायास पाहतात. जे खरोखर ख्रिस्ती आहेत तेच मात्र आपल्या शत्रूसाठीं प्रार्थना करितात. तर यावरून ख्रिस्ती धर्माचें श्रेष्ठत्व दिसून येतें. (४) सर्वांहून मोठे अपराधी जे आहेत त्यांची देखील क्षमा ख्रीस्तानें केललें प्रायश्चित्त व मध्यस्थी यांकडून होण्याजोगी आहे. असले बहुत्येक तारण पावले असतील. प्रे. २:३७,४२, ४३; ६:७; १४:१ पाहा. "हें त्यांस समजत नाहीं." त्यांनीं अज्ञानपणानें केलें. प्रे. ३:१७. पाऊलस ह्मणतो "त्यांनीं जाणिलें असतें तर गौरवाच्या प्रभूला खांबीं दिल्हें नसतें. १ करिं. २:८. म्हणून त्यांनीं समजून खरा पश्चात्ताप केला तेव्हां ते क्षमा पावले. जर उमजून जाणून हा अघोर अपराध केला असता तर क्षमा पावले नसते. तरी प्रत्येक मनुष्य आपल्या अज्ञानपणाविषयीं कमी ज्यास्त दोषी आहे. जो खुशीनें अज्ञानी राहतो अथवा ज्ञान मिळविण्यास प्रयत्न बरोबर करीत नाहीं तो त्यावरून दोषी होतो.

३५–३९ मात्थ. २७:४१–४४ पाहा.

३७ तूं यहूद्यांचा राजा असलास तर आपणाला तार.
३८ आणि हेल्लेणी व रोमी व इब्री या अक्षरांनीं लिहिलेला असा पत्ता
त्याच्या वरतीं होता कीं, हा यहूद्यांचा राजा आहे.
३९ आणि त्या टांगलेल्या अपराध्यांतील एकानें [1] त्याची थट्टा
करून ह्मटलें, तूं ख्रीस्त असलास तर आपणाला व आह्मासहि तार.
४० परंतु दुसऱ्यानें उत्तर देऊन त्याला असें धमकाविलें कीं, तूं याच
दंडांत [2] असतां देवाचें भय अगदीं धरीत नाहींस काय? [3]
४१ आह्मी तर न्यायानें सोसितों खरें, कारण कीं आह्मीं जें केलें त्या-
चें योग्य फळ भोगितों, परंतु यानें कांहीं अयोग्य केलें नाहीं. [4]
४२ मग तो येशूला ह्मणाला, हे प्रभू, तूं आपल्या राज्यांत येसील
तेव्हां माझी आठवण कर. [5]

(१) लूक. १७:१४-२६. (२) इर्म. ५:३. (३) गीत. ३१:१. (४) १ पेत्र. १:१९. (५) गीत. १०६:४,५; रोम. १०:९,१०; १ करिं. ६:१०,११.

३८ मात्थ. २७:३७ पाहा.

३९ "अपराध्यांतील एकानें त्याची निंदा" इ० मात्थ. २७:४४ ह्मणतो कीं, "जे लुटारू......होते त्यांनींहि" इ० तर हीं वर्णनें मिळतील कशीं? असें जर कोणी विचारिलें तर आदीं दोघे लुटारू निंदा करूं लागले आणि मग हा वास्तविक खरा मशीहा आहे असी खातरी धरून पश्चात्ताप पावला, हें संभाव्य आहे; आणि मात्थीनें एका अंगीं असून एकाला निंदा करितांना दोघांचें एकासारिखें म्हणणें आहे असें समजून लिहिलें हेंहि संभाव्य आहे. एकाचें म्हणणें अथवा मत त्याच्या सोबत्यांचेंहि आहे असें वारंवार मोजलें आहे. मार्क. ७:१७,५:३१; मात्थ. १५: १५; लूक. ८:४५; ९:१३; यो. ६:८,९ पाहा. अनेक माणसांची साक्ष घेतांना सारांशाविषयीं सारिखी असली तर क्षुल्लक गोष्टीविषयीं फेरफार असला म्हणजे त्याची साक्ष अधिक विश्वासास योग्य आहे, कारण कीं त्यांनीं सामील होऊन एकोपा केला नाहीं असें सिद्ध होतें. "आपणाला व आम्हासहि तार." म्हणजे अमचा जीव वांचीव. आपल्या पापांची क्षमा आणि जीवात्म्यांचें तारण व्हावें म्हणून मागितलें असें कांहीं नाहीं. याचप्रमाणें बहुत लोक त्या संकटांत पडले म्हणजे संकटांपासून आपण तारलें जावें असी विनंति करितात, परंतु या लुटाऱ्यासारिखेंच कांहीं विश्वास न धरितां आणि अगदीं स्वार्थबुद्धीनें ते मागतात म्हणून ख्रीस्त ऐकत नाहीं.

४०, ४१ "देवाचें भय अगदीं धरीत नाहींस काय?" तूं दोषी असतां या निर्दोष्याची निंदा करून भीत नाहींस काय? लवकर हिशोब देणार आहेस तर कसें भीत नाहींस? आह्मी न्यायानें सोसतों, हा निरपराधी असून सोसतो.

४२ "हे प्रभु......माझी आठवण कर." याची प्रार्थना व दुसऱ्याची प्रार्थना यांचा मोठा भेद लक्ष्यांत ठेवण्याजोगा आहे. त्यानें अविश्वास व उपहास दाखविला. यानें खरा

४३ तेव्हां येशूनें त्याला ह्मटलें, मी तुला खचीत [1] सांगतों, तूं आज माझ्या संगतीं स्वर्गांत [2] असशील.

४४ तेव्हां सुमारें दुपार झाली होती, आणि तिसऱ्या प्रहरापर्यंत सर्व देशावर अंधार पडला.

४५ सूर्य अंधक झाला, व देवळांतील पडदा मध्यें फाटला.

४६ आणि येशू मोठ्यानें ओरडत बोलला, हे बापा, मी आपला आत्मा तुझ्या हातांत [3] सोंपून देतों; आणि असें बोलून [4] त्यानें प्राण सोडिला.

४७ तेव्हां शतपति झालेली गोष्ट पाहून देवाला गौरवून बोलला, खचीत हा माणूस नीतिमान होता.

४८ आणि जे समुदाय पाहण्याकरितां जमले होते ते अवघे झालेल्या गोष्टी पाहून आपले ऊर बडवून माघारे गेले.

---

(१) रोम. ५:२०,२१. (२) २ करिं. १२:४; प्रग. २:७. (३) गीत. ३१:५; १ पेत्र. २:२३. (४) मात्थ. २७:५०; मार्क. १५:३७; यो. १९:३०.

विश्वास व भरवसा व प्रीति दाखविली. यानें अगोदर ख्रीस्तानें केलेला उपदेश ऐकिला असेल, नाहीं तर याच वेळेस त्याच्या दृष्टीस पडलें व ऐकण्यांत आलें त्यावरून त्याची खातरी झाली कीं हा खरा मशीहा आहे. ख्रीस्ताला राज्यांत यायाचें होतें आणि त्याचें राज्य कसें होतें हें त्याला कसें कळलें याविषयीं आम्हांस ठाऊक नाहीं; पण कळलें असें त्याच्या बोलण्यावरून दिसतें.

४३ "तूं आज माझ्यासंगतीं स्वर्गांत असशील." त्या गरीब लुटाऱ्याची प्रार्थना किती लवकर ऐकण्यांत आली. ज्यांस वधस्तंभीं देत असत त्यांस मारायाला दोन तीन दिवस लागत असत. म्हणून हें बोलणें आश्चर्यकारक होतें. परंतु ख्रीस्तानें जाणिलें कीं हा लवकर मरेल व मजबरोबर सौख्यलोकांत येईल. स्वर्ग या शब्दाचा मूलार्थ सुखाचा भाग अथवा स्थान असा आहे. परलोकीं दोन स्थानें म्हणजे सुखाचें व दुःखाचें स्थान आहे, असें यहुद्यांचें मत होतें. तर ख्रीस्ताच्या या म्हणण्याचा अर्थ हाच आहे कीं आज तूं मजबरोबर सौख्यलोकांत होसील. आणि या गोष्टीवरून सिद्ध होतें कीं, १. आत्मा शरीरापासून वेगळा होऊन राहतो. त्यांचे आत्मे त्या दिवसीं स्वर्गांत असून त्यांचे देह थडग्यांत होते. २. देवाचे भक्त देहत्याग करितात तेव्हांच त्यांचे आत्मे सुखांत जातात. ३. त्या दोन लुटाऱ्यांपैकीं एकालाच मात्र ख्रीस्तानें हें वचन दिल्हें. दुसरा तर दुःखाच्या स्थानीं गेला असावा. लूका. १६:१९–३१ एथें पाहा. ४. तेथें असण्याचें जें विशेष सुख तें ख्रीस्ताच्या संगतीं असणें हेंच आहे. फिल. १:२३; प्रग. २१:२३;५:१–१४.

४४-४६ मात्थ. २७: ४५-५० यांवर पाहा.

४७-४९ ,, २७: ५२-५५ पाहा.

४९ तेव्हां त्याचे सर्व ओळखीचे व ज्या बायका त्याच्या मागें गाली-
लाहून आल्या होत्या त्या दूर [1] उभ्या राहून या गोष्टी पाहत होत्या.

५० आणि पाहा, यहूद्यांच्या अरिमथाई नगरांतला योसेफ नामें मनुष्य,
तो सभासद व चांगला व नीतिमान् असा होता;

५१ त्यानें त्यांच्या विचाराला व कामाला संमत दिल्हें नव्हतें व तो
स्वतां [2] देवाच्या राज्याची वाट पाहत होता;

५२ त्यानें पिलातसाकडे जाऊन येशूचें शरीर मागितलें.

५३ मग तें खालीं काढून तागाच्या वस्त्रानें गुंडाळलें व खडकांत
खोदलेल्या ज्या थड्यांत कोणी कधीं ठेविला नव्हता त्यांत तें ठेविलें. [3]

५४ तो तयारी करण्याचा [4] दिवस होता व शाब्बाथ लागणार होता.

५५ आणि ज्या बायका [5] गालीलाहून त्याच्या संगतीं आल्या होत्या,
त्यांनींहि पाठीमागें चालून तें थडें व त्याचें शरीर कसें ठेविलें तें पाहिलें.

५६ मग त्यांनीं माघारें जाऊन सुगंध द्रव्यें व सुगंध तेल हीं [6] तयार
केलीं. मग शाब्बाथ दिवसीं आज्ञेप्रमाणें त्या स्वस्थ राहिल्या.

२४ अध्याय.—आणि सप्तकाच्या [7] पहिल्या दिवसीं मोठ्या पहाटेस
त्या आपण तयार केलेलीं सुगंध द्रव्यें घेऊन थड्याकडे आल्या, व
त्यांसुद्धां दुसऱ्या कित्येक होत्या.

२ तेव्हां धोंड थड्यावरून लोटलेली असी त्यांनीं पाहिली.

३ आणि आंत गेल्यावर प्रभु येशूचें शरीर त्यांस मिळालें नाहीं.

४ आणि असें झालें कीं त्याविषयीं त्यांस भ्रांति पडली असतां पाहा
लखलखीत वस्त्रें ल्यालेले दोन मनुष्य [8] त्यांच्या जवळ उभे राहिले.

---

(१) गीत. ३८:११; १४२:४. (२) मार्क. १५:४२; लूक. २:२५,३८. (३) यश. ५३:९.
(४) मात्थ. २७:६२. (५) लूक. ८:२;२३:४९. (६) मार्क. १६:१; निर्ग. ३०:८-१०.
(७) मात्थ. २८:१; मार्क. १६:२; यो. २०:१. (८) यो. २०:१२; प्रेषि. १:१०; प्रग. १:१८.

---

४८ "झालेल्या गोष्टी पाहून." म्हणजे अंधार, भूमिकंप, ख्रीस्ताचीं दुःखें वगैरे पाहून. ऊर बडवून त्यांनीं मनाची खातरी व भयें दाखविलीं. आमचे अधिकारी फार दोषी आहेत आणि ईश्वरापासून भारी शासन लवकर प्राप्त होणार आहे असें त्यांनीं पाहिलें.

५०–५६ मात्थ. २७:५७–६१; मार्क. १५:४२–४७ यांवर पाहा.

अध्याय २४.

१–१२ मात्थ. २८:१–११ यांवर पाहा.

५ आणि त्या भिऊन तोंड भूमीकडे लावीत असतां त्यांस ते ह्मणाले, मेलेल्यांमध्यें जिवंताचा शोध तुह्मी कां करितां?

६ तो एथें नाहीं तर उठला आहे, तो गालीलांत होता तेव्हां त्यानें तुह्मास कसें सांगितलें [१] हें आठवा.

७ ते असें, मनुष्याच्या पुत्राला पापी माणसांच्या हातीं दिल्हें पाहिजे, व खांबीं दिल्हें पाहिजे, व तिसऱ्या दिवसीं फिरून उठलें पाहिजे.

८ तेव्हां त्यांनीं त्याचें बोलणें आठविलें;

९ आणि थडग्यापासून त्यांनीं माघारे येऊन अकरांस व वरकड सर्वांस त्या अवघ्या गोष्टी सांगितल्या.

१० आणि ज्यांनीं या गोष्टी प्रेषितांस सांगितल्या त्या मारया माग्दालीणी व [२] योहान्ना व याकोबाची आई मारया, व यांसुद्धा दुसऱ्या अशा होत्या.

११ परंतु त्याच्या गोष्टी त्यांस [३] गप्प अशा वाटल्या, व त्यांवर त्यांनीं विश्वास ठेविला नाहीं.

१२ तेव्हां पेत्रस [४] उठून थडग्याकडे धांवत गेला, व ओणवा होऊन त्यानें प्रेतवस्त्रें एकीकडे ठेविलेलीं, आणि झालेल्या गोष्टीविषयीं तो आश्चर्य करीत आपल्या घरीं गेला.

१३ आणि पाहा, त्याच दिवसीं त्यांतील [५] दोघे जण एम्माऊस नामें गांवास जात होते; तो यरूशलेमापासून तीन कोस लांब आहे.

१४ आणि ते त्या घडलेल्या सर्व गोष्टींविषयीं परस्पर संभाषण करीत होते.

---

(१) मात्थ. १६:२१; १७:२२; मार्क. ८:३१; ९,३१; लूक. ९:२२; यो. २:२२.
(२) लूक. ८:३. (३) उत्प. १९:१४; २ राज. ७:२; ईयो. ९:१६; गीत. १२६:१; प्रेषि. १२:२,१५. (४) यो. २०:३,६. (५) मार्क. १६:१२.

१३, १४ "त्यांतील दोघेजण" एकाचें नांव क्लयपास होतें. ओं० १८. हा याकोबाचा बाप अल्फी होता असें लैत्फुट डाक्तर साहेबानें दाखविलें आहे. मात्थ. १०:३ या दोघांतील दुसरा कोण होता याविषयीं प्रमाण नाहीं. लू. २४:३५ व १ करिंथ. १५:५ यांवरून कित्येकांस वाटतें कीं तो पेत्रस होता, पण या मताला पुरता आधार नाहीं. "एम्माऊस" या नांवाचे दोन गांव होते. एक तिबेरयस समुद्राजवळ होता आणि मागून त्याला निकापलिस असें म्हणत असत. हा एम्माऊस यरूशालेमापासून पश्चिमेस सुमारें तीन कोसांवर वसला होता, तेथें जातांना हे दोघे शिष्य झालेल्या गोष्टींविषयीं

१५ आणि असें झालें कीं ते संभाषण करीत [1] व विचारीत असतांना येशू स्वतां जवळ येऊन त्यांच्या बरोबर चालला.

१६ परंतु त्यांनीं त्याला ओळखूं नये ह्मणून त्यांचे डोळे आकळले होते. [2]

१७ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, तुह्मी चालतांना ज्या गोष्टी एकमेकांसीं काढून म्लानमुख होतां त्या कोणत्या?

१८ मग क्लयपास [3] नामें एकानें त्याला उत्तर दिल्हें कीं, तूं यरूशलेमांत प्रवासी असतां त्यांत या दिवसांमध्यें ज्या गोष्टी घडल्या त्या तुला एकल्यालाच ठाऊक नाहींत काय?

१९ तो त्यास ह्मणाला, कोणत्या? तेव्हां त्यांनीं त्याला ह्मटलें, येशू नाजारेथकर याविषयींच्या; तो माणूस देवाच्या व सर्व लोकांच्या समोर करण्यांत व बोलण्यांत पराक्रमी [4] भविष्यवादी झाला;

(१) मत्त. ३:१६; मात्थ. १८:२०; लूक. २४:३६. (२) यो. २०:१४,१५;२१:४.
(३) यो. १९:२५. (४) लूक. ७:१६; यो. ३:२; प्रेषि. २:२२;७:२२.

संभाषण करीत चालले. त्यांस किती दुःख वाटलें असेल. त्यांचा गुरु लोकांनीं सरकाराचा हुकूम मिळवून वधस्तंभीं दिल्हा होता, येणेंकरून त्यांची आशा भंग झाली होती. तरी त्या अंधाराचा व भूमिकंपाचा काय अभिप्राय असेल; शिवाय तो थडग्यांत नाहीं असी अवयी उठल्यावर काय समजायाचें, असे विचार त्यांच्या मनांत घोळत आले असावे.

१५ "विचारीत असतांना." हा वास्तविक आमचा मशीहा होता कीं काय? ते म्हणतात कीं, तो मेलेल्यांतून उठला आहे, हें खरें असेल काय? असले विचार ते करीत गेले असतील. "येशू स्वतां जवळ येऊन" त्यांचा अंदेशा दूर करायाला व त्यांचा विश्वास बळवायाला ख्रीस्त आला. जे नम्रतेनें व बुद्धीनें सुमार्ग शोधितात त्यांस तो वाट दाखवील.

१६,१७ "त्यांचे डोळे आकळले होते." ह्मणजे त्यांनीं त्याला ओळखिलें नाहीं. न ओळखावें म्हणून कांहीं चमत्कारिक बळ त्यांवर आणिलें होतें असें समजायाचें नाहीं. ख्रीस्त दुसऱ्या रूपानें आला (मार्क. १६:१२) आणि तो दृष्टीस पडेल असें त्यांस वाटत नव्हतें, म्हणून हा वास्तविक तोच आहे असी खातरी व्हायाला बळकट प्रमाण पाहावें लागलें. "त्या कोणत्या." काय झालें आहे कीं तुह्मी एवढे दुःखित झालां?

१८,१९ "तूं ...... प्रवासी असतां." इ० यहुदी चहुंकडून या सणास यरूशालेमांत येत असत; परंतु ख्रीस्ताची गोष्ट एवढ्या प्रसिद्धपणें झाली होती कीं सर्वांस कळली असें त्यांस वाटलें; म्हणून त्यांनीं त्याला विचारलें, "तुला एकव्यालाच कळली नाहीं हें कसें?" "पराक्रमी भविष्यवादी झाला." मशीहा असें त्यांनीं त्याला म्हटलें

२० त्याला तर आमच्या मुख्य याजकांनीं [1] व अधिकाऱ्यांनीं मरण-
दंडासाठीं पराधिन करून खांबीं दिल्हें.
२१ परंतु आह्मी आशा धरीत होतों कीं, जो इस्राएलाची खंडणी
करणार तो हाच आहे [2]; अणखी या अवघ्यांशिवाय या गोष्टी घडून
आज तिसरा दिवस चालला आहे.
२२ अणखी आमच्यांतील कित्येक बायकांनींहि [3] आह्मास थक के-
लें, त्या मोठ्या पहांटेस थड्याकडे गेल्यावर त्याचें शरीर त्यांस मिळालें
नाहीं.
२३ तेव्हां त्यांनीं येऊन सांगितलें कीं, दुतांनीं आह्मास दिसून तो
जीवंत आहे असें ह्मटलें.
२४ मग आमच्या बरोबरच्या माणसांतील कित्येक [4] थड्याकडे
गेल्यावर, बायकांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांसहि अढळलें, परंतु त्यांनीं त्याला
पाहिलें नाहीं.
२५ मग तो त्यांस ह्मणाला, [5] अहो निर्बुद्धि, व भविष्यवाद्यांनीं ज्या
गोष्टी सांगितल्या त्या सर्वांवर विश्वास धरण्यास मतिमंद हो,

---

(१) लूक. २३:१; प्रेषि. १३:२७,२८. (२) लूक. १:६८; प्रेषि. १:६. (३) लूक. ९:१०.
(४) लूक. २४:१२. (५) इब्रि. ५:११,१२.

नाहीं. कारण तो मरण पावल्या वरून त्यांस संशय वाटूं लागला. तरी त्यानें केलेले चमत्कार व उपदेश यांवरून तो वास्तविक देवापासून आला असा बळकट विश्वास ते धरीत गेले.

२०–२३ अध्यायांत वर्णिल्या प्रमाणें.

२१ "आशा धरीत होतों." तो खरा मशीहा असें आह्मांस वाटत होतें. पण तो मेला–तरी त्यानें कसे केवढे चमत्कार केले–केवढा पराक्रम दाखविला–बहुत चमत्कारिक गोष्टी झाल्या—शिवाय "आज तिसरा दिवस—" कितीएक थड्याकडे जाऊन येऊन बोलले कीं तो थड्यांत नाहीं; आणि आम्हास आठवण आहे, कीं, मी तिसऱ्या दिवशीं उठेन म्हणून तो बोलला: तर कसें काय समजावें हें सुचत नाहीं, हें भलें व निष्कपट बोलणें आहे. यावरून शिष्यांनीं कांहीं एकोपा केला नाहीं, कांहीं संमत करून घेतलें नाहीं असें किती चांगलें प्रमाण पटतें.

२२,२३ मात्थ. २८:१—७. "दुतांनीं" यो. २०:१२ पाहा.

२४ "कित्येक." म्हणजे पेत्रस व योहान्न. लू. २०:२–९.

२५ "निर्बुद्धि." म्हणजे अविचारी, असमंजस. ख्रीस्तानें त्यांस पूर्वीं सांगितलें होतें तें त्यांनीं मनांत ठेवून बरोबर समजून घेतलें नव्हतें म्हणून त्यानें त्यांस निषेधिलें. "मतिमंद हो." भविष्यवाद्यांनीं लिहून ठेविलें होतें तें बरोबर लक्ष्यांत आणिलें असतें

२६ ख्रिस्तानें हीं दुःखें सोसून आपल्या गौरवांत जावें [1] याचें अगत्य
नव्हतें काय?

२७ मग त्यानें मोशे [2] व सर्व भविष्यवादी [3] यांपासून आरंभ क-
रून सर्व शास्त्रांतील आपल्या विषयींच्या गोष्टी त्यांस समजाविल्या.

२८ आणि ज्या गांवास ते जात होते त्याजवळ आले तेव्हां त्यानें पुढें
जाण्याचा रोख [4] दाखविला;

२९ परंतु ते त्याला आग्रह करून ह्मणाले, आमच्या संगतीं राहा,
कारण कीं सांज जवळ आहे व दिवस उतरला आहे. मग तो त्याच्या
बरोबर राहायास आंत गेला.

३० आणि असें झालें कीं तो त्यांबरोबर जेवायास बसला असतां त्या-
नें भाकर घेऊन [5] आशीर्वाद मागितला व मोडून त्यांस दिल्ही.

---

(१) लूक. २४:४६; प्रेषि. १७:३; इब्रि. ९:२२,२३; १ पेत्र. १:३,११. (२) लूक. २४:४४; प्रेषि. ३:२२. (३) प्रेषि. १०:४३;२६:२२. (४) उत्प. ३२:२६; मार्क. ६:४८. (५) मात्थ. १४:१९.

तर तुम्ही समजलां असतां कीं ख्रीस्ताची तसी गत व्हायाची होती.

२६,२७ "याचें अगत्य नव्हतें काय?" ख्रीस्ताला दुःखें लागतील व जीव द्यावा लागेल असें भविष्यवाद्यांनी लिहिलें आहे, तर तें पूर्ण व्हावें व देवाचा न्याय प्रगट व्हावा म्हणून असें सोसण्याचें अगत्य पडलें. "मोशे." ह्मणजे जुन्या करारांतील मोश्यानें लिहिलेले ग्रंथ. "भविष्यवादी." ह्मणजे भविष्यवाद्यांनीं लिहिलेले ग्रंथ, परंतु मोहोगम सगळा जुना करार असें आहे. शास्त्र त्या वेळेस छापलें नव्हतें, हातांनीं लिहिलेलें होतें. "आपल्या विषयींच्या गोष्टी." ह्मणजे मशीहा विषयींच्या गोष्टी. त्यानें, मीच तो मशीहा आहें, ह्मणून सांगितलें असें दिसत नाहीं; परंतु खऱ्या मशीहानें दुःख सोसावें, जीव द्यावा, थड्यांत उतरावें व मेलेल्यांतून उठावें याचें अगत्य आहे असें त्यानें शास्त्रवाक्य काढून दाखविलें. तर जरी तो मेला तरी तो मशीहा नाहीं असें समजायाचें नाहीं, तर यावरून अधिक बळकट पुरावा होतो कीं तो मशीहा आहेच आहे. या शास्त्रवाक्यांतलीं, उत्प. ३:१५; अनु. १८:१५; उत्प. ४९:१०; गण. २१:८,९; यो. ३:१४; यश. ५३; दान. ९:२५–२७; यश. ९:६,७; गीत. ११०; १६; २२; गल. ४:२–६ पाहा.

२८,२९ "पुढें जाण्याचा रोख दाखविला." तोंड पुढें ठेविलें आणि त्यांनीं आग्रह केला नसता तर तो पुढें गेला असता. परंतु त्यानें सांगितलें होतें तें त्यांच्या अंतःकरणांस लागलें होतें आणि अनेक ऐकण्याची इच्छा उद्भवली होती, ह्मणून त्यांनीं त्याला राहायाला आग्रहानें आमंत्रण केलें. एथें पाहुणचार केल्याचा काय चांगला परिणाम झाला तो पाहा.

३०,३१ "भाकर घेऊन." इ० तो पूर्वी करीत असे त्याचप्रमाणें आतां करूं लागला.

३१ तेव्हां त्यांचे डोळे मोकळे झाले व त्यांनीं त्याला ओळखिलें, मग
तो त्यांस अदृश्य झाला.

३२ नंतर ते एकमेकांस ह्मणाले, तो वाटेंत आह्मासीं बोलत होता व
आह्मासाठीं शास्त्र उघडें करीत होता तेव्हां आमचें अंतःकरण आह्मा-
मध्यें [१] जळत होतें कीं नाहीं?

३३ तेव्हां त्याच घटकेस ते उठून यरूशलेमास माघारे गेले, आणि
अकरा जण व त्यांच्या संगतीचीं माणसें एकत्र मिळालेलीं, त्यांस अढ-
ळलीं.

३४ व सांगूं लागलीं कीं, प्रभु उठला आहे खरा, व शिमोनाला दि-
सला आहे. [२]

३५ मग त्यांनीं वाटेंतील गोष्टी व तो भाकर मोडते वेळेस आपण
कसा ओळखला, हें सांगितलें.

---

(१) गीत. ३९:३; इर्म. २०:९; २३:२९. (२) १ करिं. १५:५.

यावरून त्यांस समजलें कीं हा आमचा गुरू आहे. "त्यांचे डोळे मोकळे झाले." ह्मणजे त्यांनीं जें पाहिलें व ऐकिलें त्यावरून त्यांची खातरी झाली कीं हा आमचा प्रभु व तारणारा आहे. तो वास्तविक मेलेल्यांतून उठला आहे. "तो त्यांस अदृश्य झाला." ते आश्चर्यानें व्याप्त होते इतक्यांत तो त्यांस सोडून गेला असें दिसतें.

३२ "आमचें अंतःकरण आह्मांमध्यें जळत होतें कीं नाहीं?" त्यानें सांगितलें तें किती गोड वाटलें, मनांत कसें ठसलें, असें कीं आमचें अंतःकरण जळत व फार उत्तेजन पावत होतें. याचें कारण त्यांस आतां समजलें. तेव्हांपासून आजपर्यंत सर्व खऱ्या भक्तांच्या अनुभवास तसेंच आलें आहे कीं, जेव्हां खीस्ताजवळ असतों व त्यासीं जवळचा सहवास व संघटण ठेवितों आणि आह्मांसाठीं त्यानें कसें दुःख सोसिलें व जीव दिल्हा याविषयीं मनन करितों तेव्हां आमची त्यावरील अधिक प्रीति पेटती आणि आमचें अंतःकरण पापाबदल अधिक पस्तावा करून अधिक नरम व प्रेमळ होतें. हें वर्णन किती साधें, भोळें, सवघड, सुंदर, रसिक, निष्कपट मनांत ठसण्यासारिखें व त्यांच्या खरेपणाविषयीं खातरी करण्याजोगें आहे.

३३ "त्याच घटकेस." रात्र पडली होती व मुक्काम झाला होता, तरी प्रभु भेटल्यावरून एवढा आनंद झाला कीं लवकर जाऊन सोबती शिष्यांस सांगावें असें त्यांस वाटलें. "अकरा जण." यहुदा मेला होता. बाकीचे अकरा जमले होते, यावरून सिद्ध होतें कीं एम्माऊसाला गेले ते दोघे शिष्य प्रेषितांतले नव्हते.

३४,३५ "व सांगूं लागलीं." अकरा प्रेषित सांगूं लागले. हे त्यांस सांगायाला आले पण ते प्रथम यांस सांगूं लागले. "शिमोनाला दिसला आहे." शिमोन ह्मणजे पेत्रस याला कोणत्या घटकेस दिसला हें कळण्यांत आलें नाहीं. इतर प्रेषितांस दिसला यांच्या अगोदर पेत्रसाला दिसला असें पाऊलसानें दाखविलें आहे. १ करिं. १५:५.

३६ आणि ते या गोष्टी सांगत असतां [१] येशू स्वतां त्यांच्यामध्यें
उभा राहिला, व त्यांस ह्मणाला, तुह्मास शांति असो.
३७ परंतु ते घाबरले, व भयभीत होऊन आपण आत्मा पाहिला असें
त्यांस वाटलें. [२]
३८ मग त्यानें त्यांस ह्मटलें, तुह्मी कां घाबरलां व तुमच्या अंतःकर-
णांत कल्पना कां उठतात?
३९ माझे हात व माझे पाय पाहा, कीं मी स्वतां आहें मला चांचपून पाहा
कां कीं मला मास व हाडें आहेत ह्मणून पाहतां, तसीं आत्म्याला नाहींत.
४० तेव्हां हें बोलून त्यानें आपले हात व पाय त्यांस दाखविले.
४१ तोंपर्यंतहि ते आनंदामुळें [३] विश्वास न ठेवून आश्चर्य करीत
त्यानें त्यांस ह्मटलें, एथें तुह्माजवळ कांहीं खायाला आहे काय? [४]
४२ मग त्यांनीं त्याला भाजलेल्या मास्याचा तुकडा व मोहळाचें कां-
हीं दिल्हें.
४३ तेव्हां त्यानें घेऊन त्यांच्या देखतां [५] खाल्लें.

---

(१) मार्क. १६:१४; यो. २०:१९. (२) मार्क. ६:४९. (३) उत्प. ४५:२६. (४) यो. २१:५. (५) प्रेषि. १०:४१.

३६,३७ "येशू स्वतां त्यांच्यामध्यें उभा राहिला." प्रेषितांनीं एकत्र मिळून यहुद्यांच्या भयामुळें दारें बंद केलीं होतीं तेव्हां तो आला. यो. २०:१९. दारें बंद केलीं असतांहि तो अकस्मात् दिसला ह्मणून ते घाबरले. "तुह्मास शांति असो." हें क्षेम बोलणें त्यांमध्यें रूढांत होतें. उत्प. ४३:२३. हें येशूला विशेष योग्य होतें कारण मेल्या अगोदर त्यानें त्यांस म्हटलें होतें कीं, "मी आपली शांति तुम्हास देतों." यो. १४:२७. आणि यावेळेस ते यहुद्यांचे फार भय धरीत होते.

३८ "कल्पना कां उठतात?" अंदेशा. हा वास्तविक आमचा प्रभु कीं काय? याविषयीं त्यांनीं संशय धरल्यामुळें तो त्यांस निषेधितो, कारण मशीहा जीव देईल व मेलेल्यांतून उठेल असें भविष्यलेखान लिहिलें होतें. त्यानें स्वतां असें त्यांस अनेक वेळ सांगितलें होतें; आणि तो खरोखर उठला आहे, यास पेत्रसाची व दुतांची साक्ष त्यांस मिळाली होती. तर अद्यापि अंदेशा धरीत जावें यांत पाप व दोष आहे असें मानून ख्रीस्तानें त्यांस निषेधिलें.

३९–४३ "माझे हात व माझे पाय पाहा." त्यांस पक्कें पूर्ण प्रमाण तो पटवीत गेला, हातपायांतल्या जखमा दाखवून, मला हात लवून पाहा, असें बोलला, व त्यांच्या देखतां त्यानें कांहीं खाल्लें, त्याची खातरी व्हावी ह्मणून. यो. २०:२७ पाहा. यावरून सिद्ध होतें कीं आत्मा देहविरहित जगूं, असूं शकतो, परंतु त्याला मास व हाडें नाहींत, आणि खायाला येत नाहीं.

४१,४२ "आनंदामुळें विश्वास न ठेवून." या वाक्यावरून शिष्यांच्या खऱ्या मनोभावना

४४ नंतर त्यानें त्यांस ह्मटलें, मी तुमच्या बरोबर होतों तेव्हां ज्या गोष्टी तुह्मास सांगितल्या त्या [१] याच कीं, मोश्याच्या नेमशास्त्रांत व भविष्यवाद्यांत [२] व गीतांमध्यें [३] मजविषयींच्या सर्व लिहिलेल्या गोष्टी पूर्ण झाल्या पाहिजेत. [४]

४५ तेव्हां त्यांनीं शास्त्र समजावें ह्मणून त्यानें त्याचें मन उघडिलें;

४६ मग त्यांस ह्मटलें, असें लिहिलें व असें अगत्यहि होतें कीं, ख्रीस्तानें सोसावें, [५] व तिसऱ्या दिवसीं मेलेल्यांमधून उठावें, [६]

४७ आणि यरूशलेमापासून आरंभ करून सर्व राष्ट्रांस पश्चात्ताप व पापांची क्षमा [७] त्याच्या नांवानें गाजविण्यांत यावी.

---

(१) मात्थ. १६:२१. (२) लूक. २४:२७. (३) गीत. २२:११. (४) लूक. २१:२२; प्रेषि. ३:१८; १३:२७,२६. (५) यश. ६३:२,५; प्रेषि. ४:१२. (६) १ पेत्र. १:३. (७) प्रेषि. ५:३१; १३:२८.

दिसून येतात. ख्रीस्त वास्तविक मेलेल्यांमधून उठला आहे असें ऐकण्यांत पाहण्यांत आलें तेव्हां एवढी आनंदकारक गोष्ट खरी होईल कसी? असें त्यांस वाटलें आणि पक्का पुरावा पाहिल्याशिवाय ते विश्वास धरिनात.

४२,४४ "मी तुमच्याबरोबर होतों." ह्मणजे वधस्तंभीं दिल्ह्या अगोदर. "ज्या गोष्टी तुह्मास सांगितल्या त्या याच. मार्क. १०:३२,३४ वगैरे. "नेमशास्त्रांत." ह्मणजे जुन्या करारांतलीं पहिलीं पांच पुस्तकें. हीं शास्त्राचा पहिला भाग आहे असें यहुदी मानीत असत. "भविष्यवाद्यांत." हा शास्त्राचा दुसरा भाग. यांत यहोशवा, न्यायाधीश, १ व २ शमुवेल, १ व २ राजे यांस पूर्वीचे भविष्यवादी ह्मणत असत आणि, यशाया, इर्मीया, यहेज्केल. व शेवटलीं बारा पुस्तकें ह्मणजे योशेहा–मलाखी; यांस मागले भविष्यवादी ह्मणत असत. गीतांमध्यें गीतांबरोबर ते नीति, इयोब, उपदेशक शलमोनाचें गीत, रूथ, इर्मयांचा विलाप, एस्थेर, दानीयल, एज्रा, नहेम्या, १ व २ काळवृत्तांत शास्त्राचे हे तीन विभाग प्राचीन काळीं केळे होते. या तीन भागांमध्यें ख्रिस्ताविषयीं भविष्यवचनें लिहून ठेविलीं होतीं. त्याच्या मेलेल्यांतून उठण्याविषयीं गीत. १६:९–११ एथें पाहा, आणि त्याचा अर्थ प्रेषि. २:२४–३२ व १३:३५–३७ एथें पाहा.

४५,४६ "त्यांचें मन उघडिलें." शास्त्रांत मशीहा विषयीं लिहून ठेविलें आहे तें सर्व आतां पूर्ण झालें आहे, तर हा खरा मशीहा असावा आणि वास्तविक मेलेल्यांमधून उठला आहे असी त्यांची पक्की खातरी झाली. मनांतली भ्रांती, भ्रम इत्यादिकांवरून बहुत गोष्टी आतां समजत नाहींत, त्या गोष्टी घडल्यावर समज पडेल, मग आम्हीं किती मंद होतों ह्मणून वाटेल. आह्मी देवाची गोष्ट समजावी म्हणून त्याचें साह्य मागावें. प्रेषि. १६:१४; याक. १:२१; मार्क. १०:१५. "असें अगत्य होतें." शास्त्रलेख पूर्ण व्हावे ह्मणून, आणि पापाबद्दल प्रायश्चित्त केलें जावें ह्मणूनहि असें अगत्य होतें.

४७ "पश्चात्ताप." यांत पापाचा खेद व

४८ आणि या गोष्टींचे साक्ष तुह्मी आहां.[१]

४९ आणि पाहा मी आपल्या बापाचें वचन तुह्मावर पाठवितों, परंतु
तुह्मी वरून सामर्थ्य [२] अंगीं ल्याल तोंपर्यंत यरूशलेम नगरांत राहा.

५० नंतर तो त्यास बेथानीपावेतों बाहेर घेऊन गेला, तेव्हां त्यानें आ-
पले हात वर करून त्यांस आशीर्वाद दिल्हा.

५१ आणि असें झालें कीं तो त्यांस आशीर्वाद देत असतां त्यांपासून
वेगळा झाला व तो आकाशांत वर घेतला गेला. [३]

५२ तेव्हां ते त्याला नमन [४] करून मोठ्या आनंदानें यरूशलेमास
माघारे गेले.

---

(१) प्रेषि. १:८. (२) यश. ४४:३; योह. २:२८; प्रेषि. २:१–२१; १:८. (३) प्रेषि. १:९; इब्रि. ४:१४. (४) मात्थ. २८:९,१७.

त्याग हीं दोन्ही येतात. सर्व माणसें पापी अ-सतां सर्वांस पश्चात्ताप केला पाहिजे असें घोषण करायास योग्य आहे. प्रे. १७: ३०. "पा-पांची क्षमा." जे कोणी पश्चात्ताप करतील व पाप सोडतील त्या सर्वांस पापांची क्षमा होईल असें ख्रीस्ताच्या अधिकारानें जगाला प्रसिद्ध केलें आहे. यरूशालेमांत ज्या लोकांनीं ख्रीस्ताला वधस्तंभीं दिल्हें त्यांस आधीं ही गोष्ट गाजविली होती, आणि असें करून ख्रीस्तानें आपली अत्यंत दया दाख-विली. परंतु तेव्हांच त्यानें आपल्या मनाचा उद्देश दाखविला कीं सर्व राष्ट्रांस गाजविली जावी.

४८,४९ "या गोष्टींचे साक्ष." माझें ज-गांत येणें, दुःख सोसणें, मरणें, मेलेल्यांतून उठणें, या सर्व गोष्टींचे साक्ष तुम्ही आहां, अवघ्या जगांत जाऊन या गोष्टींविषयीं साक्ष द्यावी, हें त्यांचें काम होतें. तसेंच सांप्रत-काळीं, इतर लोकांनीं पश्चात्ताप करावा व विश्वास धरून तारण पावावें म्हणून ख्रीस्ता-च्या सर्व शिष्यांनीं या गोष्टी सांगाव्या व साक्ष पटवीत जावें. "आपल्या बापाचें वच-न." मात्थ. १०:१९; यो. १४:१६,१७,२६; योएल. २:२८:२९ हेंहि पाहा व याच्या ब-रोबरीस प्रेषि. २:१६-२१ लावून पाहा. "वरून सामर्थ्य" वेगवेगळ्या भाषांनीं बोल-ण्याचें व अनेक चमत्कार करण्याचें साम-र्थ्य. हें पन्नासाव्या दिवसीं पवित्र आत्म्याच्या योगानें पूर्ण झालें. प्रेषि. २:

५०,५१ "बेथानी पावेतों." मात्थ. २१: १; मार्क. १६:१९. मार्था, मार्या व लाजार-स बेथानीस राहत असत. तेथें जायाला येशूला आवडत असे, व तेथून तो वर आ-काशांत गेला. प्रेषि. १:१२. "आशीर्वाद देत असतां." आशीर्वाद द्यावा ह्मणून ख्री-स्त अवतरला, तो जग सोडून गेला तोंवर तो आशीर्वाद देत गेला, आणि आतांहि आ-म्हा गरीब पाप्यांवर आशीर्वाद द्यायास व आम्हांस तारायास तो तयार आहे.

५२ "ते त्याला नमन करून" इ० नमन या शब्दावरून ईश्वरी भजन असें समजलें पाहिजे. तो त्यांस सोडून अदृश्य झाल्यावर त्यांनीं हें नमन केलें. हा आ-मचा खरा मशीहा आहे, असी त्यांची पूर्ण

५३ आणि ते नित्य देवळांत देवाची स्तुति व गौरव करीत असत. (१)
आमेन.

(१) प्रेषि. २:४६,४७; ५:४२.

खातरी झाली होती म्हणून हा देव आहेच असे मानून त्यांनीं त्याचें भजन केलें.

५३ "ते नित्य देवळांत." इ० पन्नासावा दिवस आला तोंवर प्रेषि. २ हा वास्तविक आमचा खरा मशीहा आहे, भविष्यलेखाप्रमाणें त्यानें येऊन पापाबद्दल प्रायश्चित्त केलें व आम्हांस खंडून घेतलें आहे, असीं जीं पूर्ण पक्कीं प्रमाणें व पुरावा झालीं होतीं त्याविषयीं विशेषेंकरून ते देवाची स्तुति व गौरव करीत असत.

BOMBAY: PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS, BYCULLA.